

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

# मूर्तिमंत भागवत

।। श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।।



## प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर

# मूर्तिमंत भागवत

संपादक

डॉ. वासुदेव व्यं. देशमुख

श्रीसद्गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर समग्र लेखन समिति
श्रीवासुदेव निवास, पुणे - ४.

**प्रकाशक**

श्रीसद्‌गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर
समग्र लेखन समिती
श्रीवासुदेव निवास
४२/१७ एरंडवणे, कर्वे रोड, पुणे - ४.

**संपादक**

डॉ. वासुदेव व्यं. देशमुख

**प्रकाशन दिन**

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज पुण्यतिथी
फाल्गुन शु १४ शके १९२९
गुरुवार दि. २० मार्च, २००८

**मुद्रक**

प्रवरा ट्रेडर्स
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे - ५१

**मूल्य रु. ११०/-**

©. सर्व हक्क श्रीवासुदेवनिवास विश्वस्त मंडळ यांचेकडे सुरक्षित

## श्रीसद्गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर समग्र लेखन समिती

श्रीवासुदेव निवास
४२/१७ एरंडवणे, कर्वे रोड, पुणे - ४.

**प. पू. श्री नारायणकाका ढेकणे महाराज**
(अध्यक्ष) प्रधान विश्वस्त, वासुदेवनिवास, पुणे

**पू. श्री. मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर**
कार्याध्यक्ष

**विश्वस्त श्री. सुभाष दामले**
कोषाध्यक्ष

**सन्माननीय सदस्य**
पू. डॉ. रा.ल.जोशी, डॉ. वा.व्यं.देशमुख,
पू. श्री.शरदराव जोशी, श्री.बाळासाहेब कुलकर्णी,
श्रीमती नीलाताई जोशी, श्रीमती सुशीलाताई मोडक,
श्रीमती आशाताई धारप, पू.प्र.ना.दीक्षित,
श्री.श्रीपादराव आघारकर, विश्वस्त, श्री.कमलाकर देशपांडे



# आशीर्वाद

ॐ

पब्लिक ट्रस्ट नं. ए-१३११

# श्री स्वामी जगद्गुरू शंकराचार्य पीठ करवीर

१२११ 'डी' वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर. दूरध्वनी : (०२३१) २५४१४५४ सर्वजित्

~~माघ कृ. १०/१९२९~~

जावक नंबर

तारीख : रविवार २/३/०८

श्री. प्रकाशक

श्री. प.पू. दत्तमहाराज कवीश्वर समग्र चरित्र लेखन समिती.

पीठस्थ देवतांचे उत्तम आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण.


'आपण करीत असलेले प्रकाशन "प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर व मूर्तिमंत भागवत" संकल्प आवडला. प.पू. श्री दत्तमहाराजांचे जीवनचरित्रच या द्वारे उभे राहणार आहे. भगवंताच्या स्मरणात कसे रहावे, धर्माचे आचरण कसे असावे, तसेच सर्वसमावेशक कसे असावे इ. सर्व पैलू या जीवनचरित्रात येतील व ते साधकांना मार्गदर्शक ठरतील.

हे कार्य लवकरच पूर्णत्वास जावो, ही पीठस्थ देवतांच्या चरणी प्रार्थना.

पुनश्च एकदा पीठस्थ देवतेंचे अनेक आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण.

महानुशासनम् वर्तिर्ति.

श्री. जगद्गुरु शंकराचार्य,
करवीर पीठ, कोल्हापूर



## आशीर्वाद

**तुझे तेज अंगी शतांशे जरीही**
**उजाळून देऊ दिशा दाही-दाही।**

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे अनन्य साधारण चरित्र संकलन व संपादित करणे हे ईश्वरीय सत्तेचे बहुरुपित्व वर्णन करायचे धारिष्टच्य पत्करण्यासारखे होणार आहे. श्रीमद्‌भगवदगीता, भागवत, ज्ञानेश्वरी, संत तुकोबांची गाथा अर्थात वेदोपनिषद यांमधील गुणांचे वर्णन उद्धृत करण्यासारखेच होणार आहे.

प. पू. दत्तमहाराज इतके महान असूनही नातवाशी ज्याप्रमाणे वात्सल्याने बोलावे तसे आपल्याशी बोलतात असे वाटावयाचे. त्यामुळे त्यांचे मोठेपण वटवृक्षासारखे पूर्ण विस्तारित व सर्वांना शीतल छाया देणारे असे होते. महापंडित, टीकाकार, विचक्षण, सांसारिक अडचणी मांडणारे या सर्वांचे समर्पकपणे नेटक्या शब्दांनी समाधान करायचे अजब कौशल्य त्यांच्या वेदतुल्य वाणीतून प्रसवत असे.

काही गोष्टी या आपल्या वर्णन शैलीच्या सीमा पार करून प्रत्यक्ष त्या चैतन्याच्या अधिष्ठानाला स्पर्श करतात. अशा व्यक्तींच्या चरित्राचे उत्कलन करून जनसमर्दांपुढे सारभाग म्हणून मांडणे हे फारच अवघड काम आहे. परंतु ते आवश्यक तर आहेच; कारण त्यांच्या विविध अंगांचे प्रस्फुटीकरण जरी पूर्णांशाने झाले नाही तरी सत्तासामान्याचा आधार धरुन आबालवृद्धांना हे आपलेच हृदगूत मांडण्यात आले आहे असे वाटावे म्हणून तेही कार्य आवश्यकच वाटते. सध्या प्रथम दर्शनी प. पू. महाराजांच्या परम भागवत भक्तिस्वरुपासंबंधी त्यांच्या अंशात्मक स्वरुपाचे दर्शन या प्रथम खंडात करण्याचा मानस आहे. अर्थात सुर्योदयाची प्रथम तांबूस छटा सर्वांना मनरमणीय वाटून पुढे होणाऱ्या 'मार्तंड जो तापहीन' असे सर्वांना अंत:शीतलता देणारे ठरल्याशिवाय रहाणार नाही असा विश्वास वाटतो.

"जागे व्हा," ज्यामुळे पुढील सर्व निवेदन पूर्ण जागणाऱ्या परिपाकाचा आस्वाद अमृताप्रमाणे मन प्रसन्न करण्यास समर्थ ठरेल.

सर्वांचा कल्याणेच्छु

**ना. य. ढेकणे**

प्रधान विश्वस्त

श्री. प. प. वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामीमहाराज

व श्री. प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज स्मारक ट्रस्ट

# अंतरंग

प्रास्ताविक निवेदन ९

प.पू.श्रीदत्तमहाराज कवीश्वर
यांचे चरित्र, १९८९-१९९८ १७

उपोद्‌घात २१

भागवतस्वरुप ब्रह्मश्री दत्तमहाराज ३५
स्वामी गोविंद देवगिरी

प्रात:स्मरणीय दत्तमहाराज आणि श्रीमद्‌भागवत ३९
डॉ. रा. ल. जोशी (सोलापूर)

भागवतोत्तम दत्तमहाराज कवीश्वर ७६
कर्मयोग आणि भक्तियोग
डॉ. वासुदेव व्यं.देशमुख

भागवतोत्तम दत्तमहाराज कवीश्वर - ज्ञानयोग ९४
डॉ. वासुदेव व्यं.देशमुख

भागवतोत्तम दत्तमहाराज कवीश्वर - शक्तिपातयोग ११०
डॉ. वासुदेव व्यं.देशमुख

प्रात:स्मरणीय ब्रह्मश्री प.पू.दत्तमहाराज कवीश्वर १२३
आल्हादिनी दिव्यभक्तीचे अंतरंग प्रवक्ते
पं. श्री.शरद ज.जोशी

शुक व्यास संवाद १३५
पं. श्री.शरद ज.जोशी

श्रीमद्‌भागवतकथा..... वरदान १३८
पं. श्री.शरद ज.जोशी

| | |
|---|---|
| **श्री वासुदेव निवासातील भागवत सोहळा**<br>श्रीमती नीलाताई जोशी | १४७ |
| **श्रीमद्भागवतसप्ताह - बीड**<br>डॉ.दिलीप देशमुख, डॉ.सुरेखा दि.देशमुख | १५३ |
| **दोन यात्रांच्या काही आठवणी**<br>गु.भ.उ.र.कुर्लेकर | १६४ |
| **नाशिकमधील भागवतसप्ताह ज्ञानयज्ञ**<br>गु.भ.अ.बा.डांगे | १८५ |
| **श्रीक्षेत्र नारेश्वर येथील भागवतसप्ताह**<br>गु.भ.द.र.देशपांडे, गु.भ.सुशीलाताई मोडक | १८७ |
| **वसईचा भागवतसप्ताह**<br>गु.भ.उदय चं.कडीकर | १९६ |
| **दादर येथील भागवतसप्ताह** | १९९ |
| **कुरवपूर भागवतसप्ताह**<br>डॉ.दिलीप देशमुख, गु.भ.सुशीलाताई मोडक | २०२ |
| **श्रीक्षेत्र गाणगापूर येथील भागवतसप्ताह**<br>श्रीमती नीलाताई जोशी | २१९ |
| **मलकापूरचा भागवतसप्ताह**<br>गु.भ.रमेश श्री.घिर्णीकर,गु.भ.प्र.ब.कुलकर्णी | २२३ |
| **अंतिम भागवतसप्ताह गुलबर्गा**<br>गु.भ.सौ. शांताबाई कमलापूरकर | २२९ |
| **श्रीदत्तमहाराज कवीश्वर नामावली**<br>डॉ.वासुदेव व्यं. देशमुख | २३७ |

# प्रास्ताविक निवेदन

**सकल धर्मामाजी धर्म। स्वरुपी रहाणे हा स्वधर्म**
**हेचि जाणिजे वर्म। साधुलक्षणाचे**

**- समर्थ रामदासस्वामी**

राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामीमहाराजांचे उक्तीप्रमाणे असे महान साधू शक्तिपातयोग पीठाधीश्वर, राष्ट्रीय पंडित प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर हे या पुण्य पावन नगरीत होऊन गेले. त्यांच्या कृती प्रेरणा, आणि जीवननिष्ठा आजही सहस्रावधी भाविकांना, साधकांना, विद्वानांना अनुग्रहीतांना आणि शिष्यांना जीवनाचा आधार होऊन राहिले आहेत. आणि पुढे ही दीर्घकाळ राहतील.

महाराष्ट्र ही संतांची खाण आहे. हजारो वर्षाची संतांची दिव्य परंपरा या महाराष्ट्राला लाभली आहे. त्याच परंपरेतील एक महान श्रीगणेशदत्त भक्त प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर आहेत. ज्यांचे वर्णन असे करता येईल -

ज्यांना राग नाही, वैराग्य संपन्न जीवन, जितेंद्रीय आहेत, निर्लोभी आहेत, ज्यांच्याठिकाणी दया आहे, जे क्षमाशील आहेत, अत्यंत शांत आहेत, लोकांच्या मनात त्याच्याविषयी प्रेम आहे,

ज्यांच्याठिकाणी दातृत्व आहे त्यांना कशाचेही भय वाटत नाही. कशाचाही शोक नाही. ही ज्ञानी पुरुषाची दहा लक्षणे आहेत.

समर्थ म्हणतात -

**नसे गर्व अंगी सदा वीतरागी।**
**क्षमा शांति भोगी दया दक्ष योगी।**
**नसे लोभ वा क्षोभ ना दैन्यवाणा।**
**अशा लक्षणी जाणिजे योगी राणा॥**

सर्वसामन्यांना परमार्थाची वाट दाखविणारे, सर्वार्थाने मार्गदर्शन करणारे, जनसामान्यांचे अध्यात्मिक जीवन उन्नत करणारे असे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवनकार्य ईश्वरी प्रेरणेनेच झाले असे दिसते. संतांचे चरित्र हे चित्त शुद्ध करणारे, स्थिर करणारे असे अलौकिक असते.

**संत: स्वयं परहितेषु कृताभियोगा:।**

असे पू. दत्तमहाराजांचे जीवनकार्य आहे. माझा किर्तनाच्यानिमित्ताने महाराष्ट्रात खेडोपाडी, वाड्या- वस्त्यांवर तसेच अनेक प्रांतात प्रवास झाला. आपल्या परंपरेतील सद्‌गुरूंचा कीर्तनात जयजयकार केल्यावर श्रोत्यांमध्ये जिज्ञासा निर्माण होऊन त्यांच्याशी बोलणे झाले की, मी 'श्रीदत्तमहाराजांचा अनुग्रहीत आहे' असे त्यांना कळल्यावर दोघांमध्ये प्रेमभाव निर्माण होतो असा पू. महाराजांचा प्रभाव आहे. असे अनेक श्रोते पू. महाराजांचे दीक्षित, विद्यार्थी, विद्वान, शास्त्री, पंडित भेटल्यावर ते पू. महाराजांचे विषयी अनेक आठवणी व अनुभव सांगत असत. अर्थात अनुभव सांगताना त्यांचे

डोळे पाण्यानी भरून यायाचे. पू. महाराजांचे चाहते भारतात नव्हे तर, विदेशातही आहेत. हे सर्वच अनुभव विद्यमान चरित्रात नाहीत. म्हणून असे जे पू. महाराजांचे शिष्य, भक्त आहेत त्यांना आवाहन करून पू. दत्तमहाराजांचे बृहत् चरित्र पण सध्या उपलब्ध असलेल्या चरित्रापेक्षा वेगळे असे निर्माण व्हावे, अशी प्रबल इच्छा निर्माण झाली. मनाने संकल्प केला, पण एवढे मोठे कार्य कसे होणार, त्याची योजना काय करावी इ. विषयाचे चिंतन सुरु झाले. माझ्या मनातील हा चरित्र लेखनाचा विचार महान गुरुभक्त पू. दत्तमहाराजांचे सान्निध्य ज्यांना महाराजांच्या अखेरच्या क्षणापर्यंत लाभले असे अंतरंग शिष्य, पू. दत्तमहाराजांच्या आठवणीने जे त्या भावविश्वात रमून जातात व तो भाव ज्यांच्या नेत्रातून अश्रुद्वारा प्रकट होतो असे आमचे डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख यांच्याशी बोललो. त्यांना ही कल्पना अत्यंत आवडली.

आपण हे कार्य करु या, माझे पूर्ण सहकार्य राहिल. असे सांगीतल्यावर मला फार आनंद झाला. डॉ. देशमुखांप्रमाणेच गुरुभक्त नीलाताई जोशी(बोरिवली), गुरुभक्त डॉ. रा. ल. जोशी(सोलापूर), पंडित शरदराव जोशी (बार्शी), श्रीमती सुशीलाताई मोडक (पुणे) यांच्याशी बोललो, सर्वांनाच ही कल्पना आवडली. मग सर्वांनी एक निवेदन योग तपस्वी प. पू. नारायणकाका ढेकणे महाराज (प्रधान विश्वस्त श्रीवासुदेव निवास) यांना देऊन प्रार्थना केली, पू. महाराजांनी याला मान्यता देऊन हे कार्य होण्याची अत्यंत आवश्यकता आहे असे

सांगितले. पू. दत्तमहाराज सर्वांना समजतील असे चरित्र व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. पू. नाराणकाका ढेकणे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली **"श्रीसद्गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर समग्र चरित्र लेखन समिती"** गुरुवार दि. ५. ५. २००५ चैत्र व ३० प. प. श्रीनारायणस्वामी महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी स्थापन झाली. सर्वानुमते या समितीचे कार्याध्यक्ष पू. श्री मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर यांनी स्वीकारावे असे ठरले. कोषाध्यक्ष म्हणून विश्वस्त श्री सुभाष दामले यांची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली. ज्येष्ठ व श्रेष्ठ विद्वान मंडळींच्या या समितीत सदस्य म्हणून समावेश केला. संपूर्ण चरित्र संपादनाचे कार्य गुरुभक्त डॉ. वा. व्यं. देशमुख यांनी करावे असे ठरले व डॉक्टरांनी ते मान्य केले.

पू. श्रीनारायणकाका महाराजांनी या चरित्राचे जेवढे खंड होतील तेवढे तयार करा असे सांगून हे वासुदेव निवासाचे अधिकृत प्रकाशन असेल. समितीने पूर्ण पुस्तक तयार करून श्रीवासुदेव निवसाला द्यावे असे सांगितले व या कार्याची सर्व सूत्रे कार्याध्यक्ष श्री मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर यांचेकडे सुपूर्त केली.

चरित्र लेखन समितीचे चिंतन - वाटचाल प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे समग्र चरित्र लिहिण्याची अनेक साधकांची, भक्तांची मदत लागणार आहे. त्यासाठी काही प्रवास करून माहिती मिळविण्याची आवश्यकता आहे. तसेच पू. महाराजांचा पत्र व्यवहार हा उपलब्ध करून त्यातून अनेक साधकांना मार्गदर्शन लाभले आहे.

अशा चरित्राचे अनेक खंड होण्याची गरज आहे. त्यामुळे अनेक प्रश्नांची उत्तरे साधकांना मिळून त्यांचे परमार्थजीवन कल्याण पर्यवसायी होणार आहे. यासाठी समितीने प्रथमत: प. पू. श्री. अशोकमहाराज कवीश्वर यांचे आशिर्वाद घेतले. त्यांच्याकडे पू. काकामहाराजांचे पत्र घेऊन समितीचे कार्याध्यक्ष पू. मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर आणि श्री वासुदेवनिवासचे व्यवस्थापक श्री बाळासाहेब कुलकर्णी हे दि. ९. ५. २००५ रोजी समक्ष भेटून पू. महाराजांच्या चरित्राची कल्पना दिली. आज दैवयोगाने पू. अशोकमहाराज देहाने आपल्यात नसले तरी त्यांचे आशीर्वाद सदैव समितीच्या कार्याला लाभतील अशी आमची श्रद्धा आहे.

पू. महाराजांचे शिक्षण धारवाड येथे झाले. त्यांचे गुरुवर्य ब्रह्मश्री पू. नागेशशास्त्री जोशी उप्पिनबेट्टीगिरी यांचे चिरंजीव प. पू. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री जोशी हे सध्या श्रीजगद्गुरु शंकराचार्य संस्कृत पाठशाळा, धारवाड याचे विद्यमान आचार्य आहेत त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी पू. काकामहाराजांचे पत्र घेऊन श्री. मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर व डॉ. देशमुख धारवाड येथे जाऊन त्यांचे आशीर्वाद घेऊन आले. त्यांनाही चरित्राची संकल्पना आवडली तेथील काही छायाचित्रे घेऊन तसेच सविस्तर चर्चा करून पू. महाराजांच्या जुन्या आठवणी घेऊन पुण्याकडे हे दोघे परत आले. अशा प्रकारे या कार्याचा श्रीगणेशा झाला.

सर्व साधकांसाठी चरित्र लेखन समितीने एक आवाहन पत्रक

काढले. (सोबत पत्रक जोडले आहे) त्यात निधीसाठी विशेष सहकार्याचे आवाहन केले. त्याला किमान १४० साधकांनी उत्तम प्रतिसाद दिला. त्याविषयी आम्ही कृतज्ञ आहोत. दि. १८. ७. २००७ रोजी दुसरे निवेदन चरित्र लेखन समितीने सर्व साधकांसाठी श्रीवासुदेव निवासच्या अंकात प्रकाशित केले. पू. दत्तमहाराजांच्या चरित्रातील अप्रसिद्ध चरित्राचा अंश आधी उपलब्ध व्हावा या हेतूने त्यांच्या जीवनांतील अंतिम १० वर्षांचा कालावधीचा खंड प्रसिद्ध करण्यासाठी प्रयत्न सुरु झाले. त्याप्रमाणे त्या कालखंडातील प्रमुख घटनांची एक तालिका प्रकाशित करण्यात आली. पत्रद्वारा काही जणांनी पाठविली (सोबत तालिका दिली आहे) त्याच्या आधाराने सर्व भक्तांनी, साधकांनी उपलब्ध माहिती पाठवली त्याप्रमाणे माहिती संकलित करणे चालू आहे. प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर मूर्तिमंत भागवत अशा शिर्षकाचा एक खंड प्रकाशन करण्याचे ठरले व त्याप्रमाणे प. पू. श्रीनाराणकाका महाराजांना व विश्वस्तांना याचे सविस्तर निवेदन करून प्रकाशनाची तारीख निश्चित करण्यात आली.

ईश्वर सेवा बुद्धीने, अत्यंत त्वरित गतीने या चरित्राचे मुद्रण डी. टी. पी., छपाई, बायडिंग तसेच चरित्राचे मुखपृष्ठ इ. सर्वकामे श्री. प्रमोद पोटभरे व त्यांचे सहकारी यांनी अत्यंत आत्मीयतेने केले. तसेच चरित्र ग्रंथात छापलेली छायाचित्रे ज्या गुरुभक्तांनी उपलब्ध करून दिली या सर्वांनी सद्गुरुंची सेवा या हेतुने हे सहकार्य केले. तसेच चरित्रलेखन समितीत नसतानाही सहकार्य करणारे गुरुभक्त

मा. श्री. वि. ग. जोशी, मा. श्री दत्तोपंत घाटपांडे वत्यांच्या पत्नी सौ. घाटपांडे यांचे मोलाचे सहकार्य झाले त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करावी तेवढी थोडीच आहे.

प. पू. श्रीमद्‌जगद्‌गुरु शंकराचार्य विद्यानृसिंहभारती स्वामी महाराज करवीरपीठ यांचे शुभाशीर्वाद लाभले आहेत. तसेच कार्यक्रमात व प्रवासांत व्यग्र असून प. पू. यतिराज श्रीगोविंद गिरी महाराज (हरिद्वार) यांनी प. पू. दत्तमहाराजांच्यावरील अतीव प्रेमादरामुळे लेख पाठविला आणि शक्तिपात योग पीठाधीश्वर पुणे-नाशिक व वासुदेवनिवासचे प्रधान विश्वस्त, समितीचे अध्यक्ष योगतपस्वी प. पू. श्रीनारायणकाका ढेकणे महाराज यांचे आशीर्वाद या ग्रंथास लाभले हे एक भाग्य आहे.

अशा प्रकारे गेली ३ वर्षे समितीच्या अथक परिश्रमाचे फळ म्हणजे श्रीसद्‌गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे पुण्यतिथीच्या दिवशी फाल्गुन शु १४ शके १९२९ गुरुवार दि. २० मार्च, २००८ रोजी प. पू. श्रीमद्‌जगत्‌गुरु शंकराचार्य श्रीविद्यानृसिंहभारती स्वामी महाराज यांचे पवित्र करकमलाद्वारे तसेच योगतपस्वी प. पू. श्रीनारायणकाका ढेकणे महाराज यांचे अध्यक्षतेखाली अनेक साधकांच्या, भक्तांच्या प्रत्यक्ष सहभागाने प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर मूर्तिमंत भागवत या ग्रंथाचे प्रकाशन पुण्यपावन क्षेत्री श्रीवासुदेवनिवासाच्या पवित्र वास्तूत संपन्न होत आहे ही एक सौभाग्याची साक्ष आहे.

विशेष म्हणजे संकल्पाप्रमाणे प. पू. श्रीनारायणकाका ढेकणे

महाराजांचा सहस्रचंद्रशांती महोत्सव आणि प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा जन्मशताब्दी महोत्सव या पावन कालखंडात हे प्रकाशन व्हावे अशी इच्छा होती हा संकल्प श्रीगणेशदत्तसद्‌गुरु यांच्याकृपेने संपन्न झाला.

या चरित्र लेखन कार्यात ज्या ज्या भक्तांचे सहकार्य लाभले आहे त्या सर्वांचा नामोल्लेख विस्तारभयास्तव करणे अशक्य आहे पण त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करीत आहोत. या चरित्र ग्रंथांत काही त्रुटी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. याची चरित्र लेखन समितीला जाणीव आहे. यथावकाश पुढील आवृत्तीत त्याचा परामर्श घेतला जाईल.

श्रीसद्‌गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे अनुग्रहित, भक्त, शिष्य इतरही जिज्ञासू सज्जनवर्ग यांचेकडून या चरित्र ग्रंथाचे वाचन व चिंतन नित्य घडत राहून त्यांना शाश्वत समाधानाचा लाभ होवो व स्वकर्तव्यतेचे समाधान श्रीवासुदेव निवास ट्रस्टच्या विश्वस्तांना व चरित्रलेखन समितीला लाभो हीच सद्‌गुरुचरणी प्रार्थना.

श्रीसद्‌गुरुचरणरज

**मोरेश्वर नागनाथ जोशी-चऱ्होलीकर**

फाल्गुन शु १४ शके १९२९

गुरुवार २० मार्च, २००८

# प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र, १९८९-१९९८

| साल | महिना | ठिकाण | |
|---|---|---|---|
| १९८९ | | मार्च | भिवंडी  भागवतसप्ताह |
| | मार्च | अकोला, नागपूर | |
| | २१ एप्रिल | नरसोबावाडी | नारायणस्वामी पुण्यतिथी |
| | | नारेश्वरचा | भागवतसप्ताह |
| | | अहमदाबाद | |
| | | गरुडेश्वर | भेट |
| | ४ ते १० जून | नरसिंहवाडी | पू. झुरळेमहाराज यांनी आयोजित केलेला भागवतसप्ताह |
| | | पुणे | प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज यांची ७५ वी पुण्यतिथी सुनीताताई जोशी आणि उमाबेन देशपांडे वडोदरा, यांची प्रवचने प्रकृतीच्या अस्वास्थामुळे आश्रमांत भागवतसप्ताह झाला नाही. |
| | ऑगस्ट | तुळजापूर, गाणगापूर | तुळजापूरची शेवटची यात्रा |
| | ऑक्टोबर | पुणे | नवरात्रात देवीभागवतावर प्रवचने |
| | | देऊळगांवराजा | |
| | नोव्हेंबर | इचलकरंजी | भागवतसप्ताह, शिष्यांचे संमेलन |
| | १७ ते २३ | हरिहर | श्रीकालभैरव जयंती व मूर्तीप्रतिष्ठापना |
| | डिसेंबर | बेळगांव | भागवतसप्ताह |
| | | धारवाड | |
| १९९० | जानेवारी | पावस | भागवतसप्ताह |
| | १२ ते १८ मे | पुणे | सहस्रचंद्रदर्शनशांती समारोह |
| | ऑक्टोबर | वाडी | गुरुद्वादशी |
| | २५ नोव्हेंबर ते १ डिसेंबर | पुणे | दत्तपुराणावर प्रवचने |
| | २ ते ८डिसेंबर | पुणे | रेणुकानिवासामध्ये भागवतसप्ताह |
| | २३ डिसेंबर | अकलूज | ज्ञानेश्वरी सप्तशताद्वि देवीभागवत |

| | | | |
|---|---|---|---|
| १९९१ | ३फेब्रुवारी | गुलबर्गा | डॉ. कमलापूरकर यांचे घरी भागवतसप्ताह |
| | ८-१४ एप्रिल | वाडी | नारायणस्वामी पुण्यतिथी उत्सव |
| | २३-३० एप्रिल | पुणे | भागवतावर प्रवचने |
| | मे | बार्शी | भागवतसप्ताह |
| | १६ मे | नाशिक | प. प. लोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांच्या पादुकांची स्थापना. |
| | १२ सप्टेंबर | पुणे | श्रीपादवल्लभ जयंती पहाटे आश्रमांत |
| | ८ ते १६ ऑक्टोबर | पुणे | नवरात्र उत्सवात देवीभागवत |
| १९९२ | जानेवारी | पुणे | श्रीयोगीराज पुण्यतिथी |
| | २३ फेब्रुवारी | पुणे | ८२ वा वाढदिवस |
| | २६ एप्रिल ते २ मे | वाडी | श्रीनारायणस्वामींचा उत्सव |
| | २ ते ५ जून | पुणे | श्री शिवोमतीर्थ शंकासमाधान |
| | १ जून | पुणे | मकरंद महाराज, परभणी यांचा सत्कार |
| | २ सप्टेंबर | पुणे | द्वारकापीठाधीश स्वामी स्वरुपानंद सरस्वती यांची आश्रमास भेट |
| | ६-१२सप्टेंबर | पुणे | भागवतसप्ताह आनंदशास्त्री |
| | २३ सप्टेंबर | पुणे | शारदापीठाधीश श्रीमच्छशंकराचार्य यांची सकाळनगर मध्ये पाद्यपूजा आणि |
| आश्रमभेट | | | |
| | २७ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर | पुणे | देवीभागवत |
| | २३ ऑक्टोबर | वाडी | गुरुद्वादशी |
| | १९ डिसेंबर | पुणे | किशोरजी व्यास यांची आश्रम भेट व श्रीदत्तमहाराजांचा सरस्वतीमंदिराच्या प्रांगणात सत्कार |
| | २५ डिसेंबर | पुणे | नरसिंहसरस्वती जयंती जन्माख्यान |
| १९९३ | ९ ते १५ जानेवारी | पुणे | प. पू. योगीराज पुण्यतिथी चातुर्मास्य याग |
| | २३ ते २७ एप्रिल | पुणे | डॉ. रा. ल. जोशी यांची प्रवचने |
| | सप्टेंबर | पुणे | श्रीपादश्रीवल्लभ जयंती |
| | ११ नोव्हेंबर | वाडी | गुरुद्वादशी |
| | २६ नोव्हेंबर | पुणे | पू.जयेंद्रसरस्वतीस्वामींची आश्रमभेट |
| | २९-३० नोव्हेंबर | पुणे | वे. मू. कोढणीकरगुरुजींची आयुष्यकामेष्टी |
| | २१ डिसेंबर | पुणे | श्रीदत्तजयंती |
| १९९४ | ३ मार्च | पुणे | प. पू. दत्तमहाराजांचा ८५ वा वर्धापन दिन |
| | २३- २७ एप्रिल | देऊळगांवराजा | प. पू. दत्तमहाराजांचा रौद्रीशांति |

| | | | |
|---|---|---|---|
| | १-५ मे | जालना | प. पू. दत्तमहाराजांचा सत्कारसमारंभ |
| | | | प. पू. दत्तमहाराजांच्या आयुरारोग्यासाठी चतुर्वेद पारायण |
| | २०-२२ मे | पुणे | नाण्यांची तुला |
| | २२ जुलै | पुणे | प. पू. दत्तमहाराजांची पाद्यपूजा |
| | गणेशचतुर्थी सप्टेंबर | पुणे | श्रीपादवल्लभ जन्माख्यान दत्तमहाराजांनी सांगीतले |
| | १३-१९ सप्टेंबर | पुणे | श्रीमद्भागवतसप्ताह |
| | नवरात्र ५-१२ऑक्टो | पुणे | देवीभागवत - डॉ. रा. ल. जोशी |
| | २९ ऑक्टो ते १नोव्हें | वाडी | गुरुद्वादशी |
| | १०-१७ डिसेंबर | पुणे | श्रीदत्तजयंती |
| | ३० डिसेंबर | पुणे | श्रीयोगीराज जयंती |
| १९९५ | ३ जानेवारी | पुणे | नरसिंहसरस्वती जयंती |
| | १८-२४ जानेवारी | पुणे | श्रीयोगीराज पुण्यतिथी |
| | | पुणे | श्रीलोकनाथतीर्थ पुण्यतिथी |
| | | पुणे | वर्धापनदिन |
| | ६ मार्च | नगर, औरंगाबाद | जालना |
| | ७ मार्च | जालना | वर्ष १८ अंक ३ |
| | ८ ते १२ मार्च | जालना | दत्तयाग |
| | १३ ते १४ मार्च | देऊळगांवराजा | देवदर्शन व भेटीगाठी |
| | १४ ते १७ मार्च | जालना | |
| | १७ मार्च | बीड | डॉ. दिलीप देशमुख यांची नवचंडी व प्रवचन |
| | १९ मार्च | लातूर | रविंद्रकुमार राठी - दत्तयाग |
| | २० मार्च | लातूर | पाद्यपूजा व मंत्रोपदेश, खंडेराय यांचे दत्तमंदिर, वेदप्रतिष्ठान, डॉ. कुलकर्णी यांच्या घरी पाद्यपूजा |
| | २१ मार्च | लातूर | पाद्यपूजा |
| | २४ मार्च | लातूर | पुण्याला प्रयाण |
| | २४ ते ३१ मार्च | खर्डा | पंढरीनाथ गोरे यांचेकडे मुक्काम, केळेश्वर मंदीर |
| | १ एप्रिल | बार्शी | पंचांगकर्ते दात्ये सत्कार समारंभाचे अध्यक्षपद |
| | ३ एप्रिल | बार्शी | प. पू. धुंडिराजमहाराज पुण्यतिथी - महाराजांचे प्रवचन |
| | ४ एप्रिल | पुणे | रेणुकानिवासात आगमन |

| | | | |
|---|---|---|---|
| | १३ ते २३ एप्रिल | पुणे | रघुनाथरावांचा अतिरुद्र |
| | २३ ते २९ एप्रिल | पुणे | नारायणस्वामींचा उत्सव |
| | ३० एप्रिल ते २ मे | पुणे | शहापूरकरांच्या परिवाराची धार्मिक कार्ये |
| | १ ते ५ मे | पुणे | श्रीमच्छंकराचार्य जयंती |
| | १५ मे | पुणे | सौ. आईसाहेब सहस्रचंद्रदर्शन तांदुळाची तुला |
| | १६ मे | पुणे | सौ. ताईमहाराज जालना, वारुणीशांती व तांदुळाची तुला |
| | ३० मे ते ६ जून | पुणे | गंगालहरी - पं. आनंदशास्त्री पारखी, |
| | ९ जून | पुणे | करवीरपीठातर्फे संस्कृती पुरस्कार व सन्मानपत्र घैसास गुरुजी व किसनमहाराज साखरे |
| | २३ ते २९ जून | पुणे | श्रीवासुदेवानंदसरस्वती पुण्यतिथी उत्सव |
| | २९ जून | पुणे | प्रयागचे प्रकाशन |
| | २१ ऑक्टोबर | वाडी | गुरुद्वादशी आणि सुर्यग्रहण |
| | | पुणे | श्रीदत्तजयंती |
| | २० डिसेंबर | पुणे | श्रीयोगीराज जयंती |
| | | पुणे | श्रीनृसिंहसरस्वतीजयंती |
| १९९६ | ७ - १३ जानेवारी | पुणे | श्रीगुरुमहाराजांचा पुण्यतिथी उत्सव |
| | १० फेब्रुवारी | पुणे | श्रीदत्तमहाराजांचा वर्धापनदिन |
| | १२ मे | पुणे | द्विसाहस्री मराठी भाषांतर प्रकाशन व द्विसाहस्री हवन - डॉ. धीरुभाई जोशी |
| | ३० जुलै | पुणे | श्रीगुरुपौर्णिमा सकाळी १० ते रात्रौ ८ |
| | १३ ते २० ऑक्टोबर | पुणे | देवीभागवत - डॉ. रा. ल. जोशी |
| १९९७ | १९ ते २५ फेब्रुवारी | पुणे | श्रीलोकनाथतीर्थ पुण्यतिथी ३ दिवस रेणुकानिवासात किर्तने |
| | २८ फेब्रुवारी | पुणे | श्रीदत्तमहाराजांचा वर्धापनदिन महाराजांचा त्यांच्या घरीजाऊन सत्कार |
| | ८ एप्रिल | पुणे | श्रीवासुदेवनिवास भजनीमंडळाचा वाढदिवस |
| | २० जुलै | पुणे | सकाळी १० ते १२ |
| १९९८ | १७ फेब्रुवारी | पुणे | श्रीदत्तमहाराजांचा वर्धापनदिन |
| | ९ जुलै | पुणे | श्रीगुरुपौर्णिमा सकाळी १० ते संध्याकाळ महाराज आश्रमांत |
| १९९९ | १० जानेवारी | पुणे | सौ. आईसाहेब कवीश्वर यांचे देहावसान |
| | १ मार्च | पुणे | फाल्गुन शु॥१४ श्रीदत्तमहाराज ब्रह्मलीन |

# उपोद्घात

**दत्तं कवीश्वरं वन्दे गणेशं मानुषं वरं।**
**प्राप्ता वामनयोगीशाद्दीक्षा वै येन शांभवी॥**
**निगूढतत्त्व ते ज्ञातं यत्किञ्चिल्लोकदुर्ग्रहम्।**
**चेष्टितं ते प्रसादोऽयं प्रक्पुण्यैर्मय्यिपुस्थितः॥**

द्वि. सा. गुरुस्तुति. ॥ ८५॥

ज्याचे तत्त्व निगूढ आहे अशा भगवंता, तुझ्या मानवी जीवांना दुर्गम असणाऱ्या जीवनाचे जे यत्किञ्चित् आकलन मला झाले आहे तो माझ्या पूर्वपुण्याईने मजवर झालेला आपला कृपाप्रसादच होय! भगवंत आपल्या योगमायेचा आश्रय करून देह धारण करून ज्या लीला करतो त्या सामान्य जीवांना कळणे कठिण असते. तसेच थोडेफार त्याच्या इच्छेनेच प्रकट झालेल्या त्याच्या भक्तांचेही असते. 'धर्मसंस्थापनेचे नर ते ते ईश्वरी अवतार॥' या समर्थोक्तीला अनुसरून त्यांचे जीवनही भगवल्लीलात्मकच असणे साहजिक आहे. अशा जीवनाचा अन्वयार्थ लावणे दुरापास्त आहे. तरीसुद्धा या संतांच्या चरित्रांच्या अभ्यासाने आणि चिंतनाने चित्तशुद्धी होते तसेच त्यांचा कृपाप्रसादही प्राप्त होतो. 'जन्मकर्म च मे दिव्यं' (भ. गी. ४:९) या भगवद्वचनानुसार भगवंताच्या तसेच त्याच्या भक्तांच्या दिव्य चरित्रांच्या अनुशीलनाने मुक्तीचा मार्ग सुकर होतो. ह्या विश्वासानेच आम्ही

आधुनिक युगातील महान् भगवद्भक्त प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वरांच्या चरित्राचा मागोवा घेण्याचा हा उपक्र म करीत आहोत.

**आणखी एक चरित्र का?**

प. पू. दत्तमहाराजांची अनेक चरित्रे प्रकाशित झाली आहेत. पू. अच्युतरावजी पोटभरे (श्रीदत्तवाक्सुधा), श्री. नीलाताई जोशी (प्रयाग) व गु. भ. शरच्चंद्र कोपर्डेकर (श्रीदत्तमहाराज कवीश्वर: चरित्र आणि विचारधन) ही काही उल्लेखनीय चरित्रे आहेत. यांच्या माध्यमांतून श्री महाराजांच्या जीवनांतील बहुतेक घटनांची माहिती प्रसिद्ध झाली आहे. तेव्हा आणखी चरित्रलेखनाचा हा खटाटोप का असे कदाचित् कांही लोकांना वाटण्याचा संभव आहे. या सर्व अधिकारी लेखकांनी निश्चितच श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लोकांपुढे समर्थपणे मांडले आहे. तरीही अजून बरेच चरित्र प्रकाशांत आलेले नाही अशा विचाराने हा उपक्रम हाती घेतला आहे. हे संपूर्णपणे कळणे अशक्यच आहे. पण जितक्या प्रमाणांत ते आपण जाणून घेऊ तितका अधिक लाभ लेखक व वाचक या उभयतांचा होणार आहे ह्या श्रद्धेने आम्ही प्रवृत्त झालो आहोत.

**मननात्मक चरित्र.**

आणखी एक महत्त्वाचे कारण असे आहे की संतांच्या जीवनांतील घटनाक्रम म्हणजेच त्यांचे चरित्र असे नाही. त्या घटनांतून प्रकाशणारी त्यांची जीवनप्रणाली, तिच्यामागचे तत्त्वज्ञान आणि त्यांतून साधक-भक्तांना होणारे मार्गदर्शन हे खरे चरित्र आहे. खरे तर संतांची चरित्रे ह्या आध्यात्मिक ज्ञानाच्या खाणी आहेत. आध्यात्मिक

पांथिकांच्या वाटा प्रकाशणारी अनेक मूल्यवान् बोधरत्ने त्या खाणीतून उपलब्ध होत असतात. आणि म्हणूनच संतांची चरित्रे कधीच पूर्ण होत नाहीत. वर्षानुवर्षेच काय शतकानुशतके, श्रद्धावान अभ्यासकांना त्यांतून नवनवीन अर्थांचे द्योतन होत असते. यासाठीच कवि म्हणतात, 'सगुण चरित्रे परम पवित्र सादर वर्णावी.' हेच आमच्या ह्या उपक्रमाचे आत्मकल्याणात्मक प्रयोजन आहे.

तेवढ्यासाठी घटनात्मक दृष्टीला प्राधान्य न देता ह्या प्रयोजनाशी सुसंगत अशीच उद्बोधनात्मक दृष्टि ह्या चरित्राच्या मांडणीत आम्ही अवलंबिली आहे. आधीच्या चरित्रांपेक्षा हेच कदाचित ह्या चरित्राचे वैशिष्ट्य म्हणतां येईल. हे चरित्र म्हणजे केवळ इतिहास नाही. वर सांगितल्याप्रमाणे त्या घटनांमागील जीवनमूल्यांचा, श्रद्धांचा आणि तत्त्वज्ञानाचा शोध घेण्याचा यांत प्रयत्न केला आहे. महापुरुषांची चरित्रे एखाद्या उत्तुंग दीपस्तंभाप्रमाणे युगानुयुगांपर्यंत आत्मज्ञानाचे प्रकाशझोत प्रक्षेपीत असतात. त्यांचा यथाशक्ति वेध घेण्याचा हा आमचा एक अल्प प्रयत्न आहे. इंग्रजी भाषेत संतांच्या चरित्रांचा असा एक विशिष्ट वाङ्मयप्रकारच आहे. (Hagiograph) त्यात संतांच्या चरित्रांतून आध्यात्मिक, धार्मिक आणि नैतिक मूल्यांचे संकलन करण्याचा हेतुपुरःसर प्रयत्न केला जातो. अशा वाङ्मयात चरित्रनायकाकडे केवळ वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहतां येत नाही. एक संत, सत्पुरुष किंवा प्रेषित या श्रद्धेनेच त्याच्या चरित्राचा अभ्यास करावा लागतो. ह्याला कांही इतिहासाचार्य नाके मुरडतातही. परंतु आध्यात्मिक जिज्ञासूंना अपेक्षित लाभ किंवा मार्गदर्शन हवे असेल

हाच श्रद्धाप्रधान दृष्टिकोन आवश्यक आहे. घटना, कालक्रम आणि व्यक्तिविशेष ह्यांच्या यथातथ्यतेला महत्त्व आहेच; पण त्यापेक्षाही त्यांतून प्रकट होणाऱ्या संतस्वभावाला, अध्यात्मज्ञानाला आणि तत्त्वज्ञानार्थाला अधिक महत्त्व आहे. 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले।' या संत तुकोबांच्या उक्तीला अनुसरून संतांची चरित्रे आणि त्यांचे उपदेश यांचा समन्वय केल्याविना त्यांच्या चरित्राचे रहस्य आकळणार नाही. हाच आमचा प्रयत्न आहे.

**श्रीमद्भागवतसप्ताह.**

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरित्राचा एक महत्त्वाचा घटक श्रीमद्भागवतसप्ताहाचे अनुष्ठान हा होता. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी सद्गुरु प. प. नृसिंहसरस्वती (दीक्षित)स्वामीमहाराजांच्या आज्ञेने भाद्रपद महिन्यात महाराजांनी पहिला भागवतसप्ताह केला. पू. धुंडीराज महाराजांकडून होणारा वार्षिक भागवतसप्ताह स्वामींनी दत्तमहाराजांना करायला सांगितला. हे केवळ संहितावाचनाचेच अनुष्ठान होते. औरवाडच्या दत्त अमरेश्वरासमोर झालेल्या संपूर्ण सप्ताहाचे वाचन प. प. श्रीदीक्षितस्वामींनी श्रवण केला. एकाग्र चित्ताने, अस्खलित, शुद्ध वाणीने आणि श्रद्धेने आपल्या प्रिय शिष्याने केलेल्या पठणाने स्वामी महाराज प्रसन्न झाले. किशोर वयातील दत्तमहाराजांना त्यांनी 'मोठा ज्ञानी होशील!' असा आशीर्वाद दिला. औरवाडहून वाडीपर्यंत 'भागवताची मिरवणूक' नावेतून काढली आणि आपल्या शिष्याचा प्रकट गौरव केला. त्याच वेळी त्यांनी दत्तमहाराजांना प्रतिवर्षी प्रौष्ठपदी भागवतसप्ताहाचे अनुष्ठान औरवाड येथे येऊन करायची

आज्ञा पण दिली. ह्या भागवतसप्ताहाच्या माध्यामातून पुढे दत्तमहाराजांकडून जो विशाल लोकसंग्रहाचा प्रासाद उभारला जाणार होता त्याची ही मुहूर्तमेढच श्रीदीक्षितस्वामीनी जाणीवपूर्वक घातली होती यांत संशय नाही.

श्रीदीक्षितस्वामींच्या द्वारा दत्तमहाराजांना झालेल्या या चोदनेचे मूळ दत्तमहाराजांच्या जन्माचे वेळी प्रत्यक्ष श्री थोरले स्वामीमहाराजांनी काढलेल्या उद्गारात सांपडते. 'काय वक्रतुंडबुवा! पुराण सांगण्याची हौस पुरली नाही म्हणून पुन्हा आलां वाटते?' असे म्हणून त्यांनी दत्तमहाराजांच्या मातुःश्रीना 'तुमचे सासरेच आले आहेत बरं का!' असे म्हणून त्याचे पुन्हा नामकरण करून 'वक्रतुंड' नांव ठेवायला सांगितले. ह्यांतून ह्या बालकाच्या हातून पुढे कोणते मोठे आध्यात्मिक कार्य होणार आहे याची जणूं पूर्वसूचनाच त्यांनी दिली होती. तिला अनुसरूनच श्रीदीक्षितस्वामींनी दत्तमहाराजांना भागवतसप्ताहाच्या मार्गावर अग्रेसर केले.

**श्रीमद्दत्तसंप्रदाय आणि श्रीमद्भागवत.**

अत्यंत विशाल अशा व्यासबुद्धीतून प्रकट झालेल्या १८ महापुराणे आणि १८ उपपुराणे यांतून नेमके भागवतच श्रीदीक्षितस्वामीनी निवडावे हा काही केवळ योगायोग नाही. विशेषतः श्री थोरल्या महाराजांचा श्रीदत्तसंप्रदाय ध्यानांत घेतां त्यांनीच केलेले श्रीदत्तपुराण किंवा श्रीदत्तप्रभूंच्या चरित्राचे वर्णन असलेली मार्कंडेयादि पुराणे स्वामींनी कां दुर्लक्षिली असा प्रश्न मनात येऊ शकतो. पण याचे उत्तर प. प. श्री टेंबे स्वामींनीच देऊन ठेवले आहे. श्री. दामोदर

पाठक यांना लिहिलेल्या पत्रात श्री थोरले स्वामी महाराज म्हणतात, '**श्रीदत्तात्रेयोपासना हा भागवत सांप्रदाय आहे. हा अवतार विष्णूचे २४ अवतारांपैकी सहावा आहे. हे १ व २ भागवत स्कंधा(त) असून ४ स्कंधारंभी जन्म आहे........ श्रीदत्तात्रेयावधूत भागवत सांप्रदाय तर वेदोक्त आहे. पाहिजे तर याचे उपनिषद मिळेल.**' यावरून प. पू. श्रीदत्तमहाराजांचे भागवतसप्ताहरूपी कार्य हे प. प. श्री थोरल्या महाराजांच्या व श्रीदत्तसंप्रदायाच्या उद्बोधनाचेच कार्य होते याविषयी संशय नाही.

श्रीदीक्षितस्वामींच्या आज्ञेनुसार दत्तमहाराजांनी औरवाड येथे प्रतिवार्षिक प्रौष्ठपदी भागवत सप्ताह करण्याचा नियम ४० वर्षे निष्ठेने चालविला. २५ वर्षांपर्यंत औरवाडच्या बाहेर भागवतसप्ताह केला नाही. १९५० साली खड्यांच्या भागवतसप्ताहापासून बाहेरच्या सप्ताहांना आरंभ झाला. १९६५ सालापर्यंत औरवाडचा सप्ताह अखंडपणे चालू होता. १९६५ सालापासून मात्र प. पू. योगिराज गुळवणीमहाराजांच्या आज्ञेने हा सप्ताह पुण्याला श्रीवासुदेवनिवास येथे होऊ लागला. पानशेतचा जलप्रलय, औरवाडच्या पादुकांची चोरी, तिचा पू. दत्तमहाराजांना झालेल्या दृष्टांताद्वारे लागलेला शोध अशा काही घटनातून ह्यामागे कांही समष्टीचे संकेत असले पाहिजेत असे वाटते. अन्यथा इतक्या वर्षांचा निरंतर चालविलेल्या नियमात न दत्तमहाराजांनी बदल केला असता न श्रीगुरुमहाराजांची तशी आज्ञा झाली असती. ह्याचा थोडा विचार श्रीवासुदेवनिवासातील भागवतसप्ताहाविषयीच्या लेखात केला आहे.

प. पू. दत्तमहाराजांनी ही अनुष्ठाने किती निष्ठेने आणि तीव्र संवेगाने केली याचे किंचित् दिग्दर्शन ह्या भागवतसप्ताहाच्या हकीकतीत मिळेल. कोणताही ऋतु असो, कितीही समाज असो, संहितावाचन असो की निरूपण असो, महाराज एका बैठकीवर करीत असत. ५-६ तासांचे निरूपण वयाच्या ८०व्या वर्षीही त्यांनी मांडीसुद्धां न मोडता केली आहेत. श्रोतृवर्गाला १० मिनिटांची मधली सुटी असायची. चहापाण्याचीही सोय असायची. पण महाराज कधी पाणीसुद्धा प्याले नाहीत. श्रीदत्तमहाराजांनी श्रीवासुदेवनिवासमध्ये प. पू. योगिराजांच्या उपस्थितीत एक दिवसाचे भागवतपारायण केले होते. फक्त सायंसंध्येसाठी थोडा खंड पडला होता. 'मध्यरात्री श्रीगुरुमहाराज येऊन पाहून गेले' अशी आठवण दत्तमहाराजांनी गंहिवरून सांगितली. यावरून अनुष्ठानासाठी साधकाची मनाची व शरीराची बैठक कशी असावी ते कळते.

## 'तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे'

श्रीमद्भागवतसप्ताहातून प्रामुख्याने भगवंताचे गुणगान, आध्यात्मिक आणि धार्मिक सिद्धांतांचे प्रबोधन दत्तमहाराजांनी केलेच. पण त्याशिवाय महाराजांच्या सत्संगांतून जिज्ञासू साधकभक्तांना मौलिक मार्गदर्शनाचाही लाभ झाला. श्रीमहाराजांचे सतत 'जगाचिया सुखोद्देशे' घडत असलेले आचरण, 'रंजल्या-गांजल्या'विषयी त्यांच्या मनांतला स्वाभाविक कळवळा, 'आलिया भोगासी सादर'तेने सामोरी जाणारी त्यांची अनाक्रोश तितिक्षा, 'जे जे भेटिजे भूत' त्या त्या भूतांच्या ठायी भगवंत पाहणारी त्यांची साक्षात्कारी दृष्टि, भगवत्स्मरणाने

अष्टसात्त्विकभावांच्या फुलोऱ्यांतून मधून मधून अभिव्यक्त होणारी त्यांची निरंतर भावसमाधि, खऱ्या जिज्ञासूला एकदोन वाक्यांतच निःशंक करणारी प्रामाणिक निश्चयात्मक वाणी, इष्ट किंवा अनिष्ट उपलब्धींच्या हेलकाव्यानी किंचित् ही विचलित न होणारे त्यांचे स्थैर्य, भक्तांचे दोष न पाहणारा त्यांचा वात्सल्यभाव इत्यादि अनेक गुणवैशिष्ट्यांचे दर्शन त्यांच्या सहवासात घडत असे. याशिवाय सर्वांत श्रेष्ठ लाभ होई तो त्यांच्या सान्निध्यांत अनुभवाला येणाऱ्या सहज, अखंड शक्तिसंचाराचा. 'तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे' या समर्थोक्तीचा प्रत्यय अनेकांना त्यांच्या सहवासात लाभला आहे.

## कुंडलिनीशक्तिपातयोग आणि श्रीमद्भागवत

प. पू. दत्तमहाराजांचे वेदान्तावरील व श्रीमद्भागवतावरील प्रभुत्व मान्य करूनही त्यांचा शक्तिपातयोगाशी काही संबंध नाही असे कोणी म्हणतातही. पण हे शास्त्राला किंवा वस्तुस्थितीला धरून नाही. ज्ञान, भक्ति व कर्म ह्या तीनही योगात शक्तिपात अनुस्यूत आहे. ह्याविषयी शक्तिपाताचार्य श्री योगेन्द्र विज्ञानी यांचे सप्रमाण विवेचन त्यांच्या महायोगविज्ञान या ग्रंथांत अष्टम प्रकाशात आले आहे. ते मुळांतूनच वाचण्यासारखे आहे. त्यांत वेदान्त मार्गात शाम्भवी दीक्षेचे महत्त्व असे सांगितले आहे -

**गुरोरालोकमात्रेण भाषणात्स्पर्शनादपि।**
**सद्यः सञ्जायते ज्ञानं दीक्षा सा शाम्भवी मता।।**

(वायवीय संहिता. २५. ७)

परम कृपाळू गुरुदेवांच्या दृष्टिमात्राने किंवा केवळ त्यांच्या

वचनाने शिष्याला तात्काळ दिव्य ज्ञान प्राप्त होते. प. पू. दत्तमहाराजांची दीक्षा याच प्रकारची होती हे प. पू. दत्तमहाराजांचा शक्तिपातयोग या लेखांत स्पष्ट केले आहेच.

**श्रीभक्तिरसामृतसिन्धु** या ग्रंथात भक्तांच्या अंतरांतील भक्तिभावाच्या लक्षणांचे वर्णन आले आहे.

**नृत्यं विलुठितं गीतं क्रोशनं तनुमोटनम्।**
**हुङ्कारं जृम्भणं श्वास भूमा लोकानपेक्षिता॥२॥**
**लालास्रावोऽट्टहासश्च घूर्णा हिक्कादयोऽपि च।**

भगवद्भक्तीच्या आवेशांत नृत्य, गायन, जमीनीवर लोळणे, आक्रोश, अंगविक्षेप, दीर्घ श्वास, लोकनिंदेची उपेक्षा, लाळ वाहणे, अट्टहास्य, चक्कर येणे, उचक्या, हातपाय आपटणे इत्यादि बाह्य क्रियांचे वर्णन आहे. त्याच ग्रंथांत ह्या सर्व क्रिया सुषुम्णेत प्रवेशिलेल्या प्राणामुळे होतात. अर्थात् या कुंडलिनीजागृतीच्या क्रियाच आहेत अशी उपपत्ती पण दिली आहे. भक्तिशास्त्रांत श्रेष्ठ मानलेले अष्ट सात्त्विक भावसुद्धा प्राणाच्या विक्रियांतून उद्भवतात असे या ग्रंथात प्रतिपादन आहे. भूमितत्त्वाचा आश्रय केलेल्या प्राणाने स्तंभ (ताटस्थ्य), जलाच्या आश्रयाने अश्रुपात, तेजतत्त्वाच्या आश्रयाने स्वेद आणि वैवर्ण्य, आकाशस्थित प्राणाने विलय (मूर्च्छा) आमि स्वस्थ प्राणाच्या मंद, मध्यम आणि तीव्र संवेगाने अनुक्रमे रोमांच कंप आणि वैस्वर्य (स्वरविक्रिया) हे अष्ट भाव प्रकट होतात. प्रस्तुत ग्रंथात अनेक लेखकांनी प. पू. दत्तमहाराजांच्या भागवतसप्ताहांत श्रोत्यांना शक्तिसंचाराच्या अनुभूति येत असत असे प्रतिपादन केले आहे. त्याची

ही संक्षिप्त शास्त्रीय भूमिका आहे. श्रीमद्भागवतात भक्तीची लक्षणे अशीच सांगितली आहेत-

आपल्या परमप्रिय भगवंताच्या नामकीर्तनाने उद्भवलेल्या प्रेमाने त्या भक्ताचे चित्त द्रवीभूत होते. त्या उचंबळत्या प्रेमभावाने तो खळखळ हसू लागतो, कधी स्फंदून स्फुंदून रडूं लागतो, कधी हंबरतो, कधी गाऊं लागतो, कधी वेड्यासारखा नाचू लागतो अशा लोकबाह्य क्रिया करूं लागतो. अशा विक्रियांची व भगवत्प्रेमाने प्रकट अष्ट सात्त्विक भावांची वर्णने श्रीमद्भागवतांत विपुल आहे. हे सर्व दिव्य आह्लादिनी कुंडलिनी शक्तीचेच आविष्कार आहेत, देहपातस्तथा कम्पः परमानन्दहर्षणे। स्वेदो रोमाञ्च इत्येच्छक्तिपातस्य लक्षणम्। देह खाली पडणे, कंप, आनंदातिशयाने हसणे, घाम येणे, रोमाञ्च इत्यादि शक्तिपाताची लक्षणे सूतसंहितादि तंत्रग्रंथांत वर्णन केलेली आढळतात. ती इथे विस्ताराने उद्धृत करण्याची आवश्यकता नाही. श्री मधुसूदन सरस्वतींनी श्रीभगवद्भक्तिरसायन ह्या ग्रंथांत भक्तीच्या सहज आविष्काराला साध्य भक्ति असे म्हटले आहे. श्रीमद्भागवतांत (स्कंध ७ अ. ७) या भक्तीचे वर्णन असे केले आहे.

**एवं निर्जितषड्वर्गैः क्रियते भक्तिरीश्वरे।**
**वासुदेवे भगवति यया संलभते रतिम्।।३२।।**
**निशम्य कर्माणि गुणानतुल्यान् वीर्याणि लीलातनुभिःकृतानि।**
**यदातिहर्षोत्पुलकाश्रुगद्गदंप्रोकण्ठउद्गायतिरौतिनृत्यति।।३३।।**
**यदा ग्रहग्रस्त इव क्वचिद्धसत्याक्रन्दतेध्यायतिवन्दतेजनम्।**
**मुहुः श्वसन्वक्ति हरेजगत्पतेनारायणेत्यात्ममतिर्गतत्रपः।।३४।।**

षड्रिपूंवर विजय मिळवून भगवान वासुदेवांची (साधन)भक्ति केल्याने रति (साध्यभक्ति) प्राप्त होते. तेव्हां भगवंतांनी लीलादेह धारण करून केलेल्या पराक्रमांचे, त्यांच्या गुणांचे आणि कर्मांचे श्रवण करतांना हर्षातिशय (अट्टाहास्य), रोमांच, अश्रुपात, ऊर भरून येणे, गळा रुद्ध होणे, उच्च स्वराने गाणे, रुदन करणे, नाचणे, पिशाचाने झपाटल्यासारखे हंसणे, मोठ्याने ओरडणे, ध्यानमग्न होणे, सर्वांना नमस्कार करणे, दीर्घ श्वासोच्छ्वास करणे, 'हरी, नारायण, जगत्पति' असे स्वतःशीच बोलणे असे व्यवहार निर्लज्जपणे करतो.

या श्रीमद्भागवतांत आणि इतर भक्तिसास्त्रग्रंथांतही सहज भक्तीच्या उदयांनंतर ही लक्षणे प्रकट होतात. इतकेच नव्हे तर भगवंताच्या कथा श्रवण केल्याचे तेच मुख्य फळ आहे असे प्रतिपादन आहे. तेव्हा श्रीमद्भागवताच्या निरूपणातून हे दिव्य आल्हादिनी कुंडलिनी शक्तीचे प्रक्षेपण होत नसेल तर ते व्यर्थच म्हणावे लागेल. प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांच्या भागवतसप्ताहांतून अशा शक्तिसिंचनात श्रोते न्हाऊन निघत याची साक्ष ह्या ग्रंथांत अनेक लेखकांनी दिली आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या साधुत्वाच्या अनेकविध पैलूंचे दर्शन अशा रीतीने केवळ त्यांच्या भागवतसप्ताहांच्या अनुशीलनाने घडू शकते हे आम्ही स्पष्ट केले. आतां असे दर्शन घडविण्यासाठी आपल्याला तसे अधिकारी वक्तेही लाभले पाहिजेत. गुणी गुणं वेत्ति या न्यायाने श्रीदत्तमहाराजांचे गुण ज्यांच्याजवळ अंशतः तरी आहेत, पू. महाराजांचा कृपापूर्ण सहवास व मार्गदर्शन ज्यांना लाभले आहे आणि

ज्यांनी त्यांचे एक वा अनेक भागवतसप्ताह श्रवण केले आहेत आणि ज्यांनी श्रीदत्तमहाराजांकडून प्राप्त झालेले भागवतसप्ताहाचे व्रत निष्ठेने पुढे चालविले आहे असे दोन अधिकारी लेखक या ग्रंथाला लाभले आहेत. भागवताचार्य डॉ. राजारामशास्त्री (रा. ल.) जोशी, सोलापूर व भावताचार्य पं. शरदशास्त्री जोशी, बार्शी यांचा विशेष उल्लेख इथे करणे उचित होईल. डॉ. रा. ल. जोशी (पू. राजाभाऊ) यांचा व दत्तमहाराजांचा दीर्घकालीन, घनिष्ठ व आंतरिक संबंध आहे. तसेच तीन पिढ्यांचा श्रीमद्भागवतसेवेचा वारसा लाभलेले पं. शरदशास्त्री यांनाही महाराजांचे आत्मीयतापूर्ण मार्गदर्शन झाले आहे. त्यांचे लेख दत्तमहाराजांच्या सर्व भक्तांना पुनःपुनः वाचनीय आणि मननीय वाटतील यांत संशय नाही. 'श्रीगुरुचरित्राचा अन्वयार्थ' आधुनिक दत्तभक्तांना विशद करणारे प. पू. योगिराज गुळवणीमहाराजांचे अनुग्रहीत गुरुभक्त उ. र . कुर्लेकर यांच्यावरही पू. श्रीदत्तमहाराजांचे निकट सान्निध्य आणि कृपा आहे. त्यांनीच दिल्ली येथे महाराजांचा भागवतसप्ताह आयोजित केला होता. ती सर्व हकीकत तिथे घडलेल्या चिंतनीय प्रसंगासहित या ग्रंथांत आली आहे. निरंतर श्रीवासुदेवनिवास च्या संपादिका कु. सुशीलाताई मोडक यांनी स्वतः आयोजित केलेल्या कुरुगड्डीच्या भागवतसप्ताहाची हकीकत त्यांच्याच भक्तिभावाने ओथंबलेल्या शब्दात प्रस्तुत केली आहे. गुरुभगिनी नीलाताई जोशी यांच्या 'प्रयाग' या ग्रंथांतून आम्ही दादर व खर्डा येथील सप्ताहांचे संकलित केले आहे. बीडचे डॉ. दिलीप व डॉ. सौ. सुरेखा देशमुख, गुलबर्ग्याचे डॉ. व सौ. कमलापूरकर, वसईचे श्री. कडीकर, मलकापूरचे श्री. रमेश

घिर्णीकर व प्र. ब. कुलकर्णी, पुण्याचे द. र. देशपांडे ह्या सर्व दत्तमहाराजांचे निःसीम भक्तांनी आपल्या आपल्या गांवी आयोजित केलेल्या सप्ताहांचे वर्णन केले आहेत. या सर्वच सप्ताहांत कांही ना कांही लक्षणीय घटना घडल्या आहेत. त्या वाचकांना चित्तवेधक आणि चिंतनीय वाटतील असा विश्वास वाटतो.

अगदी ऐनवेळी मिळालेला प. पू. स्वामीआनंददेव गिरी (पूर्वाश्रमीचे भागवताचार्य श्री. किशोरजी व्यास)यांचा छोटासाच लेख पण भावसौरभप्रचुर लेख या ग्रंथाच्या शिरोभागी कस्तुरीतिलकासारखा शोभेल यात शंका नाही.

ह्या सर्व भक्तांनी हे लेखन श्रीसेवेच्या भावनेने केले आहे. ही सेवा श्रीचरणी खचितच रुजूं झाली आहे. सर्व दत्तभक्तांना हा ग्रंथ प्रिय होऊन त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीला पोषक ठरावा अशी प्रार्थना सर्व लेखकांच्या वतीने आम्ही श्रीगुरुचरणी करतो.

अनेक लेखकांच्या सहभागाने या ग्रंथात विविधता आली आहे आणि प. पू. श्रीदत्तमहाराजांचे विविध अंगांनी दर्शन घडले आहे. अशा ग्रंथात सहाजिकच काही द्विरुक्ति, थोडा विस्कळीतपणा असे दोष येणे अपरिहार्यच असते. वाचक उदारमनाने याकडे दुर्लक्ष करून ग्रंथाच्या साराकडे लक्ष देतील असा विश्वास वाटतो.

हा ग्रंथ सिद्ध करण्यात पुढाकार घेतलेल्या 'प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज समग्र चरित्र समिती' ने मला ही संपादनसेवा करण्याची संधी दिली याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहे. या कार्यात चरित्र लेखन समितीचे कार्याध्यक्ष प. पू. श्री दत्तमहाराजांचे शिष्य ज्यांना

पू. दत्तमहाराज बुवासाहेब यानावाने हाक मारायचे, किर्तनाचे व्रत स्विकारलेले राष्ट्रीय किर्तनकार दीक्षाधिकारी पू. ह. भ. प. श्रीमोरेश्वर जोशी (चऱ्होलीकर) महाराज यांचे अमोल सहकार्य झाले आहे. तसेच गुरुभक्त श्री. विनायक ग. जोशी, गु. भ. श्री. व सौ. घाटपांडे, इत्यादींचे अमोल सहकार्य झाले आहे.

श्रीमहाराजांनी केलेल्या शेकडो भागवतसप्ताहांतून जे अमेय ईश्वरी कार्य केले आहे त्याचा एक अल्पांश म्हणजे ह्या ग्रंथात सादर केलेले भागवतसप्ताह आहेत. आणखी किती तरी सप्ताहांची माहितीसुद्धा आपल्याकडे नाही. ही सर्व माहिती आमच्याकडे पाठविण्याची नम्र कळकळीची विनंति आम्ही पुन्हां एकदा श्रीमहाराजांच्या भक्तगणांना करीत आहोत. श्रीमहाराजांचे पावक जीवन अधिकाधिक प्रमाणांत लोकांपुढे यावे याच एका तळमळीने आम्ही हे आवाहन वारंवार करीत आहोत 'मूर्तिमंत भागवत' हा केवळ एक ग्रंथ न होतां ती एक मालिका व्हावी व तिच्या अनुशीलनाने आपला सर्वांचा मोक्षमार्ग प्रशस्त व्हावा हीच दत्तनामक गणेश आणि वामनसंज्ञक दत्ताच्या चरणी प्रार्थना.

पुणे फाल्गुन शु॥१४, शके १९२९

श्रीदत्तचरणरजाभिलाषी

**वासुदेव व्यंकटेश देशमुख**

# भागवतस्वरूप ब्रह्मश्री दत्तमहाराज

स्वामी गोविंददेवगिरी
(आचार्य किशोर व्यास)

अनर्घ्यरत्नप्रसवा महाराष्ट्र भूमीने गेल्या शतकात जी अमोल रत्ने भारतीय समाजास प्रदान केली त्यात प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे स्थान उच्च आहे. राजकीय व सामाजिक कार्यांमध्ये प्रसिद्ध असलेल्या व्यक्तींची नावे वारंवार प्रसिद्धीच्या झोतात येतात व सर्वसामान्यांना ठाऊक होतात, पण काही विभूति दैनंदिन सामाजिक उलाढालींपासून दूर असूनही आपल्या तपोरूप कर्तव्यात अशा मग्न असतात की त्यांच्या ज्ञानाचा, चारित्र्याचा व अध्यात्मिक साधनेचा समीपस्थ समाजावर स्थायी परिणाम होऊन त्या वर्तुळातील लोकांची जीवनशैली आध्यात्मिक दृष्ट्या उंचावतेच; पण पुढील अनेक पिढ्यांनाही हा प्रेरणा-प्रकाश प्रभावित करीत राहतो. ब्रह्मश्री पू. दत्तमहाराजांचे जीवन समाज मंदिरातील अशा शांत, पवित्र व प्रेरक नंदादीपासारखे होय!

पवित्र परंपरेने लाभलेला व त्यांच्या ठायी मुरलेला ज्ञानसाधनेचा व ईश्वरोपासनेचा कौटुंबिक वारसा, संस्कृतातील न्यायादि शास्त्रांचे सखोल अध्ययन-अध्यापन व त्यातून परिणत झालेली प्रगाढ विद्वत्ता, तसेच योगिराज पू. गुळवणीमहाराजांच्या

योगपीठाचे उत्तराधिकारी म्हणून लाभलेले अधिष्ठान या त्रिसूत्रीने श्रीमहाराजांचे जीवन व कार्य सुशोभित आहे व हे सर्वही पैलू आपापल्या परीने महत्त्वाचे असून त्यांचे विस्ताराने विवेचन आवश्यक, शक्य व उपयोगी आहे.

पण या तीनही अधिष्ठान तीर्थांच्या काठाकाठाने त्यांच्या जीवनात श्रीमद्‌भागवत कथा-प्रवचनाची सुंदर सरिता सातत्याने वाहत राहिली, या पवित्र भक्ति प्रवाहाने त्यांचे जीवन अत्यंत प्रभावित व आध्यात्मिकदृष्टया सुप्रकाशित झाले. मुळात श्रीमद्‌भागवत हा थोडीही संवेदनशीलता असलेल्या कुणालाही मानसिक समाधान, बौद्धिक तृप्ति व अध्यात्मिक आंनद देऊन भारून टाकणारा ग्रंथ होय! या दिव्य भागवतामृताला पू. श्रीमहाराजसारखे सुवर्णपात्र लाभलेआणि त्यांच्या संपर्कात येणारा प्रत्येक भाग्यवान काना-मनाने धन्यतेच्या वर्षावात न्हाऊन निघाला.

श्रीमहाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षापासून आजीव व अखंडपणे भागवत कथा-सेवा केली;अगदी मन:पूर्वक केली ती इतकी की त्यांचे जीवनच भागवतमय झाले. त्यांचे अंतरंग भागवताशी तद्रूप झाले. भागवताचा त्यांचा तादात्म्य संबंध साकारला. एरवी सामान्यत: अबोल व गंभीर असणारा हा महान तर्कपंडित अतीव तन्मयतेने भागवतातील भक्तिकथा सांगत असताना इतका रंगून जाई कि तो भगवत् प्रेम प्रवाह नेत्रांवाटे ओसंडून वाहू लागे व वाग् गद्‌गदा द्रवते यस्य चित्तं रुदत्यमीक्ष्णम्...
हे भागवतातील भगवंताचे शब्द साकारल्याचा अनुभव येई.

जाणे भक्तीचा जिव्हाळा, तोचि दैवाचा पुतळा या संत तुकारामोक्तिनुसार ते तर दैवाचा पुतळा होतेच; पण अशा संतमुखातून भागवत श्रवण करणारे श्रोतेही सुदैवीच!

श्रीमहाराजांच्या भागवत-तादात्म्याचा परिचय होण्यासाठी विचक्षणांना त्यांची भागवत कथा श्रवण करणे अनिवार्य नव्हते. त्यांचा संपूर्ण आचार व उद्‌गार हे भागवताचेच स्पंदन होते.

**सन्तोऽनपेक्षा मच्चिता:प्रशान्ता: समदर्शिन:।**
**निर्ममा निरहङ्कारा निर्द्वंद्वा निष्परिग्रहा:॥**
**अकिञ्चनस्य दान्तस्य शान्तस्य समचेतस:।**
**मया सन्तुष्टमनस: सर्वा: सुखमया दिशा:॥**

भागवतात सांगितलेली ही सर्व संतलक्षणे त्यांच्यात खरोखरी मुरलेली होती. त्यांचे अत्यंत सहज, साधे, निगर्वी, निरागस, शांत, सहिष्णु, धर्मपरायण व भगवद्‌भक्तिने युक्त जीवन अंतरंग व बहिरंग दोन्ही अंगांनी भागवतीय विचारांशी इतके एकरूप होत की त्यांना बघून मला चैतन्य महाप्रभूंच्या

**तृणादपि सुनीचेन तरोरपि सहिष्णुना।**
**अमानिना मानदेन कीर्तनीय: सदा हरि॥**

या श्लोकाचे चालते बोलते उदाहरणच ते वाटत.

श्रीमहाराजांच्या आत्यंतिक साधेपणामुळे स्थूल दृष्टीच्या पामरांच्या नजरेत त्यांची महानता न भरली तरी जाणकारांना त्यांची थोरवी ज्ञात होती म्हणूनच महाभागवत पू. श्री. डोंगरेजी महाराजांसारखे सत्पुरुष बार्शी येथे स्वत: भागवत कथा सांगत असताना श्रीमहाराज मंडपात येताहेत हे बघूनच व्यासपीठावरून

उठले व साष्टांग नमस्कार करून आग्रहपूर्वक स्वतःच्या व्यासपीठावर श्रीमहाराजांना बसवून त्यांना कथा सांगावयास लावली व स्वत: श्रवणारू बसले ते उगाच नव्हे सत्पुरुषासच अन्य सत्पुरुषाची खरी योग्यता लक्षात येते याचा हा प्रत्यय होता व बार्शीच्या भगवंताने पू. महाराजश्रींच्या योग्यतेची दिलेली ती खरीखुरी पावती होती.

त्यांची निरहंकारिता व नम्रता इतकी सहज होती कि त्यांच्या थोरवीची जाणीवही त्यांना कधी झालीच नाही. वासुदेव निवासात पू. पं. आत्मारामशास्त्री जेरे जेव्हा भागवत सांगण्यासाठी येत तेव्हा श्रीमहाराज त्यांच्या व्यक्तिगत सेवेत तत्परतेने वावरत. **माझ्या श्रद्धेखातर आमच्या वडिलांच्या वर्षश्राद्ध प्रसंगी भागवत सप्ताहासाठी ते हर्नियाच्या ऑपरेशननंतर सर्वजण नको म्हणत असतानाही विसाव्या दिवशी आले व रोज ६ ते ७ तास कथा निरूपण केले.** सर्वात कहर म्हणजे एकदा मी त्यांचे घरी दर्शनास गेलो असता मला तुमची संपूर्ण कथा श्रवण करावयाची आहे असे सांगून खरोखरी बार्शीस सपत्नीक व पू. ताई महाराजांसह संपूर्ण कथा श्रवण करून वक्त्याचा गौरव वाढविला खराच पण आणखी कळस म्हणजे बार्शीहून निघतांना एक मागणी केली म्हणाले मला तुमच्या सुदामा प्रसंगाची कॅसेट द्याल का? हा प्रसंग पाहून मला पुन्हा पुन्हा ऐकावासा वाटतो इतक्या थोर विभूतिंच्या या शब्दांनी मी गहिवरलो, किती लिहावे ....

**वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम्!**

# प्रात:स्मरणीय दत्तमहाराज आणि श्रीमद्‌भागवत

-डॉ.रा.ल.जोशी,सोलापुर

गजाननमहंवन्दे कार्यकारणमानुषम् ।
शेगाववासिनं नित्यं सर्वकार्यार्थसिध्दये ॥

पूज्य दत्तमहाराजांच्या ठिकाणी जी असामान्य गुणसंपदा दिसून येते त्यासंबंधी विद्यार्थी-दशेपासून आम्हाला जिज्ञासा उत्पन्न झाली होती. परंतु त्यावेळी निश्चित स्वरूपात कांही कळण्यासारखी किंवा सांगण्यासारखी परिस्थिती नव्हती. कदाचित् प्रारब्ध फलोन्मुख न झाल्यामुळे श्रीमद्‌भागवताविषयी हे इतर पुराणांप्रमाणेच एक पुराण आहे एवढीच माहिती होती. या पुराणाशी जसजसा संबंध येऊ लागला तसतशी त्याच्यांविषयी गोडी वाटू लागली. सुमारे पंचवीस वर्षांचा काल गेल्यावर याच्या वाचनाने अधिकाधिक आनंद वाटू लागला. त्याचे पर्यवसान असे झाले की पूज्य दत्तमहाराजांच्या ठिकाणी असलेल्या गुणसंपदेच्या कारणाचा शोध लागला. पूज्य दत्तमहाराजांनी वयाच्या १५-१६ व्या वर्षी सुरू करून आमरण व्रतरूपाने केलेल्या श्रीमद्‌भागवत-सप्ताह-पारायण-चिंतन-निरूपण याचे परिपक्व फल म्हणजेच परमादरणीय दत्तमहाराजांचे विशुद्ध जीवनसूत्र होय. हे निश्चित समजले. या सूत्राची उकल होण्यास जवळ जवळ चाळीस वर्षे लागली. आज निश्चितपणे असे म्हणू

शकतो की पू. दत्तमहाराजांचे संपूर्ण जीवनच श्रीमद्‌भागवतातील लहान-मोठया प्रसंगातून त्यांना भावलेल्या तत्त्वज्ञानाने घडविलेले आहे. त्यांच्या इहलोकयात्रासमाप्तीचा प्रसंग तर या संबंधात कलाशाध्याय आहे. त्यांच्या मृत्यूने श्रीमद्‌भागवताचा नायक असलेल्या परीक्षिताच्या मृत्यूचे विशदीकरण झाले व परीक्षिताच्या मृत्यूचे गूढ स्वरूप उकलल्याने पू. दत्तमहाराजांच्या मृत्यूचे स्वरूप समजून येऊ शकते. पू. दत्तमहाराजांच्या आणि श्रीमद्‌भागवतातील परीक्षिताच्या मृत्यूचा इतका निकटचा संबंध दिसून येतो. श्रीमद्‌भागवतातील कोणकोणत्या लहान-मोठया प्रसंगांचा महाराजांच्या जीवनावर कशाकशा प्रकारचा ठसा उमटला हे सविस्तर समजून घेणे हा या लेखन प्रयत्नाचा उद्देश आहे. श्रीमद्‌भागवत हे दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारे, हे जीवनसुखी, समृद्ध, आंनदी करणाऱ्या तत्त्वज्ञानाचा उद्‌घोष करणारे असून कोणाही साधकाला त्याचा अनुभव घेणे शक्य आहे हा विचार सर्वांपर्यंत पोचवावा हा या लेखनामागचा हेतु आहे. पूज्य दत्तमहारांजांच्या चरित्राच्या निमित्ताने हे घडत आहे हा एक दुग्धशर्करा योग आहे.

## हरिः शं ते करिष्यति

पद्मपुराणातील गोकर्ण माहात्म्यापासून सुरूवात केली असता एक आश्वासक जीवनसूत्र आढळून येते. हिमालयात संचार करणाऱ्या भगवान् नारद महर्षींना ज्ञान व वैराग्य या दोन वृध्द पुत्रांसह दुःखी-कष्टी असलेल्या तरुण भक्तिमातेने आपली करुण कहाणी सांगितली व दुःख-सागरातून आपल्याला मुक्त करण्याविषयी

प्रार्थना केली. महाकारुणिक महर्षि नारदांनी तिचे सांत्वन करताना म्हटले ''हरिः शं ते करिष्यति ।'' नारदांचा अभिप्राय असा - तूं मुळीच चिंता करू नकोस. परमेश्वर तुझे कल्याण करील. या सूत्रात्मक वाक्यावर विश्वास ठेवल्यास त्यातून अधिकाधिक परिणामकारक अर्थ निघू शकतात. १) परमेश्वर तुझे कल्याण करीलच. निष्कारण दिसेल त्याच्यापुढे तोंड वेंगाडू नये. आपले दु:ख निवेदन करू नये. पू. दत्तमहाराजांचा या सूत्राच्या या अर्थावर इतका विश्वास होता की त्यामुळेच बार्शीच्या मुक्कामात पूर्ण एकांतात भेट झाली. अनेक विषयावर मनमोकळी चर्चा झाली परंतु मला माहित असलेल्या त्यांच्या दु:खाविषयी त्यांनी एकही शब्द उच्चारला नाही. त्याचे कारण एकच दिसते की परमेश्वर या स्थितीतून त्यांना पूर्णपणे मुक्त करीलच या विषयी त्यांची खात्री होती. तसे पुढे घडूनही आले.

२) या सूत्राचा पहिल्या अर्थातूनच निघणारा दुसरा अर्थ असा - **परमेश्वरच** तुझे कल्याण करील. दुसऱ्या कोणाकडे दु:खमुक्तीसाठी प्रार्थना केली तर परमेश्वरावरील विश्वास कमी असल्याचे मानावे लागते. पू. दत्तमहाराजांच्या बाबतीत तसे मुळीच नव्हते.

३) या सूत्राचा तिसरा अर्थ - परमेश्वर तुझे **कल्याणच** करील. या अर्थामुळे परमेश्वरावरील विश्वासाची पातळी अधिक वाढलेली आहे. 'परमेश्वर जे करील तेच तुझे कल्याण' असा त्याचा अंतिम अर्थ असून पूज्य दत्तमहाराज या सूत्राचा हा अर्थ अनुभवीत होते. ते म्हणत समष्टि संकल्पाप्रमाणेच सर्व घडत असते. ''प्राप्तं प्राप्तमुपासीत'' या सिध्दांताप्रमाणे ते सर्व स्वीकारीत असत. सहन करीत असत.

## सुखमस्ति विरक्तस्य

गोकर्ण माहात्म्यामध्ये गोकर्णाने आपल्या पित्याला अत्यंत परिणामकारक उपदेश केला आहे. प्रत्येक प्राणिमात्राची ज्या सुखाकरिता धडपड असते ते सुख कोणाला मिळते या विषयी गोकर्णाने एक परखड सिध्दांत सांगितला आहे. ''न चेन्द्रस्य सुखं किंचिन्न सुखं चक्रवर्तिनः। सुखमस्ति विरक्तस्य॥'' खरे सुख तीव्र वैराग्य उत्पन्न झालेल्या व्यक्तीलाच प्राप्त होते. हे सुख पू. दत्तमहाराजांना प्राप्त झाल्याचे त्यांच्या सान्निध्यात आलेल्यांनाच कळत होते.

चित्तशुद्धीमुळे उत्पन्न होणारी अंतःकरणाची प्रसन्नता ही श्रीमद्‌भागवताच्या तात्पर्यापैकी एक मानण्यास हरकत नाही. इतकी तिची पुनरूक्ति सुरूवातीपासून केलेली आढळून येते. शौनकांनी सुतांना पुराणे, इतिहास यांचे सार सांगण्यासंबंधी विनंती करतानाच तसा निर्देश केला आहे. ''असे सर्वांचे सार सांगा की ज्यामुळे चित्त प्रसन्न होईल'' ... येनात्मा संप्रसीदति।''

अहंकाररहीत झाल्याशिवाय चित्त शुद्ध होऊच शकत नाही आणि चित्त शुद्धीशिवाय प्रसन्नता प्राप्त होऊ शकत नाही. या चित्तशुद्धिकरीता पू. दत्तमहाराज किती साक्षेपी होते हे त्यांच्या सहस्त्रचंद्रदर्शनशांतीच्या वेळी त्यांनी केलेल्या भाषणातून स्पष्ट होते. या शांतीच्या निमित्ताने झालेला सत्कार हा अहंकाराच्या द्वारा चित्तशुद्धीच्या आड तर येणार नाही ना? अशी भीती त्यांनी त्यावेळी व्यक्त केली होती.

या प्रसन्नतेने त्यांचे संपूर्ण जीवनच व्यापले होते. कोणत्याही परिस्थितीकडे सकारात्मक दृष्टीने पहाण्याची प्रवृत्ती यामुळेच त्यांच्या ठिकाणी निर्माण झाली होती. त्यासाठीही त्यांना श्रीमद्‌भागवतातील नारदांनी व्यासांना कथन केलेल्या आत्मचरित्राचा आधार मिळाला होता. त्याचा वारंवार उल्लेख त्यांच्या बोलण्यात येत असे. श्रीमद्‌भागवतातील असे काही प्रसंग कथानकदृष्टया फारसे महत्वाचे नाहीत परंतु त्यातील दैनंदिन जीवनोपयोगी तत्वज्ञान प्रभावीपणे ते सांगतात म्हणून ते विशेष महत्त्वाचे वाटतात. अशा प्रसंगापैकींच हा एक प्रसंग असल्यामुळेच पू. महाराजांच्या तोंडून तो वरचेवर ऐकण्यास मिळत असे. पूर्वजन्मी नारद एक दासीपुत्र होते. त्यांची माता मालकाच्या गाईची धार काढण्यास गेली असता पायाला सर्प दंश होऊन ती मरण पावली. त्यावेळी पाच वर्षे वय असलेल्या नारदांनी, ''मातेचा मृत्यू हा परमेश्वराचा अनुग्रह-उपकारच मानून मी उत्तरेला हिमालयात निघून गेलो.'' (अनुग्रहं मन्यमान: प्रातिष्ठं दिशमुत्तराम्) । असे स्वत:चे वर्णन केले. पू. महाराज थोडे हसून पुढे म्हणत -''मातृवियोग व्हावा यासाठी त्यांनी काही अनुष्ठान केले नव्हते!'' परंतु वियोग झाल्यानंतर या घटनेचा उपयोगच करून घेण्याचा निश्चय करून ते हिमालयात निघून गेले. चातुर्मासात भेट झालेल्या भिक्षूंनी जे आत्मज्ञान करून दिले होते, त्या ज्ञानाचा अनुभव घेण्याच्या बाबतीत जो मातेचा अडसर होता तो नाहीसा झाला हा अनुग्रह नव्हे तर काय? परंतु सामान्यपणे असे कोणाला वाटत नसते. नारदांनीसुध्दा मातेचा वियोग होण्यापूर्वी तसा विचारही मनात आणला नव्हता. परंतु वियोग झाल्यानंतर

मात्र या घटनेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याचे ठरवून तो त्यांनी करून घेतलाही. तसा दु:स्थितीकडे सकारात्मक दृष्टिकोनाने पाहून तिचा आपल्या जीवनातही उपयोग करून घ्यावा हीच पू. महाराजांची अपेक्षा.

## भीष्मस्तुति

श्रीमद्‌भागवतातील काही भाग पू. दत्तमहाराजांना विशेष आवडत असे. भीष्मस्तुति ही त्यापैकी एक होय. श्रीक्षेत्र माणगांवला टि. म. वि. मधील माजी निवासी विद्यार्थ्यांच्या संमेलनात ते मोठया आनंदाने सहभागी झाले होते. तीन दिवसांच्या त्या संमेलनात पू. महाराजांची तीन प्रवचने व्हावीत अशी आमची इच्छा त्यांनी लगेच मान्य केली. एवढेच नव्हे तर त्या प्रवचनांचा विषय त्यांनी आपण होऊनच सांगितला आणि तो म्हणजे भीष्मस्तुति. पन्नास वर्षांच्या सहवासात त्यांनी प्रवचनाचा विषय आपण होऊन सुचविल्याचे मला माहीत नाही. इतकी आत्मीयता या विषयासंबंधी वाटण्याचे कारण इतकेच दिसते की भीष्मपितामह हे ज्ञानी होते. भगवान गोपालकृष्णांना त्यांनीच फक्त खरे जाणले होते. भगवतांच्या सगुण-निर्गुण रूपाचे यथार्थ रीतीने आकलन फक्त त्यांनाच झाले होते. भगवद्‌गीतेत वर्णन केलेल्या ज्ञानी भक्ताचे तेच स्वत: उदाहरण होते. या ज्ञानी भक्ताने आपल्या प्रयाणसमयी वर्णन केलेले भगवंताचे वर्णन म्हणजेच ही भीष्मस्तुति. या वर्णनाचे त्यांना आकर्षण असण्याचे कारण म्हणजे पू. श्रीदत्तमहाराज हेही स्वत: ज्ञानी भक्त होते. ''गुणी गुणं वेत्ति'' किंवा ''शिवो भूत्वा शिवं यजेत'' (गुणवानालाच गुण समजतात किंवा स्वत: शिवस्वरूप होऊन

शिवाचे पूजन करावे) या सिध्दांताप्रमाणे महाराजांना ज्ञानी भक्ताची आत्मनिवेदनरूप भगवतस्तुती विशेष आवडली असणे अगदीच स्वाभाविक आहे.

तीव्र विवेकामुळे उत्पन्न झालेली, इतरांना - अगदी शत्रूलासुध्दा - दु:ख न देण्याची त्यांची वृत्ती द्रौपदीच्या उद्‌गाराची आठवण करून देते. झोपेत असलेल्या आपल्या बालकांचा वध करणाऱ्या अश्वत्थाम्याला बांधून अर्जुनाने द्रौपदीसमोर आणले असता द्रौपदीने उद्‌गार काढले-" सोडा सोडा याला. ब्राम्हण हा अत्यंत श्रेष्ठ असतो. पतिव्रता असलेली याची माता गौतमी पुत्रवधामुळे दु:खी झालेल्या माझ्याप्रमाणे दु:खी न होवो "पूज्य दत्तमहाराजांनीही आपल्यावर आभिचारिक प्रयोग करणाऱ्यावर तो प्रयोग उलटविण्याची परवानगी मागितली असता ती दिली नाही. त्या मागची त्यांची भूमिका द्रौपदीप्रमाणेच, "आत्मन: प्रतिकूलानि न परेषां समाचरेत् "(आपल्याला जे दु:खदायक वाटते ते दुसऱ्याच्या बाबतीत आपण करू नये) अशा प्रकारच्या उच्च साधकाची होती.

**चित्तप्रसादन**

पातंजल योग सूत्रांत एक सूत्र आहे. "मैत्री करुणा मुदितोपेक्षाणां सुखदु:खपुण्यापुण्य विषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम्" साधकाने कोणाशी कसे वागावे याविषयी या सूत्रांत मार्गदर्शन केले आहे. सुखी माणसाबरोबर मैत्री करावी, दु:खी माणसाविषयी करुणा उत्पन्न व्हावी, पुण्यवानाला पाहून आनंद व्हावा आणि दुर्जनाची उपेक्षा करावी. या सूत्रांतील उपदेशाप्रमाणे सर्वांत अवघड भाग अखेरच्या अंशात आहे. दुर्जनाच्या आचरणाविषयी पुन:पुन:

विचार, चिंतन आपल्याकडून नेहमी घडत असते. या सूत्रांतील उपदेशाप्रमाणेच पुष्कळसा उपदेश नारदांनी ध्रुवाला केलेला आहे.
''गुणाधिकान्मुदं लिप्सेदनुक्रोषं गुणाधमात्।
मैत्री समानादन्विच्छन्न तापैरभिभूयते।। ''(४-८-३४)
(गुणवानालापाहून आनंद मिळवावा. दुर्जनाविषयी कीव यावी; समान प्रवृत्तीच्या मनुष्याबरोबर मैत्री करावी. असे केले असता दु:ख होत नाही) पातंजल सूत्रात चित्तप्रसादन हे उद्दिष्ट किंवा विधेय असल्यामुळे महाराजांच्या तोंडी हे सूत्र वरचेवर येणे हे स्वाभाविक होते.

## दुस्तर्कात सुविरम्यताम्

ध्रुवाच्या उत्तर आयुष्यात घडलेला एक सामान्य प्रसंग अत्यंत महत्त्वाचा आहे. ध्रुवाच्या सावत्र भावाचा वध एका यक्षाने केला असता ध्रुवाने त्याचा सूड म्हणून क्रोधाविष्ट होऊन संपूर्ण यक्ष नगरीचाच संहार करण्यास प्रारंभ केला. भगवान मनूंच्या उपदेशाने ध्रुव आपल्या उद्दिष्टापासून परावृत्त झाला हा भाग वेगळा. या प्रसंगाचे चिंतन करीत असता एक आशंका निर्माण होते की ज्या ध्रुवाला त्याच्या तपश्चर्येचे फळ म्हणून भगवंताने दर्शन दिले, त्याच्या गालाला शंख स्पर्श केला, त्याची इच्छा पूर्ण केली - त्याला अढळ पदप्राप्त करून दिले. त्या ध्रुवाच्या अंत:करणात इतका पराकोटीचा क्रोध उत्पन्न कसा झाला? तो झाल्यामुळे असे वाटणे स्वाभाविक आहे की क्रोधावर जय मिळविणे कोणालाही शक्य नाही. त्यामुळे क्रोध घालविण्याचा प्रयत्न करूंच नये, कारण परमात्म-दर्शन झालेल्या ध्रुवाला जे जमले नाही ते आपल्या सारख्या सामान्याला जमेल

असे म्हणणे हास्यास्पद ठरेल. वरवर पाहता हा विचार इतका बिनतोड - खोडता न येण्यासारखा- वाटत असला तरी पू. दत्तमहाराज तो तितकाच सहजासहजी असा बोथट करतात की त्यांच्या मूलभूत विचारसरणीचे कौतुक करावेसे वाटते. वरील आक्षेपाला त्यांचे अगदी सूत्ररुप उत्तर असे- ते एवढेच म्हणत ''हा काय विचार झाला? ''याचे स्पष्टीकरण जाणकारांनी स्वत:च करून घ्यावे, विचार तोच की जो आपल्या कल्याणालाच कारण होईल.

कितीही तर्कशुद्ध असला तरी आपल्या हिताच्या दृष्टीने उपयोगी नसला तर तो स्वीकार्य नाही; त्याज्यच होय. तर्क कितीही प्रभावी असला तरी जर तो दुस्तर्क असेल तर शंकराचार्य म्हणतात त्याप्रमाणे ''दुस्तर्कात् सुविरम्यताम् ''-त्या तर्कापासून अगदी दुरच रहाणे योग्य. कल्याणकारक तर्क हा 'श्रुतिसंमत तर्क 'आणि अकल्याणकारक हा दुस्तर्क असा विभाग केला म्हणजे सर्व समाधान होऊ शकेल. क्रोधाचा स्वीकार हा मनुष्याचे कधीही कल्याण करू शकणार नाही. भगवद् गीतेत तर त्या क्रोधाला 'शत्रू समज ' असे भगवंतांनी अर्जुनाला सांगितले ''विद्ध्येनमिह वैरिणम् ''असे म्हणून त्याचा नाश करण्यास सांगितले आहे. ध्रुवाच्या उदाहरणावरुन ते अतिशय कठीण आहे एवढेच समजावे. शांत करण्यास अतिशय कठीण असलेला हा क्रोध येऊ न देण्याचे किंवा आल्यास तात्काळ शमविण्याचे साधन म्हणजे संतोष. उपासनेने, विवेकाने व ईश कृपेने प्राप्त होणारा संतोष हाच क्रोध येऊ देत नाही किंवा आल्यास तात्काळ त्याचा नाश करतो. पू. दत्तमहाराजच याचे मूतिमंत उदाहरण होत.

एखाद्याचे प्रतिकुलाचरण हे क्रोध उत्पन्न करण्यास सामान्यपणे पुरेसे असते. पण पू. दत्तमहाराज त्यावेळी ''अयं तु युगधर्मो हि वर्तते कस्य दूषणम् ''(हा कलियुगाचा प्रताप आहे. दोष ना कुणाचा) या भागवत माहात्म्यसूत्राचा आधार घेत किंवा देत सर्व सहन करीत असत. हे सर्व सहन करण्याचा त्यांचा नेहमीचा आधार भगवद्गीता ही असे. (''तांस्तितिक्षस्व भारत''- २-१४) भगवतांनी उपदेशिलेल्या प्रास्ताविक भागातच इंद्रिय - विषय संबंधाने उत्पन्न होणारे दु:ख हे अनित्य म्हणजे कालांतराने नाहीसे होणारे असल्याने ते सहन करणेच इष्ट होय असा त्यांच्या बोलण्याचा रोख असे.

**अत्यंतिक श्रध्दा**

'हरि: शं ते करिष्यति'या सूत्रावरुन निर्माण झालेली महाराजांची ईश्वरश्रद्धा ही जीवनाच्या सर्वच क्षेत्रात व्यापून राहिलेली होती त्याकरीता पुढील तीन उदाहरणे पुरेशी आहेत. १) घेतो झोप सुखे फिरून उठतो ही ईश्वराची दया; झोपण्याचे कर्तृत्व आपले मानता येईल पण उठण्याचे कर्तृत्व आपले मानणे अवघड आहे. काही लोक झोपलेले पुन: उठलेच नाहीत याचे कारण हेच आहे. २) अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रित:। प्राणापानसमायुक्त: पचाम्यन्नं चतुर्विधम्। (१५-१४ गीता) या गीता सिद्धांताप्रमाणे खाणे माणसाच्या हातात तर पचविणे ईश्वराच्या हातात आहे. ३) मत्त: स्मृतिर्ज्ञानमपोहनंच (स्मरण, ज्ञान आणि त्यांचा अभाव हे माझ्यामुळेच घडते) असे भगवंत म्हणतात. या गीतोक्तीचे श्रवण तर महाराजांच्या तोंडून अनेकवार घडत असे. या सर्वांचे तात्पर्य

एकच की - 'अहं करोमीति वृथाभिमान :'। कर्तृत्व आपल्याकडे घेणे हे अज्ञानाचे द्योतक असून ईश्वरी सत्ताच मानणे हे सूज्ञपणाचे लक्षण आहे. हा ईश्वरी सत्तेचा भाव संतोषवृत्तीला जन्म देऊन जीवन आनंदी करण्यास कारण होतो तसा तो पू. दत्तमहाराजांच्याही बाबतीत झाला होता.

**ज्ञाताज्ञातदोषनिरसनम् ।**

श्रीमद्भागवतात एक विलक्षण संवाद भगवान विष्णु आणि सनत्कुमारादि चार बंधू यांच्यामध्ये झालेला आहे. कथानकाच्या दृष्टीने काहीच महत्त्वाचा नसलेला हा प्रसंग आपल्या दृष्टीने अधिक मोलाचा असून पू. दत्तमहाराजांनाही तसा वाटला होता. भगवान् विष्णूंच्या पार्षदानी सनत्कुमारादि बंधूना विष्णूंच्या भेटीला जाण्यास मना केली होती. त्यावेळी ते विष्णूचे पार्षद-रक्षक आणि सनत्कुमार यामध्ये वाग्द्वंद्व सुरू झाले. सनत्कुमारांनी जय-विजय या विष्णुपार्षदांना, 'पृथ्वीवर तुम्ही असुरयोनीत जन्माला याल असा शाप दिला. शब्दाने शब्द वाढला असणारच. तो आवाज ऐकून भगवान् विष्णु बाहेर आले. त्यांनी सर्व परिस्थिती पाहिली. वस्तुस्थिती न समजण्याइतके भगवान् निर्बुध्द नक्की नव्हते. जय-विजय या द्वारपालांचा काहीच दोष नव्हता. हे जे आपल्याला कळले ते त्यांना (विष्णूंना) समजले नाही. हे म्हणणे धाडसाचे ठरेल. ते समजूनही विष्णूंनी सनत्कुमारादि ब्रह्मदेवाच्या चार मानसपुत्रांची क्षमा मागितली. भागवतातील या प्रसंगाचा पूज्य दत्तमहाराजांच्या मनावर बाल्यावस्थेपासून जबरदस्त परिणाम झाला होता. त्यामुळेच महाराजांच्यापैकी कोणीतरी एका गृहस्थाचा कळत न कळत अपमान

केल्याचे त्यांच्या कानावर आले. वस्तुत: पू. महाराजांचा यात काहीही संबंध नव्हता. तथापि पू. महाराज स्वत: त्या गृहस्थांकडे गेले आणि त्या तथाकथित अपमानाविषयी आपण उदार अंत:करणाने ते बालकृत्य मनावर घेऊ नये असे म्हणून एक प्रकारे क्षमाच मागितली. भागवतातील प्रसंगात सनत्कुमारांच्या नंतर लक्षात आले की आपण जय-विजयाना जो शाप दिला ती आपलीच चूक आहे, त्यांनी आपणास अडवण्यात कोणतीच चूक केलेली नाही. ते हुकुमाचे ताबेदार, त्यांनी त्यांचे कर्तव्य केले. आपण त्यांना शाप देण्यात आपलीच चूक आहे. भगवान विष्णूंना त्यांनी तसे सांगितलेही, अर्थात पूज्य महाराजांच्या उदाहरणात तसे घडले नाही हा भाग वेगळा.

**न कळत आदर्श निर्माण केला**

पूज्य दत्तमहाराजांनी तसे करण्याचे कारण एकच - आपल्या अंत:करणाला दुरूनही अशुद्धतेचा स्पर्श होऊ नये - विकाराचा स्पर्श होऊ नये. जसा स्वप्नात दिलेला शब्द खरा करण्याचा प्रयत्न आमच्या पूर्वजांनी केला. तर आम्ही निदान परंपरेने आपल्याला चिकटणाऱ्या, काल्पनिक का असेना, दोषाचे निराकरण करणे आवश्यक नाही का? असा महाराजांचा आतला आवाज म्हणत असणार. प्रत्येक व्यवहारात हाच विचार त्यांच्या मनात बिंबला होता.

पूज्य महाराजांचे बार्शीला एकदा एक प्रवचन झाले. ते ऐकण्यास माझे एक परिचित गृहस्थ गेले होते. ते जाणकार, चौकस असून साक्षेपी होते. काही दिवसानंतर त्यांची भेट झाली असता

त्यांनी मला थांबवून महाराजांच्या प्रवचनाविषयी सांगण्यास सुरूवात केली. त्यांनी प्रवचनातील विषय वगैरे - त्याची मांडणी किंवा गांभीर्यादि वैशिष्टय या विषयी काहीही न बोलता महाराजांच्याच एका गुणाचा आवर्जून उल्लेख केला. ते म्हणाले ''महाराजांच्या दोन तासांच्या प्रवचनात एकदाही मी, आम्ही किंवा माझे, आमचे, असा शब्दप्रयोग आला नाही.'' प्रथम पुरुषी प्रयोगाचा वापरच न होणे हाच त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे. श्रीमद्भागवताच्या बालपणापासून केलेल्या चिंतनाने ही वृत्ती पू. महाराजांच्या ठिकाणी मुरली होती.

भगवंतांनी ब्रम्हदेवाला सृष्टी निर्माण करण्याची आज्ञा केली असता ब्रम्हदेवांनी ते मान्य केले. पण त्याच वेळी एक विनंती केली की मी सृष्टी निर्माण केली असा अहंकार माझ्या ठिकाणी उत्पन्न न व्हावा. '' मा मे समुन्नद्धमदोऽजमानिनः।''(श्रीभाग. २-९-२९) अहंकार निर्माण होऊ नये म्हणून केवढी सावधानता! याच परंपरेचा वारसा पू. दत्तमहाराजांसारख्या फारच थोड्या लोकांनी पुढे चालू ठेवला.

**अपमान मानी अमृतासम**

दैनंदिन जीवनात अत्यंत प्रतिकूल परिस्थिती उत्पन्न झाली असता शांतपणे त्यातून मार्ग कसा काढावा याचे बाळकडूच महाराजांना त्यांच्या बाल्यावस्थेपासूनच मिळाले होते.

**''सन्मानात् ब्राह्मणो नित्यमुद्विजेत विषादिव ।**
**अपमानस्य चाकाङ्क्षेदमृतस्येव सर्वदा ॥''**

''(साधकाला सन्मानाचा विषाप्रमाणे उव्देग यावा आणि

अमृताप्रमाणे अपमानाची इच्छा असावी.'')

या राजर्षि मनूंच्या शिकवणुकीचा आणि श्रीमद्‍भागवतातील विदुरांच्या वागण्याचा परिणाम पू. श्री. महाराजांच्या मनावर होणे स्वाभाविकच होते. विदुरांचे उदाहरण अतिशय बोलके आहे. धृतराष्ट्राचे मंत्री असलेल्या विदुरांनी त्याला कुलाच्या कल्याणासाठी दुर्योधनाचा त्याग करण्याचा उपदेश केला. ही माहिती दुर्योधनाच्या कानावर गेली. तेव्हा तो अत्यंत हीन शब्दांनी विदुरांची निर्भर्त्सना करतो आणि त्यांना नगरातून हाकलून देण्यास सांगतो. त्यावेळी विदुरांचे जे वर्णन केले आहे ते अतिशय भेदक आहे.

''धनुर्द्वारि निधाय मायां गतव्यथोऽयादुरू मानयान:।।''

(धनुष्य राजदरबारात टाकून मायेला पूर्ण मान देत दुर्योधनाच्या बोलण्याने दु:खी न होता विदुर निघून गेला.)

कोणत्याही आणि कितीही प्रतिकूल कारणाने अत्यंत दु:खी किंवा क्रुद्ध होण्यासारख्या प्रसंगीसुद्धा अत्यंत शांत राहण्याचा मार्गच या ठिकाणी सांगितला आहे. हा मार्ग दिसताना तसा कितीही सोपा दिसला तरी त्याचा स्वीकार करून तो आचरणात आणण्यास जे धैर्य आवश्यक असते ते पूजनीय दत्तमहाराजांसारख्या एखाद्यालाच क्वचित् प्राप्त होत असते.

पूजनीय दत्तमहाराजांच्या जीवनात असे मर्मभेदक दोन प्रसंग एकाच वेळी आले. दु:खदायक आणि आनंददायी! प्रिय कन्येच्या चिरविरहाचा आणि कांची कामकोटीच्या शंकराचार्यांकडून सुवर्णकंकण मिळण्याचा!! या प्रसंगांनी पूज्य दत्तमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर पूर्ण प्रकाश पडला आहे. महाराजांचा भागवत-

सप्ताह औरवाडला होता. त्यांची धाकटी कन्या पुण्यात आजारी होती. प्रातःस्मरणीय श्रीगुळवणी महाराज देखभाल करीत होते. आजार बळावला. त्यातच तिचा अंत झाला. महाराज अंत्यविधीला येऊ शकले नाहीत. त्याच सुमाराला कांची कामकोटीच्या शंकराचार्यांकडून महाराजांची विद्वत्ता, शास्त्रीय प्रतिभा आणि दैवीगुणसंपदा यांच्यामुळे त्यांना सुवर्णकंकण प्राप्त झाले.

या प्रसंगांचे जे साक्षी होते त्यांना पूज्य महाराजांच्या रूपाने मूर्तिमंत स्थितप्रज्ञाचेच प्रत्यक्ष दर्शन झाले. "संचरिष्णुर्वेदांत" - चालता बोलता वेदांत असे त्यांचे वर्णन यामुळेच करण्यात येत होते. ही त्यांची स्थिती प्रामुख्याने श्रीमद्‌भागवताच्या दीर्घ अनुष्ठानामुळे प्राप्त झाली होती. 'प्राप्तं प्राप्तमुपासीत 'गृहीत्वापीन्द्रियैरर्थान् यो न द्वेष्टि न हृष्यति। विष्णोर्मायामिदं पश्यन् स वै भागवतोत्तम :॥" ( इंद्रियांनी विषयांचा उपभोग घेऊनही जो द्वेष करीत नाही किंवा हुरळून जात नाही - ही सर्व माया आहे असा विचार जो करतो तो उत्तम भागवत होय (११-२-४८)) या उत्तम भागवताच्या लक्षणाचा आणि त्याचे उत्कृष्ट उदाहरण असलेल्या अम्बरीष व सुदामा यांच्या जीवनाचा परिणाम पू. महाराजांच्या जीवनावर न कळत झाला होता. अंबरीषराजाचे वर्णन "अम्बरीषो महाभाग : सप्तद्वीपवतीं महीम् । अव्ययां च श्रियं लब्ध्वा विभवं चातुलं भुवि ॥ मेनेऽतिदुर्लभं पुंसां सर्वं तत् स्वप्नसंस्तुतम् (९-४-१५, १६ भा. म. पु.)म्हणजे अतिदुर्लभ अशी अखंड लक्ष्मी व सात द्वीपासहित पृथ्वीचे राज्य प्राप्त झाल्यावरही हे सर्व स्वप्नतुल्य आहे असे अंबरीष मानीत असे. आणि कृष्णभक्त सुदामा याचे,

ऐश्वर्य प्राप्त झाल्यानंतरचे वर्णन "विषयांन् ज्यायया त्यक्ष्यन् बुभुजे नातिलम्पट:।" (विषयामध्ये अति आसक्त न होता, पत्नीसह त्यागपूर्वक विषयांचा उपभोग घेत होता.) या दोन्ही वर्णनांचा पूजनीय महाराजांच्या जीवनावर खोल ठसा उमटला होता हे त्यांच्या अत्यंत सात्त्विक पवित्र व विचारपरिपक्व आचरणावरून समजून येते.

सुदामा चरित्राचे महाराजांच्या मनाला किती आकर्षण होते हे एका साध्या प्रसंगावरून कळून येते. पुण्यामध्ये एकदा एक ज्येष्ठ भागवतकार पू. महाराजांना भागवत सप्ताह श्रवणासाठी निमंत्रण देण्यासाठी आले असता पू. महाराजांनी त्यांना विचारले की सुदामा आख्यान कोणत्या दिवशी आहे? हे आख्यान ते ज्येष्ठ भागवतकार फारच चांगल्या रीतीने रंगवत होते हे जितके खरे तितकेच पू. महाराजांना सुदामा आख्यानाचे जबरदस्त आकर्षण होते हेही खरे. हे आकर्षण नेमके कोणत्या कारणामुळे किंवा त्या आख्यानातील कोणत्या घटनेमुळे होते याचा विचार करता असे निश्चितपणे म्हणता येते की भगवान् गोपाळकृष्णांच्याकडून कुटुंबपोषणासाठी धन मागण्यासाठी आलेले सुदामजी ते धन न मागताच ज्यावेळी परत जाण्यास निघतात त्यावेळी त्यांच्या तोंडून बाहेर पडलेले जे उद्‌गार आहेत ते सकारात्मक चिंतनाचे पराकोटीचे उदाहरण आहे.

**"अधनोऽयं धनं प्राप्य माद्यन्नुच्चैर्न मां स्मरेत्।**
**इति कारुणिको नूनं धनं मे भूरि माददात्॥"**

(हा दरिद्री मनुष्य भरपूर धन प्राप्त झाल्यावर माझे पूर्वीप्रमाणे आर्ततेने स्मरण करणार नाही असा विचार करून अतिशय दयार्द्र अंत:करणाच्या भगवंताने आपल्याला थोडेसुध्दा धन दिले नाही)

परमेश्वराने धन दिले तरीही त्याची दयाच व नाही दिले तरी त्याची दयाच हा भाव अंत:करणात उत्पन्न होणे म्हणजे सकारात्मक विचाराची पराकाष्ठा होय. ही पूजनीय महाराजांच्या ठिकाणी पूर्वजन्मसुकृत व या जन्मातील भागवत-सेवा यामुळे निर्माण झाली होती. यामुळेच ते आदराचा विषय झाले होते.

जाणीवपूर्वक चिंतनाने अशी वृत्ती निर्माण होऊ शकते. अशा प्रकारची कितीतरी स्थळे श्रीमद्‌भागवतात आढळतात. दक्षयज्ञप्रसंगात दक्षाचे मस्तक कुंडात टाकल्यावर ब्रह्मदेवादिकांच्या विनंतीवरून शंकरांनी त्याला बोकडाचे मस्तक लावण्यास सांगितले. तसे केले असता दक्ष जिवंत होऊन तो शंकरांची स्तुति करू लागतो. तो म्हणतो ''भूयाननुग्रह अहो भवता कृतो मे दण्डस्त्वया मयि भृतो (आपण मला जी शिक्षा केली हा माझ्यावर मोठा अनुग्रहच झाला आहे.) आपल्याला झालेली शिक्षा किंवा प्राप्त झालेले दु:ख हे आपल्या कल्याणालाच कारण होते हा दृढ विश्वास आणि ही दु:खाची परिस्थिती आपल्याच पूर्वजन्मातील कर्माचे फळ अशी संगती लावली आणि पूर्ण समाधानात आपण राहिलो तर तत्त्वज्ञानाच्या चिंतनाचे सार्थक झाले असे म्हणता येईल. पूजनीय दत्तमहाराजांना ही विचारांची दृष्टी श्रीमद्‌भागवताच्या दीर्घचिंतनाने व पूर्वजन्मसुकृताने प्राप्त झाली होती. त्यामुळेच टि. म. विद्यापीठात अध्यापन कार्य करीत असता उत्पन्न झालेल्या वस्तुत: दु:खदायक व प्रतिकूल प्रसंगाच्या वेळीही सर्व सहन करण्याची शक्ति त्यांना प्राप्त झाली होती'' तांस्तितिक्षस्व भारत''(गीता २-१४) हे गीतावचन महाराजांच्या तोंडी नित्य असे व त्याप्रमाणे त्यांचे आचरण

असल्याचे आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे.

### दयया सर्व भूतेषु

चौथ्या स्कंधात शेवटच्या अध्यायात प्रचेतांना उपदेश करताना नारदांनी परमेश्वराला संतुष्ट करण्याचा जो उपाय सांगितला आहे तो पू. महाराजांच्या अंत:करणात इतका खोल रूजला होता की त्याचा प्रत्यय पदोपदी येत असे. टि. म. विद्यापीठात वेदांतपाठ देत असताना एकदा एका पाठाचे वेळी दुपारी तीन वाजता एक विद्यार्थी झोपला. एवढेच नव्हे तर तास संपण्याची वेळ झाली ; घंटा वाजली तरी उठला नाही. बाकीचे विद्यार्थी हसू लागले परंतु पू. महाराजांच्या तोंडावर यत्किंचितही हसू नव्हते, अगदी गंभीरपणे ते म्हणाले - होते, दुपारच्या वेळी थोडी डुलकी लागते. '**दयया सर्व भूतेषु** ....' या भागवतसूत्राच्या अनुभवाचे हे प्रत्यक्ष उदाहरणच होय!

### सर्वसमन्वय प्रवृत्ति

श्रीमद्‌भागवतात भगवंतांनी उध्दवाला उपदेश करताना, जगदुत्पत्तीच्या संदर्भात, मूळ तत्त्वांच्या संख्येच्या बाबतीत निरनिराळी मते सांगितल्यावर, आपले मत व्यक्त करताना एक सुंदर शब्द प्रयोग केला आहे. अनेक सिद्धांतापैकी कोणता सिद्धांत ग्राहय किंवा श्रेष्ठ असा नाजुक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असतेच. त्याचे उत्तर देण्यात भगवंताचे खरे कौशल्य दिसून येते. कोणालाही न दुखवता व प्रत्येकात काही ना काही ग्राह्य भाग असतो असा मूलभूत सिद्धांत मान्य असल्यामुळे, भगवंतांनी उत्तर दिले. "सर्व न्याय्यं युक्तिमत्त्वात्, विदुषां किमशोभनम्?" (भा ११/

२२/२५)(संख्येच्या बाबतीत मांडलेली सर्वच मते तर्काला धरूनच आहेत; विद्वानांनी मांडलेली मते कशी अयोग्य असतील?) हाच विचार पूजनीय दत्तमहाराजांच्या सर्व प्रतिपादनात होता हे आता कळून येत आहे. १९५० साली पू. महाराजांच्याकडे (त्यावेळचे पू. कवीश्वर गुरूजी) ब्रह्मसूत्र-भाष्याचा पाठ चालू असता घडलेल्या एका प्रसंगाचा आता उलगडा होतो. त्या ठिकाणी 'चोदनाजन्यत्वात्' असा शब्द भाष्यात आला होता. त्या शब्दाची फोड 'जन्यत्वात्' आणि 'अजन्यत्वात्' अशा दोन रीतीने होऊ शकते. आम्ही दोघेच विद्यार्थी होतो. जवळ-जवळ अर्धा तास (विद्वत्ताप्रचुर) भांडण आम्ही करीत होतो एकाचे म्हणणे जन्यत्वात् दुसऱ्याचे अजन्यत्वात पू. महाराज नुसते शांत बसले होते. त्यांचे मत काय होते, ते आता समजले - 'विदुषां किमशोभनम्' हेच त्यांचे मत असले पाहिजे. त्यांच्या तोंडी नेहमी एक सुभाषितवजा वाक्य असे ते म्हणजे **'बुद्धेः फलमनाग्रहः'** म्हणजे - आग्रहवृत्ति नसणे हेच खरे ज्ञानाचे फलित आहे.

या वृत्तीनेच वादाची प्रवृत्ति नाहीशी होत असण्याची शक्यता आहे. न्याय शास्त्राचे थोडे जरी अध्ययन झाले तरी ही वादप्रवृत्ति उफाळून येते असा अनुभव आहे. या शास्त्रातील अत्युच्च पदवी संपादन करूनही ही प्रवृत्ति उत्पन्न न होण्याचे कारण त्यांची वेदांताची स्वाभाविक बैठक व श्रीमद्भागवाताचे दीर्घकाल परिशीलन हेच असावे. **'वादः परित्यजयताम्'** (वाद टाळावा) हा आद्य शंकराचार्यांचा उपदेश पू. महाराजांच्या स्वाभाविक प्रवृत्तीला उपकारकच ठरला. पू. महाराजांच्या या वृत्तीचा अनुभव पू. गुळवणी

महाराजांच्या सहस्त्रचंद्र दर्शन शांतीच्या प्रसंगी आला. पूजनीय गुळवणी महाराजांची हत्तीवरून मिरवणूक चालली होती. वासुदेवनिवास पासून दशभुजा गणपतीकडे मिरवणूक जात असता पूजनीय दत्तमहाराजांच्या बरोबर एक ज्येष्ठ नैयायिक चालले होते. शेजारीच असल्यामुळे मला त्यांचे बोलणे स्पष्ट कळत होते. बोलता बोलता पू. दत्तमहाराज त्यांना म्हणाले आश्रमात पूर्वोत्तरपक्ष (शास्त्रार्थ) करावेत. त्यांच्या समवेत असलेले वादविवादनिपुण असे ते पण्डित क्षणभर काहीच बोलले नाहीत. ते पाहून पू. दत्तमहाराज म्हणाले पूर्वोत्तर पक्ष दोन्ही आपणच करा. त्यांनी हसण्यावर घालवले. चर्चेला वेळही मिळाला नाही हा भाग वेगळा. पू. दत्तमहाराजांचा, त्यामागचा हेतु केवळ शास्त्रसेवा घडावी एवढाच होता.

## शत्रुबुद्धिविनाशाय

महाराजांच्या प्रत्येक कृतीच्या किंवा वृत्तीच्या पाठीमागे एक विशिष्ट हेतु किंवा मूलभूत विचार होता. "लोकांनी आपल्या बद्दल शत्रुभाव धरला तरी आपण कोणालाही शत्रु समजत नाही" अशा प्रकारचा विचार देवीभागवतातील राजपुत्र सुदर्शन याने जसा प्रकट केला होता त्याच प्रकारची धारणा पूज्य दत्तमहाराजांची होती. या विचारापाठीमागची त्यांची भूमिका स्पष्ट होती. ती म्हणजे श्रीमद्‌भागवतातील भिक्षुगीतामध्ये म्हटल्याप्रमाणे संसारचक्र बदलविण्याचे सामर्थ्य असलेले मन हेच सुखदु:खाचे मूळ असून ते शांत नसेल तर सुखाची शक्यताच नाही. म्हणून सुखाची इच्छा असणाऱ्याने मन:शांतीसाठीच सर्व प्रयत्न केले पाहिजेत. देवहूतीला

उपदेश करताना कपिलांनी ''इतरांशी शत्रुत्व करून केल्या जाणाऱ्या पूजेचा (धार्मिक कार्याचा) काहीही उपयोग नाही. असे सांगण्याचे कारण अतिशय परिणामकारक शब्दात दिले आहे. ते म्हणतात - ''भूतेषु बद्धवैरस्य न मनः शान्तिमृच्छति।''(कोणाविषयीही शत्रुभाव दृढ बाळगणाऱ्या व्यक्तीचे मन कधीही शांत असत नाही.)'अशान्तस्य कुत:सुखम' हा सिद्धांत तर सर्वमान्यच आहे. पू. दत्तमहाराज कोणाविषयीही शत्रुभाव बाळगत नसण्याचे कारण हा इतका मूलभूत विचार. त्याच्याशिवाय चित्तशुद्धि होऊच शकत नाही. त्यासाठीच सारी धडपड. भागवताच्या सतत चिंतनाने पू. महाराजांच्या बाबतीत ही वृत्ती स्वाभाविकच बनून राहिली होती.

पू. महाराजांच्या या आचरणविशेषाचे चिंतन, मनन करण्याचा आपल्यासारख्या साधक म्हणविणाऱ्यांना फार मोठा फायदा आहे. आपल्याला त्रास देणाऱ्या, अत्यंत प्रतिकूल वर्तन करणाऱ्या व्यक्तीविषयी शत्रुभाव उत्पन्न होणे हे तसे अगदी स्वाभाविकच आहे परंतु तसे करण्यामध्ये आपले कल्याण आहे का याचा विचार केल्यास मात्र उत्तर वेगळे येते. कोणाविषयी का होईना शत्रुभाव दृढ निर्माण झाल्यास त्या माणसाचे मन अशांत होते - ते शांत राहूच शकत नाही. मग ते सुखी कसे होऊ शकेल? श्रीमद्भागवताची आणि पू. दत्तमहाराजांची सुद्धा शिकवण अशी की अंतिम हिताच्या दृष्टीने विचार करणे हे अगत्याचे आहे. नुसते हे स्वाभाविकच आहे असे म्हणून सोडून देणे योग्य नाही. कारण स्वाभाविक म्हणून केल्या जाणाऱ्या तशा आचार-विचाराने जे सुख प्राप्त होते ते राजस सुख म्हटले असून ते शेवटी दुःखालाच कारण

होते. (गीता १८-३८) हा अंतिम परिणामांचा विचार पू. महाराजांनी सतत केला आहे. हा धागा धरून अधिक विचार, चिंतन केल्यास पू. महाराजांच्या जीवनातील काही प्रसंगांची किंवा विशिष्ट प्रसंगी त्यांच्या वागण्यातील पद्धतीची उकल होऊ शकते. मन:शांतीमूलक सुख प्राप्त होण्यासाठी सर्वच जण तसा प्रयत्न का करू शकत नाहीत? या प्रश्नाचे उत्तर असे की तसे करण्यासाठी अंत:करणाची उदारता - विशालता - विचारशीलता आवश्यक असते. ती सर्वांच्या जवळ असू शकत नाही. ''शुभंकरोति' या प्रार्थनेतील 'शत्रुबुद्धि विनाशाय' या पदाचा अर्थ महाराज 'शत्रूच्या बुद्धिचा नाश' असा न करता 'शत्रुत्व भावनेचा नाश' असा करीत असत.''

पू. महाराजांचा आणखी एक आवडता श्लोक श्रीमद्‌भागवतातील विचारांवरच आधारलेला पण प्रत्यक्षात त्या शब्दांत भागवतात नसलेला असा आहे. - संग: सर्वात्मना त्याज्य: स चेद्धातुं न शक्यते। सद्भि : सह कर्तव्य: स चानन्त्याय कल्पते।। म्हणजे कोणाशीही कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवणे योग्य नाही. तो तसा टाळणे शक्यच झाले नाही तर तो संबंध संतांशी ठेवावा. अशा प्रकारचा संबंध चित्तशुद्धीला कारण होऊन मोक्षप्राप्ती करून देतो. हा श्लोक म्हणण्याची त्यांची एक विशिष्ठ लकब होती. त्यामुळे तो त्यांना विशेष आवडत असावा असे त्यावेळी वाटे. याचे बीज श्रीमद्‌भागवतात दिसून येते. एकादश स्कंधात उद्धवाला उपदेश करताना श्रीकृष्णांनी सत्संगाचे पराकोटीचे महत्त्व - श्रेष्ठत्व, केवळ अर्थवादरूपाने नव्हे तर सिद्धांतरूपाने विस्ताराने वर्णन केले आहे. ते सर्व पाहिले असता यासंबंधी आधिक चिंतन करण्याची

आवश्यकता आहे असे वाटते थोडक्यात याचे तात्पर्य सांगावयाचे झाल्यास असे सांगता येईल की पू. महाराजांच्या तोंडी असलेल्या आम्ही ऐकलेल्या श्लोकातील 'सत्संग' शब्द सत्पुरुषांचा सहवास, आश्रय अशा अर्थाने आहे. तर एकादश स्कंधातील बाराव्या अध्यायात विस्ताराने चर्चिलेला 'सत्संग'शब्द परमात्म्याशी संपूर्ण शरणागतिपूर्वक केलेली एकरूपता या अर्थाने आहे. या दोहोंची एकवाक्यता पू. महाराजांना अभिप्रेत असलीच पाहिजे. सत् म्हणजे ब्रह्म = परमात्मतत्त्व, त्या परमात्म्याशी संग म्हणजे एकरूपता होण्यासाठी उपयोगी पडणारा संतांचा सहवास हाही सत्संग मानण्यास काहीच हरकत नाही. कारण तो परमात्म्याशी एकरूपता साधणारा सत्संग निर्माण करू शकतो किंवा निर्माण करण्याचा प्रयत्न तरी करीत असतो. म्हणूनच तशा प्रकारचा सत्संग महाराजांना अभिप्रेत होता. आजकाल सत्संग शब्द फारच सवंग झाला आहे. यासंदर्भात श्रीमद्‌भागवतातील (११-२) हा अध्याय पूर्ण पाहण्यासारखा आहे.

पू. महाराज जे उपदेशात्मक सांगत असत. त्याचे पूर्णपणे पालन ते स्वत: करीत असत. असे पन्नास वर्षांच्या निकट सहवासातून नि:संदिग्धपणे म्हणता येते. चोवीस गुरूंपैकी प्रथम क्रमांक असलेल्या पृथ्वीचा 'पराकोटीची सहनशीलता'हा गुण अतिशय महत्त्वाचा पण अनुकरण करण्यास कठीण असा आहे. पू. महाराजांच्या तोंडून गीतेतील (२-१४) 'तांस्तितिक्षस्व भारत' हा चरण खूपखूप वेळा ऐकला. याच अर्थाचा भारवीच्या किरातार्जुनीय या महाकाव्यातील 'न तितिक्षा सममस्ति साधनम्' हा श्लोकार्ध तितक्याच वेळा त्यांच्या तोंडून ऐकला आहे. याचा अर्थ इतकाच

की परमार्थ मार्गात तितिक्षा म्हणजे सर्व सहन करण्याची वृत्ती ही सर्वात महत्त्वाची म्हणून मानली आहे. लौकिक जीवनही शांतीने परिपूर्ण करण्यास या तितिक्षा गुणाची नितांत आवश्यकता आहे, असे गीता - भागवत - महाकाव्य यातील उद्धरणांतून पू. महाराजांना सूचित करावयाचे असे. इथे हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण लेखाच्या प्रारंभी म्हटल्याप्रमाणे 'बोले तैसा चाले' किंवा 'चाले तैसाच बोले' ही पू. महाराजांची जीवन व्यतित करण्याची पद्धती होती. या विषयीचा अनेक साक्षीदार असलेला एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. सोलापूरला श्री साबळे शेटजींच्या कारखान्यात इतर काही कार्यक्रमाबरोबर पू. दत्तमहाराजांची तुला करण्याचे ठरले. त्याप्रमाणे कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी पू. महाराज वखारीतील मोठया लोखंडी तराजूतून बाहेर येताना ताजव्याची लोखंडी जाड कांब पू. महाराजांच्या डोक्याला तीव्रतेने लागली. पू. महाराजांनी हूं का चूं केले नाही. दुसरा कोणीही मनुष्य त्या ठिकाणी असता तर एकदा तरी मोठयाने ओरडल्याशिवाय राहिलाच नसता. पू. महाराज फक्त डोके दोन्ही हातांनी घट्ट धरून होते. रक्त वाहिलेले दिसले नसते तर कोणालाही काही कळलेच नसते. ही झाली शारीरिक तितिक्षा. याही पेक्षा अधिक महत्त्वाची परमार्थ क्षेत्रात अधिक उठून दिसणारी म्हणजे मानसिक तितिक्षा - सहनशीलता. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात नोकरी करीत असता मानसिक क्लेश निर्माण झाले असताही सर्व सहन करून 'कालं तावत् प्रतीक्षेत' या भागवतोक्तीप्रमाणे प्रतिकूल कालावस्थेत मायेला मान देत, विदूरजीप्रमाणे, स्थितप्रज्ञावस्थेत ते रहात होते. अनुकूल

काल प्राप्त झाल्यानंतरचीही स्थिती आपण पाहिली आहे. अंबरीष राजर्षी प्रमाणे सर्व ऐश्वर्य ते 'स्वप्नतुल्य' मानीत असल्याचे सर्वांनाच विदित आहे.

## देहीच विदेही

एकादश स्कंधातील प्रारंभीचेच कथानक म्हणजे विदेह राजा, निमि व आत्मविद्याविशारद असे ऋषभपुत्र यांचा जो संवाद आहे त्याचा पू. दत्तमहाराजांच्या चित्तावर अत्यंत सखोल ठसा उमटला नसता तरच नवल. परम भागवत श्रीएकनाथ महाराजांनी यावर केलेले भाष्य हे पूज्य दत्तमहाराजांना इतक्या परिणामकारक रीतीने भावले होते की दैनंदिन व्यवहारातही स्वाभाविकरीतीने ते विचार प्रकट होत असत. देहबुद्धी ही अत्यंत भयावह आहे. सर्व पापाचे मूळ देहबुद्धीत आहे. देहबुद्धीने मनुष्य कदापिही सुखी होण्याची सुतरां शक्यता नाही, असे या संवादाच्या प्रारंभीच स्पष्ट केले आहे. या सर्वाचा परिणाम म्हणूनच की काय श्रीशंकराचार्य सूत्र रूपाने उपदेश करतात - 'देहेऽ हंमतिरुज्झ्यताम्' देह म्हणजे मी ही बुद्धी - भावनाच सोडून दिली पाहिजे या उपदेशाचे सर्वथा पालन करावे, त्याची अनुभूती घ्यावी त्यासाठीच सर्व अनुष्ठाने, उपासना यांचा उपयोग व्हावा असा प्रयत्न पू. महाराज करीत होते याचा मला प्रत्यय आला. पू. दत्तमहाराजांचा शेवटचा भागवतसप्ताह त्यांच्याच निवासस्थानात झाला. माझे सौभाग्य की मी त्यावेळी संहिता वाचनास होतो. या सप्ताहाचे दृकश्राव्य (व्हीडीओ)चित्रण करण्यात येत होते. सामान्यपणे कोणालाही स्वत:चे अशा प्रकारचे चित्रण बघण्यात -ऐकण्यात आनंद वाटला तर आश्चर्य वाटण्याचे काहीच

कारण नाही. परंतु पराकोटीच्या पारमार्थिक साधकाला अशा चित्रणाच्या दर्शनाने काय वाटेल याची आम्हा सामान्य साधकांना कल्पनाही करता येणार नाही. त्या सप्ताहात पू. महाराज एकटेच होते त्यांनी ते चित्रण नुकतेच पाहिले होते ते मला माहीत आहे अशा विचाराने महाराज म्हणाले अहो, पूर्वी फक्त आपला आवाजच ऐकला जात होता, आता प्रत्यक्ष आपले दर्शनच - त्यांनी वाक्यही पूर्ण केले नाही. हे उद्‌गार त्यांनी इतक्या व्यथित अंत:करणाने काढले होते की मी ते वाक्य अद्यापि विसरू शकलो नाही. त्यातही विशेष असा की हे सर्व आपल्याला प्रतिकूल चालले आहे असे लोकांना वाटून त्यांच्या उत्साहावर विरजण पडू पये म्हणूनच जणू काही सर्व बोलून झाल्यावर एक स्मितहास्य करून त्या विषयाचा त्यांनी शेवट केला. त्यांचे म्हणणे असे की देहबुध्दी घालवण्याचा प्रयत्न करावयास सांगतात आणि या चित्रणाने देहबुद्धी दृढच होणार की नाही! या विवेचनावरून अध्यापनाच्या वेळी सांख्य शास्त्राचे कितीही खंडन केले तरी ते म्हणत, अहो सांख्यांनी देहात्मवाद घालावला - आत्मा-अनात्म विवेक शिकवला हे त्यांचे उपकार मानावेच लागतील. हे म्हणण्यातला त्यांचा आशय त्यावेळी तितका समजला नसेल जितका याप्रसंगाने तो लक्षात आला.

**ज्ञानविज्ञानतृप्तात्मा**

पूज्य महाराजांच्याठिकाणी इतकी शान्त वृत्ती, समाधानी भाव, क्रोधाचा परित्याग गीतेच्या तेराव्या अध्यायातील सातव्या श्लोकापासून वर्णन केलेले अमानित्वादि गुणसमूह कसे काय उत्पन्न झाले असतील? असे आम्हाला आमच्या विद्यार्थिदशेत वाटत असे.

एकदा तर एक असा प्रसंग घडला की कोणालाही साहजिकपणे राग आला असता तर काही आश्चर्य वाटण्याचे कारणच नव्हते. परंतु पू. दत्तमहाराजांना थोडाही राग उत्पन्न झाला नाही. मी डायरीत त्यादिवशी असे लिहिलेले आठवते की 'गुरुजींना राग येतच नाही की आलेला राग त्यांचा तात्काळ नाहीसा होतो हे समजत नाही. 'या कोड्याचे उत्तर श्रीमद्‌भागवाच्या अवलोकनाने स्पष्ट मिळू शकते. वयाच्या सोळाव्या वर्षी संपूर्ण भागवताचे सप्ताह पारायण समर्थसद्‌गुरु असलेल्या प. प. श्रीदीक्षितस्वामींच्या समोर सात दिवसात स्पष्टपणे, शुद्ध रीतीने ज्यांनी केले त्यांना त्या सद्‌गुरुंचा मोलाचा आशीर्वादच मिळाला होता की या श्रीमद्‌भागवताचे ज्ञान - अनुभवपर्यवसायी ज्ञान, म्हणजेच विज्ञान प्राप्त होईल. ते जर झाले नाही तर सर्व श्रम व्यर्थ होत. पू. महाराजांना हे सर्व ज्ञान श्रीमद्‌भागवताच्या सप्तम स्कंधातील मुख्य कथानक संपल्यावर महर्षी नारदांनी युधिष्ठिराला केलेल्या उपदेशातून झालेले होते. हे चिंतन भागवत सप्ताहात करण्यास सांगण्यास सामान्यपणे कोणालाही वेळ मिळत नसतो. ऐकण्यातही कोणाला विशेष रस नसतो हेही खरेच! तथापि तो भाग आपल्या हिताच्या दृष्टीने साधकांना उपयोगी पडणारा असल्याने व पू. महाराजांच्या जीवनप्रवृत्तीशी संबंधित असल्याने आपण पाहणार आहोत. श्रीमद्‌भागवतातील कथानके चित्तशुध्दीसाठी व अशा प्रकारचे उपदेशामृत हे अनुकरणासाठी असते. सद्‌गुरु श्री दत्तमहाराजांच्या जीवनाला वळण लावणारा, त्यांच्यावर खोल ठसा उमटवणारा उपदेश पुढीलप्रमाणे आहे. दरिद्री माणसाने यात्रेसाठी किंवा धर्मकार्यासाठीही धनाची याचना

करण्याची इच्छा करू नये (७-१५)

**संतोषाचे कवच**

ही धनादि मिळवण्याची इच्छा माणसाला दाही दिशा हिंडवते. अजगरवृत्तीने राहणाऱ्या, प्राप्त परीस्थितीवरच संतुष्ट राहणाऱ्या विचारी माणसालाच सुख मिळू शकते. वासनांची पूर्ती करण्यासाठी दाही दिशांना हिंडून धन मिळवण्याने कोणतेही सुख-समाधान मिळणार नाही. सातव्या स्कंधातील 'सदा सन्तुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशः'। (१५-१७) हे सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगे वचन पूजनीय महाराजांच्या चित्तावर अशारीतीने कोरले असले पाहिजे की क्षणभर असा भ्रम व्हावा की भागवतातले वचन इथे कोरले आहे की इथूनच ते भागवतात गेले आहे. संतोष हे एक विनामूल्य मिळणारे कवच-चिलखत आहे. ज्याला हे वापरण्याची किमया प्राप्त झाली असेल त्याच्यावर येणारे दुःखाचे आघात हे बोथट होऊन त्यांचा स्पर्श अंतःकरणाला होणारच नाही. पू. महाराजांना हे कवच फार लहानपणापासून पूर्वजन्मपुण्याईने, सद्गुरुकृपेने व समष्टिसंकल्पाने प्राप्त झाले होते. त्यामुळे क्रोध उत्पन्न होण्याचा प्रसंग उत्पन्न झाला तरी तो अग्नीवर उडी घालणाऱ्या पतंगाप्रमाणे तात्काल नष्टच झाला पाहिजे. ज्ञान्याची कर्मे ज्ञानाग्नीत भस्मसात होतात असे जे वर्णन आहे (गीता - ४ - १९) त्यात थोडी भर घालून असे म्हणता येईल की 'कर्माबरोबरच इतरांच्या कर्माचा आपल्यावर होणारा परिणामरूप क्रोधही भस्मसात होतो' हे त्यावेळी न कळलेले उत्तर आता समजू शकले. साधकाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे परमेश्वराकडे - त्या सर्वनियंत्याकडे

काही मागायचे झाल्यास ते तेवढे संतोषरूपी कवच कायमचे आम्हाला प्राप्त करून दे, एवढेच मागावे; जे आमच्या सद्गुरूंना फार फार पूर्वीपासून मिळाले होते किंवा त्यांनी ते मिळवले होते. हे आमच्या ज्ञानाच्या अवाक्यापलीकडचे होते. प्रस्तुत सिद्धांतरत्नाचे पुढे सुंदर विश्लेषण केले आहे. त्याचे विशेष चिंतन करून आपल्या शास्त्राध्ययनाने उत्पन्न झालेल्या पाण्डित्याचा विपरीत परिणाम होऊ नये याविषयी त्यांनी विशेष काळजी घेतली असलीच पाहिजे, कदाचित् त्यांच्या ठिकाणी श्रीदत्तगुरूंच्या कृपाप्रसादाने ती सहजावस्थाच बनली असावी, इतके वर्णन करण्याचे कारण असे की या विश्लेषणात नारदांनी पुढे असे म्हटले आहे की राजा, पुष्कळ पंडित असे असतात की शास्त्रांचे खूप अध्ययन करून जवळजवळ सर्वज्ञत्व त्यांनी प्राप्त करून घेतलेले असते, लोकांच्या कोणत्याही शंकांचे ते समाधान करू शकतात असे मोठमोठे विद्वत्सभापतीही त्यांच्याजवळ हे संतोषाचे कवच नसल्याने त्यांचा अध:पात होत असतो. (७-१५-२१) असंतोषात् पतन्त्यध:। पूजनीय महाराजांच्याइतके शास्त्राध्ययन झालेले प्रखर विद्वान पाहिले असता या म्हणण्याचा प्रत्यय येतो. शब्दपाण्डित्य हे त्यांनी खरोखरच परिश्रमपूर्वक शास्त्रनिष्ठेने मिळवलेले असते. परंतु दुर्दैवाने हे संतोषाचे कवच त्यांच्याजवळ नसल्याने अशा एका वेदातील महापण्डिताने संभावनेच्या संबंधात फार मोठा असंतोष प्रकट केला होता. याच कारणाकरिता श्रीमद्भागवतात या संतोषरूप कवचाचे अतिमहत्त्व वर्णन केले आहे आणि ते पू. महाराजांच्या ठिकाणी विलक्षणरीतीने प्रकट झाले होते. याठिकाणी 'अध:पात होतो' याचा अर्थ इतकाच

की त्यांचे अध्ययन आत्मकल्याणाला कारण होत नाही. 'भुक्तये न तु मुक्तये' म्हणजे पोटासाठी उपयोग, मुक्तीसाठी नाही.

**सत्कर्मचोदना**

श्रीमद्‌भागवताच्या चिंतनाचा सखोल परिणाम होत असताही क्वचित् वरवर पाहणाऱ्याला भागवतसिद्धांतापेक्षा थोडी वेगळी प्रवृत्ति पू. दत्तमहाराजांची असल्यासारखे वाटणे शक्य आहे. त्याचाही थोडा विचार होणे योग्यच होईल. सप्तम स्कंधातच अवधूत-प्रल्हाद संवादामध्ये अवधूतांनी आपल्या नेहमी आनंदीवृत्ती धारण करण्याच्या स्वभावविशेषाचे कारण स्पष्ट करीत असताना म्हटलेले एक सुभाषितरत्न प्रसिध्द आहे ते म्हणतात माझं टेक्निक काही वेगळंच आहे. 'नाहं निन्दे न च स्तौमि स्वभावविषमं जनम् ।' (भा - ७-१३-४२) म्हणजे प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव-प्रवृत्ती त्याच्यातील सत्त्व, रज, तमांची अवस्था किंवा प्रमाण हे वेगवेगळे असल्यामुळे प्रत्येकाचे आचार-विचार, वागण्याच्या-बोलण्याच्या पद्धती, वेगवेगळया असतात. मी कोणाची निंदाही करीत नाही आणि स्तुतीही करीत नाही तर त्यांचे कल्याण व्हावे एवढीच इच्छा करतो. या अवधूतांच्या विधानापैकी पहिल्या अर्ध्या भागाविषयी म्हणजे कोणाची निंदा न करण्यासंबंधी वेगळे मत कोणाचे असायची शक्यता नाही, पू. दत्तमहाराजांचे तर मुळीच संभवत नाही. उलट सामान्यपणे निंदा केल्या जाणाऱ्या कृतीचे तसे वागणाऱ्या व्यक्तीच्या दृष्टीकोनातून ते स्पष्टीकरण, उदार दृष्टीकोण स्वीकारून वर्णन करण्याकडे त्यांची प्रवृत्ती होती. याचे उदाहरणही देण्यासारखे आहे पण प्रस्तुत ते महत्त्वाचे नाही. प्रस्तुत विचार असा

आहे. की कोणाचीही निंदेप्रमाणे स्तुतीही न करण्याचा सिध्दांत पू. महाराजांनी अनेकदा मानला नसल्याचे आढळून येते. उदाहरणार्थ कोणी भागवत सप्ताह करून पू. महाराजांच्या दर्शनास गेल्यास त्याची ते खूप प्रशंसा-स्तुति करीत असत. तुमचा सप्ताह लोकांना फारच आवडला किंवा एखाद्यासंबंधी कोणी आदराचा उल्लेख त्यांच्याजवळ केला तर लगेच पत्र लिहून त्यांनी त्याची स्तुति केलेली आहे. ही अशी स्तुति करणं हे अवधूतांच्या सिद्धांताशी विरोधी आहे असे वाटण्याची शक्यता आहे पण तसे वाटण्याचे काही कारण नाही. अवधूतांच्या वचनाचे तात्पर्य असे आहे की स्तुति-निंदेमुळे ती करणाऱ्याच्या चित्तवृत्तीत आसक्ति निर्माण होऊ शकते, ती दुषित होते- सर्वथा पारदर्शी ती राहू शकत नाही. म्हणून निंदेबरोबर स्तुतिही मी टाळतो. सर्वांनी-विशेषत: साधकांनी, ती टाळावी असे अपेक्षित आहे. पू. महाराजांच्या स्तुतीमागील हेतु इतकाच असे की त्या व्यक्तीला अधिक उत्साह वाटावा. सत्कर्माकडे त्याची प्रवृत्ति अधिकाधिक व्हावी, आपल्या गुणाची लोक-विशेषत: पू. महाराजांसारखे कदर, करतात असे वाटून त्याला सात्त्विक आनंद व्हावा एवढाच हेतु किंवा परिणाम असे. त्यांच्या चित्तवृत्तीत काही दूषितत्व किंवा आसक्ति उत्पन्न होण्याची शक्यताच नव्हती त्यामुळे त्या अवधूतांच्या सिद्धांताशी पू. महाराजांच्या आचारांचा स्तुती करण्याचा मुळीच विरोध येत नाही.

**शरणागति**

प. प. श्री. वासुदेवानंद सरस्वतींच्या 'दत्ता मजला प्रसन्न होशी' या पदावर प्रवचन करताना त्यांच्या मनातील भाव इतके

स्पष्टपणे बोलके झाले आहेत की त्या विचारांशी ते अत्यंत एकरूप झालेले आहेत असेच वाटते. विशेषत: आपल्या इंद्रियांवर ताबा मिळविणे व अंतकाळापर्यंत ईश्वर-स्मरण राहणे याविषयी सतत जागरूक राहिले पाहिजे, असे सर्व संतमहात्मे सांगत असतात. पूज्य दत्तमहाराजांचेही याविषयी दुमत असण्याचे काहींच कारण नाही. पण या संदर्भात ते इतके आग्रहाने प्रतिपादन करतात की या दोन्ही गोष्टी - १) इंद्रियांवर ताबा मिळवणे २) आणि ईश्वरस्मरण या आपल्या प्रयत्नाने साध्य होणाऱ्या नाहीत असे स्पष्ट प्रतिपादन 'शरीर इंद्रिये आणि मन हे तुझे हाती आहे' या चरणावर भाष्य करताना, त्यांनी केले आहे. परमेश्वर हाच आमच्या संपूर्ण जीवनाचा नियंत्रक - रिमोट कंट्रोल आहे. त्याची संपूर्ण शरणागती स्वीकारल्याशिवाय हे संभवत नाही. ही पराकोटीची आत्यंतिक शरणागती पू. महाराजांच्या ठिकाणी श्रीमद्भागवतातील 'विना महत्पादरजोऽ भिषेकम्' (महापुरुषांच्या चरणकमलाच्या धुळीने माखल्याशिवाय ती अवस्था प्राप्त होत नाही) या जडभरताने रहुगण राजाला केलेल्या उपदेशातून मुरलेली होती. याचाच परिणाम म्हणून पू. महाराजांचे असे ठाम मत बनले होते की, सर्व सामर्थ्य ईश्वर कृपेचेच आहे त्याच्या कृपेनेच मानवाचे मन परमार्थाला अनुकूल होऊ शकते. म्हणून सर्व प्रयत्न ईश्वरकृपा संपादन करण्यासाठीच व्हावेत असा त्यांचा उपदेश असे.

## हळुवार मार्गदर्शन

कोणत्याही साधकाला त्याच्या प्रतिकूल परिस्थितीत अडचणीच्या अवस्थेत त्याला धीर देण्याची त्याचा उत्साह कमी

होऊ न देण्याची त्यांची प्रवृत्ती विशेष उल्लेखनीय आहे. प्रयत्न करूनही 'रुद्र' सस्वर म्हणायला जमत नाही अशी खंत एका भक्ताने व्यक्त केली असता पू. महाराजांनी त्याला धीर देऊन म्हटले, "नाही तरी, लघुरुद्र, महारुद्र करताना मंत्रांचा उच्चार स्वरासहित कुठे कळत असतो." याचा अर्थ असा नव्हता की स्वररहित रुद्र म्हणावा असे पू. महाराजांना अभिप्रेत होते. या उलट त्यांच्या दिलाशामुळे त्या भक्ताने प्रयत्न न सोडता केलेल्या व्यासंगामुळे व पू. महाराजांच्या शब्द न उच्चारता दिलेल्या आशीर्वादामुळे तो भक्त चांगल्यारीतीने रुद्र म्हणू लागला. "सात दिवसांनी मृत्यु निश्चित येणार असलेल्या परीक्षिताला दिलासा देऊन त्याचा मनोभंग होऊ न देता, जीवनाची कृतकृत्यता संपादन करण्यास त्याला समर्थपणे मदत करणाऱ्या शुकाचार्यांचेच कार्य पू. दत्तमहाराज करीत होते हाच या सर्वांचा अर्थ होय.

## सारं सुष्ठ मितं मधु

पू. महाराजांच्या चालण्या-बोलण्यावरही श्रीमद्‌भागवताचा परिणाम झाल्याचे यामुळेच स्पष्ट जाणवते. अनेकदा त्यांच्याबरोबर त्यांच्या घरून वासुदेव निवासमध्ये चालत जाण्याचा योग आला. त्यावेळी श्रीमद्‌भागवताच्या पंचम स्कंधातील जडभरताप्रमाणे अधोदृष्टी ठेवूनच ते चालत असल्याचे लक्षात येई. चतुर्थ स्कंधातील सम्राट पृथूचे पूर्ण जीवन पू. महाराजांच्या ठिकाणी पूर्ण प्रतिबिंबित झाल्याचे लक्षात येते. सनत्कुमारादिक ब्रह्मपुत्र एकदा पृथूच्या दरबारात आले असता पृथूने त्यांचे स्वागत करून त्यांना प्रश्न विचारला की "इंद्रियांच्या विषयोपभोगातच रममाण झालेल्या

आमचे कुशल होईल होईल ना? तुमच्या ठिकाणी कुशल-अकुशल अशा वृत्तीच निर्माण होत नसल्यामुळे तुमच्याविषयी कुशल प्रश्न विचारणे योग्यच ठरत नाही'' या बोलण्याविषयीचे वर्णन करताना मैत्रेय ऋषींनी पृथूला आदर्श भाषणाचे प्रशस्तिपत्रच दिले आहे - ''पृथोस्तत्सूक्तमाकर्ण्य सारं सुष्ठ मितं मधु ''(पृथूचे ते थोडक्यात, गोड मोजके व सारभूत बोलणे ऐकून) सनत्कुमारांनी पृथूची स्तुती केली. पू. महाराजांचे बोलणेही अशाच प्रकारचे होते.''

सर्वांच्या कल्याणात आपलाही अंतर्भाव होतोच; तेव्हा आपल्या कल्याणाविषयी संकल्पात स्वतंत्र निर्देश करण्याची काय आवश्यकता असे पू. महाराज म्हणत असत. '**अकामः सर्वकामो वा**'(भा. २-३-१०) हा चरणच त्यांच्या विचाराचा आधार असे.

**योगनेन्ते तनुत्यजाम्**

सातव्या स्कंधातील प्रल्हादचरित्रानंतरच्या शेवटच्या पाच अध्यायाविषयीचा उल्लेख पूर्वी आलेला आहे. त्यातील एक धागा धरूनच या लघुचरित्राचा शेवट करण्याचा मानस आहे. या स्कंधातील बाराव्या अध्यायात वानप्रस्थाश्रमात आचार कसा असावा याचे दिग्दर्शन केले आहे. गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थ किंवा संन्यासाश्रम घेतलाच पाहिजे (अनाश्रमी न तिष्ठेत ।) असा धर्मशास्त्राचा दंडक आहे. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वतींच्या वाङ्मयातूनही तसे स्पष्टपणे कळते. वानप्रस्थाश्रमात कमीतकमी एक वर्षापासून २, ४, ८ किंवा १२ वर्षे वनातच राहून कसे जीवन जगावे या विषयीचे नियम याच अध्यायात दिले आहेत. पूजनीय दत्तमहाराजांनी असा विचार केला असला पाहिजे की हे नियम या

उतार वयात, या भीषण कलियुगात पाळणे शक्य होणार नाही. असा विचार करून देहत्यागाचा त्यांनी निर्धार केला असावा. अधिक शास्त्रीय परिभाषेत बोलायचे झाल्यास, देह जिवंत राहण्यासाठी आवश्यक, नव्हे अपरिहार्य असलेला 'अहं देह: इमानि मम इन्द्रियाणि 'अशा प्रकारचा अध्यास थांबवण्याचा त्यांनी निश्चयच केला असला पाहिजे. हा अध्यास (देहाच्या ठिकाणी अहं चा व इंद्रियांच्या ठिकाणी ममत्वाचा आरोप) म्हणजेच देह म्हणजे मी व इंद्रिये, पुत्र-भार्यादिक हे माझे असा अभिमान पूर्णपणे नाहीसा झालेल्या व्यक्तीच्या हातून, बोलणे, ऐकणे इ. प्रकारचा लौकिक व्यवहार होऊच शकत नाही. कारण अशा प्रकारचा लौकिक व्यवहाराला ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान अशा प्रकारची त्रिपुटी आवश्यक असते. हीच परिस्थिति पू. दत्तमहाराजांची महानिर्याणापूर्वीची होती. त्यापूर्वी दोनच दिवस मी कुरवपूरचा प्रसाद-अंगारा घेऊन पू. महाराजांच्या घरी गेलो होतो. एरव्ही त्यांच्या भेटीला सर्वांना प्रतिबंध होत असे. यावेळी 'महाराज तुमच्याशी बोलतात का पहा' असे श्री रघुनाथरावांनी म्हटले. मीही त्यांच्याशी मोठमोठयाने बोलण्याचा प्रयत्न केला. परंतु कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. या महापुरुषाने दीर्घकाल श्रीमद्‌भागवताच्या व्यासंगाने, त्यातील चरित्रनायकाच्या - सम्राट परीक्षिताच्या, निर्याणाचे चिंतन-मनन करून, त्याच पद्धतीने आपले महानिर्याण करण्याचा निश्चय केला - नव्हे तसा अनुभव घेण्यास प्रारंभ केला होता. हे त्यावेळी मुळीच लक्षात आले नाही. तळेगावला चालू असलेल्या भागवत सप्ताहातच परीक्षिताच्या महानिर्याणाच्या निरूपणाच्या वेळी मला याचा उलगडा झाला.

पू. दत्तमहाराजांचे निर्याण समजून घेण्यासाठी परीक्षिताचे महानिर्याण समजून घेणे आवश्यक आहे. पू. महाराज काही बोलत नव्हते किंवा ऐकत नव्हते. कसे ऐकतील किंवा बोलू शकतील? देहाच्या ठिकाणी असलेला अहं, अभिमानच गेला होता. त्यामुळे कोणतीच क्रिया त्यांच्याकडून होणे शक्य नव्हते. परीक्षिताने शेवटी शुकमुनींची परवानगी मागितली आहे. 'अनुजानीहि मां भगवन् वाचं यच्छाम्यधोक्षजे।'(भा. १२-६-६) मी वाणी बंद करतो; मला परवानगी द्या (न बोलण्याची); सर्ववासनारहित झालेले अन्तःकरण भगवंताशी एकरूप करतो. कोण तक्षक आणि काय ती त्याची दंश करण्याची क्रिया? सर्व ब्रह्मस्वरूप असल्याचा अनुभव परीक्षित घेत होता. तीच स्थिति पू. दत्तमहाराजांची होती. योगमार्गानेच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

पू. आईसाहेबांच्या निर्याणानंतरच त्यांनी हा निर्णय घेतला असला पाहिजे. असे म्हणण्यास स्पष्ट आधार आहे. पू. आईसाहेबांची प्रकृती बरी नसताना, रुग्णालयात जाताना त्यांनी पू. महाराजांना नमस्कार केला असता 'सौभाग्यवती भव'असा आशीर्वाद पू. महाराजांनी त्यांना दिला होता. त्यामुळे सौ. आईसाहेब असेपर्यंत देहत्यागाचा विचार करणे त्यांना शक्य नव्हते. त्या गेल्यानंतर पू. महाराजांनी देहत्यागाच्या विचाराला अधिक प्राधान्य दिले असले पाहिजे. असे म्हणण्याला सबळ आधार आहे. पू. सौ. आईसाहेबांच्या अन्त्य विधीसाठी वे. मू. कृष्णशास्त्री आर्वीकरांना नागपूरहून मुद्दाम बोलावून घेतल्यावर, ते विधी चालू असता पू. महाराजांनी त्यांना म्हटले " आमच्या वेळीही तुम्हालाच यावयाचे

आहे.'' त्यावेळी कोणालाही त्यांच्या मनात चाललेल्या विचारांची कल्पना आली नाही. परंतु पू. महाराजांनी तो विचार खरा करून दाखवला.

परीक्षिताचे महानिर्याण सर्वांसमक्ष झाले असून सर्वांनाच त्याची कल्पना होती. कारण त्याला मिळालेल्या शापाची घटनाच तशी होती. पू. दत्तमहाराजांनीही त्याच पद्धतीने सर्वांना, निदान काहींना तशी कल्पना का दिली नाही असे प्रथम वाटत होते. परंतु ते आपल्याला सहन झाले नसते; शिवाय आसक्तीचा अडथळा आपण होऊन निर्माण करू नये असे वाटून शांतपणे कोणालाही न सांगता निघून जाण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय योग्यच मानावा लागेल!

## भागवतोत्तम दत्तमहाराज कवीश्वर
# कर्मयोग आणि भक्तियोग

डॉ. वासुदेव व्यं. देशमुख

प. प. श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांनी आपल्या द्विसाहस्री गुरुचरितम् यया ग्रंथाच्या शेवटी योगरहस्य या प्रकरणांत म्हटले आहे की श्रेष्ठ अशा मनुष्यजन्माचे तीन योगांच्या आश्रयाने सार्थक करणे हेच या ग्रंथाचे सार आहे. कर्म, भक्ति व ज्ञान हे तीन योग होत. योगेश्वर श्रीकृष्णाच्या गीतेतहि हेच तीन योग प्रतिपादिलेले आहेत. श्रीमद्भागवतातही भगवंत हेच प्रतिपादन करतात.

**योगास्त्रयो भया प्रोक्ता, तृणां श्रयो विधित्सया ।**
**ज्ञानं कर्म च भक्तिश्च, तोपायोऽन्योस्तिकुत्रचित्॥**

श्री. भा. ११.२०.६

प. प. श्रीस्वामीमहाराजांच्या मते हे तीन योग म्हणजे तीन वेगळे मार्ग नसून एकाच योगाची तीन अंगे आहेत. 'भक्ति-क्रिया-ज्ञानयोगान्मुक्तिरुक्तापि तत् त्रयम्। ज्ञेयं साष्टांगयोगांतर्गतं द्वैधमतोऽत्र नो॥ 'यालाच महायोग असे म्हणतां येईल. प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांच्या जीवनांत महायोगाच्या कर्म, भक्ति आणि ज्ञान या तीनही अंगांचा पूर्ण आविष्कार झालेला दिसतो म्हणूनच ते भागवतोत्तम या संज्ञेला पात्र होते. नव्हे, या संज्ञेचे प्रत्यक्षीकरणच होते. अर्थात् ह्याचे यथार्थ दर्शन अधिकारी महात्म्यांनाच होऊं शकेल. जिज्ञासूंना ते तसे झाले नाही तरी हा अभ्यास आध्यात्मिक दृष्ट्या

लाभदायक होईलच. ते तसे व्हावे, चित्ताचे मालिन्य अंशत: दूर होऊन बुद्धीत विवेक स्थिरावून ती निश्चयात्मिका व्हावी हा या मननाचा उद्देश आहे.

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा जन्म श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे माघ वद्य ६, शके १८३१ (इ. स. १९१०) रोजीं झाला. त्या वेळी स्वामी महाराजांचा मुक्काम वाडींतच होता. कवीश्वरांच्या घरी त्या वेळी भिक्षा घेणे शक्य नव्हते. तरीही श्री 'थोरले महाराज' त्यांच्या घरी गेले. अर्थात्च लहानग्या दत्ताला मातु:श्रींनी महाराजांच्या मांडीवर घातले. बाळाच्या गालाला हात लावून त्याला हंसरा करून महाराज त्याच्याशी बोलूं लागले. 'काय वक्रतुंडबुवा! पुराण सांगण्याची हौस अजून पुरली नाही म्हणून परत आलांत? तसा तुमच्यांत आणि आमच्यांत काय फरक आहे? आमची वस्त्रे भगवी आहेत आणि आपली पांढरी इतकेच काय ते! 'असे बोलून त्यांनी मातु:श्रींना सांगितले, 'श्वशुरच आलेत पुत्ररूपाने. ह्याचे नांव वक्रतुंडच ठेवा बरं का. 'बाळाचे नामकरण त्या वेळी दत्तात्रेय असे झाले होते. पण महाराजांची आज्ञा म्हणून पुन्हां बारसे केले व वक्रतुंड असे नांव ठेवण्यांत आले. जरी ते पुढे प्रचारांत आले नाही तरी दत्तमहाराजांच्या मुंजीच्या आणि लग्नाच्या पत्रिकांत तेच नांव छापले आहे.

**कर्मयोगी दत्तमहाराज**

प. प. श्रीस्वामीमहाराजांनी श्रीमद्दत्तपुराणांत एका ब्राह्मणाचे वर्णन केले आहे. 'कोणी एक ब्राह्मणश्रेष्ठ (सु)दैवाने सर्व संस्कारांनी संस्कृत झालेला, वेद व वेदांगांचे अध्ययन करून, (वर्णा)श्रमधर्माच्या (नित्य व नैमित्तिक) विहित कर्मांचे आचरण करून, माता, पिता व गुरु याच्या सेवेत तत्पर होऊन, देव, पितर व ऋषी या तीनहि ऋणांपासून मुक्त होऊन, प्रायश्चित्तादिकांनी सर्व पापांचा क्षय करून,

उत्तम भक्तीने श्रीदत्तप्रभूंच्या उपासनेला लागला. 'खुद्द स्वामीमहाराज ब्रह्मावर्त येथे हे पुराण सांगत असतां एका श्रोत्याने हा द्विजवर इतर कोणी नसून स्वत: महाराजच होत असे म्हटले. त्यावर महाराजांनी फक्त स्मित मात्र केले अशी आठवण ग्रथित आहे. ह्या वर्णनाच्या आधारेच आपण श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांतील कर्मयोगाचा विचार करु या.

**सर्वसंस्कारसंस्कृत:**

यापुढील संन्यासाचे वर्णन सोडले तर हे सर्व वर्णन आपल्याला प. पू. दत्तमहाराजांच्या जीवनांत साकारलेले दिसते. पिढ्यान् पिढ्या संस्कारांना जोपासणाऱ्या आचारसंपन्न ब्राह्मण कुटुंबांत ते जन्माला आले. गर्भाधानापासून सर्व संस्कार यथाशास्त्र पार पडल्याने 'संस्कारात् द्विज उच्यते' या कसोटीवर ते पुरेपूर उतरले. श्रीस्वामी महाराजानी म्हटल्याप्रमाणे हे दैवाने - अर्थात् पूर्वपुण्याईच्या प्रभावानेच घडते. आठव्या वर्षी उपनयनानंतर हे अत्यंत देवदुर्लभ असे संस्कारसंपन्न द्विजत्व प्राप्त झाल्यावर घरीच नित्यकर्माबरोबरच पिताश्री पू. धुंडीराज महाराज यांच्याकडे वेदाध्ययन आणि गुरुचरित्रवाचनही तत्परतेने सुरू झाले.

**अधीतवेदवेदांग**

श्रीदत्तमहाराजांचे अध्ययन सुरुवातीला वाडीतच श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य प. प. श्रीजेरेस्वामींच्या पाठशाळेत झाले. त्यानंतर सांगलीच्या वे. मू. श्री. शंकरशास्त्री अभ्यंकर याच्या पाठशाळेत व्याकरणाचे अध्ययन झाले. १९२९ साली त्यांचा विवाह झाला. तरीही त्यांनी अध्ययन चालूंच ठेवले. पुण्याच्या मीमांसाविद्यालयांत, पं. श्रीसुब्बाशास्त्री यांच्याकडे मीमासाशास्त्राचे

अध्ययन झाले. याच सुमारास वेदान्त, काव्य, धर्मशास्त्र इत्यादींच्या विविध परीक्षा त्यांनी दिल्या. १९३३ ते १९३७ या पांच वर्षांत ते धारवाडच्या श्रीजगद्‌गुरु शंकराचार्य पाठशाळेंत, पंडितप्रवर ब्रह्मश्री नागेशशास्त्री उप्पनबेट्टिगिरी यांच्याकडे न्याय, वेदान्त इत्यादि अध्ययन झाले. त्यानंतरही ते कांही काळ काशी येथे महापंडित राजेश्वरशास्त्री द्रविड यांच्याकडे अध्ययन झाले. अशा रीतीने अधीतवेदवेदांग होऊन वर्णाश्रमधर्माचे - विशेषत: ब्रह्मचर्य व गृहस्थाश्रमांचे यथाशास्त्र पालन करून एक कर्मयोगाचा महान् आदर्श आपल्यासमोर ठेवला.

धारवाडला असतांना पं. नागेशशास्त्रींनी आपले चिरंजीव भालचंद्रशास्त्री व श्री. दत्तमहाराज यांना म्हैसूर येथे झालेल्या विद्वतपरिषदेला पाठविले. तेथे प्रथम श्री. दत्तमहाराज कवीश्वर यांचा वेदांतशास्त्रांतील अधिकार सर्व विद्वद्वरांच्या प्रत्ययाला आला. धारवाडलाच पं. नागेशशास्त्रींचे गुरु कुडली मठाचे शंकराचार्य श्रीविद्याभिनव वाळुकेश्वर भारती (पूर्वाश्रमींचे पं. विरूपाक्षशास्त्री, हनगळ) यांनी आयोजित केलेल्या अद्वैत ब्रह्मविद्यापरिषदेत पं. नागेशशास्त्रींच्या आज्ञेने वेदांतावर निरूपण केले. तेव्हां श्री दत्तमहाराजांच्या प्रतिभा, विद्वत्ता, गांभीर्य, सात्त्विकता, सदाचार आदि गुणांनी प्रभावित झालेल्या परमगुरु शंकराचार्यांनी 'आपल्या विद्यावंशांतील हे प्रदीपक शिष्यरत्न आहेत' असे उद्‌गार काढले. ह्या परिषदेचा समग्र अहवाल कांचीकामकोटीच्या परमाचार्यांनी आवर्जून मागविला आणि ब्रह्मश्री दत्तमहाराजांच्या विद्वत्तादि गुणांनी प्रभावित होऊन त्यांनी त्यांना एका सेवेकऱ्याबरोबर सुवर्णकंकण-वस्त्रादि मानाचे उपचार पाठविले. तसेच त्यांना पांचशे रुपयांचे वर्षासन सुरूं केले. हे वृत्त कळाल्यावर पुण्यांत प. पू. योगीराज गुळवणीमहाराजांनीही त्यांचा जाहीर सत्कार केला. यानंतरच्या जीवनांत श्रीदत्तमहाराजांची

विद्वत्ता अनेक विद्वत्सभांतून भारतभर मान्यता पावली. त्यांना विविध पीठस्थ शंकराचार्यांकडून वारंवार सन्मान मिळाले. कांचीकामकोटीचे परमाचार्य त्यांचा मोठा आदर करीत. एकदां उगार येथील मुक्कामांत परमाचार्यांनी दत्तमहाराजांना मुद्दाम बोलावून घेऊन, त्यांच्याशी सतत चार दिवस रात्र-रात्रपर्यंत शास्त्रचर्चा केली.

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांना राजसन्मानही बरेच मिळाले. ते चार वेळां राष्ट्रपतींकडून सन्मानित झाले आहेत. भोरच्या संस्थानाने त्यांना वर्षासन दिले होते.

१९३७ साली पुण्याच्या करवीरपीठाधीश जगद्‌गुरु शंकराचार्य विद्यानृसिंहभारती (शिरोळकरस्वामीमहाराज) यांनी चालविलेल्या 'शांकर विद्यापीठांत', न्याय व वेदांत या विषयाचे अध्यापक म्हणू रुजू झाले. त्या वेळी ते सर्व भारतांत एक अधिकारी विद्वान म्हणून मान्यता पावले होते. येथे आठ वर्षे अध्यापन केल्यावर १९४५ साली ते टिळक महाराष्ट्र विद्यापीठांत न्याय व मीमांसा या विषयाचे प्राध्यापक झाले. तेथे २२ वर्षे अध्यापन केल्यावर ते निवृत्त झाले.

अध्ययन, अध्यापन यांप्रमाणेच **यजन-याजन** ही ब्रह्मकर्मेही विपुलतेने प. पू. श्रीदत्तमहाराजांनी संपन्न केलेली दिसतात. सर्व शास्त्रांवर त्यांचा अधिकार भारतभर यात होता. कोणत्याही मोठ्या कार्यांत कांही संशय उपस्थित झाला की त्याचा निर्णय पू. दत्तमहाराज सहज व सर्वांना पटेल, रुचेल अशा पद्धतीने करत असत. प. पू. नारायणमहाराज केडगांवकर यांनी बंगलोर येथील अतिरुद्र स्वाहाकारानंतर अनपेक्षितरीत्या देह ठेवला तेव्हा त्यांची अंत्येष्टि बंगलोरला करावी किंवा केडगांवला असा प्रश्न उपस्थित झाला. त्या वेळी दत्तमहाराजांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे तो सर्व विधि

बंगलोरलाच पार पडला. पुण्यांत व पुण्याच्या बाहेरही अनेक श्रौत व स्मार्त कर्मांचे नियोजन व मार्गदर्शन दत्तमहाराजांनीच केले. प. पू. योगीराज गुळवणीमहाराज असतांना व नंतरही श्रीवासदेवनिवास आश्रमांत जे अनेक यज्ञयाग पार पडले त्यांचे धुरीणत्व दत्तमहाराजांकडेच असावयाचे.

**मंत्रशास्त्रांत** श्रीदत्तमहाराजांचा अधिकार मोठा होता. त्यांनी स्वत: अनेक अनुष्ठाने केली व शेंकडो लोकांना मार्गदर्शन केले. त्यांनी अमरापूर येथे गायत्रीपुरश्चरण केले. तसेच श्रीदत्तमालामंत्राचेही पुरश्चरण केले. त्यांच्याकडून दत्तमालामंत्राचा उपदेश घेऊन बऱ्याच भक्तांनी लाभ करून घेतला आहे. अनेक आर्त व अर्थार्थी भक्तांसाठी त्यांनी गुरुचरित्र पारायणे इत्यादि सेवा निष्काम भावाने केल्या. श्रीमद्‌भागवतसप्ताहरूपी ज्ञानयज्ञ त्यांनी शेंकडो केले. तसेच प्रवचन-निरूपणाच्या माध्यमांतून अध्यात्मिक प्रबोधनही केले. त्याविषयीं आपण पुढे विचार करूंच.

## दान व परिग्रह

हीसुद्धां ब्रह्मकर्मातच समाविष्ट आहेत. ब्राह्मणाने पुण्याचे संपादन करून ते पुण्य परिआहाच्या माध्यमांतून इतरांना द्यायचे आहे. हा शास्त्राने पुरस्कृत केलेला उपाय आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज ह्याच भूमिकेतून अन्न, द्रव्य आदि दानाचा स्वीकार करीत असत. दान करणाऱ्याच्या पापाचे क्षालन करण्याचे सामर्थ्य त्यांनी तपश्चर्येने सिद्ध केले होते. अनेक सत्पुरुषांनी ह्या मार्गाने जनसामान्यांना आपली अमाप पुण्याई वाटली आहे. ह्या परिग्रहांत कांही लोकांना त्यांचा द्रव्यलोभ दिसला तर त्या लोकांच्या दृष्टीतला तो दोष म्हणावा लागेल. दत्तमहाराजांनी अशा प्रकारे आलेल्या धनाचा विनियोग कसा केला

याला महत्त्व आहे. अर्थात् तो नेहमीच आपल्याला पूर्णपणे कळेल असे नाही. दानधर्माच्या बाबतीत गोपनीयताच विहित आहे. उजव्या हाताचे दान डाव्या हाताला कळू नये असे शास्त्र आहे. तरीही एकूणच द्रव्याच्या बाबतीत पू. दत्तमहाराजांचा दृष्टिकोन कळण्याइतकी माहिती आपल्याला कळूं शकते.

श्रीदत्तमहाराजांनी शेकडो श्रीमद्भागवतसप्ताह केले. त्याविषयी आपण पुढे विचार करूंच. पण कधीही त्यांनी मोबदला आधी निश्चित केला नाही. तसेच यजमानांनी दिलेल्या मोबदल्याविषयी यत्किंचित्हि असमाधान प्रदर्शित केले नाही. एकदां तर आठ दिवसांचा पूर्ण सप्ताह संपन्न झाल्यावर यजमानांनी पांचपन्नास रुपयेच दक्षिणा दिली. इतकी कमी दक्षिणा त्यांनी दिली ह्याची त्यांनी वाच्यताही केली नाही व बरोबरच्या मंडळींनाही हे कुठेही बोलू नये असे बजावले. अशा प्रकारे मिळालेल्या पैशांचा विनियोग त्यांनी प्राधान्याने श्रीगुरुसेवेत व धर्मकार्यांतच केला असल्याचे दिसून येते. प. पू. योगीराज गुळवणीमहाराजांच्या स्मरणार्थ जो वामननिवास उभा झाला त्यासाठीचे बह्वंशी द्रव्य श्रीदत्तमहाराजांनी गांवोगांव फिरून केलेल्या श्रीमद्भागवतसप्ताहांतूनच उपलब्ध झाले आहे. धारवाडच्या जगद्गुरु शंकराचार्य पाठशाळेलाही त्यांनी हजारों रुपये वेळोवेळीं पाठविले आहेत.

श्रीदत्तमहाराजांच्या समोर येणाऱ्या दक्षिणेचाही विनियोग असाच धर्मकार्यासाठी होत असे याबद्दल माझा प्रत्यक्ष अनुभव येथे देत आहे. ही गोष्ट श्रीदत्तमहाराजांच्या शेवटच्या आजारापूर्वीच्या गुरुपौर्णिमेची आहे. गुरुपौर्णिमेला महाराज सकाळी आठ वाजतांच आश्रमांत येत असत व रात्री उशीरापर्यंत (१०च्या पुढेही) थांबत असत. या काळांत दर्शनेच्छूंची सारखी रीघ असे. त्या दिवशी

श्रीदत्तमहाराजांनी आश्रमांतच मुक्काम केला. रात्री दहाच्या नंतर समोर जमलेले सर्व पैसे मोजले. एक लाखाला थोडेच कमी होते. ते सर्व पैसे त्यांनी तात्काळ त्या वेळी प्रगतिपथावर असलेल्या औरवाडच्या अमरेश्वरमंदिराच्या जीर्णोद्धारासाठी दिले. याच काळांत श्रीमहाराजांना मध्यवर्ती शासनाकडून मिळणाऱ्या मानधनाची दहा-वीस हजारांची रक्कम एका भक्तांनी प्रयत्नपूर्वक प्राप्त केली. तो धनादेश आल्याबरोबर महाराजांनी लगेच एका सुप्रसिद्ध संस्कृत पाठशालेला ते पैसे धनादेशानेच दिले. एकदां एका भक्ताने दत्तमहाराजांना नित्यकर्मासाठी चांदीचा तांब्या, पंचपात्र, ताम्हण. पळी इत्यादि उपकरणे दान म्हणून दिली. साधारण महिना-दोन महिने ती महाराजांनी वापरली असतील. त्यानंतर एका विद्वान् ब्राह्मणाला ते सर्व दान केले. ह्या मी पाहिलेल्या घटना आहेत. श्रीदत्तमहाराजांनी केलेले बहुतेक दान हे अत्यंत गुप्ततेने केले आहे. ते आपण केलेले दान इतर कुणाला कळूं देत नसत. त्यांच्या निकटवर्ती लोकांना ह्यापेक्षां अधिक माहिती असेल.

पुण्यांत श्रीदत्तमहाराज आले तेव्हां प्रथम सरदार नातूंच्या वाड्यांत रहात होते. जागा प्रशस्त व सोयिस्कर होती. पण सरदार नातूंना कवीश्वर घराण्याविषयीं जो गुरुतुल्य आदर होता त्यामुळे ते भाडे घेईनात. दत्तमहाराजांनी अनेक वेळां विचारूनही ते कांही भाडे सांगण्यास तयार होईनात. मग मात्र महाराजांनी कुणालाही न विचारतां व घरचा थोडा विरोधही पत्करून दुसरी भाड्याची जागा पाहून ती गैरसोयीची असूनही बिऱ्हाड हलवले. पुढे शंकराचार्यांच्या ओळखीने वर्तकवाड्यातील जागा मिळाली व पुण्यांतील महाराजांचे बहुतेक वास्तव्य ह्या तिसऱ्या मजल्यावरच्या तीन खोल्यांच्या जागेतच झाले.

श्रीदत्तमहाराजांची धनाविषयींची अनासक्ती आणखी एका प्रसंगाने प्रकट झाली आहे. टिळक महाविद्यालयांत प्राध्यापकाची

कर्तव्ये करीत असतां एकदां दत्तमहाराज देऊळगांवला गेले व तिथे विषमज्वराने आजारी पडले. अर्थात्च ते रजेहून परतण्यास उशीर झाला. रीतसर वैद्यकीय दाखला देऊनही ती रजा बिनपगारी करण्यांत आली. महाराजांनी निमूटपणे हे सर्व सहन केले. पण ही गोष्ट विद्यार्थ्यांना समजली. त्यांनी उत्स्फूर्तपणे ५०० रु. जमा केले व ते दत्तमहाराजांना समर्पण केले. रजा बिनपगारी झाल्याने महाराजांचे २५०/- रु. च नुकसान झाले होते. त्यामुळे त्यांनी तेवढेच पैसे विद्यार्थ्यांच्या आग्रहाने घेतले व उरलेल्या पैशांचा एक शिक्षकनिधि स्थापन करण्यास सांगितले. वाडीच्या वडिलोपार्जित घराचा त्यांनी ट्रस्ट केला. अशी अनेक उदाहरणे देतां येतील.

वरील कांहीं घटनांवरून श्रीदत्तमहाराजांची द्रव्याविषयीची अनासक्ती लक्षांत येते. केवळ महाराज दक्षिणेचा स्वीकार करीत होते म्हणून त्यांना पैशांचा लोभ होता असे म्हणणे धाष्ट्र्याचे आहे. द्रव्याबरोबर येणाऱ्या दोषांचे पूर्ण ज्ञान असणारे ते शास्त्रज्ञ होते. त्या पूर्ण जाणिवेने त्यांनी दान स्वीकारले व त्याबरोबरच दात्यांच्या दोषांचा परिहार केला. हे केवळ रंजल्या गांजलेल्यांच्या कळवळ्यानेच केले.

हे समजण्याइतकीही ज्यांची श्रद्धा नसेल त्यांनी श्रीदत्तमहाराजांच्या अत्यंत साध्या राहणीचा विचार करून तरी त्यांच्या निंदेच्या महत्पापापासून स्वतःला सांभाळावे. आयुष्यभर दत्तमहाराजांनी एक धोतर व एक उपरणे, थंडीच्या दिवसांत आवश्यक तर एखादी शाल याखेरीज कोणतेच वस्त्र वापरले नाही. पायांत वहाणसुद्धां क्वचित् कुणाचे मन राखण्यापुरतीच घातली. त्यांनी प्रवास बह्वंशी रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाचा किंवा साध्या परिवहन मंडळाच्या बसने केला. विमानाने प्रवास करण्याचा प्रस्ताव एकदां त्यांच्यापुढे

मांडला तेव्हां त्यांनी विरोधच केला व त्यासाठी लागणाऱ्या धनाचा विनियोग धर्मकार्यासाठी करावा अशी सूचनाही केली. वार्धक्यावस्थेतही स्वत:च्या शरीराचे यत्किंचितही लाड त्यांनी केले नाहीत. वाडीच्या वेशींत (देवाच्या आवारांत) गाडी तर सोडाच पण चाकांची खुर्चीसुद्धां ते घेत नसत. एकदां प्रयागला भर दुपारी तापलेल्या दगडावरून जातांनासुद्धां ते अनवाणी गेले. ओल्या कपड्यांनी दगड थंड करण्याच्या प्रयत्नांचा निषेध केला. अशा जीवन्मुक्त देहाविषयी अनासक्त महात्म्याच्या मनात द्रव्याचा लोभ असूच शकत नाही.

**मातापितृगुरूद्युक्त**

हे कर्मयोगाचेच एक प्रधान अंग आहे. आपल्या आईवडिलांचा दत्तमहाराज नितांत आदर करीत. ते वडिलांसमोर सहसा बसतही नसत. बसले तरी खाली, एका बाजूला अगदी नम्रपणे बसत. आईवडिलांना घरांतील कुणीही बोललेले त्यांना खपत नसे. धुंडिराजमहाराजांनीही आपल्या पुत्राची योग्यता जाणली होती. त्यांनी आपल्या वडिलांकडून आलेले पारंपरिक दीक्षागुरुत्व पू. दत्तमहाराजांना दिले होते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी ज्या ज्या गुरूंकडून विद्या ग्रहण केली त्या सर्वांचा ते अत्यंत आदर करीत. सर्व संन्याशांना ते गुरुस्थानी मानत. चोवीस गुरु करणाऱ्या भगवान् दत्तप्रभूंचा आदर्श त्यांच्यासमोर होता. 'जो जो जयाचा घेतला गुण। तो तो म्यां गुरू केला जाण। गुरूंसि आले अपारपण। जग सर्वत्र गुरु दिसे।।' या एकनाथमहाराजांच्या उक्तीप्रमाणेच त्यांची अवस्था होती. आपल्यापेक्षां लहान असलेल्या, पूर्वाश्रमीं आपल्याकडे अध्ययन केलेल्या संन्याशांना ते वंदन तर करीतच, पण त्यांच्याशी अत्यंत मर्यादेने वागत. वाडीच्या एका

मुक्कामांत तिथे प. प. श्रीनारायणानंद सरस्वती, ब्रह्मानंदांच्या माडीवर थांबले होते. दत्तमहाराजांना जिने चढण्याची डॉक्टरांनी मनाई केली होती. पण तेथील आठ दिवसांच्या काळांत ते रोज सकाळी न चुकतां स्वामींच्या दर्शनाला जात. त्यांना निदान जिना न चढतां खुर्चीतून वर नेण्यालाही त्यांनी ठामपणे नकार दिला. स्वामींच्या समोर ते कधीही टेकून बसले नाहीत. त्यांच्या त्या वेळच्या अवस्थेत तास-तास न टेकता बसणे किती क्लेशकारक असेल ते तेच जाणोत. त्यांनी कधीही इतरांना ते कळूं दिले नाही. पीठस्थ जगद्‌गुरूंचाही ते असाच अतीव आदर करीत.

प. प. श्रीवरदानंद भारती (पूर्वाश्रमींचे प्रा. अनंतराव आठवले) यांच्या पहिल्या पुण्याच्या भेटींत ते आवर्जून त्यांच्या दर्शनास गेले. त्यांना सादर वंदन करून, परमश्रेष्ठ अशा चतुर्थाश्रमाचा स्वीकार करून मानवी जीवनाचे साफल्य केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्या वेळी तेथे कांही उपस्थित भक्तमंडळींनी श्रीदत्तमहाराजांना नमस्कार केला तेव्हां ते म्हणाले ‘(मला) प्रापंचिकाला काय नमस्कार करतां?’ पुढे दोन वर्षांनी स्वामीजी पुण्याला आले तेव्हां दत्तमहाराज रुग्णशय्येवरच होते. त्याही अवस्थेत ते उठून बसले व स्वामींना वंदन करूं लागले. मात्र या वेळीं स्वामींनी ‘मी आपल्या दर्शनाला आलो आहे’ असे म्हणत महाराजांचा हात धरून आपल्या मस्तकी धारण केला.

वंशपरंपरा व विद्यापरंपरा यांचाही ते बहुमान करायचे. कर्नाटक-केरळ सीमेवरील अश्वत्थपूर येथे एका सहस्रचंडी यागाला दत्तमहाराज गेले असतांना तेथे त्यांना मद्रासकडील एका तरुण विद्वानांचा परिचय करून दिला. ते अद्वैताचार्य अप्पय्या दीक्षित यांचे वंशज आहेत असे समजतांच महाराजांनी त्यांना उठून साष्टांग नमस्कार

घातला.

मोक्षगुरु प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराज, विद्यागुरु पं. नागेशशास्त्री उप्पनबेट्टिगिरी व दीक्षागुरु योगीराज गुळवणीमहाराज यांना तर त्यांनी पूर्ण आत्मसमर्पणच केले होते. त्यांच्या संपूर्ण जीवनांतील सर्व कृतींचा उद्देश ह्या त्रैमूर्तींची सेवा हाच होता. प. प. श्रीदीक्षित स्वामी महाराज यांच्या आदेशाप्रमाणे आयुष्यभर त्यांनी प्रौष्ठपदी श्रीमद्‌भागवत सप्ताह केला तसेच औरवाड येथे सद्‌गुरूंनी स्थापिलेल्या श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठाचा व अमरेश्वरमंदिराचा जीर्णोद्धार केला. विद्यागुरूंचे ऋणही त्यांनी त्या विद्येचे मुक्त हस्ताने दान करून, पाठशाळेला सढळ हाताने अर्थसहाय्य करून व गुरुपौत्र पं. राजेश्वरशास्त्रींना वेदान्त शिकवून फेडले. प. पू. श्रीगुरुमहाराजांकडून प्राप्त झालेल्या शक्तिपात मार्गाचा आजीवन प्रसार करून, त्यांच्या स्मरणार्थ श्रीवामननिवासाची उभारणी करून व श्रीवासुदेवनिवासाची धुरा २५ वर्षे तत्परतेने सांभाळून त्यांनी केली.

अशा रीतीने तीनही ऋणांचा परिहार प. पू. दत्तमहाराजांनी केला. हे सर्व करीत असतांच त्यांनी योगीन्द्र म्हणजे प्रभु दत्तात्रेयांची भक्तिपूर्वक उपासना केली.

**सद्‌भक्त्योपास्तयोगीन्द्र**

आपण आधी पाहिल्याप्रमाणे दत्तमहाराजांना भक्तिमार्गाचे बाळकडूच लाभले होते. त्यांच्या मातु:श्री महान् भक्तिमान् साध्वी होत्या. वाडीच्या पादुकामंदिराला रोज ५०० प्रदक्षिणा करण्याचा त्यांचा नियम वर्षानुवर्षे होता. दत्तमहाराज लहान असतांना मातु:श्रीना कधी कांही अडचण आली तर त्यांच्या प्रदक्षिणा दत्तमहाराज करीत. बाळपण वाडीच्या दत्तभक्तिपरिपूरित वातावरणांत गेले. त्यांतच प. प. श्रीदीक्षितस्वामींचा

देवदुर्लभ सत्संग त्यांना लाभला. वाडीतील आणखीही कांही बालगोपालांबरोबर ह्या बालदत्तमूर्तीलाही प. प. दीक्षितस्वामींचा चांगलाच लळा लागला. पुढे दीक्षितस्वामींनी वाडी सोडली व औरवाडला श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठाची स्थापना केली. तरीही वाडींतील हे बालभक्त नदी ओलांडून नित्य गुरुदर्शनाला येऊं लागले. एकदां दीक्षितस्वामी गुरुचरित्रांत गंगानुजाला सांगितलेल्या त्रिस्थळीच्या यात्रेला निघाले. दत्तमहाराजांसह १५-१६ भक्त त्यांत होते. ही मुले शाळा बुडवून कोल्हापूरपर्यंत गेली. इकडे धुंडीराजमहाराजांसह पालकांना त्यांच्या शिक्षणाची काळजी वाटून ते कोल्हापूरला गेले. त्या मुलांना समजावून सांगून परत आणतां सर्वांच्या नाकी नऊ आले. दत्ताने तर परत आल्यावर महाराजांकडे परत जाण्यासाठी जेवणच सोडले. मोठ्या मिनतवारीने त्याची समजूत घालावी लागली.

पुढे सांगलीच्या पाठशाळेत अध्ययनासाठी गेल्यावर प. प. श्रीदीक्षितस्वामींचे नित्यदर्शन घडेना. मात्र वाडीला आल्यावर गुरुदर्शनाशिवाय ते कधी परत जात नसत. एकदां पावसाळ्याच्या दिवसांत एक दिवसासाठीच दत्तमहाराज वाडीला आले होते. घरी अधिक मासाचे ब्राह्मण जेवायला सांगितले होते. जेवायला वेळ होता तेव्हां औरवाडला जाऊन स्वामींचे दर्शन घेण्याची ओढ दत्ताला अनावर झाली. आईला विचारले तेव्हां त्यांनी घरी ब्राह्मणभोजन असल्याची आठवण केली. शेवटी जेवायच्या वेळेला परतण्याचे आश्वासन देऊन दत्ता निघाला. त्या वेळी नदीला प्रचंड पूर होता. लहानपणापासूनच नदीत पोहण्याचा सराव होताच. कमरेला एक धोतर व दुसरे डोक्याला गुंडाळून स्वारी नदीत उतरली. झपाझप पोहत पैलतीराला गेली. डोक्याचे वस्त्र पिळून नेसले व कमरेच्या वस्त्राचा पिळा खाद्यावर टाकून मंदिरांत गेले. स्वामीमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला.

त्या दिव्य तेजस्वी पावन मूर्तीला डोळ्यांत सांठवले व मन आनंदाने भरून आले. स्वामींनी कोरडी वस्त्रे दिली, जेवणाचा आग्रह केला; पण घरी अधिकाचे ब्राह्मण जेवायचे आहेत हे कळतांच त्यांनी परत जाण्याची अनुज्ञा दिली. पुन्हा नदीवर आले, त्या तसल्या पुरांत उडी घातली. ह्या वेळी मात्र दत्ता भोंवऱ्यांत सांपडला. शारीरिक बल व पोहण्याचे कौशल्य त्या कृष्णामाईच्या जीवघेण्या सलगीपुढे तोकडे पडले. दत्ता अगतिक झाला आणि त्याने श्रीदत्तप्रभूंचा धांवा केला. त्या गुरुभक्तीने ओथंबलेल्या हृदयाची हांक लगेच दत्तप्रभूंना ऐकायला गेली. क्षणार्धच ते स्मितमुख, चैतन्यमय रूप दत्ताच्या डोळ्यांपुढे झळकले आणि तो त्या भोंवऱ्यातून बाहेर खेचला गेला. त्या दर्शनाने आंतरिक सुखाचा एवढा कल्लोळ त्याच्या हृदयांत उसळला की आपले प्राण वांचल्याचा आनंद जाणवलासुद्धां नाही.

**भागवत सप्ताह**

अशा ह्या सहज निरुपचारिक प्रेमांतून दीक्षितस्वामीनी दत्तमहाराजांचे आध्यात्मिक जीवन पुष्ट केले. पुढे सांगलीच्या पाठशाळेत दत्तमहाराज अध्ययन करीत असतांनाच त्यांनी त्यांना औरवाडला पाचारून त्यांच्याकडून पहिला प्रौष्ठपदी भागवतसप्ताह करून घेतला व तो ऐकण्यास स्वत: बसले. सप्ताहसमाप्तीनंतर स्वामीमहाराज अतीव प्रसन्न झाले व श्रीदत्तमहाराजांच्या अंगावर स्वहस्ते शाल घातली. यापुढे दर वर्षी भागवत सप्ताह करण्याची आज्ञा दिली आणि ‘तू पूर्ण ज्ञानी होशील. माझा तू प्रिय भक्त आहेस, तुझ्यावर ईश्वराची मोठी कृपा आहे. या भागवतसप्ताहाच्या माध्यमांतून तुझ्या हस्ते मोठा धर्मप्रसार होईल‘ असा आशीर्वाद दिला.

हा आशीर्वाद पुरेपूर फळला. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा

भागवतसप्ताह हे भक्तिमार्गाचे शक्तिमान, वेगवान वाहनच झाले. आबालवृद्धांना, सहजपणे भागवतांतील सिद्धांत विशद करीत असतांनाच त्यांची वाणी श्रोत्यांच्या आल्हादिनी शक्तीचे जागरण करीत असे. सप्ताहाच्या पूर्ण काळांत व नंतरही हे श्रोते एका उच्च भावमय अवस्थेचा अनुभव घेत असत. खरोखर, ज्यांना ही महापर्वणी साधली ते हा संसारसागर तरून गेले. प. पू. गुरुमहाराजांना(योगीराज गुळवणीमहाराज) कुठे नेण्यासाठी हमखास उपाय म्हणजे श्रीदत्तमहाराजांच्या भागवतसप्ताहाचे तिथे आयोजन करणे हे खुले गुपित झाले होते. प. पू. गुरुमहाराज श्रीदत्तमहाराजांचा भागवतसप्ताह सहसा चुकूं देत नसत. दत्तमहाराजांच्या भागवतसप्ताहाचा हा प्रभाव त्यांच्या वैराग्यशील वृत्तीमुळे आहे असे श्रीगुरुमहाराज म्हणत. सुप्रसिद्ध भागवताचार्य डोंगरेमहाराज यांनी दत्तमहाराजांना साष्टांग नमस्कार घालून त्यांच्या विरोधाला न जुमानतां आपल्या पीठावर बसून उपदेशाचे चार शब्द त्यांच्याकडून श्रवण केले; त्यांना साक्षात् वेदव्यास म्हटले. अशा अनेक अधिकारी मंडळींनी त्यांच्या भागवतसप्ताहाची असीम स्तुती केली आहे.

हे भागवतसप्ताह व महान् वंशपरंपरेतून प्राप्त झालेले गुरुत्व ह्यांतून श्रीदत्तमहाराजांनी केलेला भक्तिमार्गाचा प्रचार फार मोठा विस्तृत व प्रभावी आहे. त्यांच्याबरोबरमराठवाड्यांतील देऊळगांव, जालना, खर्डा इत्यादि ठिकाणी जे गेले असतील त्यांनाच ह्या भक्तिसागराच्या अथांगतेची थोडीशी कल्पना येऊं शकेल. स्वत: दत्तमहाराज तर भागवतांत वर्णिलेले भागवतोत्तमच होते.

**नरसोबाची वाडी**

नरसोबाची वाडी आणि तेथील निर्गुण पादुका यांविषयी

श्रीदत्तमहाराजांच्या मनांत असलेल्या भावना अकल्पनीय आहे. ते कुठेही असले तरी त्यांचे मन जणूं वाडींतच असायचे. 'आतां धूप पडला असेल' असे कांही तरी बोलणे सहज त्यांच्या तोंडून निघायचे. वाडीला जायचा विषय निघाला तरी त्यांचे मन मोहरून जायचे! श्रीगुरुद्वादशी आणि श्रीनारायणस्वामींचा उत्सव अशा दोन तरी वार्षिक वाऱ्या त्यांच्या होत. वाडींत - विशेषत: देवाच्या कट्ट्यावर ते अक्षरश: भान हरपत असत. समोरची नित्यपरिचित व्यक्तिसुद्धां त्यांना ओळखू येत नसे. हे अनेकांनी पाहिले आहे. जणूं त्यांची दृष्टि दत्तप्रभूंच्या दर्शनांत हरवून जायची. स्वभावत: संकोची वृत्तीच्या दत्तमहाराजांनी आपली अवस्था सांवरण्याची शिकस्त करूनही ती लपत नसे. नित्यच हृदयांत वाहणारा आनंदाचा प्रच्छन्न ओघ वाडींत उसळून दृष्टिगोचर व्हायचा.

वाडीच्या मुक्कामांत काकड आरतीपासून शेजारतीपर्यंतच्या कार्यक्रमांत ते सहभागी व्हायचे. शेवटची दोन-तीन वर्षे त्यांना हृदयविकाराचा त्रास असल्याने वाडीचा घाट चढण्या-उतरण्याला डॉक्टरांची परवानगी नव्हती. तरीही ते रोज दर्शनाला जात असत. बहुतेक वेळां त्यांना मोटरगाडींतून बाजूच्या रस्त्याने कट्ट्याजवळ सोडण्यांत येई. पण त्याने त्यांना समाधान वाटायचे नाही. एकदां तरी मोटारींतून जाण्याचे टाळून पायीं घाट उतरून दर्शन घेतल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे.

ह्याच काळांत त्यांना पालखीला जाणे शक्य होत नसे. वाडीच्या मुक्कामांत, स्वारीपुढे पुराण सांगण्याची श्री. वक्रतुंडमहाराजांनी सुरूं केलेली परंपरा ते आवर्जून चालवत. पुराण झाले की त्यांना घरी सोडायला बरोबर जाणाऱ्यांना ते सांगत 'भाग्यहीनाची संगत करूं

नका. पालखी चुकवूं नका. 'पालखीला जातां न येणे हे भाग्यहीनाचे लक्षण अशी त्यांची दृढ भावना होती.

श्रीनारायणस्वामींच्या उत्सवांत त्यांचे चरित्र पुराणांतून सांगण्याची परंपरा प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतींनी सुरूं केली होती. कित्येक वर्षे नेमाने ही पुराणसेवा श्रीदत्तमहाराजांनी केली. अखेर एक दिवस असा आला की हृदयविकारामुळे त्यांना हा उत्सव अर्ध्यावर सोडून पुण्याला परतावे लागले. त्यावेळी निरोप घेतांना '(देवांनी) सेवा घेतली नाहीऽ' असे म्हणतांना त्यांचा कंठ रुद्ध झाला व डोळ्यांतून पाणी वाहूं लागले.

**श्रवणं कीर्तनं विष्णोः...**

पू. दत्तमहाराजांना कीर्तन अतिशय प्रिय होते. श्रीदत्तमहाराज स्वतः उत्तम कीर्तनकार होते हे कदाचित् सर्वांना माहीत नसेल. त्यांचा संगीताचा अभ्यास होता आणि उत्तम जाणही होती. श्रीशिरोळकरस्वामींच्या शांकरमठांत एकदां त्यांनी अस्खलित संस्कृत भाषेंतून दोन तास कीर्तन केले. प. पू. योगीराज गुळवणीमहाराजही उपस्थित होते. श्रीस्वामी इतके प्रभावित झाले की आपल्या पीठाच्या मर्यादेमुळे आपल्या दत्तमहाराजांना वंदन करतां येत नाही याबद्दल त्यांनी खेद प्रकट करतांना त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. श्रीवासुदेवनिवासांत होणाऱ्या कीर्तन-भजन-प्रवचनादि कार्यक्रमांत ते तत्परतेनेच नव्हे तर उत्कंठेने उपस्थित असायचे. अगदी वृद्धावस्थेतही, बसण्याच्या जागीच सतत दुःखाचा ठणका असतांना, शारीरिक क्लेशांची पर्वा न करतां ते दोन-दोन तास बसलेलेआम्ही पाहिलेले आहेत. शेवटी शेवटी डॉक्टरांनी त्यांना फार वेळ बसण्याची मनाई केली. तरीही ते डॉक्टरांना डावलून कीर्तनाला बसायला उत्सुक असत. एकदां दत्तजयंतीच्या कीर्तनाला बसण्याचा त्यांनी हट्टच धरला.

पण कांही ज्येष्ठ मंडळींनी डॉक्टराच्या सल्ल्याने त्यांना बसूं दिले नाही. त्याना उठून घरी जावे लागले. त्या वेळी त्यांच्या डोळ्यांतून घळघळां अश्रू वाहत होते. 'वियोग घडतां रडो' हे कांही केवळ यमक जुळवण्यासाठी लिहिले नाही याचा तेव्हां सर्वांना साक्षात्कार झाला. सागराला मिळणाऱ्या गंगौघासारखे त्यांचे द्रवीभूत अंत:करण अखंड भगवत्स्वरूपांत प्रवाहित होत असे. निरूपण करतांना, कीर्तनादींचे श्रवण करतांना किंवा सहज बोलतांनाही एखादी गुरु ईश्वर वा संत यांची आठवण किंवा उक्ति, ह्या भावगंगेला प्रस्फुटित करण्याला समर्थ ठरे. आसमंत तिच्या लहरींनी जणूं आर्द्र होऊन जाई आणि तो ओलावा सर्व श्रोत्यावक्तांच्या हृदयांतही पाझरूं लागे. अशी होती त्यांची भावावस्था. ही कांही साधन भक्ति नव्हती. ही होती ज्ञानोत्तर भक्ति. कारण प. पू. दत्तमहाराज पूर्ण ज्ञानी होते.

## प. पू. धुंडामहाराज देगलूरकर यांचे अभिवादन.

(गु. भ. नीलाताई जोशी यांच्या चरित्रलेखनानिमित्ताने)

प. पू. श्रीदत्तमहाराज यांची विद्वत्ता व अधिकार हा आजच्या काळांत सहजासहजी कळणे कठिण आहे. न्यायमीमांसावेदांतादि शास्त्रांचे प्रगाढ पांडित्य असूनही अत्यंत विनयशील असा त्यांचा स्वभाव आहे. एका श्रेष्ठ परंपरेच्या आचार्यपदावर आरूढ असूनहि अत्यंत साधी त्यांची राहाणी आहे. लोकल्याणाच्या हेतूने अनेक कार्यांत व्यग्र असूनही ते सर्वांपासून अलिप्त आहेत. असे श्रेष्ठगुणसंपन्न त्यांचे व्यक्तिमत्त्व असूनही तो श्रेष्ठपणा मिरविण्याचा त्यांचा स्वभाव नसल्याने कित्येकदा जवळच्या लोकांनाही त्यांची खरी ओळख होत नाही! कांही लोक नसलेला मोठेपणा मिरवतात व कांही लोक असलेला मोठेपणा झाकतात! पण तो झाकून राहणे लोकहिताच्या दृष्टीने योग्य नाही. कारण त्या मोठेपणाचे दर्शन हे अनेक लहानांना मोठे करीत असते.

# भागवतोत्तम दत्तमहाराज कवीश्वर
# ज्ञानयोग

डॉ. वासुदेव व्यं. देशमुख

## प. पू. दत्तमहाराजांचा ज्ञानयोग

प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या अध्ययनाविषयी आपण विचार केला आहे. आसेतुहिमाचल जेथे जेथे म्हणून भारतीय पारंपरिक ज्ञान ग्रहण करण्याची त्यांना संधि मिळाली तेथे तेथे जाऊन त्यांनी ते आत्मसात केले. ते ज्ञान पूर्णपणे पचवले. याविषयी कांचीपीठाचे जगद्गुरु परमाचार्य यांनी प. प. श्रीनारायणानंद सरस्वतींना दिलेला अभिप्राय उल्लेखनीय आहे. ते म्हणतात, 'येथे आलेली अनेक विद्वान दिग्गज मंडळी, ही त्यांच्या क्षेत्रांत मान्यता पावलेली व कर्माचरणी आहेत. परंतु आमचे कवीश्वरशास्त्री हे खरे मुरलेले आहेत. जसा मुरलेला आंवळा हा परिपूर्ण तृप्त व संपृक्त द्रावण होऊन अधिकाधिक गुणकारी असतो त्याप्रमाणे. 'आचार्यपरंपरेतील, आंतरराष्ट्रीय मान्यतेच्या एका महान साक्षात्कारी सत्पुरुषांचे हे मत आहे. स्वतः परमाचार्य श्रीदत्तमहाराजांना किती मानत असत ह्याचे अनेक दाखले आहेत. एकदां श्रीदत्तमहाराज कांची येथे श्रीपरमाचार्यांच्या दर्शनासाठी गेले असतां, आचार्यांनी शेंकडों दर्शनार्थींना तिष्ठत ठेवून दत्तमहाराजांना आंत बोलावून घेतले व तासापेक्षांही अधिक वेळ बोलणे झाले. दत्तमहाराजांच्या संकोची स्वभावानुसार त्यांनी नम्रपणे बाहेर प्रतीक्षा

करीत असलेल्या लोकांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला तेव्हां आचार्य म्हणाले, 'ते रोजचेच आहेत! आपला सत्संग मात्र दुर्लभ आहे!!' उगार येथील मुक्कामांत परमाचार्यांनी दत्तमहाराजांना बोलावून घेऊन सतत चार दिवस-रात्र शास्त्रचर्चा केली होती. दत्तमहाराजांशी संवादाला परमाचार्य किती आसुसलेले होते हे त्या वेळी सर्वांच्या लक्षांत आले.

दत्तमहाराजांच्या विद्वत्तेचाच नव्हे तर त्यांच्या ज्ञानाचा इतका अलोट गौरव झाला तरी ते स्वत:ला ज्ञान-प्राप्तीचाही अधिकार नसल्याचे मानत. इतकेच नव्हे तर तो अधिकार तरी मिळावा यासाठी तळमळत असत. इथे सॉक्रेटीस या ग्रीक तत्त्वज्ञाची गोष्ट आठवते. सॉक्रेटीसच्या जीवनांत एकदां ग्रीसमध्ये सर्वजण मानीत असलेल्या डेल्फीच्या ओरॅकल्‌ने असे सांगीतले की 'ग्रीस देशांत फक्त सॉक्रेटीस्‌च काय तो ज्ञानी आहे. 'हे जेव्हां लोकांनी सॉक्रटीस्‌च्या कानांवर घातले तेव्हां त्याला फार आश्चर्य वाटले. मला खरोखर कांही ज्ञान नसतांना ओरॅकल्‌ने असे कां म्हटले असेल? असा विचार त्याला पडला. त्याचीही ओरॅकल्‌वर पूर्ण श्रद्धा होती. त्यामुळे ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी त्याने एकांतांत जाऊन खूप चिंतन केले. तेव्हां त्याच्या लक्षांत आले की 'आपल्याला ज्ञान नाही हे फक्त आपल्यालाच कळले आहे! 'अशीच कांहीशी अवस्था श्रीदत्तमहाराजांची होती. परोक्ष ज्ञानाची परिणति ईश्वराच्या अज्ञेयत्वाच्या साक्षात्कारांत होणे हेच खरे फळ आहे. आत्मस्वरूप हे बुद्धीच्या पलीकडे आहे, हे कळण्यासाठी बुद्धीच्या सीमेपर्यंत पोंचणाऱ्या ज्ञानातिशयाची आवश्यकता आहे. दत्तमहाराज हे असे सीमोल्लंघन करणारे ज्ञानी

होते. आणि म्हणूनच ज्ञानित्वाचा संभ्रमही त्यांच्या चित्ताला स्पर्श कधीच स्पर्श करूं शकला नाही.

श्रीदत्तमहाराजांच्या स्वत:च्या अज्ञानित्वाचा आणखी एक पैलू लक्षांत घेणे गरजेचे आहे. श्रीमहाराज हे श्रीमच्छंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचे व परंपरेचे एकनिष्ठ व जाणते अनुयायी होते. 'संन्यस्य श्रवणं कुर्यात्' ह्या आदेशाला पूर्णपणे मानणारे होते. विधिपूर्वक संन्यास घेऊनच ज्ञानसाधनेची पहिली पायरी जे श्रवण त्याचा अधिकार प्राप्त होतो ही त्यांची दृढ धारणा होती. त्यामुळेच कितीही अधिकारी मंडळींनी केवढेही आपल्या विद्वत्तेचे कौतुक केले करी आपली अजून पहिली पायरीही नाही याचे शल्य त्यांच्या मनांत कायम होते. प. प. श्रीनारायण सरस्वतींना पाठविलेल्या एका उत्कंठापत्रांत ही त्यांची तळमळ दत्तमहाराजांनी व्यक्त केली आहे. ती मुळांतूनच वाचण्यासारखी आहे.

**नारायणयतिमहाराजांना उत्कंठापत्र**

'आपल्या .. पवित्र संगतीचा व सच्छास्त्रश्रवणाचा लाभ आपल्या कृपेने होतो. तसाही लाभ स्वीयदूरदृष्टीने अंतरायग्रस्त, मायाबुद्धिनिमग्न या जीवाला आजपर्यंत झाला नाही... 'आठवण तुम्ही घावी पांडुरंगा' या श्रीतुकारामांच्या प्रार्थनेप्रमाणे हे सर्व आपणांसारख्या निरवधिकृपापूर्ण महापुरुषांच्या संकल्पप्रभावानेच घडून येणारे आहे. वयाला ऐंशी वर्षे होत आली. पण हे आयुष्य 'निद्रया ऱ्हियते नक्तं दिवा चार्थेह्या तथा' या प्रह्लादजींच्या उक्तीप्रमाणे व्यर्थ गेले आहे. पश्चिमेकडे रथ चालला आहे.... असा

नैराश्यात्मक व्याकुलीभाव आपल्यापुढे मांडला आहे. 'या पत्रांतील

शब्द न् शब्द अंत:करणापासून आलेला जाणवतो. प. पू. श्रीदत्तमहाराजांविषयी समकालीन अधिकारी ज्ञानी सत्पुरुषांना वाटणारा प्रगाढ आदर आणि स्वत: दत्तमहाराजांना आपल्या ज्ञानाचा सलणारा अभाव यांचा समन्वय घालणे अशक्य आहे. मृगाला आपल्या नाभींतल्या कस्तुरीची जाणीव नसावी आणि तिच्या गंधाने व्याकुळ होऊन सगळीकडे शोध घ्यावा अशी कांही आर्तता श्रीदत्तमहाराजांची ज्ञानाविषयीं झालेली दिसते.

ह्यावरून त्यांच्या ज्ञानीपणाविषयीं शंका घेणे आपल्या प्रगाढ अज्ञानाचे घोतक ठरेल. स्वत:ला ज्ञानी समजणारा कधी ज्ञानी असतो काय? किंवा ज्ञानी स्वत:ला कधी ज्ञानी समजतो काय? ह्या प्रश्नांची उत्तरे 'यस्यामतं.. 'इत्यादि श्रुतीने देऊन ठेवली आहेत. मग श्रीदत्तमहाराज ज्ञानी होते याला कांहीं प्रमाण आहे की नाही असा प्रश्न उपस्थित होऊं शकतो. खरे तर हा प्रश्न केवळ दत्तमहाराजांच्या संदर्भांतच उद्भवतो असे नाही. कोणत्याही ज्ञानी पुरुषाच्या ज्ञानी पुरुषाची ओळख कशी पटायची हाच प्रश्न आहे. याचे एक नेहमीचे उत्तर असे आहे की ज्ञानी होऊनच ज्ञान्याची ओळख पटणार! ज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दांत सांगायचे तर ते 'पवित्रैकनिधान'ज्ञान अनिरूप्य आहे. 'डोळां देखिजे। ऐसे नाही।। १३:१७६. 'ज्ञानी पुरुषाच्या शरीरांतसुद्धां ते ज्ञान आपला प्रभाव करते आणि त्याच्या इंद्रियव्यापारांतून ते दृष्टीस देसते. मग वसंताचे आगमन झाडांच्या टवटवीनेने कळावे, झाडाच्या मुळाला लागलेले पाणी फांघाच्या पालवीतून दिसावे, जमिनीचा कस कोंभांच्या लवलवीतून प्रकटावा, आचारशीलतेतून कुलीनता कळावी, स्वागताच्या धांदलीतून व्यक्तीचा स्नेह ओसंडावा किंवा दर्शनाने

झालेल्या सुखाने पुण्यपुरुषाची ओळख पटावी तशी हृदयस्थ ज्ञानाची चिह्ने देहांत उमटतात. (१३:१७७-१८३). भगवद्गीतेच्या तेराव्या अध्यायात जी ज्ञानाची व्याख्या (एतज्ज्ञामिति प्रोक्तम्) म्हणून लक्षणे सांगितली आहेत त्यावरील टीकेच्या उपोद्घातांत ज्ञानेश्वरमहाराजांनी ह्या ओव्या ग्रथिल्या आहेत. तेव्हां श्रीदत्तमहाराजांच्या ज्ञानाचा मागोवा घ्यायचा असेल तर गीताप्रतिपादित या लक्षणांचाच आश्रय आपल्याला करावा लागेल.

**अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम्।**
**आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रह:।।७।।**
**इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च।**
**जन्ममृत्युजराव्याधिदु:खदोषानुदर्शनम्।।८।।**
**असक्तिरनभिष्वंग: पुत्रदारगृहादिषु। नित्यं च**
**समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ।।९।।**
**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।**
**एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा।।१०।।**

**अमानित्वाची** व्याख्या करतांना ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की आपल्या ठिकाणी असलेलेच गुण जरी कुणी वाखाणत असेल, आपली योग्यता साकरूं लागली कीं तो पारध्याने वेढलेल्या सावजासारखा तो अस्वस्थ होतो. दत्तमहाराजांना अशा प्रसंगांना नेहमीच सामोरे जावे लागले आहे. पण असे सन्मानाचे प्रसंग ते किती निकराने टाळावयाचे त्याचे उदाहरण पाहू या. १९८९ सालच्या मे महिन्यांत धारवाडच्या संस्कृत पाठशाळेचा शताब्दि महोत्सव साजरा झाला. दोन वर्षे आधीपासून तयारी चालली होती. संयोजकांनी वारवार

भेटून दत्तमहाराजांनी उपस्थित राहावे म्हणून खूप आग्रह केला होता. तरीही, ह्या पाठशाळेविषयी अतीव आदर असूनही दत्तमहाराजांनी त्या उत्सवाला जाण्याचे टाळले. दत्तमहाराजांचे निकटवर्ती गु. भ. रघुनीथराव कुळकर्णी यांनी खोदून विचारले तेव्हां दत्तमहाराज अमानित्वाच्या व्याख्येंतील पुढील ओंव्या म्हणून दाखविल्या.

**'पूज्यता डोळां न देखावी। स्वकीर्ति कानी नायकावी।**
**हा अमुकाऐसी नोहावी। सेचि लोकां।।८८।।**
**तेथ सत्काराची गोठी। के आदरा देईल भेटी।**
**मरणेसी गांठी। नमस्कारिता।।८९।।**

आणि पुढे बोलले, 'तेथे गेल्यावर स्तुती करत बसतील. म्हणून न गेलेलेच बरे. '

**अदंभित्व** म्हणजे स्वत:चे सुकृत प्रकट करणे. 'वेश्येने वय लपवावे, कुळवधूने अंग चोरावे, प्रवासांत द्रव्य झांकावे, किंवा शेतकऱ्याने पेरलेल्या बीजांवर माती पांघरावी तसा तो आपले दानपुण्य गुप्त ठेवतो. '(१०५-६). असेच दत्तमहाराजांचे होते. धारवाडच्या विद्वत्सभेत दत्तमहाराजाची विद्वत्ता सर्वश्रेष्ठ ठरली. अगदी कांचीकामकोटीच्या परमाचार्यांनी त्यांचा सुवर्णकंकण देऊन बहुमान केला. पण त्या विद्वत्सभेहून परतल्यावर प. पू. योगीराज गुळवणीमहाराजांना वृत्तांत सांगतांना ह्यांतले कांहीच दतत्महाराज बोलूंच शकले नाहीत. ही सर्व हकीकत गुरुमहाराजांना पं. भालचंद्रशास्त्री उप्पनबेट्टिगिरी यांच्याकडून कळली. खरोखर दत्तमहाराजांनी संपूर्ण आयुष्यांत आपल्या कुठल्याही सत्कर्माची वाच्यता केलेली कुणी ऐकली नाही.

**अहिंसा.** 'ऐसा मने देहे वाचा। सर्व संन्यासु दंडाचा। जाहला ठायी

जयाचां। देखशील॥३१०॥ 'काया, वाणी आणि मनाने ज्याने हिंसेचा त्याग केला आहे तोच ज्ञानी असे ओळखायला ज्ञानेश्वर माउली सांगतात. दत्तमहाराजांच्या शरीराने काय किंवा बोलण्याने काय कुणी दुखावण्याची शक्यताच नसे.

**'तैसे साच आणि मवाळ। मितले परि सरळ।**

**बोल जैसे कल्लोळ। अमृताचे॥२६९॥**

'अशीच त्यांची वाणी होती. साधे जेवणाचे आमंत्रण देतांना ते विचारीत, 'आपला उद्यां काय कार्यक्रम आहे?' जेवायला यायला कांही अडचण नाही अशी खात्री झाल्यावरच ते सांगत. कुणाचीही चूक स्पष्टपणे दाखविणे त्यांना एकांतांतही जमत नसे. यामुळे जसे गैरसमज होत तसेच कांही लोकांना पडत्या फळाची आज्ञाही मिळे. कुणी कांही चुकत असेल तर ते त्याच्या ध्यानांत आणण्याचा ते त्यांच्या परीने प्रयत्न करीत. पण ते संवेदनाशील श्रोत्यालाच कळू शकत असे. 'आम्हांला स्पष्ट बोलतां येत नाही' असा कबुलीजबाबही ते देत असत. समोरच्याला लागेल असे ते केव्हांही बोलले नाहीत. ज्ञानेश्वरमहाराजांनी अहिंसेची आणखी एक भावात्मक व्याख्या पण केली आहे. 'जगाचिया सुखोद्देशे। कायावाचामानसे। राहाटणे ते अहिंसे। रूप जाण॥१६-११४॥' हिंसेचा त्याग म्हणजे अहिंसा असे न म्हणतां, काया-वाचा-मनांना जगाच्या कल्याणासाठी प्रवृत्त ठेवणे हा अर्थ अधिक मार्मिक वाटतो. अहिंसेच्या आचरणांतील अनेक सकृद्दर्शनी शंकांचे यांत निरसनही होते. शस्त्रक्रियेसारखे कर्म हिंसात्मक भासले तरी परिणामी हितकर असल्याने ह्या भावात्मक व्याख्येने आचरणीय ठरते. तसेच ही व्याख्या अधिक सूक्ष्मही आहे. सर्व जीवांचे

कल्याण हा ज्याच्या मनाचा स्थायीभावच आहे त्याच्याकडून हिंसा घडतच नाही. दत्तमहाराज हे अशाच श्रेष्ठ श्रेणींतील संत आहेत. समोर आलेल्या प्रत्येक जीवाच्या कल्याणाचाच विचार त्यांनी केला. हजारो आर्त, अर्थार्थी आणि जिज्ञासू जीवांना, त्यांच्या त्यांच्या अधिकारानुसार कल्याणभाजन केले. त्याचे सविस्तर वर्णन करणे या लेखाच्या मर्यादेपलीकडे आहे.

**क्षांति** 'जो मानापमानाते साहे। सुखदु:ख जेथ सामाये। निंदास्तुती नोहे। दुखंडु जो।।२४५।।'सन्मान सहन करणेही अवघड असते. दत्तमहाराजांच्या वांट्याला खूप मोठे सन्मान आले. अनेक पीठांचे शंकराचार्य, चार राष्ट-पती, संत-सत्पुरुष, राजे-महाराजे इत्यादींकडून सन्मानित होण्याचे प्रसंग त्यांच्यावर आले. तरीही त्यांची आंतरिक नम्रता अखेरपर्यंत दृढ होती. लग्नाकार्याला त्यांना आमंत्रणे येत. नुसते सांगूनही कुणी गेला तर ते आवर्जून उपस्थित रहात, आहेर करीत. कसलीही आदरसत्काराची अपेक्षा त्यांना नसे. बसायला आसन नसले करी त्याचे त्यांना कांही वाटत नसे. संन्यासी, सत्पुरुष अतिथि इत्यादींसमोर तर बसायलाही संकोचत. याचाच अर्थ त्यांनी ते सर्वमानसन्मान 'सहन'केले होते. त्यांचे अपमानही झाले आहेत. अकारण सकारण त्यांना बोलणारे भेटत. ते फक्त ऐकून घेत. एकदां एक गृहस्थ आम्रापूरच्या दुरवस्थेवरून त्यांना 'गुरुस्थान असून तुम्ही कांही पहात नाही'इत्यादि खूप बोलले. दत्तमहाराजांनी एक अक्षरही न बोलतां सगळे ऐकून घेतले. पुढे ते गृहस्थ जेव्हां रागाच्या भरांत प. पू. योगीराजांच्याविषयी असेच कांही बोलायला लागले तेव्हां मात्र दत्तमहाराज त्यांना म्हणाले, 'साधुसंतांविषयी असे बोलू नये.'

अगदी शरीराच्या दु:खानेसुद्धां दत्तमहाराजांची क्षांति ढळत नसे. याचे एक उदाहरण वे. शा. सं. पित्र, प्रयाग यांनी ग्रथित केले आहे. प्रयाग येथे श्राद्धाचा संकल्प करून उठतांना, समोरच्या कपाटाचे अनवधानाने उघडे राहिलेले दार थाडदिशी दत्तमहाराजांच्या क्षौर केलेल्या डोक्यावर आपटले. पाहणारेसुद्धां चक्रावून गेले. पण दत्तमहाराजांनी ना कांही आवाज केला ना डोक्याला हातही लावला. शांतपणे खाली बसून स्तंभित झालेल्या ब्रह्मवृंदाला म्हणाले, 'पुढं चालूं द्या' एवढे बोलून ते परत उठतात तोंच तेच दार पुन्हां तसेच थाडदिशी त्याच ठिकाणी आपटले. दत्तमहाराजाही तेवढ्याच शांतपणे, डोक्याकडे हातही न नेतां हंसतमुखाने म्हणाले 'मंत्र चालूं द्या.' दत्तमहाराज पायांत सहसा कांही घालत नसत. कडक उन्हांत, तापलेल्या मातीवरून किंवा दगडावरून उघड्या पायांनी शांतपणे चालतांना त्यांना अनेकांनी पाहिले आहे. कधीकधी त्यांच्यासाठी त्या मार्गावर कुणी कांही अंथरत. दत्तमहाराज मात्र त्यावरून जात नसत. 'हे अनाक्रोश क्षमा। जयापाशी प्रियतमा। जाण तेणे महिमा। ज्ञानासि गा।।३५२।।'

**आर्जव** तैसे जयाचे मन। माणुसाप्रति आन आन। नव्हे आणि वर्तन। ऐसे पैं ते ।।३५६।। जे जगचि सनोळख। जगेसी जुनाट सोयरीक। आपपर हे भाख। जाणणे नाही।।३५७।।'

आपला आणि परका असा भेद दत्तमहाराजांच्या चित्तांतच नव्हता. मग तो वागण्यात कुठून येणार? लहानथोर सर्वांशी ते सारख्याच आदराने वागत. बहुमानार्थी 'आपण' शब्दाचाच उपयोग करीत. त्यांच्याकड घरी अध्ययन केलेल्या एका शास्त्रीबुवांनी स्वत: पाहिलेली गोष्ट. अगदी स्वत:च्या रांगत्या मुलालासुद्धां दत्तमहाराज 'आपण आतां

बाहेर खेळा' असे म्हणत. किंवा पत्नीला 'अहो यांना जरा घेऊन जा' असे सांगत. त्यांचे बोलणे सरळ, दृष्टी स्थिर आणि अंत:करण प्रांजल होते. त्यामुळे त्यांचा आपल्यावरच लोभ आहे असे किंवा आपल्याविषयी त्यांच्या मनांत आदर आहे, असे बऱ्याच लोकांना वाटे. तसे ते खरेही होते. पण दत्तमहाराज सगळ्यांविषयींच सहज आणि निष्कपट सद्भाव असायचा हे न कळल्याने गैरसमज होत. कधी कधी महाराजांचे हे वागणे धूर्तपणाचे वाटे. कुणाचीही कांहीही भावना झाली तरी महाराजांना मात्र त्यांच्याविषयी आत्मीयताच वाटे. ते कधीहि कुणासमोर एक व पाठीमागे एक असे बोलले-वागले नाहीत. ते तसे करूंच शकत नव्हते. त्यांच्याविषयी आपल्या चित्तांत येणारे विकल्प हे आपल्याच संस्कारांतून उद्भवले आहेत असे जाणणारे भाग्यवान!

**आचार्योपासन** 'तैसे सबाह्य आपुले। जेणे गुरुकुळी वोपिले। आपणपे केले। भक्तीचे घर।।१३-३७०।।' आपले अंतर्बाह्य तनमनधन गुरुकुळाला समर्पण करून दत्तमहाराज स्वत: भक्तीचे माहेरच होऊन गेले होते. अंतरंगांत जीवदशेचा धूप जाळीत, ज्ञानदीपाचा प्रज्वलित दीपाने त्यांनी जे सद्गुरूंचे आराधन केले असेल ते जरी आपल्या कळणे अशक्य असले तरी त्यांनी रचलेली बाह्य गुरुसेवा प्रत्यक्ष आहे प. पू. योगीराज गुळवणीमहाराज असतांना, दत्तमहाराज त्यांचे केवळ आज्ञाधारकच होते. श्रीगुरुकार्यासाठी आपला प्रपंच, शरीरस्वास्थ्य वा पैसा ह्यांचा विचार त्यांना दुरूनही शिवला नाही. हे माहीत असल्यानेच योगीराज स्वत: दत्तमहाराजांच्या प्रपंचाकडे जातीने लक्ष देत. दत्तमहाराजांची अनुष्ठाने, त्यांचे भागवतसप्ताह, त्यांची

प्रवचने, निरूपणे, लेखन, संपादन इत्यादि सर्व क्रियांमागे गुर्वाज्ञेचीच प्रेरणा होती. त्यांच्या मनांतील संकल्पाची जागाच जणू सद्गुरूंच्या आज्ञेने घेतली होती. गुरुमहाराजांच्याशी त्यांचे मर्यादशील, विनम्र, आज्ञाधारक वर्तन पाहून प. पू. श्रीरंगअवधूतस्वामींनी असे उद्गार काढले की 'शिष्य असावा तर कवीश्वरशास्त्रीसारखा!'

योगीराजांच्या पश्चात्‌ही त्यांनी स्थापिलेल्या आश्रमाची आणि संप्रदायाची धुरा वाहण्यांत, तसेच गुरुमहाराजांचे स्मारक वामननिवास उभारण्यांत दत्तमहाराजा तसेच अथक प्रयत्नशील होते. मोक्षगुरु प. प. श्री नृसिंहसरस्वती दीक्षितस्वामी महाराजांच्या आज्ञेने त्यांनी आयुष्यभर प्रौषठपदी भागवत सप्ताहाचे अनुष्ठान केले, वेदांताचे (प्रस्थानत्रयीचे) अध्ययन-अध्यापन-मनन-निरूपण केले. तसेच स्वामींनी स्थापन केलेल्या वासुदेवानंदसरस्वतीपीठाची नवी वास्तु व कृष्णेकांठी घाट केला.

**शौच** 'यालागी बाह्य विभागु। कर्मे धुतिला चांगु। आणि ज्ञाने फेडिला पांगु। अंतरीचा॥४७३॥' अशीच अवस्था दत्तमहाराजांची होती. नित्य आण नैमित्तिक कर्मांच्या अविरत आचरणाने स्थूल-सूक्ष्म देहांची शुद्धि झालेली आणि अंतरांतला ज्ञानदिवा उजळल्याने अंतरबाह्य शुचित्वाची प्रचीती त्यांच्या ठिकाणी सहजच येत असे.

**स्थैर्य** 'दैन्यदु:खी न तपे। भयशोकी न कंपे। देहमृत्यु न वासिपे। पातिलेनि॥४९२॥' हे क्षांतीचेच परिणत रूप आहे. दत्तमहाराजांच्या दृष्टीत, बसण्यांत, बोलण्यात आणि चालण्यातसुद्धां एक प्रकारच्या स्थैर्याची जाणीव होत असे. त्यांच्या मनाच्या स्थैर्याचे ते प्रतिबिंब होते. एकदां त्यांच्या पाद्यपूजेच्या वेळीं त्यांना लावण्यासाठी काढलेल्या

कुपीतले अत्तर त्यांच्या वस्त्रांवर उपडी झाली. अर्चकाची धांदल उडाली. पण दत्तमहाराजांच्या डोळ्याची पापणीही लवली नाही. डोक्यावर कपाटाचे दार आदळल्याचा प्रसंग वर सांगितला आहेच. त्यांच्यावर एकदां फौजदारी झाली होती. सगळ्या भक्तमंडळींत खळबळ माजली. दत्तमहाराज मात्र त्या सर्व प्रसंगांत शांत होते. असे अनेक प्रसंग सांगतां येतील. 'तैशा आल्यागेल्या ऊर्मी। नव्हे गजबज मनोधर्मी। 'हे माउलींनी सांगितलेले स्थैर्याचे लक्षण त्यांच्या ठिकाणी स्पष्ट दिसे.

**आत्मविनिग्रह** ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात जो मनाच्या महाद्वारांत प्रत्याहाराच्या चोकीवर यम आणि दम हे पहारेकरी सतत जागे ठेवतो **इंद्रियार्थेषु वैराग्यम्** '**अर्जुना** तेणे पाडे। जयासी विषयवार्ता नावडे। नेदी इंद्रियाचेनि तोंडे। कांहींच जावो।।५१६।। 'ह्यापुढील ज्ञानाची लक्षणे ही आंतरिक असल्याने, ती प्रसंगानेच प्रकट होणारी आहेत. अखंड अनुसंधानांत मग्न असलेल्या दत्तमहाराजांसारख्या माहात्म्यांचे ऐंद्रिय विषयांकडे चित्त कुठून असणार? कॉफी पितांना साखर नसली तरी त्यांच्या ती त्यांच्या लक्षांत येत नसे. कॉफी करणाऱ्याला आपली चूक समजल्यावर त्यांनी चौकशी केली तर दत्तमहाराजांच्या ते गांवीही नसायचे. 'तोही नेत्री पाहत आहे। श्रवणी कीर ऐकत आहे। परी तेथिंचा नोहे। नवल देखा।।५-४१।। 'ह्या ज्ञानदेवांच्या उक्तीचे प्रत्यंतर त्यांच्या ठिकाणी येत असे.

**अनहंकार** 'वर्णाश्रमपोषकें। कर्मे नित्यनैमित्तिके। तयांमाजी कांही न ठके। आचरतां।। परि मियां हें केलें। कीं माझेनि हें झालें। ऐसें नाहीं ठेविलें। वासनेमाजीं।।१३-५२५व२६।।'

**जन्ममृत्युजराव्याधिदु:खदोषानुदर्शनम्** ज्ञानी पुरुष जन्म, मरण, जरा व्याधि, आपले दोष आणि दु:ख यांचे सतत स्मरण ठेवतो. सर्वसाधारणत: जन्म आपला होऊन गेलेला असतो. त्याचे कांही स्मरण होण्याचा प्रश्नच नाही; तसेच दोष आपल्याला दुसऱ्याचे दिसतात. मृत्यु, जरा, व्याधि आणि दु:ख जोंवर समोर येऊन ठेपत नाही तोंवर आपल्याला त्यांची आठवण तर येतच नाही, पण कुणी करूनदिली तर त्याला आपण वेडचांत काढतो. प. पू. दत्तमहाराजांसारख्या ज्ञानी पुरुषांना मात्र हे सर्व सतत डोळ्यांसमोर दिसत असतात असे भगवंत सांगत आहेत. प. पू. दत्तमहाराजांना इतरांचे दोष कधी दिसलेच नाहीत. इतरांचे दोषसुद्धां ते गुणरूपानेच पहात असत असे त्यांचे निकटवर्ती गुरुबंधु पू. भालचंद्रशास्त्री उप्पनबेट्टिगिरी म्हणतात. मात्र स्वत:च्या असलेल्या नसलेल्या दोषांचीहि त्यांना तीव्र जाणीव असायची. आपल्या कुटुंबियांचे तसेच सहकारी विश्वस्तांचे दोषही तेच स्वीकारीत असत आणि त्यासाठी लोकापवाद बिनतक्रार पतकरीत.

त्यांच्या जीवनांत त्यांना सलणारा एक मोठा दोष, अपराध म्हणा हवे तर, नरसोबाची वाडी सोडून पुण्याला सर्व जीवन व्यतीत करणे हा होता. प. प. श्री थोरल्या महाराजांनी नरसोबावाडींत राहणे हा एक स्वतंत्र नृसिंहवाटिकायोग मानला आहे. गिरनारसारख्या आपल्या दुर्गम स्थानी राहणारा परमात्मा दत्त, आपल्या भक्तांना सुलभ होण्यासाठीच केवळ वाडींत येऊन राहिला आहे अशी श्रीस्वामीमहाराजांची श्रद्धा होती. अशा देवदुर्लभ वाडींत जन्माल येऊनसुद्धां आपण आपले आयुष्य तिथे परमेश्वरसेवेत व्यतीत न करतां

पुण्यांत घालविले ह्याचे त्यांना किती शल्य होते हे त्यांच्या एका वाडीच्या भेटींत सर्वांसमोर प्रकट झाले. वाडीत त्यांचे एक बालमित्र पुजारी त्यांना भेटले. उभयतांची प्रेमाची भेट झाली. कांही विचारपूस झाली. आणि एकदम दत्तमहाराज म्हणाले, 'आपण देवाची सेवा करीत आयुष्य घालविले; आम्ही मात्र प्रपंचाच्या मागेच फिरत राहिलो. 'बोलतां बोलतां महाराजांचा गळा भरून आला. त्यांचा खेद इतका हार्दिक आणि तीव्र होता कीं त्यांच्या मित्रालाही अश्रू आवरेनात; तोही हुंदके देऊं लागला.

**असक्तिरनभिष्वंग: पुत्रदारगृहादिषु** वाटेवरच्या थांब्याविषयी किंवा सांवलीसाठी आश्रय घेतलेल्या वृक्षाविषयी वाटसरूला जेवढी आस्था असते तेवढीही ज्ञानी पुरुषाला आपल्या शरीराविषयी वाटत नाही असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. मग घराविषयी अथवा कुटुंबियांविषयी नसते हे वेगळे काय सांगावे? एकदां एकाने त्यांच्या डोळ्याचे ऑपरेशन त्यांना घेऊन जाऊन, त्यांच्या घरच्यासुद्धां कुणाला न कळवितां परस्पर केले. त्यांत कांही दोष होऊन दत्तमहाराजांचा तो डोळा गेला. पण आपल्याला त्या डोळ्याने दिसत नाही हे ते कुणालाही स्वत:हून बोलले नाहीत. कांही दिवसांनी घरच्या मेडळींच्या लक्षांत आल्यावर चौकशी झाली व सर्वांना कळले. स्वत:च्या देहाविषयीही एवढी उदासीनता थक्क करणारी आहे.

**नित्यं च समचित्तत्वं इष्टानिष्टोपपत्तिषु** दत्तमहाराजांना कांची पीठाकडून सुवर्णकंकण मिळाले त्याच वेळी त्यांची कन्या शोभा फ्ल्यूच्या सांथींत निवर्तली. भेटायला येणाऱ्या मंडळींना शांतपणे दत्तमहाराज सांगत, 'ज्याच्या कृपेने सुवर्णकंकण मिळाले, त्याच्याच

इच्छेने मुलगीहि देवाघरी गेली. ''सुखदु:ख जेथ सामाये'चे यापेक्षां समर्पक उदाहरण क्वचित्‌च पहायला मिळेल.

**मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी** श्रीदत्तचरणांची भक्ति हा श्रीदत्तमहाराजांच्या चित्ताचा स्थायीभाव होता. आपण भक्तियोगाचा विचार करतांना ते सविस्तर पाहिले आहेच. वाडीला जायला परवानगी मिळावी म्हणू आपले दुखणे ते डॉक्टरांपासून लपवून ठेवत. संपूर्ण आयुष्य पुराणसेवा करूनही शेंवटी जेव्हां नारायणस्वामींच्या उत्सवांतून प्राकृतिक अस्वस्थतेने मध्येच परतावे लागले तेव्हां ते फारच व्यथित झाले. 'देवांनी सेवा घेतली नाही' असे म्हणतांना त्यांचा कंठ दाटून आला, डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. वाडीला जातांना ऑक्सिजनची बरणी घेतली तर ते अस्वस्थ झाले. 'आम्हांला त्याच्या आधारावर जायचे नाही' असे म्हणाले. देवाच्या सेवेला जातांना डॉक्टर, औषध यांचा आधार त्यांच्या दृष्टीने व्यभिचार होता.

**विविक्तदेशसेवित्वं** दत्तमहाराज जात्याच एकांतप्रिय होते. प. पू. योगीराजांच्या देहत्यागाचे वृत्त समजल्यावर ते पवनीला जाऊन उर्वरित जीवन तिथेच देवसेवेत घालवण्याच विचार होता. पण श्रीगुरुमहाराजांनी मृत्युपत्रांतून दिलेल्या आदेशाच्या पालनासाठी त्यांना पुण्याला येऊन श्रीवासुदेवनिवास आश्रमाची धुरा सांभाळावी लागली. नंतरही ते एकदां खर्ड्याजवळ बराच काळ अज्ञातवासांत राहिले होते.

**अरतिर्जनसंसदि** श्रीदत्तमहाराजांना जितक्या समारंभांत भाग घ्यावा लागला तितका फार क्वचित् कुणाला घ्यावा लागला असेल. पण या सर्व प्रसंगांत गुरूंची आज्ञा आणि कर्तव्यपालन या अपरिहार्य कारणांमुळेच ते जात असत. स्वत:च्या मानसन्मानापासून ते किती

दूर राहायचे त्याचा विचार आपण अमानित्वाच्या विवेचनांत केला आहेच.

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम्** ही सर्व संतसत्पुरुषांची आंतरिक स्थिति बाहेरून पाहणाराला कळणे अशक्य आहे. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हे अध्यात्मज्ञान इतके दृढ झालेले असते की त्यांना देहभावावर येणे हे सामान्यांना ब्रह्मभावांत प्रवेशण्यापेक्षां कठिण असते. खरे तर वर विचार केलेल्या सर्व लक्षणांच्या मुळाशी दत्तमहाराजांचा सदैव जाग्रत असलेला नित्यानित्यवस्तुविवेकच आहे. आपल्या सच्चिदानंद आत्मस्वरूपांत ते सतत मग्न असल्यानेच अमानित्वादि लक्षणे स्वाभाविकच त्यांच्या ठायीं विलसत होती.

**इमां मुक्तावस्थां परमशिवसंस्थां गुरुकृपाम् ।**
**सुधापांगावाप्यां सहजसुखवाप्यामनुदिनम् ।**
**मुहुर्मज्जन्मज्जन् भजतु सुकृतैश्चेन्नरवर- ।**
**स्तदा योगी त्यागी कविरिति वदन्तीह कवयः ।।**

या भगवत्पूज्यपादाचार्यांच्या शब्दांतच श्रीदत्तमहाराजांना श्रद्धांजली वाहून या लेखाचा समारोप करून ही लेखनसेवा श्रीदत्तचरणी समर्पित करूं या.

***

## भागवतोत्तम दत्तमहाराज कवीश्वर

# शक्तिपातयोग

**डॉ. वासुदेव व्यं. देशमुख**

आपण प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांच्या ठायी प्रकट झालेल्या ज्ञानचिन्हांचा विचार केला. त्यांत त्यांच्या अमानित्वाचा उल्लेख आहेच. स्वत:च्या ठिकाणी काही श्रेष्ठत्व आहे ही भावनाच त्यांच्या मनात उद्भवत नसे. अनेकानेक राजसन्मान. आचार्यसन्मान, लोकसन्मान यांना सामोरे जाऊनही त्यांच्या चित्तात आपण कोणी विद्वान् आहोत. ज्ञानी आहोत, संत आहोत अशी जाणीवच ठरत नसे. ज्ञानाचे हे एक श्रेष्ठ लक्षण आहे. क्वचित् तसा भाव त्यांच्या मनांत उगवला तरी तो कुणाला बोलून दाखविणे तर त्यांना जणू अशक्य होते. आपल्या आवडी-निवडी, मानापमान, स्तुति-निंदा इत्यादींविषयी ते कुणाला बोलल्याचे उदाहरण सापडणे कठीण आहे. असा त्यांचा संतसुलभ स्वभाव असल्याने प. पू. योगीराज गुळवणीमहाराज यांच्याकडून मिळालेली शक्तिपातदीक्षा व दीक्षाधिकार यांचा उल्लेख त्यांनी प. पू. योगीराजांचा देह असताना तरी कधी केला नाहीच पण त्यांच्यामागेही त्यांच्या प्रथम स्मृतिदिनापर्यंत त्यांनी या विषयावर मौनच धारण केले होते. तसेच श्रीगुरुमहाराजांचा अस्थिकलश आश्रमांत असेपर्यंत त्यांनी दीक्षाकार्यही सुरु केले नाही. क्वचित् कुणी विचारणा केली तर आपण दीक्षा देत नाही असे स्पष्टपणे सांगत. एखाद्या वेळी दीक्षेचा अधिकार

असणाऱ्या इतर कुणाकडेही त्यांनी अंगुलीनिर्देश केला आहे. खरे तर प. पू. श्री. योगीराजांनी मृत्युपत्राच्या निमित्ताने श्रीदत्तमहाराज "मोक्षमार्गाचे मार्गदर्शन करतील" या शब्दात त्यांचे गुरुत्व प्रकट केले होतेच. परंतु देवतासुलभ परोक्षप्रियतेने शक्तिपातयोगाचे ते अधिकारी आहेत असे स्पष्टपणे म्हणले नव्हते. अर्थातच बऱ्याच लोकांना श्रीदत्तमहाराजांना शक्तिपातदीक्षेचा अधिकार आहे की नाही असा संभ्रम वाटला असल्यास त्यांत आश्चर्य नव्हते.

**होने पाने की बात** :- खरे तर शक्तिपातदीक्षेचा अधिकार ही लेने-देने की बात नसून होने पाने की बात आहे हे प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामिमहाराजांनी स्पष्ट केलेले असूनही लोक ज्येष्ठांच्या अधिकाराची चौकशी का करतात ते कळत नाही. दीक्षेचा अधिकार परिपक्व साधकाच्या ठिकाणी सहज प्रकट होतो. पण त्या अधिकाराचा उपयोग मात्र सद्गुरुंच्या आज्ञेनेच करायचा असतो. हा साक्षी-पुराव्यांचा विषय होऊ शकतच नाही. शक्तिपातदीक्षा ही स्वयंप्रमाण आहे. केवळ सद्गुरूंच्या संकल्पाने शिष्याच्या ठिकाणी होणाऱ्या शक्तिसंक्रमणाला इतर कशाचाही पुरावा मागणे हास्यास्पद आणि असंबद्ध आहे.

श्रीगुरुमहाराजांच्या निर्याणानंतर सहा महिन्याहून अधिक काळाने प्रयाग क्षेत्री श्रीगुरुमहाराजांच्या अस्थींचे विसर्जन २९ जून, १९७४ रोजी झाल्यावर त्याच दिवशी प. पू. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराजांनी पहिली शक्तिपात दीक्षा खांडेकर पतिपत्नींना दिल्यावर त्यांचा अधिकार प्रकट झाला. **त्या दिवसापासून त्यांनी आरंभिलेले शक्तिपातकार्य त्यांनी आपला देह विसर्जित करेपर्यंत कोणताही गाजावाजा न**

**करता, अव्याहतपणे चालूच ठेवले होते.** त्यांच्याकडून अनुग्रह घेतलेले हजारो साधक आजही कुंडलीनी योगाच्या अनुभूति घेत आहेत यापेक्षा वेगळे प्रमाण कोणते आणि असे प्रमाण मागण्याचा अधिकारही कुणाला आहे?

ह्या प्रथम दीक्षेपावेताच्या काळात संप्रदायांतील बऱ्याच लोकांनी श्रीदत्तमहाराजांना शक्तिपातदीक्षा केव्हा झाली, त्यांचे सद्गुरु प. पू. श्रीदीक्षितस्वामीमहाराज आहेत. त्यांचा तर ज्ञानमार्ग आहे, योगमार्गाचा त्यांचा काही अभ्यास नाही इत्यादि अनेक शंका व्यक्त केल्या. स्वत: श्रीदत्तमहाराजांनी त्यांची यत्किंचितहि दखल घेतली नाही. ही गोष्ट त्यांच्या श्रेष्ठ अध्यात्मिक स्थितीला साजेशीच आहे. श्रीगुरुमहाराजांचे चरित्रकार पू. अ. सि. पोटभरे यांच्या शब्दांत "श्रीदत्तमहाराजांना सर्वार्थीने श्रीगुळवणीमहाराजांनी ओळखले होते म्हणून त्यांना वगळून श्रीगुरुमहाराजांनी काहीही केले नाही" उलट त्यांना आयुष्यभर सन्मानाने, आदराने आणि आत्मियतेने वागविले. श्रीदत्तमहाराजांच्या विरुद्ध कोणी बोललेले त्यांना खपत नसे. त्यांनी अशापैकी काहींना श्रीदत्तमहाराजांची क्षमा मागायला लावलेली आहे. श्रीगुरुमहाराजांना गुणाचे मोल होते म्हणून त्यांनी श्रीदत्तमहाराजांना आपले सर्वस्व दिले होते. अशा श्रीगुरुमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना दीक्षा न देता आपले उत्तराधिकारी असल्याचे लिहून ठेवले. ही अक्षम्य विसंगति श्रीमहाराजांच्या पदरी त्यांच्या शिष्यांनीच बांधावी हा दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे.

पोटभरे यांनी खुद्द श्रीदत्तमहाराज हयांच्याशी बोलून आणि श्रीगुरुमहाराजांच्या पत्रांतून श्रीदत्तमहाराजांच्या दीक्षेविषयी माहिती

संकलित करून ती 'दत्तवाक्सुधा' या ग्रंथात दिली आहे.

प. पू. श्रीगुरुमहाराजांचे आणि दत्तमहाराजांचे संबंध इतके घनिष्ठ तसेच गहन होते की इतरांना त्यांची कल्पना येणे दुरापास्त होते. त्यांत श्रीदत्तमहाराजांची अबोल आणि संकोची वृत्ती! श्रीगुरुमहाराजांनी मात्र वेळोवळी श्रीदत्तमहाराजांची योग्यता आवर्जून एकांतात आणि लोकांतात स्पष्टपणे दर्शविली आहे. श्रीदत्तमहाराज श्रीगुरुमहाराजांसमोर इतके विनम्र असत की फारसे बोलतही नसत. श्रीगुरुमहाराजच त्यांची इच्छा ओळखून पूर्ण करीत. हीच गोष्ट शक्तिपातदीक्षेसंबंधी झाली. श्रीदत्तमहाराजांना दीक्षा हवी होती हे त्यांचे मनोगत जाणून त्याची पूर्ति श्रीगुरुमहाराजांनी केली असे दिसते. श्रीदत्तमहाराजांना दीक्षाधिकार देण्याचा त्यांचा विचार बराच काळ चालू असला पाहिजे. त्याला विशेष चालना मिळाली ती त्यांचे निकटवर्ती सोलापूरचे श्री. वैद्य मास्तर यांच्या कळकळीच्या निवेदनाने. १९५७ साली श्रीगुरुमहाराज दरवर्षाप्रमाणे सोलापूरला गेले असता वैद्य मास्तर त्यांना म्हणाले, 'वामनराव! आपल्या ह्या शक्तिपातविद्येला आपल्यानंतर श्रीदत्तमहाराज कवीश्वरशास्त्रीच योग्य अधिकारी दिसतात. मुळापासूनच त्यांची वृत्ती तयार आहे. त्यांना तयार करण्याचा प्रश्नच येत नाही.... आपण त्यांना गेली २५-३० वर्ष पहात आलो आहोत. साधनचतुष्टय संपन्न, विवेक-वैराग्ययुक्त, ज्ञानी पंडितही आहेत. त्यांच्या विनयशील स्वभावाला तोड नाही. श्रीस्वामीमहाराजांच्या ग्रंथप्रकाशनाचे कार्य त्यांच्यामुळे तडीस गेले. त्यावेळेपासून हा विचार माझ्या मनांत होता. माझी इच्छा आपणांस सांगीतली. जशी आपली योजना असेल तसे होईल.' ही आर्जवी विनंति केल्यानंतर कांही

दिवसांतच त्या पुण्यशील वैद्यमास्तरांनी, त्यांनी स्वत: व्यक्त केलेल्या इच्छेनुसार, श्रीगुरुमहाराजांसमोर त्यांच्याकडे पहात देह सोडला. आपल्या जिवलग, ज्येष्ठ मित्र-भक्ताची अंतिम इच्छा जाणल्यावर श्रीगुरुमहाराजांचा विचार पक्का झाला असावा. ते योग्य समयाची प्रतीक्षा करु लागले. हा समय दोन महिन्यांतच आला. सज्जनगडावर दासनवमीच्या उत्सवाला प. प. श्री. श्रीधरस्वामींचे आगमन झाले. श्रीदत्तमहाराजांच्या दीक्षेसाठी श्रीगुरुमहाराजांनी त्यांचे सहकार्य घेतलेले दिसते.

इथे श्रीसमर्थसंप्रदाय आणि श्रीदत्तसंप्रदाय यांच्या प्राचीन आणि प्रगाढ संबंधांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. ह्या विषयावर एक स्वतंत्र लेख प्रकाशित झाला आहे. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांचे गुरुस्वामी प. प. श्रीनारायणानंद सरस्वती हे समर्थ संप्रदायाचे होते व हा संप्रदाय ध्यानांत घेऊन थोरले महाराज दासनवमीचा उत्सव दरवर्षी करत. तसेच त्यांना दासबोधाचा अभिमान होता हे सर्वविश्रुत आहे. विशेष म्हणजे श्रीगुरुमहाराजांचे दीक्षागुरु प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज यांचाही दासबोधाचा गाढा अभ्यास होता आणि दासबोधाचा ते हिरीरीने पुरस्कारही करत. प. प. श्रीधरस्वामी ''आम्ही गाणगापूरचे - समर्थांनी आम्हाला इकडे ओढले..'' असे म्हणत प. प. श्रीगुरुमहाराज आणि प. प. श्रीधरस्वामी यांचा अन्योन्य स्नेह आणि आदर सुप्रसिद्ध आहे. जणू एकाच आत्म्याची दोन शरीरे होती. श्रीदत्तमहाराजांची दीक्षा सज्जनगडावर श्रीसमर्थांच्या समाधीसमोर झाली यामागची ही पार्श्वभूमि ध्यानांत घ्यायला पाहिजे.

**संतांचे बोलावणे :-** श्री. श्रीधरस्वामींनी एका शिष्याला पाठवून श्रीदत्तमहाराजांना दासनवमीच्या उत्सवासाठी गडावर बोलावले. परंतु या वेळी श्रीदत्तमहाराजांची प्रकृति चांगली नव्हती. स्वामींचीच आज्ञा असल्याने थोड्या संभ्रमांत पडून श्रीदत्तमहाराजांनी श्रीगुरुमहाराजांना विचारले. तर त्यांनीही स्वामींच्या आज्ञेला दुजोरा दिला. म्हणाले, ''समर्थांच्या समाधीजवळ पहाटे बसलांत की बरे वाटेल.'' श्रीदत्तमहाराजांनी घरी आपल्या पिताश्रींना विचारले. तेही म्हणाले, ''संतांचे बोलावणे आहे तर जरुर जा.'' तेव्हा प्रकृतीकडे दुर्लक्ष करून दत्तमहाराज गडाच्या पायथ्याशी आले. पण गड चढणे अगदी अशक्य वाटल्याने तिथूनच स्वामींना निरोप केला. स्वामींचा पुन्हां सांगावा आला, ''प्रकृति बरी नसेल तर डोली करून यावे.'' मात्र सज्जनगडाला श्रीसमर्थांचे स्वरुपच मानणाऱ्या श्रीदत्तमहाराजंना डोलींत बसून सज्जनगडावर जाणे रुचले नाही. तशाही स्थितींत ते हळूहळू गड चढून गेले.

**स्वप्नदीक्षा :-** रात्री झोप झाली. पहाटेच्या वेळी दत्तमहाराजांच्या स्वप्नात श्रीगुरुमहाराज आले व त्यांनी बसायला सांगीतले. महाराजांना नमस्कार करून दत्तमहाराज बसतांच श्रीगुरुमहाराजांनी त्यांच्या भूमध्याच्या ठिकाणी स्पर्श केला आणि स्वप्नांतच क्रिया सुरु झाल्या. जाग येतांच श्रीगुरुमहाराजांच्या आज्ञेचे स्मरण होऊन प्रकृती बरी नसतांही दत्तमहाराजांनी स्नान केले आणि समर्थांच्या समाधीजवळ बसले. पू. पोटभरे यांना या वेळचे अनुभव दत्तमहाराजांनी सांगीतले ते या शब्दांत.

''मांडी आवळली जाऊन रुंद झाली. पाठीचा कणा ताठ

झाला. शरीरांत कंप निर्माण होऊन पूरक व रेचक श्वासोच्छ्वास जोरांत होऊ लागले. नंतर कुंभकही होऊ लागले. कुंभक होतांना व त्या स्थितीत राहिल्यावर अत्यंत सुखद स्थिती आली. प्राणायामाच्या आठ प्रकारांपैकी उज्जायी कुंभकाचा विशेष अनुभव आला. पूरक-कुंभक-रेचक अत्यंत शांतपणे होऊ लागले. तसतशी प्रकृति चैतन्यमय झाली. अशक्तपणा नाहीसा झाला. ताप पुन्हा आलाच नाही. गडावरील उत्सवाच्या कार्यक्रमांत उत्साहाने भाग घेता आला. **या साधनाने मनाला शांतता व स्थिरता येते तसे शरीरांतील दोष नाहिसे होऊल शरीर हलके व उत्साही बनते**. या अनुभवाचे गडावरुन पुण्याला श्रीगुरुमहाराजांना पत्र पाठविले होते. त्यांचेही ताबडतोब उत्तर आले की श्री स्वामीमहाराजांची आपणांवर कृपा झाली आहे.''

शांभवी दीक्षा :- या साधनाविषयी बोलतांना पुढे श्रीदत्तमहाराजांनी एक सहज टाकलेले वाक्य फार सूचक आहे. ते म्हणतात ''होते घडते ते ईश्वरेच्छेने असे पूर्वी वाटत होतेच पण हल्ली प्रत्येक क्षणी हाच अनुभव येतो.'' शक्तिपात दीक्षेच्या अनुभवात शरीर, प्राण, मन यांच्या क्रियांचे श्रीदत्तमहाराजांना आलेले अनुभव बहुतेक साधकांना येणाऱ्या अनुभवांपेक्षा फारसे वेगळे नाहीत. पण हा अनुभव विशेष आहे. जीवनातील यच्चयावत् घटना ईश्वराच्या संकल्पाने घडतात ही श्रद्धा असणे आणि त्याचा क्षणोक्षणी अनुभव येणे यांत महदंतर आहे. पदोपदी घडणाऱ्या लहानमोठ्या घटनेत ईश्वरी शक्तीचा अनुभव त्यालाच येऊ शकतो ज्याला ती आपलीच शक्ति आहे असा साक्षात्कार झालेला आहे. यालाच तंत्रग्रंथात शांभवोपाय असे म्हटले आहे. ''देशिकानुग्रहेणैव शिवता व्यक्तकारिणी। सेयन्तु शांभवी दीक्षा

शिवादेशस्य कारिणी ॥ वायवीय संहिता २५. ८॥'' सद्गुरूंच्या संकल्पमात्राने शिष्यांतील शिवत्वाची अभिव्यक्ति करविणारी शांभवी दीक्षा शिष्याच्या ठायी शिवाचा आदेश (दीक्षाधिकारित्व) प्रकटविते, असा या श्लोकाचा भावार्थ आहे. ही वेदान्त मार्गातील साधकांसाठी आहे असेही महायोगविज्ञानांत म्हटले आहे. (अष्टम प्रकाश)

यावरुन हे स्पष्ट आहे की श्रीदत्तमहाराजांना शांभवी दीक्षा झालेली होती आणि दीक्षेनंतर तत्काल आपल्या शिवत्वाचा त्यांना साक्षात्कार होऊन ''ही आपलीच शक्ति सृष्टीच्या उत्पत्ति-स्थिति-लयाची कारक आहे.'' अशी स्पष्ट जाणीव निर्माण झाली होती. तुकाराममहाराजांच्या ''आपणांसारिखे करिती तात्काळ'' या वचनाचा प्रत्यय आणून देणारी ही दीक्षा आहे. ही दीक्षा सर्वश्रेष्ट अशा साधकालाच होते असे तंत्रशास्त्रांचे सांगणे आहे.

अशा रीतीने श्रीदासनवमीच्या शुभदिनी श्रीसमर्थांच्या समाधीसमोरच दीक्षा आणि दीक्षाधिकार यांची प्राप्ति झाली तरीही २९ जून १९७४ पावेतो या कशाचीच वाच्यता त्यांनी केली नाही की आपला दीक्षाधिकारही प्रकट केला नाही. त्या दिवसापासून मात्र त्यांनी आरंभिलेले दीक्षाकार्य आपल्या शेवटच्या आजारापर्यंत त्यांनी अविरत आणि मुक्तपणे चालू ठेवले. ह्या २५ वर्षाच्या काळात त्यांनी हजारो दीक्षा दिल्याच पण स्वत:कडे चुकूनही त्याचे कर्तृत्व घेतले नाही की दीक्षांची गणतीहि ठेवली नाही. कसलाही गाजावाजा न करता हे कार्य शांतपणे चालू ठेवले.

''ठरलेल्या वेळी शुचिर्भूत होऊन बसा म्हणजे गुरुमहाराज कृपा करतील.'' असेच ते सर्वांना सांगत. बहुतेक सर्व दीक्षेच्छूंना

त्यांनी दीक्षा दिली. क्वचित् कधी पुढे पाहू असे म्हटले तर काहींना दीक्षेच्या पूर्वतयारीसाठी काही जपादि सांगितले. त्यांचे दीक्षाकार्य कसे चालत होते त्याचे लेखकाने पाहिलेले एक उदाहरण प्रातिनिधिक आहे. एकदा एक दक्षिण युरोपीय साधक आश्रमांत आला व श्रीदत्तमहाराजांची चौकशी करु लागला. त्याने महाराजांना पत्राद्वारे दीक्षेसाठी प्रार्थना केली होती व पत्रोत्तरी महाराजांनी त्याला दीक्षेचा दिनांक व वेळही दिले होते. दुर्दैवाने तो प्रवासात असल्याने ते पत्र त्याच्या मागे फिरत त्याला मिळेपर्यंत ती तारीख टळली होती. आपल्या मोडक्यातोडक्या इंग्रजीत त्याने ही हकीकत दुभाष्याद्वारा सांगीतली. आपल्याला आता दीक्षा मिळणार की नाही याबद्दल तो साशंक व अधीर झाला होता. महाराजांनी त्याचे बोलणे ऐकून घेतले व एकच वाक्य बोलले, "उद्या वरच्या खोलीत बसायला सांगा." हे त्या परदेशी पाहुण्याला सांगताच त्याला खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी महाराजांनी सांगितलेल्या वेळी तो आश्रमात माडीवर श्रीगुरुमहाराजांच्या छायाचित्रासमोर येऊन बसला. त्याची तास-दीड तास बैठक झाली. त्याला आम्ही त्याचे अनुभव विचारले. तेव्हा त्याने हाताने संकेत करून त्याला भूमध्यापासून सहस्त्रारचक्रापर्यंत प्राणाची स्पंदने जाणवली व मन त्यात रमून गेले असे सांगितले. तो भारतात आध्यात्मिक लाभाच्या अपेक्षेनेच आला होताच आणि सर्वत्र योग्य सद्गुरुंच्या शोधात फिरत होता. त्याला श्रीदत्तमहाराजांची माहिती मिळताच त्याची त्यांच्यावर मनापासून श्रद्धा बसली व "आपण यांचीच दीक्षा घ्यायची" असा त्याने निश्चय केला. त्या दिवशी आश्रमात प्रसाद घेऊन तो पूर्ण समाधानाने आपल्या देशी परत गेला.

एकदा दीक्षा दिल्यानंतर श्रीदत्तमहाराज पुन्हा त्याविषयी कधी स्वत:हून बोलत नसत. साधकाने काही शंका विचारल्यास समाधान करण्यापुरते बोलत. अगदी थोडक्यात, एखाद्या वाक्याने, क्वचित् एखाद्या शब्दानेही साधकाचे समाधान होत असे. साधनात येणारे अनुभव सांगितलेले त्यांना आवडत नसत. ज्याचे अनुभव त्याच्यासाठीच असतातच, इतरांना त्यांचा काही उपयोग नसतो, असे त्याचे मत होते. कदाचित् त्यांच्या संकोची स्वभावामुळे किंवा इतर काही कारण असू शकेल, त्यांनी स्पर्शदीक्षा, समोर बैठक आणि सामूहिक बैठक यांना टाळलेले दिसते. एकदा एका साधकाने "आपण श्रीगरुमहाराजांप्रमाणे स्पर्शदीक्षा का देत नाही." असे विचारलेही होते. त्यावर श्रीदत्तमहाराजांनी सांगितले की "श्रीगुरुमहाराज बालब्रह्मचारी होते, आम्ही गृहस्थ आहोत." असे ऐकण्यात आहे. बहुतेक सर्व दीक्षा पत्राने किंवा तोंडी त्यांना त्यांना आपापल्या घरी किंवा शक्य असेल तर आश्रमात माडीवर बसायला सांगून झाल्या आहेत. अर्थात् या सर्व दीक्षा संकल्पदीक्षाच होत्या. तंत्रग्रंथातून हीच सर्वात सूक्ष्म व श्रेष्ठ दीक्षा मानली गेली आहे. बऱ्याच दीक्षा परगांवी व परदेशीही झाल्या आहेत.

ज्या महात्म्याच्या ठिकाणी शिवादेश प्रकटलेला असतो तो त्या परमेश्वरी शक्तीचा स्रोतच झालेला असतो. म्हणून तर श्रीसमर्थ म्हणतात, "तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे." ह्याच अभिप्रायाने प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामीमहाराजही "सदा संतांपाशी" जायला सांगतात आणि उपदेश ते न देती तरी ऐकाव्या त्या गोष्टी असा आग्रह करतात. (इथे उपदेशाचा अर्थ दीक्षा आहे.) श्रीदत्तमहाराज अशाच

थोर संतांपैकी होते. त्यांची दीक्षा झालेल्या साधकांना जसे अनुभव येत तसेच त्यांची दीक्षा न झालेल्याही अनंक साधकांना त्यांच्या सान्निध्यात आध्यात्मिक प्रगतीची अनुभूति येत असे. अशा त्यांच्या सहज शक्तिप्रक्षेपणाचा लाभ आमच्यासह अनेकांनी घेतलेला आम्हाला विदित आहे. गु. भ. नीलाताई जोशी यांनी त्यांचा असा अनुभव व्यक्त केला आहे. प. पू. आचार्य किशोरजी व्यास यांनी आपला असा अनुभव, ते रेणुकानिवासमध्ये श्रीदत्तमहाराजांच्या भेटीला आले असताना सांगितलेला आठवतो.

हे जसे वैयक्तिक संपर्कात येणाऱ्या अनेक लोकांचे अनुभव आहेत तसेच श्रीदत्तमहाराजांच्या भागवतसप्ताहात व इतरही प्रवचनातून सर्व श्रोतृवृदांना आल्हादिनी शक्तीच्या अमृतवृष्टीचा प्रत्यय येत असे. सारांश एकांती लोकांती, जनी-वनी श्रीदत्तमहाराजांचे हे शक्तिवितरणाचे कार्य अव्याहत चालू असे. जसा सूर्याचा स्वभावच प्रकाशाने आसमंत उजळण्याचा आहे तसाच श्रीदत्तमहाराजांचा स्वभावच आध्यात्मिक शक्तिपाताने त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्व लहानमोठ्या स्त्रीपुरुषांची मने उजळण्याचा होता. ‘‘शक्तिपाताचा महामेरू’’ हे श्रीगुरुमहाराजांचे बिरुद त्यांनाही जणू उत्तराधिकाराने प्राप्त झाले होते.

**योगेनान्ते तनुत्यजाम्....**

असे हे श्रीदत्तमहाराजांचे कर्म, भक्ति, ज्ञान व शक्तिपात ह्या चारही योगातील श्रेष्ठत्व जाणून घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. यावरुन त्यांना महायोगी का म्हणायचे हे स्पष्ट झालेच आहे. आता त्यांच्या महायोगित्वाचा आणखी एक आयाम पाहून आपण हे चिंतन पूर्ण करुया.

श्रीदत्तमहाराजांच्या शेवटच्या आजारात त्यांच्या जवळच्या सर्व मंडळींनी पाहिलेले हे एक सत्य आहे. ती. सौ. आईसाहेब (श्रीदत्तमहाराजांच्या सहधर्मचारिणी सौ. लक्ष्मीबाई) यांच्या मृत्यूनंतर श्रीदत्तमहाराजांनी जणू आपल्या महाप्रयाणाचे प्रस्थानच ठेवले. तसे श्रीदत्तमहाराज संसारात कधीच लिप्त नव्हते. आता तर ते अधिकच अंतर्मुख होऊ लागले. त्यांच्या देहपाताच्या आठ-दहा दिवस आधी जेव्हा त्यांना आपल्या शरीराची विकलता जाणवली तेव्हापासून तर त्यांनी सर्व इंद्रियांचा पूर्ण निग्रह केला. त्यांचे डोळे उघडे असले तरी त्यात कसलाही भाव नव्हता. समोर कुणीही आले तरी ते ओळखीचासुद्धा भाव डोळयात नसे. त्यांना उठवून बसवले तर बसत, झोपावले तर झोपत. कोणतीही क्रिया स्वेच्छेने ते करीत नवहते. कुणी बोलले तर त्याची काहीही प्रतिक्रिया त्यांच्या मुखावर दिसत नव्हती. चेहरा पूर्णपणे शांत व निर्विकार होता. तोंडात घातलेले दूध, पाणी वगैरे बाहेर यायचे. सर्व ज्ञानेंद्रिये आणि सर्व कर्मेंद्रिये यापासून जणू त्यांनी आपल्या चित्ताचा प्रत्याहार केला होता. त्यांना रोज पहायला येणाऱ्या डॉ. तळवलकरांनाही त्यांच्या या अवस्थेने बुचकळ्यात टाकले होते. अशा ह्या निरुद्ध अवस्थेतच श्रीदत्तमहाराजांनी आपल्या देहाचे शेवटी विसर्जन केले. विषयांचा इंद्रियात, इंद्रियांचा प्राणांत, प्राणाचा मनांत, मनाचा बुद्धीत, बुद्धीचा अहंकारात आणि अहंकाराचा आत्मस्वरुपात त्यांनी लय केला आणि ते सर्वव्यापी, सच्चिदानंद, अखंडैकरस परमात्म्याशी ऐक्य पावले. ज्ञानी महात्मा त्याच्या शरीराचे विसर्जन झाल्यावर उच्च अथवा नीच अशा कुठल्याही लोकी जात नाही. तो केवळ सर्वव्यापी आत्मतत्त्वांत विलीन होतो. ह्या

श्रीदत्तमहाराजांनी अनेक वेळा प्रतिपादलेल्या भागवतप्रणीत सिद्धांताचे हे प्रात्यक्षिकच होते. त्यांच्या महायोगित्वाचा हा परमोत्कर्ष होता. एक महान, पवित्र, कृतकृत्य जीवनाची ती सांगता होती.

श्रीदत्तमहाराजांच्या परमश्रेष्ठ पावक अगम्य चरित्राचे हे चिंतन त्यांच्या चरणकमली समर्पण करून व त्यांच्या अहैतुकी कृपेच्या मेघवृष्टीच्या एक बिंदु तरी लाभावा अशी याचना करून हा लेख पूर्ण करु या.

**डॉ. वासुदेव व्यं. देशमुख**

५० नटराज संस्था, कर्वेनगर,

पुणे ४११ ०५२

## प्रात:स्मरणीय ब्रह्मश्री प. पू. दत्तमहाराज कवीश्वर

# आल्हादिनी दिव्यभक्तीचे अंतरंग प्रवक्ते

**पं. श्री. शरद ज. जोशी,**
दीनदयाळ नगर, ढगे मळा, बार्शी
(जिल्हा -सोलापूर)

**भागवत मुख्य भक्तीप्रधान। जे भक्तीचे सुख सनातन।**
**ते करतळामळ करुनि जाण। तुवां परिपूर्ण दाविले॥**

श्रीएकनाथी भागवत २४/४३२

श्रीनाथ महाराजांनी वर्णन केल्याप्रमाणे श्रीमद्भागवतकथाज्ञान यज्ञाद्वारे ब्रह्मश्री, विद्यावाचस्पती श्री दत्तमहाराजांनी अनेक भक्त जनांना, साधकांना भक्ती चे सनातन सुख देऊन ते पूर्ण रीतीने करतलामलकवत् प्रकट करून दाखविलेले आहे. अशा प. पू. महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांना वारंवार प्रार्थना करावीशी वाटते ती अशी की,

**जे मज सुख दाविले आता।**
**ते नित्य निर्वाहे सर्वथा**
**ऐशी कृपा तत्त्वता करावी॥**

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा श्रीमद्भागवतकथाज्ञानयज्ञ म्हणजे श्रोत्यांना सात दिवसांची पुण्यपर्वणीच. कारण श्रीमद्भागवत म्हणजे केवळ

एक ग्रंथच नाही तर ते भगवान श्रीकृष्णाचे स्वरूप आहे. हा ग्रंथ श्रीभगवंताची वाङ्. मयीन शद्बमयी मूर्ति आहे. श्रीमद्भागवताचे ज्ञान प्राप्त करणे म्हणजे श्रीभगवत् स्वरूपच जाणणे होय. श्रीमद्भागवत भगवतस्वरूप असल्यामुळे त्याच्या भक्तिपूर्वक अध्ययनात मनुष्याला सर्व प्रकारचे भाग्य प्रदान करण्याचे सामर्थ्य आहे. या ग्रंथाची विशेषता ही की याच्या केवळ श्रवणाने श्रीभगवान भक्तांच्या हृदयात बांधले जातात. थोडक्यात भगवद्भक्ति, पराभक्ति जागृत करणे हेच या ग्रंथाचे प्रयोजन आहे. अशा श्रीमद्भागवताचे अंतरंग प्रवक्ते प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सप्ताह म्हणजे प. पू. श्रीमहाराजांच्या तप:पूत हृदयातून प्रगट झालेली दिव्य शद्बधारा व शद्बब्रह्मच होय.

**प. पू. दत्तमहाराजांचा सप्ताह म्हणजे...**

१) सात ज्ञानाच्या (शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्त्वापती, असंसक्ति, पदार्थाभाविनी, तुर्यगा) भूमिका चढून जाण्यासाठी उपयोगी पडणारी भक्तिची मजबूत साखळी म्हणजे भागवत.

२) सात योगानुष्ठानांनी(यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि) समाधीचे आठवे शिखर गाठावयास मदत करणारी भक्तीची शक्ती म्हणजे भागवत.

३)चिदाभासाच्या सात अवस्थांचे(अज्ञान, आवरण, विक्षेप, परोक्षज्ञान, अपरोक्षज्ञान, शोकनिवृत्ती, निरंकुषवृत्ती) अतिक्रमण करून जीवन्मुक्तीचा लाभ घडवणारी सुवर्ण पर्वणी म्हणजे भागवत.

भारतात सर्वत्र सात दिवसांत म्हणजे भाद्रपद महिन्याच्या शुद्धनवमी पासून पौर्णिमेपर्यंत (प्रौष्ठपदी) श्रीमद्भागवत सप्ताह ऐकण्याची परंपरा हजारो वर्षे चालू आहे. त्याशिवाय इतर महिन्यात चातुर्मासांत, माघ,

मार्गशीर्ष महिन्यात नवमी ते पौर्णिमेपर्यंत अथवा कोणत्याही सप्ताहात श्रीमद्‌भागवतकथाज्ञानयज्ञ करण्याचा प्रघात आहे. श्रीकृष्णाची वाङ्मय मूर्ती म्हणजे श्रीभागवत आहे. अशा पवित्र ग्रंथाचे संहिता वाचन सकाळी स्पष्ट व शांतपणे करणे व दुपारी भागवतार्थाचे रहस्ययुक्तनिरुपण चूर्णिकेद्वारे (संस्कृतगद्यग्रंथ) करणे अशी परंपरा आहे.

बार्शी येथील श्रीभागवत मंदिरात गेली ८० वर्ष पं. प्रल्हादशास्त्री, पं. दादाशास्त्री व माझ्याकडून श्रीभागवतकथाज्ञानयज्ञ सेवा चालु आहे. दर ३ वर्षांनी येणाऱ्या अधिकमासातील वद्यपक्षात प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सप्ताह अगदी नित्यनेमाने होत असे. वै. प. पू. वक्रतुंड महाराज यांचेपासून ही परंपरा चालू आहे असे सांगीतले जाते. आरंभीच्या काळात सन १९८० पूर्वी प. पू. दत्तमहाराज स्वत: संहिता वाचन करावयाचे. त्यांनतर पं. दादाशास्त्री व माझे कडे संहिता वाचनाची सेवा करण्याचे महद्‌भाग्य प्राप्त झाले. प्रती तीन वर्षानंतर होणाऱ्या सप्ताहात पू. महाराजांच्या निरूपणात नावीन्य असावयाचे. निरूपणातून आल्हादिनी दिव्यभक्तिचे अंतरंग-दर्शन ज्यांना घडले ते धन्य होत व ते पुण्य ज्यांच्या पदरी पडले ते खरोखरीच धन्य व कृतार्थ होत.

श्रीमद्‌भागवतावर ज्या टीका आहेत त्यांची नावे कै. गोपाळाचार्य कऱ्हाडकर यांनी आपल्या भागवतभूषण या ग्रंथात दिलेली आहेत. ती अशी -

हनुमती, चित्सुखी, शांकरी, श्रीमन्मध्वाचार्यकृत, भागवततात्पर्य, वल्लभाचार्यकृत, सुबोधिनी, रामानुजीय वीरराघवी, निंबार्कीया,

बोदपदेवकृत हरिलीला, मुक्ताफल, परमहंसप्रियाख्यव्यारण्याययविद्वत् कामधेनू संबंधोक्ति, तत्त्वदीपिकाशुकहृदया, सुदर्शनी, मुनिभाव प्रकाशिका, प्रहर्षिणी, श्रीधरी, विजयध्वजी यादुपती, श्रीनिवासी, सत्यधर्मतीर्थी, बृहत्तोषिणी, लघुतोषिणी, चक्रवर्ती, संदर्भतोषिणी, सारमाधवीवामनी, एकनाथी, पुरुषोत्तमी

अशा एकतीस टीका आहेत. यामधील सुबोधिनी, श्रीधरी, वंशीधरी इ. प्रमुख टीका ग्रंथाद्वारे गूढ अध्यात्मिक तत्त्वांची उकल व त्यांतील संगती याच्या परामर्शासह प. पू. श्री. महाराजांच्या अर्थ निरूपणाचे वैशिष्ट्य असावयाचे. श्रीभागवतातील प्रत्येक स्कंधातील संगतीची सूत्रे, व भगवान श्रीकृष्णाच्या समग्र चरित्राचा सांगोपांग परामर्श मानव जीवनातील अनेक प्रश्नांना पूर्ण विराम देणारी प. पू. श्रीमहाराजांची चिंतनधारा आपोआप साधक भक्तांच्या चित्तामलांचे प्रक्षालन करीत असे.

श्रीमद्‌भागवतातील मूळ तत्त्वज्ञान, उपासना पद्धती व कथासंग्रह ही दोन परंपरांनी प्रसार पावलेली आहेत असे भागवतातील वर्णनावरुन दिसते. पहिली परंपरा - भगवान विष्णु, ब्रह्मदेव, नारद, व्यास, शुक, सुत, शौनक अशी असून ती प्रथम स्कंधात, द्वितीय स्कंधात, द्वादश स्कंशात आलेली आहेत. दुसरी परंपरा तिसऱ्या स्कंधात आली असून भगवानविष्णु, शेष, सनत्कुमार, सांख्यायन, पराशर, मैत्रेय अशी आहे. या दोन्ही परंपरेतील प्रवक्ते महर्षि सूत व मैत्रेय ऋषी यांनी पुढील श्लोकाद्वारे भागवत पुराण कथन प्रेरणेचा उल्लेख केलेला आहे तो असा - सूत उवाच

**अहं चाध्यगमं तत्र निविष्टस्तदनुग्रहात।**
**सोऽहं वः श्रावयिष्यामि यथाधीतं यथामति।।**

भा. स्क. १/३/४५

सूत सांगतात - हे (शौनक) ऋषींनो जेव्हा महातेजस्वी श्रीशुक येथे (गंगातटाकी) या (श्रीमद्‍भागवत) पुराणाची कथा सांगत होते. तेव्हा तेथे मी बसलो होतो. तेथे मी त्याच्या कृपापूर्ण संमतीने अध्ययन केले. माझे जसे अध्ययन झाले, माझ्या बुद्धीने जितके ग्रहण केले त्यानुसार मी (भागवत) सांगेन.

मैत्रेय उवाच -

**सोऽहं नृणां क्षुल्लसुखाय दुःखं महद्गतानां विरमाय तस्य।**
**प्रवर्तये भागवतं पुराणं यदाह साक्षाद्‍भगवान् ऋषिभ्यः।।**

भा. स्क. ३. ८. २

प्रपंचातील क्षुल्लक व अनित्य सुखाच्या अधीनतेमुळे लोकांना फार दुःख होते. त्याचा उपशम होण्याकरीता स्वतः श्रीभगवानांनी ऋषींना सांगितलेले भागवत मी (मैत्रेय) सांगतो असे म्हटले आहे.

या दोन्ही परंपरेचे एकत्रित संगम सरस्वतीवरदपुत्र प. पू. श्रीदत्तमहाराज होत. म्हणून श्रीदत्तमहाराज अर्थ निरूपण करीत असताना प्रत्यक्ष भगवान तर कधी प्रत्यक्ष श्रीशुकाचार्य यांच्याप्रमाणे भागवत सांगत आहेत अशी भावमय अवस्था साधक भक्तांनी अनुभवली आहे.

प. पू. श्रीमहाराजांच्या सप्ताहात पहिल्या दिवसापासून सात दिवसांपर्यंत साधक भक्तांना अर्थ निरूपणातून सर्व विषय शांतपणे समजावून देत. त्यांच्या मनातील सर्व प्रश्नांची उकल करण्याचे कार्य हळुवारपणे असे. ते कशा पद्धतीने असावयाचे तर तो प्रसंग मुळातील श्रीभागवतातून

पहाणे योग्य आहे.

श्रीकृष्णांनी आपले हृदगत तेवढे सर्व उद्धवाच्या हवाली केले. उद्धवाच्या हातात भक्तीयोगरूप सुदर्शन चक्र दिले. उद्धवाच्या द्वारा ते इतर भक्तांच्याही उपयोगी पडावे व त्यांचेही संरक्षण व्हावे म्हणून श्रीभगवंतांनी भक्तियोग सांगीतला व उद्धवजींना अजून काही शंका राहिली आहे की काय ते पहाण्यासाठी शेवटी श्रीभगवान विचारतात.

**अप्युद्धव त्वया ब्रह्म सखे समवधारितम् ।**
**अपि ते विगतो मोहः शोकश्चासौ अनोभवः ।।**

११/२९/२९

मित्रा उद्धवा! तु हे सर्व ब्रह्मप्रतिपादन सावधान चित्ताने समजावून घेतलेस ना! तुझा मोह नष्ट झाला ना! तुझ्या मनात उत्पन्न झालेली तळमळ शांत झाली ना?

याहून याविषयी आणखी काही सांगण्यासारखे उरले नाही. असे स्वतः भगवंतांनीच पुढील वचनात म्हटले आहे.

**नैतद्विज्ञाय जिज्ञासो ज्ञातव्यमवशिष्यते।**
**पीत्वां पियूषममृतं पातव्यमव शिष्यते।।**

११/२९/३२

हे ज्ञान समजून घेतल्यानंतर जिज्ञासू जाणावयाचे असे काही शिल्लक रहात नाही. हे दिलेले मधुर अमृत प्याल्यावर पिण्याचे असे काही या जगात शिल्लक उरत नाही.

ज्याप्रमाणे श्रीउद्धवास श्रीभगवंतांनी भक्तियोगाद्वारे ज्ञानामृत प्यावयास दिले त्याप्रमाणे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी भागवताद्वारे ब्रह्मरसामृत देऊन सर्व भक्तांना तृप्त करण्याचे कार्य ज्ञानयज्ञाद्वारे केलेले

आहे. ज्ञानयज्ञ सांगतेनंतर प्रत्येकास कृतार्थता प्राप्त व्हावयाची हे निर्विवाद सत्य आहे.

श्रीभागवतातील मुख्य रस भक्ति होय हे सर्वश्रुत आहे. भक्तीची व भक्तांची वर्णने बहुधा प्रत्येक अध्यायात आढळतील; पण त्याशिवाय श्रीभागवतात अनेक ठिकाणी स्तोत्रे आली आहेत. त्यात भीष्मकृत श्रीकृष्ण स्तव (क. अ. ९) शुकाचार्यकृत परमेश्वरस्तवन (स्कं २ अ ४) देवताकृत परमेश्वरस्तवन (स्क ३ अ. ५) ब्रह्मदेवकृत नारायणस्त्रोत्र (स्कं ३ अ ९)ब्रह्मदेवादिकांनी केलेली वराहस्तुती (स्कं ३ अ १३) कर्दमकृत भगवत्स्तुति (स्कं ३ अ २१)गर्भस्थजीवकृत ईशस्तुती (स्कं ३ अ २१) दक्षादिकांनी केलेल विष्णुस्तुती (स्कं ४ अ ७) ध्रुवस्तुति (स्कं ४ अ ९) पृथुकृत भगवत्स्तवन (स्कं ४ अ २०) शंकरकृत संकर्षणस्तोत्र (स्कं ५ अ १७) दक्षकृत हंसगुह्यस्तोत्र (स्कं ६ अ ४) ब्रह्मादिकृत नरसिंहस्तुति (स्कं ७ अ ८) गजेंद्रकृत विष्णुस्तव (स्कं ८ अ ३) सत्यव्रतकृत मत्स्यस्तव (स्कं ८ अ २४) देवकृत गर्भस्थ श्रीकृष्णाची स्तृति (स्कं १० अ २) ब्रह्मदेवकृत श्रीकृष्णस्तुति (स्कं १० अ १४) कालियाकृत श्रीकृष्णस्तुति (स्कं १० अ १६) इंद्रकृत श्रीकृष्णस्तुति (स्कं १० अ २७) अक्रुरकृत भगवत्स्तुति (स्कं १० अ ४०) श्रीशंकरांनी केलेली कृष्णस्तुति (स्कं १० अ ६३) प्रसिद्ध वेदस्तुति (स्कं १० अ ८७) इ. स्तोत्रे महत्वाची असून त्यामध्ये वेदांतशास्त्राचे व सगुण भक्तीचेही सर्व सार आले आहे.

ही एवढी यादी देण्याचे कारण असे की, प. पू. श्रीदत्तमहाराजांना ही स्तोत्रे अत्यंत प्रिय आहेत. या स्तोत्रांचे वर्णन

करताना प. पू. श्रीमहाराज एवढे तन्मय होत असत त्यावेळी प्रत्यक्ष स्तुति करणारा भक्त व स्तोत्रदेवता यांचे प्रत्यक्ष प्रत्यंतर भाविकांना येत असे. ही स्तोत्रे श्रीभागवतातील भक्तिनिर्झर असून ही एक अभ्यासाचा, संशोधनाचा विषय आहेत असे पू. महाराजांचे सांगणे आहे. या स्तोत्रांचे श्रीभागवताच्यावेळी व अन्य कांही प्रसंगाचे वर्णन श्रीमहाराजांच्या शब्दात पहाणे योग्य होणार आहे. कारण श्रीमद्‌भागवतातील विविध विषयांचे वर्णन करताना प्रसंगोपात्त दर्शनशास्त्रातील प्रमाणे, भाष्यग्रंथातील प्रमाणे, श्रृतिस्मृति पुराणांचे संदर्भ तसेच संतांची अवतरणे इतक्या चपखलपणे स्पष्ट करीत असत त्याचा आनंद हा फार वेगळा आहे. त्यामुळे काही प्रसंग श्री महाराजांच्याच शब्दातच श्रवणीय आहेत.

## श्रीमद्‌भागवताची निर्मिती

देवर्षि नारदांच्या आज्ञेनुसार श्रीव्यासमुनी आपल्या शम्याप्रास आश्रमामध्ये ध्यानस्थ बसले. सुर्यमंडल उदयाला आले आहे. रमणीय अशी वेळ आहे. श्रीव्यासांनी चित्तवृत्ती स्थिर केल्या व समाधि अवस्था प्राप्त झाली. बुद्धीरमेय परमेश्वर जाणावयाचा आहे. परमात्मा कसा आहे? स्वच्छ घर झालं की येणारा पाहुणा आनंदित होतो. कसं छान आहे परमात्म्याला आनंद होत आहे. मन आणि बुद्धि स्वच्छ झाल्यावर परमेश्वराला त्या शरिरात वास करावासा वाटतो आणि त्याप्रमाणे श्रीव्यासांना समाधि अवस्था प्राप्त झाली. आत्मदर्शन झाले. ईश्वराची मायाशक्ति केवढी आहे. त्यामध्ये सर्व जीव सापडले आहेत देवादिकसुध्दा. त्यांना या मायेपासून सोडवणूक करावयाची आहे. म्हणून भागवत संहितेची रचना तयार झालेली आहे. समाधि भाषेमध्ये

श्रीमद्‌भागवत तयार केले. “समाधिभाषा व्यासस्य” हे मोठे प्रमाण आहे. बाहेरील वृत्ती नाही. इतर पुस्तके वाचून तयार झालेले नाही. श्रीभगवंताचे अवतार आहेत व्यास. एकूण १८ हजार श्लोकांची निर्मिती झाली आणि त्याचे फल एका श्लोकात सांगीतलेले आहे.

**यस्यां वै श्रूयमाणायां कृष्णे परमपुरुषे।**
**भक्तिरूत्पद्यते पुसां शोकमोहभयापहा ।।**

श्रीभागवत संहिता ऐकली असता अर्थ समजो अथवा न समजो प्रत्यक्ष हे भगवंताचे स्वरुपच आहे याचे ज्ञान होते. ऋतंभरा प्रज्ञासंपन्न वेदव्यासाची सारस्वतसाधना ही श्रोत्यांना कृतार्थता प्राप्त करणारी आहे.

एका मंदिरात श्रीमद्‌भगवद्‌गीतेवर प्रवचन सुरू झाले. पुराणिकांनी गीतेतील पहिला श्लोक वाचला. त्यावेळी एक श्रोता ‘शेतकरी’ होता तो रडू लागला. तो शेतकरी म्हणतो ‘महाराज’, आपण पहिला श्लोक म्हटला व मला श्रीकृष्ण अर्जुनास गीता सांगत आहेत हे प्रत्यक्ष दर्शन झाले. पुराणिक त्या शेतकऱ्याच्या पाया पडतात, म्हणतात “बाबा रे! तुलाच गीता समजली.”

अशा श्रद्धेने भगवत्‌संहिता ऐकली तर भक्ति उत्पन्न होते. शोक मोह दूर होतो व माणूस हा निर्भय होतो व श्रीकृष्ण परमात्म्याविषयी प्रेम निर्माण होते. हे भागवत्‌संहिता श्रवणाचे फळ आहे.

अशा रीतीने श्रीमद्‌भागवताच्या निर्मितीचे वर्णन झाल्यानंतर एकेक प्रसंगाचे वर्णन श्रीमहाराज इतक्या मधुरवाणीने करीत असत, ते ऐकताना मन तल्लीन होऊन जात असे.

**भीष्मस्तुति**

भारतीय युद्ध समाप्तीनंतर शरपंजरी पडलेल्या भीष्माचार्यांकडे श्रीकृष्ण पांडवांच्यासह येतात. शरशय्येवर पडलेल्या भीष्माचार्यांना अतिशय आनंद झाला. श्रीभगवंतांनी भीष्माचार्यांना धर्मराजाला मार्गदर्शन करण्याबद्दल आज्ञा केली. भीष्माचार्यांनी धर्मराजाला उपदेश केला. तू धर्मशील आहेस. त्रैलोक्यात पराक्रमी असणारे भीम व अर्जुन हे श्रेष्ठी आहेत, तरीसुद्धा तुम्हाला दु:ख का भोगावे लागले! तस्मात् इदम् दैवतंत्रम प्रमाणम्। दैव म्हणजे पूर्वकर्म. पूर्वजन्मात केलेल्या कर्मामुळे दु:ख भोगावे लागते. तसेच या जन्मातील केलेल्या कर्माला प्रयत्न म्हणतात. या प्रयत्नाने पूर्वकर्मातील दोष निवारण करण्याचे कार्य करावयाचे आहे. श्रीकृष्ण परमात्मा जवळ आहे या परमात्म बुद्धीने वागत रहा. श्रीकृष्ण म्हणतील त्याप्रमाणे कार्य करीत रहा असा उपदेश केला.

या उपदेशानंतर भीष्माचार्य श्रीभंगवंतांना म्हणतात की, देवा, माझी ही विचित्र अवस्था लक्षात घेता आपली पूजा कशाने करू! आपणाला काहीही समर्पण करता येत नाही. बुद्धीने व मनानेच संसार निर्माण होतो म्हणून ही बुद्धीच समर्पित करीत आहे. ''वाहू हा संसार देवा पायी''।

**तुज सगुण म्हणो की निर्गुण रे**
**सगुण निर्गुण ऐकू गोविंद रे।।**

या भीष्माचार्यांच्या प्रार्थनेनंतर भगवंताची दृष्टी त्यांच्यावर पडली व अंगातील त्रास कमी झाला. पापक्षय झाला. धारणा शुद्ध झाली. शरीर कसे सोडावे याचे उत्तम उदाहरण म्हणजे भीष्माचार्य होत.

भीष्माचार्य इच्छामरणी होते. त्यांच्या वडिलांनी त्यांना आशीर्वाद दिलेला होता, तरी सुद्धा उत्तरायणाला प्रारंभ झालेला असताना भगवंताचे आपल्यावर कृपादान व्हावे या शुद्धबुद्धीने भगवंताचे स्मरण केले; व ते म्हणतात, डोळे मिटून ज्याचे ध्यान करावयाचे असा परमात्मा समोर असताना मी डोळे बंद का करु!

**त्रिभुवनवामनं तूमालवर्ण**
**रविकर गौरवाम्बरं दधाने।**
**परुलक कलावृताननाब्जं**
**विजयसखे रतिरस्तु मेऽनवद्या।।** १/९/३३

ज्यांचे शरीर त्रिभुवनात सुंदर तसेच तमालवृक्षाप्रमाणे सावळ्यावर्णाचे आहे, ज्यावर सुर्यकिरणांसमान श्रेष्ठ पितांबर झळकत आहे, ज्याच्या मुखकमलावर कुरळे केस भुरभुर उडत आहेत, त्या अर्जुनसखा श्रीकृष्णावर माझे निष्काम प्रेम असो.

अशा प्रकारे श्रीभगवंताची स्तुति करीत करीत सूक्ष्म शरीर ब्रह्मस्वरुपात विलिन झाले. चित्त शरीर कायमचे मुक्त झाले. "याचसाठी केला होता अट्टाहास शेवटचा दिस गोड व्हावा" सर्व संसाराचे कारण सूक्ष्मलिंग शरीर त्या भगवत्स्वरूपाच्या ठिकाणी लीन होऊन गेले. शरीरातून बाहेर पडायचे, सूर्यद्वाराने ब्रह्मलोकाला जायचे, मोक्ष मिळवायचा असे नाहीय. याच भगवत्स्वरूपाच्या ठिकाणी लिंगशरीराचा विलय होऊन गेला. भीष्माचार्य मुक्त झाले. **ब्रह्मज्ञानी महात्मे हे असेच देहमुक्त होतात.**

असे वर्णन श्रीदत्तमहाराजांच्याकडून ऐकत असताना प्रत्यक्ष तो प्रसंग समोर उभा राहतो. मूळ श्लोकातील गूढार्थ हळुवारपणे प्रकट

करून श्रीमद्भागवतातील रहस्य सांगण्याचे हे एक वैशिष्ट्य आहे.

अशाच प्रकारचे कथामधील, स्तोत्रांमधील अथवा अन्य प्रसंगातील वर्णन मनुष्याला त्याच्या स्वरूपाकडे नेणारे व त्यासाठी प्रकाश करणारे दर्शन आहे.

श्रीमद् भागवतातील विविध विषयांची फोड करून तत्वज्ञानाचा उपदेश करीत या सर्व मार्गात भक्तिमार्ग श्रेष्ठ असून इतरमार्ग त्याच्या उपांगासारखे होत हे श्रोत्यांच्या मनावर ठसविण्याचे पू. महाराजांनी महान कार्य केलेले आहे. श्रीमद्भागवतात वैश्विक एकात्मतेचा गंभीर अर्थ भरुन राहिलेला हा प्रत्येक घराघरात नेण्याचे श्रेष्ठतम कार्य श्री महाराजांचे आहे.

***

# शुक व्यास संवाद

पं. श्री.शरद ज.जोशी

सन १९८८ साली प. पू. डोंगरे महाराजांच्या श्रीमद्भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प. पू. दत्तमहाराजांना आवर्जून आमंत्रण देण्यात आले. प. पू. दत्तमहाराजांचे बार्शीत आगमन झाल्यानंतर श्रीगणेश मंदिरातील मुक्कामाचे ठिकाणी पू. डोंगरे महाराजांनी स्वत: येऊन साष्टांग नमस्कार केला. त्यावेळी अथांग भक्तगण उभयता श्रेष्ठांचे स्वागतासाठी उपस्थित होते. हा प्रसंग अगदी अंगावर रोमांच आणणारा होता. त्यावेळी सर्व भक्तवृंदातून 'गोपाळकृष्ण महाराज की जय' याचा उत्स्फूर्तपणे जयजयकार झाला. आपल्या महाराजांनी नम्रपणे त्यांनाही वंदन केले. प. पू. श्रीदत्तमहाराज नेहमीच्या पद्धतीप्रमाणे पू. डोंगरे महाराजांना आसनावर बसण्यासाठी सांगून स्वत: जमीनीवर बसले. परंतु डोंगरे महाराजांनी त्यांच्या हातास धरुन आपल्या आसनावर बसविले. त्यांचा पुष्पहार, श्रीफल, श्रीमहावस्त्र देऊन सत्कार केला. त्या दोघांमध्ये जो संवाद झाला तो असा,

**महाराज-** मी आपली प्रसादवाणी ऐकण्यासाठी आलो आहे.

**डोंगरे महाराज -** आमच्यामध्ये आपण ऐकण्यासारखे काही नाही. आपणच आज रोजी प्रथम व्यासपीठावर येऊन आम्हांस उपदेश करावा व आम्हास पावन करावे.

**महाराज –** आपली उपासना फार मोठी आहे. अनन्य साधारण अशी श्रीकृष्ण भक्ति आहे. श्रीकृष्णाच्या कृपेने आपला कार्यक्रम चालू आहे. मध्येच मी बोलणे (सांगणे) योग्य होणार नाही. शास्त्रामध्ये बसत नाही.

**पू. डोंगरे महाराज –** आपण व्यासरुप आहात. शास्त्राचा संबंध येत नाही. जरूर उपदेश करावा. आपण ज्येष्ठ व श्रेष्ठ आहात.

असे म्हणून पू. डोंगरे महाराज श्री दत्तमहाराजांना अत्यंत आग्रहपूर्वक घेऊन स्वत:च्या गाडीमध्ये बसवून कार्यक्रमाचे ठिकाणी घेऊन गेले. सर्व भाविकांनी दोघा श्रेष्ठ संतांच्या विनम्रतेचा अनुभव घेतला.

कार्यक्रम स्थळी गेल्यावर पू. महाराजांच्या हातास धरुन प्रथम पू. डोंगरे महाराजांनी त्यांना व्यासपीठावर बसविले. किमान दहा हजार श्रोतृवृंद जमलेला होता. भव्य मंडप योजना करण्यात आली होती आणि आपले महाराज बोलू लागले.

पू. डोंगरे महाराजांच्या आज्ञेने या व्यासपीठावर बसून बोलत आहे. या भागवत सप्ताहाचे दृष्य बघितल्यावर कलियुगामध्ये जणू कृतयुगाचा अवतार झाला आहे असे वाटत आहे. श्रीगोपालकृष्णाने उद्धवास जशी आज्ञा करावी त्याप्रमाणे पू. डोंगरे महाराजांची आज्ञा प्रमाण मानतो.

श्रवणभक्तीने अंतरंगशुद्धि व बुद्धिविकास होतो. श्रवण मनन आचरणामुळे ज्याप्रमाणे गोपगोपी पावन झाल्या त्याप्रमाणे आपण (श्रोतृवृंद) या श्रवणाने पावन होत आहात.

**दुरितांचे तिमिर जावो- विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो**

**जो जे वाच्छिल तो ते लाहो ....**

याप्रमाणे विश्वाचे कल्याणासाठी अवतारी पू. डोंगरे महाराजांचे कार्य चालू आहे. अशा भागवोतोत्तम शुकस्वरुप डोगरे महाराजांना प्रणाम करतो.

एकंदरीत या दोन सत्पुरुषांच्या प्रत्यक्ष दर्शनाने सर्वांना आनंद झाला व प्रत्येक या दोघांच्या हृद्य भेटीचे कौतुक करीत होता. अशा रितीने प. पू. दत्तमहाराजांनी

**कथा भागवतस्यापि नित्यं भवति यद् गृहे ।**
**तद्गृहं तीर्थरूपं हि वसतां पापनाशनम् ।।**

ज्या घरांत (किंवा मंदिरात) नित्य श्रीमद्भागवताची कथा होते ते घर तीर्थश्रेक्ष होते व सर्वांचे पाप नष्ट होऊन जाते. या श्रीमद्भागवतमाहात्म्यातील वचनाप्रमाणे श्रीमद्भागवताची ध्वजा भारतभर फिरवून अनेक शहरे, ग्रामीण भाग, घराघरात श्रीसप्ताहाद्वारे ते ते घर, शहर तीर्थक्षेत्राप्रमाणे करण्याचे कार्य व ते कुटुंब, समाज एकात्म करण्याचे महान कार्य केलेले आहे.

या त्यांच्या महान कार्यामुळे आठवण येते ती भगवत् पूज्य शंकराचार्य व परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांची असो.

# श्रीमद्भागवतकथा.... वरदान

**श्री. शरद ज. जोशी**

**श्रीमद्भागवतकथाज्ञानाचे श्रीदत्तमहाराजांकडून मिळालेले कृपादान**

श्रीमद्भागवताची आमच्या आजोबांपासूनची परंपरा व वडिलांच्या सप्ताहात सकाळी थोडा वेळ १, २ अध्याय वाचणे व ब्रह्मश्री दत्तमहाराजांच्या अधिकमास सप्ताह श्रवण करणे एवढा आरंभीच्या काळानंतर सन १९८२ मध्ये श्रीमहाराजांनी एका पत्राद्वारे ''श्रीमद्भागवत इ. पुराणे, संतवाङ्मय, प्राचीन नवीन अध्यात्मविद्यासंबंधीचे वाङ्मयाचा वाचनाभ्यास, त्याचे सारग्रहण, लेखन हा व्यासंग करण्याबाबत व वाग्मी प्रचारक होण्याचे ध्येय ठेवावे''असा उपदेश केला. याच पत्रात 'नोकरी हा सामान्य धर्म आहे न्यायानुसारी स्वतंत्रज्ञ बनून लोकनेतृत्व संपादणे हाच असामान्य धर्म आहे. जिज्ञासा हा फार मोठा गुण असून तोच तत्त्वज्ञानाचे पुरक साधन आहे' हे मार्गदर्शन केल्यानंतर माझी श्रीमद्भागवतावरील आवड दिवसेंदिवस वर्धिष्णु होत राहिली. श्रीमहाराजांच्या सहवासात अधिक काळ राहून शंकासमाधान करून घेताना एके दिवशी श्रीमहाराज श्रीक्षेत्रतुळजापूरला जाण्यापूर्वी देऊळगांवराजावरून बार्शीस आले होते. त्यावेळी त्यांनी श्रीक्षेत्रगाणगापूरच्या श्रीगुळवणी महाराज मठामध्ये (श्रीवासुदेवानंदसरस्वती धर्मशाळा) श्रीमद्भागवतसप्ताह करण्याबाबत आज्ञा केली. त्यावेळी मला खूप आंनद झाला.

पण मला आता एकदम सप्ताह कसा करायचा असा मनामध्ये प्रश्न उभा राहिला ते जणू श्रीमहाराजांनी ओळखले आणि मला धीर दिला. आम्ही "श्रीक्षेत्रतुळजापूरला श्रीजगदंबेचे दर्शन करून व तेथील कार्य आटोपून श्रीक्षेत्रगाणापूरला येत आहोत" असे सांगीतले.

प. पू. श्रीधरस्वामींच्या आज्ञेने प. पू. श्रीगुरुमहाराजांनी श्रीतुळजापूर यात्रा व लगेच श्रीक्षेत्रगाणगापूर यात्रा सुरु केली. प्रत्येक श्रावण महिन्यात दोन रात्र श्रावण शु ६ ते श८ पर्यंत तुळजापूरात राहणे व त्यांनतर गाणगापूरला प्रस्थान असा क्रम असावायाचा. श्रावण शु ९ ते पासून श्रावण शु ११ पर्यंत गाणगापूरला मुक्काम हे प. पू. श्रीगुरुमहाराजांचे कार्य श्री. प. पू. दत्तमहाराज यांनी चालू ठेवले. त्यांचेबरोबर आजही प. पू. नारायणकाका ढेकणे महाराजांनी चालू ठेवले आहे.

श्रीक्षेत्र गाणगापूरातील 'श्रीवासुदेवानंदसरस्वती धर्मशाळेची पार्श्वभूमी' पहाण्यासारखी आहे. असे प्रमाण आहे की साक्षात्कारी महापुरुषांची इच्छाशक्ति फार प्रबल असते ती शक्ति त्या महापुरुषांच्या समक्ष कार्यक्षम राहते यात काहीच आश्चर्य नाही. परंतु त्या महापुरुषांच्या निर्याणानंतर त्यांच्या पश्चात् त्या इच्छाशक्तीचे सामर्थ्य तिचा वेग वाढतो तो मात्र नवलकारक असतो. आज गाणगापूरातील साकार झालेली 'श्रीवासुदेवानंदसरस्वती धर्मशाळा' हे या इच्छाशक्तीचे ताजे उदाहरण होय.

श्रीनृसिंहवाडी येथील मंडपाचे काम झाले. त्या कामाच्या व्यापातून मुक्त होताच एके दिवशी श्रीगुरुमहाराज म्हणाले "वाडीचे काम देवांनी चांगले करून घेतले, तसेच काहीसे गाणगापूरात झाले

तर बरे होईल'' त्यावेळी उपस्थित कै. गोविंद शेट साबळे उत्स्फूर्त म्हणाले 'महाराज, आपण आशिर्वाद दिलात तर आमच्या सारख्यांच्या हातूनही पुढे मागे आपण करवून घ्याल' 'देवाची इच्छा असेल तर देव तुमच्या हातून तसे करवून घेईलही' असा गुरुमहाराजांनी आशीर्वाद दिला. त्यांनतरच्या श्रावण महिन्यात गाणगापूर यात्रेच्या वेळी नित्याप्रमाणे निर्गुण पादुकांची महापूजा झाल्यानंतर सायंसंध्येस संगमावर जाताना संगमरोड नजिक श्रीमहाराजांनी थांबून रस्त्याच्या डाव्या बाजूस जागेकडे अंगुली निर्देश करून सांगीतले की, 'थोरले महाराज गावामध्ये भिक्षा मागून या दगडावर बसत असत. ही जागा वास्तूसाठी योग्य आहे' असे सांगीतल्यानंतर सर्वच गोष्टी आश्चर्यकारकरितीने अनुकूल होत गेल्या. पुढे कै. श्री साबळे शेटजींनी हे कार्य करावयाचे ठरविले. यानंतर काही महिन्यांनी श्रीगुरुमहाराजांनी आपल्या अवतार कार्याची समाप्ती केली.

पुढे काही वर्षांनी योग्य अशा सुमूहूर्तावर श्रीगुरुमहाराजांचे उत्तराधिकारी प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या शुभहस्ते नियोजित धर्मशाळेच्या जागेचे भूमीपूजन झाले व कालांतराने दत्तभक्तांच्या डोळयांचे पारणे फेडील अशी भव्य दिव्य 'श्रीवासुदेवानंदसरस्वती धर्मशाळा' ही नयममनोहर उत्कृष्ट वास्तू साकार झाली. सन १९७८ च्या वास्तुशांतीसमारोहानंतर सन १९७९ चा उद्‌घाटन सोहळा हा प. पू. दत्तमहाराजांच्या श्रीमद्‌भागवत कथाज्ञानाने संपन्न झाला. या सोहळ्यास महाराष्ट्रातील अनेक ठिकाणाहून भक्तगण उपस्थित होते. या सप्ताहात माझ्या वडिलांनी संहितावाचन केले व दुपारी किमान ५ तास प. पू. दत्तमहाराजांचे

रहस्यपूर्ण अर्थनिरुपण असावयाचे. हा सप्ताह अनेक अर्थाने संस्मरणीय झाला. आजही त्या कार्यक्रमाच्या आठवणी ताज्या आहेत. सांगतेच्या वेळी मी उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घेतला.

या वास्तूच्या पार्श्वभूमीनंतर प. पू. महाराजांचे वास्तव्य याच वास्तूमध्ये श्रावण महिन्यात सुरु झाले. सन १९८७ च्या श्रीमहाराजांच्या उपस्थितीत श्रावण शु९ पासून श्रीमद्‌भागवताच्या माझ्या पहिल्या सप्ताहास प्रारंभ झाला. श्रीमहाराजांना नमस्कार केला तेव्हा प. पू. महाराजांनी आशीर्वाद दिला 'अनुष्ठान म्हणून सप्ताह करा व प. पू. महाराजांचे श्रावण महिन्यातील हे एक स्मरण आहे'

**"प्रत्यक्ष देव ऐकतात या भावनेने सेवाकार्य करा"**

त्यावेळेपासून आजतागायत ही सेवा अखंड चालू आहे. पहिल्या सप्ताहाच्या वेळी संहितावाचन करताना स्वत: महाराज ऐकण्यास थांबून मला प्रेरणा द्यावयाचे. आरंभाच्या काळात फक्त संहितावाचन महाराजांनी करवून त्यानंतर "आता संहिता तयार झाली येथून पुढे थोडा थोडा कथाभाग सांगत जा" अशी आज्ञा केली. अशारीतीने श्रीमहाराजांनी सर्वाथीने मला वेळोवेळी उपदेश करून श्रीमद्‌भागवताची तयारी करवून घेतली.

अशारितीने प्रतिवर्षी श्रावणमहिन्यात मोठया प्रमाणावर 'श्रीमद्‌भागवतकथाज्ञानसोहळा' साजरा होत आहे. यापाठीमागे प. पू. महाराजांचे फार मोठे कृपादान आहे यात शंकाच नाही 'प. पू. वासुदेवानन्दसरस्वती स्वामीमहाराज व प. पू. गुरुमहाराजांच्या परमपवित्र संकल्पशक्ति व प. पू. दत्तमहाराजांच्या परमपवित्र पदस्पर्शाने पुनीत वास्तू म्हणजे' त्रिवेणी प्रयागसंगम आहे. त्याचबरोबर प्रतिवर्षी

आजही प. पू. नारायणकाका ढेकणेमहाराजांचेही प. पू. दत्तमहाराजांच्याप्रमाणे वास्तव्य याच वास्तूमध्ये असते. त्यांनीही प्रतिवर्षी येऊन आशीर्वाद व प्रेरणेतून मला हे कार्य अधिक व्यापक करण्याची पत्र आज्ञा केली. आज प्रतिवर्षी धर्मशाळेचे विश्वस्त साबळे परिवार मोठ्या प्रमाणात ज्ञानयज्ञ सोहळा करतात हे आजचे वैशिष्ट्य आहे.

'श्रीमद्भागवत ही श्रीमहाराजांचा प्राण विषय आहे' वेळोवेळी मला श्रीमद्भागवतातील अंतरंगदर्शनाचे कृपादान देवून माझ्यासारख्या य:कश्चिताकडून सेवा करून घेतलेली आहे.

यांनतर मला श्रीमद्भागवताचे व्यसनच जडले. विविध टीकांच्या अभ्यासाची प्रेरणा श्रीमहाराजांनी दिली. ठिकठिकाणी श्रीमहाराजांचे सप्ताहास उपस्थित राहून त्यांचे टाचण करणे, शक्य असेल तेव्हा रेकॉर्डींग करणे व ते लिहून काढणे. पू. महाराजांचे प्रवचन असो वा सप्ताह असो त्याचे श्रवण, मनन हा अभ्यास सुरु झाला. व जिज्ञासा हा गुण असला तरी जिज्ञासा संवर्धित झाली पाहिजे त्याप्रमाणे जिज्ञासा वाढविण्याचे काम श्रीमहाराज कसे करतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे माझी 'श्रीमद्भागवत ज्ञानयज्ञ सेवा' हे होय. एका गाणगापूरातील मुक्कामात महाराज म्हणाले

**''विश्वासो गुरुवाक्येषु स्वस्मिन् दीनत्वभावना।**
**मनोदोषजयश्चैव कथायां निश्चला मति:''॥**

माहात्म्य अ. ५ श्लोक ४५

गुरुवचनावर विश्वास, अंत:करणात नम्रता, मनातील विकारावर विजय, कथा ऐकताना चित्ताची एकाग्रता आदी नियमांचे

पालन केले तर श्रवणाचे फळ मिळते. असे गोकर्ण महात्म्यात वर्णन आहे. हाही एक अभ्यास आहे.''

असे वेळोवेळी मार्गदर्शन केल्यामुळे माझा अभ्यास दिवसेंदिवस वाढत गेला व त्याचबरोबर आज महाराष्ट्रात सर्वत्र सप्ताहाचे कार्यही पू. महाराजांच्या संकल्पाने चालू आहे. अशा रीतीने एक प्रकारे माझा उद्धारच केला.

हे कृपादान 'ते नित्य निर्वाहे सर्वथा' अशीच श्री महाराजांच्या चरणी प्रार्थना आहे.

पू. गुरुमहाराज व पू. दत्तमहाराज पू. काकामहाराज यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने हे ज्ञानयज्ञ कार्य चालू आहे. यामधून उतराई व्हावे असा माझ्या मनात विचार आला.

तेव्हा श्रीनाथमहाराजांनी केलेल्या प्रार्थनेचे स्मरण योग्य ठरणार आहे ते असे -

.... गुरूला चिंतामणि द्यावा तर तो चिंतिलेले देता देता चिंताच वाढवितो

आणि गुरुनी तरअचिंत्य वस्तु दिली आहे. त्याची फेड कधीच व्हावयाची नाही.

.... गुरूला कल्पतरु द्यावयास जावे तर तो कल्पिलेले देतान कल्पनाच वाढवितो आणि गुरुंनी तर निर्विकल्पता दिलेली आहे. तेव्हा तिची फेड त्यानेही व्हावयाची नाही.

... गुरूला परिस द्यावा तर तो धातूला स्पर्श करून तिचे सुवर्ण करतो परंतु गुरुच्या चरणस्पर्शाने ब्रह्मस्वरुप प्राप्त होते. तेव्हा परीस देऊनही त्याच्या उपकाराची फेड व्हावयाची नाही.

... गुरूला कामधेनु आणून द्यावी तर ती द्रव्य देऊन कामना वाढविते आणि गुरूतर निष्काम बुद्धीने निर्गुणदान देणारे आहेत व तेव्हा त्यांची फेड करावयाला कामधेनूही योग्य नाही.

... देहाने गुरूचे उतराई व्हावे म्हटले तर देह हा नश्वर आहे नश्वराने अनश्वराची फेड तर कधीच होणार नाही हयाप्रमाणे काया, वाचा, मन, धन जीवनात अर्पण करूनही श्रीगुरुंचे उपकार फिटावयाचे नाहीत. त्यामुळे एकच मार्ग म्हणजे

**या लागी मौनेचि जाण। उद्धवे घातले लोटांगण।**
**श्रीकृष्णाचे श्रीचरण। मस्तकी संपूर्ण वंदिले ॥**

याप्रमाणे श्री प. पू. दत्तमहाराजांच्या चरणी विनम्र भावाने प्रणाम करून त्यांच्या श्रीचरणांचे नित्य स्मरण करणेच श्रेष्ठ आहे.

या लेखाच्या रूपाने श्रीदत्तमहाराजांची वाङ्मय पूजा करता आली याचे समाधान वाटते. यानिमित्ताने सेवाकार्यासाठी योग तपस्वी शक्तिपातयोगपीठाधीश्वर प. पू. नारायणकाका ढेकणे महाराजांनी प्रेरणा दिली व ज्येष्ठ गुरुबंधू डॉ. वा. व्यं. देशमुख यांनी वेळोवेळी प्रेरणा दिली. तसेच श्री वासुदेवनिवासचे विश्वस्त श्री आबासाहेब देशपांडे, श्री आघारकर, श्री दामले व प. पू. मोरेश्वरबुवा चऱ्होलीकर यांनी शुभेच्छा देऊन सहकार्य केले त्याबद्दल त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे योग्य आहे.

आणखी असे सांगीतले जाते की, भारतीय व्यक्तींच्या सांस्कृतिक जीवनाचा प्रत्येक दिवसाचा प्रारंभच पुण्यश्लोक संत, जीवन्मुक्त, भगवदभक्त यांच्या मंगलसंस्मरणाने होतो. अशा भागवोत्तोत्तमाचे लक्षण श्रीमद्भागवत ग्रंथाने समर्पकपणे दिले आहे.

**सर्वभूतेषु यःपश्येद् भगवद्भावमात्मनः।**

**भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः॥** ११. २. ४५

आजच्या काळातील भागवतोत्तम असणारे प. पू. वासुदेवानन्दसरस्वती स्वामीमहाराज, प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज, प. पू. श्रीगुरुमहाराज, प. पू. श्रीदत्तमहाराज व प. प. काकामहाराज यांचे जीवन, कार्य आणि तत्वदृष्टी ही श्रेष्ठ ज्ञानी भक्तांचे सजीव साकार दर्शन आहे. त्यांची संकल्पशक्ती, ज्ञान हे सर्वत्र पहाण्यासारखे आहे. त्यांचे संस्मरण, अनुसरण हीच त्यांची अंतरंगभक्ती आहे अशा भागवतोत्तमांना वंदन पुढील श्लोकाने करणेच सार्थ आहे.

**वाणी गुणान कथने श्रवणौ कथायां**

**हस्तौ च कर्मसु मनस्यथ पादयोर्नः।**

**स्मृत्यां शिरस्तव निवास जगत्प्रणामे**

**दृष्टिः सतां दर्शनेस्तु भक्तनूताम् ॥**

स्कं १०/१०/३८

आमची वाणी आपले गुणानुवाद करण्यात नित्य तत्पर असो. आमचे कान आपल्या रम्य कथा श्रवण करण्यात दंग होवोत. आमचे हात आपल्या पूजनादिक कार्यात मग्न होवोत. आमचे मन आपल्या चरणांचे नित्य चिंतन करो. आमचे मस्तक नित्य आपणांस प्रणाम करण्यास तत्पर असो. आणि आमची दृष्टी आपल्या दर्शनाविषयी नित्य उत्कंठित राहो.

श्रीमद्भागवतपाठपरायण, तत्त्वोपदेशक, रहस्योद्घाटक, साक्षात श्रीमद्भागवत, भागवतोत्तम अशा ब्रह्मश्री विद्यावाचस्पती राष्ट्रीय पंडित प. पू. दत्तमहाराज कवीश्वरांचे दीप्तिमान कार्य व तपस्तेज

पाहताना किंवा दर्शन घडण्यास दिव्य चक्षुंचीच आवश्यकता आहे. जे काही समजले ते शब्दरूप केले ही त्यांचीच कृपा . कुठे साक्षात् भागवतोत्तम श्रीमहाराज आणि कुठे मंदमति मी? केवळ सद्गुरुकृपेचे भाग्य लाभले म्हणून ही सेवा झाली.

**जो ज्ञानीयांचा ज्ञान निधी। जो नि बोधच उदधी।**
**जो आनंदाचा क्षीराब्धी**

अशा प. पू. दत्तमहाराजांच्या चरणी सेवा समर्पित करून प्रार्थना की

**त्वदीयं वस्तु गोविंद तुभ्यमेव समर्पये।**
**तेन त्वदंघ्रिकमले रति मे यच्छ शाश्वतीम्।।**

।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

# श्री वासुदेव निवासातील भागवत सोहळा

श्रीमती नीलाताई जोशी

प. पू. श्री. गुरुमहाराजांची फार दिवसांची इच्छा होती की भागवत सप्ताह करावा. पण गोवईकरांच्या दोन खोल्यांच्या जागेत हे शक्य नव्हते. श्रीवासुदेव निवास झाल्यावर महाराजांची ही इच्छा पुरी होण्याचा योग आला. महाराज येणाऱ्या जाणाऱ्या साधकांना, भक्तांना सांगू लागले, की यंदा भाद्रपदात भागवत सप्ताह करावयाचा आहे. अगदी लग्नासारखा सोहळा करावयाचा आहे. सर्वांनी यायचे बरे का! प. पू. श्रीवामनरावजी गुळवणी महाराजांची उत्सवाची पध्दत फार आखीव रेखीव, नीट-नेटकी असे. तयारीला सुरुवात झाली. प्रथम सभामंडप सजला. पताका लावण्यातही विविधता होती. रंगसंगती आधीच केली होती. श्री गुरुमहाराजांचे याकडे जातीने लक्ष असे. तोरणे लागली. ठिकठिकाणी दिव्यांच्या माळा लागल्या. षट्कोनी सभामंडप शोभू लागले. मनाला प्रसन्नता वाटू लागली. दाराशी केळीचे खांब उभारले गेले. चौकात नाविन्यपूर्ण रांगोळ्या घातल्या गेल्या. व्यासपीठ तर फारच सुंदर सजवले होते. बसायला मृगाजीन, टेकायला लोड, पुढे चौरंग त्यावर बाळकृष्णाची सुंदर मूर्ती, त्याही पुढे खाली चौरंगावर एक हास्यमुख कृष्णाचा फोटो. त्यापुढे डवरलेली तुळस, व्यासपीठाभोवती सुंदर

रांगोळी व अखंड तेवती समई अशी सर्व साग्रसंगीत तयारी झाली. श्रीगुरुमहाराज फार प्रसन्न होते. पण त्याचवेळी पुण्यात जातीय दंगल उसळली. कर्फ्यू जारी झाली. दुकाने, मंडई बंद झाली. श्रीगुरुमहाराज थोडेच व्यथित होणार? 'सत्य संकल्पाचा दाता भगवान' असे म्हणून ते शांत होते. मुंबईच्या काही लोकांना प्रेरणा झाली. ते भाजीपाला, केळीची पाने, भरपूर फुले, तुळशी हे सर्व साहित्य बरोबर घेऊन आले. श्रीगुरुमहाराजांना मोठा आनंद झाला. भागवत महात्म्य सांगून झाले तो आदला दिवस. श्रीगुरुमहाराज सभामंडपात शिरल्यावर उजवीकडील खिडकीच्या बाजूला स्थानापन्न होत. श्रीदत्तमहाराज आले. श्रीगुरुमहाराजांना नमस्कार करु लागले. श्रीगुरुमहाराज म्हणाले, "आज आपण व्यास आहात. आम्हीच आपणाला नमस्कार करणार"

उदबत्यांच्या घमघमाट, निरांजनांच्या अनंत ज्योती, सगळीकडे घातलेले सुगंधी फुलांचे हार, वीजेची माफक पण नेत्ररम्य रोषणाई. सारे कसे प्रसन्न वातावरण!

देव्हाऱ्यातील भवानीदेवी मोठी प्रसन्न झाली. हसू लागली होती. श्रीदत्तमहाराजांच्या मस्तकी कोणाच्या न कळत तीने मंत्राक्षता टाकल्या. श्रीवासुदेवानंद सरस्वती, श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांच्या प्रतिमेत मंद स्मित विलसू लागले. अनेक देवता गुप्तपणे आपापल्या जागी येऊन स्थानापन्न झाल्या. श्रीगुरुमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना औक्षण करा असे सांगितले. सौ. गोदूताई-दुर्गाताई- माई-क्षीरसागर इ. सर्वांनी चांदीच्या निरांजनांनी श्रीदत्तमहाराजांना ओवाळले. समारंभाचा असा थाट झाल्यावर

श्रीदत्तमहाराजांच्या मुखातून ज्ञानगंगा वाहू लागली. श्रोत्यांच्या जनमानसापर्यंत पोचू लागली. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे-

**ऐक रसाळपणाचिया लोभा। की श्रवणींची होती जिभा।**
**बोले इंद्रिया लागे कळंभा एकमेका ।।१६।।**
**सहजे शब्दू तरी विषोश्रवणाचा।**
**परी रसना म्हणे हा रस आमुचा ।**
**घ्राणांसि भावो जाये परिमळाचा हा तोचिहोईल।।१७।।**

ज्ञाने. ६वा अध्याय

साऱ्या ज्ञानेंद्रियांनी लोक श्रवण करीत होते. या उत्सवाचे वैशिष्ट्य असे की, काही प्रसंग भावनिर्मितीसाठी मोठया प्रेमाने, अगत्याने केले होते. गोवर्धन पर्वताची पूजा हा प्रसंगसुध्दा मोठया भावभक्तिने केला गेला. लाह्यांचा मोठा पर्वतासारखा उंचवटा करून त्याच्या अवतीभोवती सुरेख सजावट केली होती. श्रीगुरुमहाराजांनी स्वत: त्यावेळी फुलांची आरास केली होती. सुंदर कुंड्या मोठया सौंदर्यपूर्ण दृष्टीने लावल्या होत्या. फळेफुले आकर्षकपणे लाह्यांच्या भोवती मांडली गेली. त्यावर गोपाळकृष्णाची मूर्ती सालंकृत करून ठेवली होती. गोवर्धनाची पूजा पुण्याहवाचन बसवून एका दांपत्याने केली. तुलसीविवाह असाच झाला. मंगलाष्टके म्हणायला चार खास पुरोहित होते. त्यानंतर आशीर्वादाचे मंत्र म्हणायला सहा वेगळे ब्राम्हण होते. बँड होता. लग्न लागल्यावर तो काही वेळ निनादत होता. अत्तर, गुलाबाची फुले, बत्तासे, कॉफी असे सारे काही होते.

दिवसामागून दिवस मागे पडत होते. अन्नदान सढळपणे होत होते. सप्ताहाला बसलेल्या मंडळींचे जेवण आश्रमातच होते.

दोन्हीवेळा चहापाणी वगैरे सर्व व्यवस्था उत्तम ठेवली होती.

दुपारी निरूपणाला अफाट गर्दी होई. मधूनमधून 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे' असा गजर होई. श्रोते मंडळी पुन्हा श्रवणासाठी सावध होत.

श्रीव्यासपुजेचा शेवट गुरुजींच्या मंत्रोपचाराने व पूजेने साजरा झाला. प्रसाद झाला. फळे, हार, उदबत्या, निरांजने या सर्वांची उत्तम व्यवस्था होती. प. पू. श्रीगुरुमहाराजांचा नीट-नेटकेपणा प्रत्येक गोष्टींत दिसून येई. श्रीगुरुमहाराजांनी शांत, स्थिर प्रसन्न मनाने सारे श्रवण केले. दिगंबराची धून आळवित सारेजण भागवताच्या मिरवणूकीत सामील झाले. गीतापठण होऊन शेवटी हा सोहळा संपूर्ण झाला.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे वाचन, निरूपण म्हणजे गंगेच्या ओघाप्रमाणे श्रवणसंपुटावर येणारा एक स्त्रोतच होता. श्रोते, वक्ते प्रसन्न झाले. पहिला सप्ताह दत्तअमरेश्वर मंदिरात प. पू. दिक्षितस्वामींसमोर झाला. वासुदेवनिवास स्थापन झाल्यावर श्रीयोगीराज गुळवणीमहाराजांच्या सानिध्यात हा भागवत सप्ताह झाला. श्रीगुरुमहाराज प्रसन्न झाले. दरवर्षी तितक्याच उत्कटतेने भागवत सप्ताह वासुदेव निवासात सुरु झाले. श्री दीक्षितस्वामी महाराजांनी सुरु केलेली ही गंगा वासुदेव निवासात वहात राहिली.

**श्रीवासुदेव निवासातील श्रीमद्भागवत सप्ताहामागील आधिदैविक पार्श्वभूमि**

लहान वयातच वेदशास्त्राचे अध्ययन पूर्ण केलेल्या दत्तमहाराजांना अवघ्या १६ व्यावर्षी भागवत महापुराणाचा सप्ताह

करायची प्रेरणा दीक्षितस्वामींनीच दिली. शके १८४७ (इ. स. १९२५) पासून दरवर्षी हा प्रौष्ठपदी सप्ताह औरवाड येथे अखंड ४० वर्षे निष्ठेने श्रीदत्तमहाराजांनी केला. १९६५ साली श्रीवासुदेव निवासाची निर्मिती त्यांच्याच पुढाकाराने झाली. तेव्हा हाच प्रौष्ठपदी भागवतसप्ताह प. पू. योगीराज गुळवणीमहाराज यांच्या आज्ञेने श्री वासुदेव निवासात होऊ लागला. श्रीवासुदेवानन्दसरस्वती पीठच पुण्यात आले याचेच हे गमक होय. त्याशिवाय श्रीदत्तमहाराजांसारख्या थोर सत्पुरुषांनी आपल्या नियमात बदल केला नसता. ह्या आमच्या श्रद्धेला बळकटी आणणारी एक अपुर्व घटना १९६५ साली घडली.

## पादुकांची चोरी

औरवाड येथील एका सेवेकऱ्याला, श्रीस्वामीमहाराजांच्या पादुकाच चोरण्याची बुद्धि झाली. संस्थानच्या विश्वस्तांच्या लक्षात आले की पादुका आणि तो सेवेकरी एकदमच अदृष्य झाले! त्यांचा शोध लावण्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाले. पू. दत्तमहाराजांना त्यानंतर काही दिवसातच असा स्वप्नदृष्टांत झाला की, तो सेवेकरी पादुकांचे गाठोडे घेऊन श्रीवासुदेवनिवासात येऊन बसला आहे. आणि २-३ दिवसांत तसेच झाले. सकाळचे आन्हिक आवरुन आश्रमांत आलेल्या दत्तमहाराजांनी स्वप्नदृष्टांतावरुन त्या सेवेकऱ्याला ओळखून त्याला त्या गाठोडयातील पादुका काढायला लावल्या आणि त्याला घेऊन ते श्रीगुरुमहाराजांकडे वरती माडीवर गेले. गुरुमहाराजांसह सर्वांनी त्या पादुकांचे भक्तिभावाने दर्शन घेतले. श्रीगुरुमहाराजांनी त्यावेळी आपल्या मनात ही अनेक दिवसांची इच्छा

असल्याचे सांगीतले. जणू काही श्री. प. प. वासुदेवानन्दसरस्वती स्वामीमहाराजच आपल्या प्रियतम शिष्याला भेटण्यासाठी आले असे सर्व पुणेकर भक्तांना वाटले. त्यानंतर चार महिने त्या पादुका आश्रमात ठेवून सन्मानाने औरवाडला परत केल्या.

ही घटना प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वतींनी श्री वासुदेव निवासात आपला नित्य निवास राहणार असल्याचे आश्वासनच आहे याविषयी आमच्या मनात यत्किंचितृहि संशय नाही. प. पू. श्रीगुरुमहाराज यांनी प. पू. श्रीदत्तमहाराज यांच्याकडे जसा आपल्या मृत्युपत्राच्या मिषाने अंगुली निर्देश केला तसाच प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आपल्या ''आदेशपत्राद्वारे'' प. पू. श्री नारायणकाका ढेकणे महाराज यांच्याकडे करून ह्या वासुदेव निवासाची परंपरा अक्षुण्ण प्रवाहित ठेवली आहे. ह्या अध्यात्मपीठाच्या आश्रयाने सहस्त्रावधी मुमूक्षूंना वाट दाखविली आहे, दाखवीत रहाणार आहे. येथील सर्व साधकांनी गुण्यागोविंदाने ''एकमेका सहाय्य करून'' प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वती स्वामीमहाराजांचा खालील आशीर्वाद ग्रहण करण्यास पात्र व्हावे.

**समानी वो इहाकूतिः समानहृदयानी वः।**
**समानमस्तु वो दत्ते मनो नोऽव्यात्त्र्धीश्वरः॥**

श्रीदत्तपुराण ६४-६८



वे. शा. सं. श्री. दादाशास्त्री व पू. दत्तमहाराज - भगवंत मंदिर बार्शी



पू. दत्तमहाराज आणि पू. डोंगरे महाराज यांच्या भेटीचे दृष्य



श्रीमद्भागवत सप्ताह, दादर - पू. दत्तमहाराज आणि नाना महाराज तराणेकर



श्रीमद्भागवत सप्ताह, वसई - कोसंबीच्या पंडित यांच्या समवेत पू. दत्तमहाराज



भागवतसप्ताह, बीड - कांचीकामकोटीचे जगद्गुरू
श्री जयेंद्रसरस्वतीस्वामी महाराज यांच्याशी बोलताना



बीड येथील भागवत सप्ताह - डावीकडून सौ. आईसाहेब, डॉ. सुरेखा देशमुख,
प. पू. दत्तमहाराज आणि डॉ. दिलीप देशमुख



बीडच्या भागवत सप्ताहाच्या निरूपणाचे दृष्य



बीड येथील भागवत सप्ताह - ग्रंथ मिरवणूक

## प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचा

# बीड मुक्कामी झालेला श्रीभागवतसप्ताह

## दिनांक १५ मार्च ते २२ मार्च, १९८२

डॉ. दिलीप देशमुख
डॉ. सौ. सुरेखा दि. देशमुख, बीड

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा भागवतसप्ताह बीडला आपले येथे व्हावा असे घरातील सर्वांनाच मनोमन वाटत होते. खरं म्हणजे हा योग जुळून येणं - साक्षात ही घटना घडणं हा श्रीमद्‌भगवतीच्या कृपा प्रसादाचा अत्युच्चपरिपाक मानावा लागेल. आज या क्षणी वाटतं की, प. पू. महाराजांचे आपल्या निवासस्थानी येणे - देवी भगवतीच्या उपासनेचा संकल्प करवून घेणे- घरातील सर्वांना गुरुमंत्र व दीक्षा प्रदान करून कृतार्थ करणे - खरेच पुर्वसुकृताची ही सर्वांत मोठी देणगी मानावी लागेल.

प. पू. दत्तमहाराजांच्या प्रमाणे प. पू. सौ. आईसाहेबांचेपण लक्ष होते. अत्यंत प्रेमार्द्र नजरेने आणि मायेने त्या सगळयांकडे पहात, सगळयांच्या मध्ये वावरत असत. प. पू. ताईमहाराजांचे प. पू. महाराज व प. पू. श्रीआईमहाराजांच्या सोबत अनेकदा येणे होत असे. त्यांच्या अबोल, हसतमुख व सतत ध्यानमग्न मुर्तीची नित्य आठवण होते. 'जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले त्यामुळे सद्‌गुरु कृपाप्रसाद मिळून अवघेची जीवन कृतार्थ झाले' असे म्हणावे लागेल.

सन १९८२ च्या जानेवारी महिन्यात माझ्या सासूबाई सौ. सिंधुताई देशमुख पुण्याला पुण्यतिथी निमित्त गेल्या होत्या, त्यावेळी त्यांनी प. पू. महाराजांना त्यांचा श्रीमद्‌भागवतसप्ताह बीडला व्हावा अशी विनंती केली. पूर्वनियोजित कार्यक्रम बरेच असल्यामुळे या सप्ताहाचे आयोजन होणे कठीणच होते. पण आमच्या मनातील आर्तता प. पू. गुरुमाऊलींनी जाणवली असावी आणि त्यांनी १४ मार्चलाच बीडला येण्याचे कबूल केले. आम्हा सर्वांना खूपखूप आनंद झाला. साऱ्या घरात जणु चैतन्यच फुलले. ती. सौ. सासुबाईंनी प. पू. महाराजांच्या सप्ताहाचे व इतरही अनेक नैमित्तिक कार्यक्रम पाहिले असल्यामुळे त्यांना त्यांच्या भव्यतेची जाणीव होती, पण आम्हां उभयंतांना कार्यक्रमाच्या आवाक्याचा अंदाज नव्हता. खर्चाच्या संदर्भात माहिती नव्हती. घरही लहान - माळवद व पत्र्यांचे फारसे नीटस पण नव्हते. पण प. पू. महाराज येथे येऊन रहाणार या कल्पनेनेच मन भरून आले होते. सगळया तयारीला वेळ पण थोडाच होता. आता हे सगळे आठवले म्हणजे विदुराघरच्या कण्या व सुदामाचे पोहे गोड मानून तृप्तीने ग्रहण करणारे श्रीकृष्ण परमात्माच गुरुमाऊलीच्या रूपाने साक्षात प्रगटले होते - त्यांच्या रूपानेच वास करीत होते. असे वाटते. इतकी दयार्द्र बुद्धी व तितीक्षा वृत्ती प. पू. महाराजांचे ठायी होती.

डॉ. दिलीपची सरकारी नोकरी होती व मला ही प. पू. महाराजांचे कृपेने नव्यानेच आयटीआयमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून नोकरी मिळाली होती. पण दोघांनाही गुरुमाऊलींच्या कृपेने त्या काळात रजा मिळाल्यामुळे व्यवस्थित जमले. घराचे अंगण मोठे असल्यामुळे

हा कार्यक्रम घरगुती करावा असे वाटले होते. प. पू. महाराजांचे कानी वरील गोष्ट घातली असता त्यांनी पुढील पत्र पाठवले.

श्रीदत्त

देऊळगांवराजा

दिनांक १. ३. १९८२

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम.

आपले पत्र मिळाले, त्याप्रमाणे येथील कार्यक्रम ४ मार्चला संपल्यानंतर इकडे जवळच एका गावी काही कार्यक्रम ठरलेला आहे. तो आटपून बीडला येण्याचे ठरवीत आहे. काळजी नसावी. ११ तारखेस टेंभूर्णीचा कार्यक्रम संपवून आम्ही येथे १२ तारखेस मुक्कामास येऊ नंतर दुसरे दिवशी शनिवारी संकष्टी आहे. त्या दिवशी १३ तारखेस सकाळी स्नानसंध्या उरकून बीडला जाण्यास निघता येईल. तरी आपली गाडी १२ तारखेस सायंकाळी किंवा १३ तारखेस सकाळी येथे आल्यास लगेच येथून निघणे शक्य आहे. संकष्टीला आम्हाला उपोषण आहे रात्री जेवणे होईल. तेथे जनीजनार्दनांच्या मंदिरात सप्ताहाचा कार्यक्रम करता येईल असे सौ. सिंधुताई म्हणाल्या. रविवारी १५ तारखेस सप्ताहारंभ होईल. चि. वासुदेव सकाळचे मूलसंहिता-वाचन स्वस्थतेने करील. दुपारी २ ते ६-६॥पर्यंत अर्थकथन आम्ही करु. २१ तारखेस एकादशीला सप्ताह समाप्ती होईल. द्वादशीस नैवेद्य होऊन कार्यक्रम संपेल. २३ तारखेस आम्ही देऊळगांवी परत येऊ. येथे ४ दिवस थांबून येथील कार्यक्रम आटपून पुण्यास परत जाऊ. याप्रमाणे आपणांस कळविले आहे. याप्रमाणे करावे. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे

आपला दत्तात्रेय कवीश्वर

श्रीराम मंदिरद्वारा वे. पुरुषोत्तमशास्त्री मुळे, पोस्ट टेंभुर्णी जि. बुलढाणा या पत्त्यावर उत्तर देणे. -उत्तर पाठविले तरी ते लगेच आम्हाला मिळेल.
-- दत्तात्रेय कवीश्वर

एखाद्याच्या घरात सप्ताह वाचन झाले तर आमंत्रणाचा अडसर रहातो त्या ऐवजी मंदिरात केला म्हणजे सर्वांना मुक्तपणे तेथे येता येते. निमंत्रणाची गरज नसते असे बोलता बोलता त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या नियोजनाचा अनुभव नव्हता, धनसंचय नव्हता. या जागेत नव्यानेच रहावयास आलो असल्यामुळे अजुबाजूच्या लोकांशीही फारसा घनिष्ठ परिचय नव्हता. पण मनात मात्र अपार उत्साह होता. काही अडचणी येतील का? सगळे व्यवस्थित होईल का? याबद्दल मात्र अजिबात संदेह नव्हता. सगळे आप्तस्वकीय जमा झाले, माझ्या मावस सासूबाई सौ. क्षीरसागर, सौ. मधुमावशी राहेरकर व भुजंगराव काका राहेरकर, श्री बाबुमामा आजेगांवकर, श्री जगन्नाथकाका कहाळेकर ही व इतर जावा-नणदा वगैरे मंडळी सुरुवातीपासूनच होती. पू. श्री वासुदेवमहाराज कवीश्वर यांचेही आगमन झाले होते. वे. श्री. धुंडीराजशास्त्री पाटांगणकरानी अत्यानंदाने पाटांगण वापरण्यास दिले व सर्वातोपरी सहाय्य केले. ''आमचे पूर्वसुकृतच उदयाला आले'' असे ते म्हणाले.

ठरल्याप्रमाणे १२ तारखेस प. पू. महाराज व श्री रघुनाथराव मुक्कामास बीडला आले. त्यावेळी पाटांगणावर श्री श्रृंगेरी पीठाधिश श्रीमत् शंकराचार्यांचा मुक्काम होता. दुसरे दिवशी सकाळी ९ वाजता प. पू. महाराज श्रीमत् आचार्यांचे दर्शनास गेले. त्यांना अती आदराने आसन प्रदान करण्यात आले. प. पू. आचार्यांनी त्यांना जवळच बसवून

घेतले व त्यांच्या मानसन्मानाकडे जातीने लक्ष दिले. दोघेही संस्कृतमध्ये वार्तालाप करीत होते. आम्ही मात्र अत्यंत कुतूहलाने तो सोहळा पहात होतो. हिमालयाची उंची असणारी त्यांची विद्वत्ता व ऋजुता ही कल्पनातीत आहे हे सारखे जाणवत होते.

पाटांगणावरील कार्यक्रम आटपून आम्ही सर्व जण ११ च्या सुमारास घरी परत आलो. भोजनोत्तर प. पू. महाराज व श्री रघुनाथराव वामकुक्षी करीत होते. प. पू. श्रीमत् आचार्यही भिक्षेनंतर पुढील मुक्कामी प्रयाण करणार होते.

पाटांगणावर जमलेल्या भक्तगणांना प. पू. महाराजांच्या भागवत सप्ताहाबद्दल माहिती देण्यासाठी दुपारी २ च्या सुमारास डॉ. दिलीप तेथील नोटीसबोर्डवर लिहिण्यासाठी गेले असता तेथील प. पू. आचार्यांच्या शिष्यवृंदापैकी एकाने त्यांना पाहिले व आमच्याच घरी प. पू. दत्तमहाराज उतरले असल्याची त्यांची खात्री झाली. कारण आचार्यांच्या प्रयाणाची वेळ झाली होती, म्हणून त्यांनी प. पू. महाराजांना बोलावून आणण्याची आज्ञा केली. त्याशिवाय ते प्रस्थान करण्यास तयार नव्हते. सगळीकडे विचारपुस सुरू झाली. "आचार्य को बुलाव" असे प. पू. शंकराचार्यांचे सारखे फर्मान येऊ लागले त्यामुळे वरीलच शिष्याने भेटून सांगितले की, "आपके घरमे जो आचार्य ठहरे हुए हैं उन्हीको जल्दी लेकर आयो - श्रीमत् शंकराचार्यजी उन्हीके लिए रुके हुए हैं!"

डॉ. दिलीप धावतपळत घरी आले व प. पू. महाराजांना हे सर्व सांगितले. प. पू. महाराज गडबडीने उठले व खांद्यावर उपरणे टाकून अनवाणीच अति त्वरेने पाटांगणाकडे अक्षरश: धावले.

त्यांच्यातील उत्कटता पाहून आम्हीही थक्क झालो. प. पू. शंकराचार्य त्यांचीच वाट पहात होते.

''आइये आचार्यजी'', असे त्यांना संबोधून अत्यंत प्रेमाने त्यांनी त्यांना जवळ बसवून घेतले. सभोवारच्या भक्तगणांना उपदेशपर संबोधन केले व प. पू. दत्तमहाराजांचा यथोचित सत्कार करून श्रीशारदंबेचा फोटो प्रसाद रुपाने दिला. प. पू. महाराजांनी तो मस्तकी धारण केला व सप्ताह समाप्तीनंतर आम्हाला प्रसाद म्हणून दिला. ती. जगन्माता शारदांबा त्यांचे कृपेने येथील देवघरात पूजेमध्ये आहे. पूज्य व्यक्तीसंबंधी त्यांनी दाखविलेला आदरभाव व प. पू. आचार्यांचे प. पू. महाराजांवर असलेले उत्कट प्रेम पाहून मन खूप भारावून गेले.

दुसरे दिवशी संध्याकाळी ''गोकर्ण माहात्म्य कथन'' झाले व १५ तारखेपासून 'श्रीमद् भागवतसप्ताहारंभ' झाला. पाटांगण श्रोत्यांनी पूर्णपणे भरुन जायचे. सकाळपासून ते संध्याकाळी ७-७॥ पर्यंत निरुपण व्हायचे. सगळेजण भक्तीरसात डुंबून जायचे. अगदी 'कानात प्राण आणून ऐकणे' ही म्हण सार्थकी लागत असे. पाटांगणावर अनेकदा इतरही व्यक्तींकडूनही भागवत कथन होत असे. व अनेकदा भागवत सप्ताह ऐकणारे श्रोतेही बरेच होते पण प. पू. महाराजांच्या वाणीला असणारी गोडी, त्यांतील भावुकता, अनुभूतीच्या ओलाव्यातील शब्दरचना, मधेच प्रसंग वर्णन करताना दाटून येणारा गहिवर, त्यामुळे आवाजातील किंचित जाणवणारा कंप अन् त्यानंतर येणारा सडेतोडपणा यासगळयां गोष्टींनी श्रोत्यांची उत्कंठता वाढवित असे. आजही त्या ध्वनिफिती ऐकतो तेव्हा त्यांच्या आवाजातील भक्तीरसाने चिंब झालेले भाव त्या प्रसंगाची आठवण करून देतात.

खरोखरच शब्द अपुरे पडतील असा सोहळा संपन्न होत होता.

फक्त अगदी थोडया वेळाचीच मध्यंतर होऊन प. पू. महाराज मांडीही न बदलता अत्यंत एकाग्रेतेने अर्थ सांगत. त्यांची नजर समोरच्या ग्रंथराजावरून परतत्त्वाला स्पर्श करणारी वाटत असे. त्यातील सर्वच्या सर्व प्रसंग साक्षीभूतपणे न्याहाळत असून ते सर्व जसेच्या तसे विदित करत असावेत असे वाटे.

पोथी समोरील सर्व धान्य व्यवस्थितपणे गोळा करून पोतीच्यापोती भरुन ठेवली जात असत. शेवटच्या दिवशी मध्यंतरामध्ये त्यांतील अर्धे धान्य वे. श्री. धुंडीराजशास्त्रींना प. पू. महाराजांनी दिले व शाल व श्रीफळ देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला. हे त्यांचे औदार्य पाहून वे. श्री. धुंडीराजशास्त्रींना फार गहीवरुन आले. त्यांना अश्रु आवरत नव्हते. "आपण याचा प्रसाद बनवून सर्वांना द्यावा" असे प. पू. महाराजांनी सुचविले.

शेवटचे २-३ दिवस प. पू. सौ. आईसाहेब त्यांच्या भगिनीसह इथे आल्या. प्रत्यक्ष श्री लक्ष्मीनारायणाचा वास या वास्तूत राहिल्यामुळे आनंदाच्या ऊर्मी दाटून येत होत्या. सगळीकडे गप्पांना, विनोदाला, आनंदाला उधाण येत होते. प. पू. सौ. आईसाहेब सगळीकडे जातीने लक्ष देत होत्या. आधीच्या रात्रीच्या 'लाडू वळणे' कार्यक्रमात तर गाणे, उखाणे, गप्पा, थट्टा विनोद यांना पूर आला होता. माझ्या सासूबाई व इतर बहिणी प. पू. सौ. आईसाहेबांना 'वहिनी' म्हणून संबोधित, त्यामुळे नणंद भावजयीच्या नात्यातील अकृत्रिम प्रेमभावाचे प्रदर्शनही तेथे होत असे.

समाप्तीच्या दिवशी खूप लोक प्रसादाचे भोजनास आले. वरचेवर स्वयंपाक बनविला जात होता. मंडळी वाढत्या संख्येने येऊन जेवून जात होती. कुठेही कमतरता पडली नाही. प. पू. महाराजांनीच हे सर्व घडवून आणले. रात्री उशीरापर्यंत जेवणावळी चालल्या. स्वयंपाक्याच्या मदतीला प्रसाद घेण्यासाठी आलेल्या महिलाही धावल्या. सगळयांनी आनंदाने व भरभरून मदत केली. प. पू. महाराज जातीने चौकशी करीत होते. "अजून किती मंडळी राहिली आहेत" 'तुम्ही भोजन केले का?' असे विचारीत. 'मराठवाडयात अन्नदान भरपूर केले जाते' असे म्हणत. सर्वही जण प्रसाद घेऊन तृप्त झाले. दिवसभर धावपळ झाली पण अति प्रसन्न वाटत होते. अजिबात दमणूक झाली नाही.

दुसरे दिवशी 'श्री नवचंडीयाग' करावा असे डॉ. दिलीपच्या मनात आले. प. पू. महाराजांनी अनुमती दर्शविली व झटपट तयारी करून घेतली. सगळे ब्रह्मवृंद तयार होते. अन अशा रीतीने या वास्तुतील पहिला नवचंडीयाग प. पू. महाराजांनी करवून घेतला. त्यांच्या आशीर्वादाने २३ मार्चला हा याग संपन्न झाला.

दिनांक २४ मार्चला प. पू. महाराजांनी आम्हा उभयतांना व सासरे श्री प्रभाकरराव (अण्णाकाका) यांना गुरुमंत्र दिला. सगळे जीवनच कृतार्थ करून टाकले. नंतर सगळी मंडळी देऊळगांवराजाला गेली. तिथेही उरलेले सर्व धान्य प. पू. महाराजांनी दिले व सर्वजण पुण्याला परत आले.

डॉ. दिलीपची लहानपणापासूनची इच्छा होती की, आपल्या उत्पन्नाचा दहावा भाग नित्य नियमाने देवीप्रीत्यर्थ खर्च करावा. प. पू.

महाराजांनी निरूपणामध्ये आपल्या संपत्तीचा विनियोग कसा करावा यासंबंधी मार्गदर्शन केले होते. ते असे - २०% धर्मकार्यासाठी खर्च असावा - २०% भाग उपभोगासाठी खर्च करावा - २०% बचत करावी - २०% परिवारासाठी व पौष्यवर्गासाठी खर्च करावा व शेवटचे २०% नावलौकीक वाढवून किर्ति संपादन करण्यासाठी व्यय करावा पण संकल्पीत केलेल्या १०% चा विनियोग देवीप्रीत्यर्थ कसा करावा याबद्दल मनामध्ये संभ्रम होता. कारण श्री योगेश्वरीदेवी मंदिर आंबेजोगाईचे बांधकाम सुरु होते त्यास द्यावे की काय असे वाटायचे, पण प. पू. महाराजांनी - श्री नवचंडीयाग करून दानधर्मादि कर्म करावीत, अन्नदान करावे असे मार्गदर्शन केले व पुढे संपुटित नवचंडी, शतचंडी, संपुटित शतचंडी, सहस्त्रचंडी, संपुटित श्रीसहस्त्रचंडी व श्रीअयुतचंडीयाग स्वत:च्या मार्गदर्शनाखाली जातीने उपस्थित राहून करवून घेतले.

अकलूजला पोहोचल्यानंतर १. ४. ८२ ला पत्र पाठविले ते असे ---

श्रीदत्त

अकलूज दिनांक १. ४. ८२

सप्रेम नमस्कार वि. क्षेम.

आम्ही येथे येऊन दोन दिवस झाले. उद्यापासून येथे सप्ताह सुरु होत आहे. येथे सकाळी ७॥ ते १० व संध्याकाळी ६॥ ते ८॥ अशा दोन वेळा प्रवचनाच्या ठेवल्यामुळे पुष्कळ विश्रांती मिळते. तिथे आपणही सर्वांनी मोठया उत्साहाने, अत्यंत परिश्रम घेऊन सप्ताहकार्य उत्तम प्रकारे

पार पाडले. श्री दिलीपराव व सौ. सुरेखाताई या दोघांनीही तनु, मन, धनाने हे कार्य पूर्णतेस नेले. त्यावेळी नित्याचा व्यवसायही त्यांनी स्थगित केला ही ईश्वराची कृपा व आपली आणि सौ. सिंधुताईंची मोठी पुण्याई आहे. त्यांच्या विशेष आग्रहानेच सौ. सिंधुताई पुण्यास आल्या - जालन्यास आल्या आणि हे कार्य शेवटी त्यांनी ठरवून पार पाडले. त्यामुळे आम्हालाही बीडला येता आले व श्री शंकराचार्यांचे दुर्लभ दर्शन घडले. अनेक धर्मप्रेमी भाविक मंडळींचा सहवास झाला. त्यामुळे समाधान झाले. येथून आम्ही ९-१० तारखेस पुण्यास जाऊन तेथून १४ तारखेस रात्री रेल्वेने वाडीस श्री नारायणस्वामींच्या उत्सवाकरीता जात आहोत. तेथून २४ तारखेस परत आल्यावर २-३ आठवडे पुण्यास मुक्काम होईल असे वाटते. सौ. सिंधुताई, श्री बाबुराव बेलेश्वरकर, श्री डॉ. दिलीप, सौ. डॉ. सुरेखाताई, श्री शंकर, कुमारी मानसीताई सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आपला

दत्तात्रय कवीश्वर

कर्तेकरवीते प. पू. महाराजच आहेत हे सर्व ज्ञात असूनही त्यांनी घरातील सर्वांना त्याचे श्रेय दिले. प्रत्यक्ष परमेश्वरच अशी लिला करु शकतात.

प. पू. गुरुमाऊलींच्या दर्शनातील सहवासाचे क्षण आठवले की, उर भरुन येते - शब्द तर खूपच अपुरे पडतात. कितीतरी गोष्टी सांगायच्या राहून जातात. मनातला दाटून आलेला गहिवर अश्रुधारांनी भरभरुन वहात रहातो.

प. पू. महाराज हे घरातलेच एक वाटायचे, त्यामुळे यथोचित सत्कार कधी केला नाही, पायघडया घालून कधी स्वागत केले नाही. घरातील सर्व जण अवतीभोवती गप्पा मारत बसत असू. त्यांच्या जेवणाखाण्याकडे किंवा विश्रांतीकडे अधिक लक्ष दिले गेले नाही. एवढेच काय पण दक्षिणेप्रित्यर्थ धनराशीही अर्पण केली नाही. फक्त प. पू. महाराज इथे येणार या कल्पनेनेच अत्यंतिक आनंद व्हायचा, सगळे आप्त स्वकीय जमायचे. दिवाळी दसऱ्याप्रमाणे उत्सव व्हायचा. अन् त्यांचे प्रयाण झाले की उदास वाटायचे, खूप रितेपण जाणवायचे. अगदी मांडप वारे लागायचे.

आता हे सगळे आठवले की उरात गहिवर दाटून येतो. प. पू. महाराजांनी आपले सर्व लाड केले, सगळया मागण्या पूर्ण केल्या, त्यांना त्रास होत असला तरी त्यांनी तो आनंदानी सहन केला. त्यांच्या सहवासातील सुखदआठवणींचा चिरंतन ठेवा हीच समृद्धी व सुख आहे. प. पू. महाराजांचे व प. पू. सौ. आईसाहेबांचे सदैव लक्ष असते. त्यांचे अहोरात्र आम्हासर्वांना स्मरण रहावे ही दत्तप्रभूचरणी प्रार्थना!

***

# पूजनीय श्रीदत्तमहाराज कवीश्वर
# यांच्या दिल्ली महानगरीत झालेल्या
# दोन यात्रांच्या काही आठवणी

गु. भ.-उ. र. कुर्लेकर

सरकारी नोकरी निमित्त माझे दिल्ली येथे प्रदीर्घ काळ वास्तव्य झाले. त्याकाळात पू. श्रीदत्तमहाराजांचे दिल्लीस दोन वेळा येणे झाले होते. प्रथम सन १९८० च्या मार्च महिन्यात दिल्ली येथील जनकपुरी भागात श्रीदत्तविनायक मंदिरातील श्रीगणेश व श्रीदत्त या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा झाली, त्यावेळी पूजनीय श्रीदत्तमहाराज श्रीजगन्नाथबुवा पुजारी व आणखी दोन वैदिक ब्राह्मण (वेदमूर्ती श्री सप्रे व वेदमूर्ती श्री नवाथे) यांच्यासह दिल्लीस आले होते. दिनांक १३ मार्च १९८० रोजी झेलम एक्स्प्रेसने बरोबरच निघाले होते. प्राणप्रतिष्ठा सोमवार दिनांक १७ मार्च १९८० रोजी गुढीपाडव्या दिवशी व्हावयाची होती. त्यासाठी पू. नानामहाराज तराणेकरही इंदूरहून येणार होते. पू. श्रीदत्तमहाराज व श्री जगन्नाथबुवा दिल्लीस शनिवार दिनांक १५ मार्च १९८० रोजी पोचले, सोमवार दिनांक २४ मार्च १९८० ला रामनवमी होती. त्या दिवशी रामजन्म साजरा केला व मंगळवार दिनांक २५ मार्च १९८० रोजी सकाळी दिल्लीहून पुण्यासाठी रवाना झाले. अशा तऱ्हेने दिनांक १५ ते २४ मार्च १९८० असा एकूण दहा दिवस पू. श्रीदत्तमहाराजांचा श्रीजगन्नाथबुवांसह दिल्लीत मुक्काम होता. दोघे वैदिक ब्राह्मण प्राणप्रतिष्ठेनंतर लगेचच पुण्यास परतले होते. या दहा दिवसांत प्रथम

जनकपुरीत, नंतर किडवाईनगर येथे माझ्या घरी, व शेवटी किडवाईनगरच्या समोरच असलेल्या ऑल इंडिया मेडिकल इन्स्टिटयूटमध्ये डॉ. ना. कृ. भिडे यांच्याघरी असे तीन ठिकाणी पू. श्रीदत्तमहाराजांचे व श्री जगन्नाथबुवांचे वास्तव्य झाले.

**प्राणप्रतिष्ठा**

जनकपुरीमध्ये संपन्न झालेल्या दोन मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठेच्या सर्व धार्मिक विधींकडे पू. श्रीदत्तमहाराजांचे पूर्ण लक्ष असे. श्री जगन्नाथबुवा तर इतर दोन वैदिक ब्राह्मणांबरोबर ते धार्मिकविधी चालविण्यातही सहभागी झाले होते. त्यावेळी दिल्ली येथे रामकृष्णपुरम भागातील श्रीविठ्ठलमंदिरात नित्य पूजा-अर्चा करण्यासाठी नागपूरच्या आर्वीकर पाठशाळेत शिकून तयार झालेले व लौकीक शिक्षणही बी कॉम पर्यंत झालेले एक तरुण वैदिक श्री हरिहर खंडेश्वर यांस दिल्लीकर मराठी मंडळींनी मुद्दाम नागपूरहून दिल्लीस आणून, येथे सरकारी नोकरी मिळवून देऊन स्थायिक करण्याचा प्रयत्न केला होता. जनकपुरीतील मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठेच्या धार्मिकविधींमध्ये तरुण हरिहर खंडेश्वरही पुण्याहून आलेल्या वैदिक ब्राह्मणांबरोबर उत्साहाने भाग घेत होते. त्यांना स्वत:ला करवती काठी उपरणे पांघरण्याची लहानपणापासून फार आवड होती. पण करवतीकाठी उपरणी नागपूरास मिळत नसत. दिल्लीत करवतीकाठी उपरणे विकत मिळण्याचा प्रश्नच नव्हता! कोणाचे याकडे लक्षही नव्हते! पण प्राणप्रतिष्ठेचे सर्व धार्मिकविधी पूर्ण झाल्यावर त्या धार्मिकविधींकडे आस्थेने लक्ष देणाऱ्या पू. श्रीदत्तमहाराजांनी श्री हरिहर खंडेश्वरांना जवळ बोलावून आपल्या अंगावर असलेले करवतीकाठी उपरणे मोठ्या प्रेमाने त्यांच्या अंगावर घातले! त्यामुळे

श्रीहरिहर खंडेश्वरांना मनोमनी जो आनंद झाला तो काय वर्णावा! आपल्याला करवतीकाठी उपरणे आवडते हे पू. श्रीदत्तमहाराजांना कसे कळाले याचेच आश्चर्य त्यांना वाटत राहिले!

पू. श्रीदत्तमहाराज दुसऱ्याच्या मनातील विचार जाणत असत. पण ही गोष्ट त्यांनी कधीही कोणाच्या लक्षात येऊ दिली नाही!.

**व्यसनीमाणूस देवाच्याकृपेला अपात्र**

याच मुक्कामांत पू. श्रीदत्तमहाराज माझ्या घरी असताना माझे ज्येष्ठ वयाचे मित्र श्री हरिभाऊ तावडे माझ्याकडे महाराजांच्या दर्शनासाठी म्हणून आले. वास्तविक श्री हरिभाऊ ब्रह्मचारी होते व त्यांना स्वत:चा प्रपंच काहीच नव्हता! पण आपल्या धाकट्या भावासाठी हरिभाऊ चिंतीत झाले होते. त्यांचा धाकटा भाऊ जयंत तावडे हा उत्तमपैकी पायलट होता. पण जयंत तावडे पुढे वाईट संगतीमुळे दारु पिऊ लागला आणि त्या व्यसनाच्या तो इतका आहारी गेला की, राष्ट्रपतींच्या निवडक विमानचालकांच्या पथकातून तर त्याला काढून टाकलेच पण विमान चालविण्याच्या कामातूनही कमी करून "वायुसेना भवन" मध्ये टेबलावर बसून फाईलींचे कारकूनी काम करण्यासाठी त्याला ठेवले. पूर्वीचा सर्व रुबाब गेला. पण दारूचे व्यसन वाढतच गेले. तब्येत बिघडल्यामुळे उपचारांसाठी हॉस्पिटलमध्ये ठेवले असता तेथेही तो चोरुन दारू पित असे. त्यामुळे श्री हरिभाऊ चिंतित होते. ते पू. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनास त्यासाठीच आले होते! पू. श्रीदत्तमहाराजांच्या पायांना हात लावून त्यांना नमस्कार करण्यासाठी हरिभाऊ वाकले; पण महाराजांनी चटकन पाय मागे घेतले व "पायाला हात लावू नका" असे त्यांनी हरिभाऊंना सांगीतले. श्री हरिभाऊ

व्यथित झाले, तेव्हा त्यांच्या धाकट्या भावाची हकिकत मी महाराजांना सांगीतली. पण "लोण्याहूनही मऊ आम्ही विष्णुदास!" या कोटीतल्या श्रीदत्तमहाराजांनी हरिभाऊंशी बोलण्यास नकार दिला. दारू पिणाऱ्या माणसाला राष्ट्रपतींच्या विशेष पथकातून काढले यात काय चुकले? असेच महाराजांनी विचारले. आपल्याला पू. महाराजांनी काही उपाय सांगावा अशी हरिभाऊंची अपेक्षा होती. पण आचरण सुधारल्याशिवाय, दारू पिणे बंद केल्याशिवाय काहीही होणार नाही असे त्यांनी हरिभाऊंना सांगीतले. हरिभाऊ आणखीच दु:खी झाले. तेव्हा मी मध्ये पडून पू. महाराजांना म्हणालो की, 'महाराज, आम्ही श्रीटेंबेस्वामी महाराजांच्या "प्रश्नावली" मध्ये प्रश्न विचारला व त्याच्या उत्तरात काही करण्याबद्दल सांगण्यात आले आहे' पण दारू पिण्याचे सोडून मनापासून पश्चाताप होऊन देवाला शरण गेल्याशिवाय काही उपयोग होणार नाही असेच महाराजांचे म्हणणे पडले. **महाराज कनवाळू असले तरी दुराचाराला संरक्षण देणारे नव्हते.** आणि आचरणाच्या बाबतीत कोणाची भिडभाडही ठेवित नसत. श्री हरिभाऊ तावडे आले तसेच परत गेले; कोणाचाच काही इलाज नव्हता.

## पितृश्राद्ध

मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेनंतरही दोन दिवस पू. श्रीदत्तमहाराजांचे वास्तव्य जनकपुरी भागातच होते. या दोन्ही दिवशी त्यांची प्रवचने श्रीदत्तविनायक मंदिरात झाली. बुधवार दिनांक १९ मार्च १९८० रोजी चैत्र शुद्ध (विनायकी) चतुर्थीला पू. श्रीदत्तमहाराजांच्या पिताजींचे (पू. श्रीधुंडीराज महाराज यांचे) श्राद्ध होते. दिल्लीत येण्याचे आमंत्रण स्वीकारतानाच पितृश्राद्धाबद्दल महाराज पुण्यातच बोलले होते व त्याची

व्यवस्था दिल्लीत केली जाईल हे ही आधीच स्पष्ट ठरलेले होते. त्याप्रमाणे श्राद्धाची व्यवस्था श्री जाखडी यांच्या साऊथपटेलनगर येथील घरी केलेली होती. तेथील श्राद्धविधीचा कार्यक्रम आटोपून संध्याकाळी महाराज पुन: जनकपुरीत आले. तेथे चतुर्थी निमित्त श्रीगणपत्यथर्वशीर्षाची आवर्तने झाली व त्यानंतर पू. श्रीदत्तमहाराजांचे छोटेसे प्रवचन झाले. या दोन्ही प्रवचनात महाराजांनी मंदिराची इमारत बांधणे, मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करणे इ. गोष्टी उत्साहाने होतात; पण मंदिराचे पुढे महत्त्व वाढविण्याच्या दृष्टीने तेथे शास्त्रशुद्ध उपासना नित्य नियमाने व निष्ठेने होणे आवश्यक असते, या गोष्टींवर भर दिला. काही लोक आपल्या घरचे देव श्रीदत्तविनायक मंदिरात आणून ठेवतील व त्यांची पूजा मंदिरातर्फे व्हावी अशी अपेक्षा करतील असे सूचित करून महाराज पुढे म्हणाले की, ज्यांनी मंदिरासाठी, मूर्तीसाठी व इतर कारणासाठी आर्थिक मदत केलेली असेल त्यांनी त्यामुळे मंदिरावर आपली मालकी आहे असे न मानता ''इदं न मम''ही भावना समजून घेऊन मंदिरातील उपासनेला प्राधान्य द्यावे, मंदिराचा महिमा वाढवावा व कायम राखावा.

त्यानंतर पू. श्रीदत्तमहाराज श्री जगन्नाथबुवांबरोबर श्री आजगांवकर यांचेबरोबर त्यांच्याच गाडीतून त्यांच्या लाजपतनगर येथील घरी मुक्कामास गेले. श्री आजगांवकर हे मुळचे कारवारचे असून त्यांना पू. श्रीगुळवणी महाराजांकडून शक्तिपात दीक्षा मिळालेली होती. ही गोष्ट त्यांनी श्रीआनंदमयी मॉ या सुप्रसिद्ध बंगाली योगिनींना जेव्हा सांगीतली तेव्हा ''तुम्ही खरोखरच फार भाग्यवान आहात'' असे आनंदमयी मॉ त्यांना म्हणाल्या होत्या. या गोष्टीचा श्री आजगांवकर

नेहमी अभिमानाने उल्लेख करीत असत. ते अतिशय सश्रद्ध व भाविक असे साधक होते. त्यामुळे पू. श्रीदत्तमहाराजांना ते अतिशय आदराने आपल्या घरी मुक्कामासाठी घेऊन गेले. दुसरे दिवशी सकाळी गुरुवार दि. २० मार्च १९८० रोजी त्यांचेकडे पाद्यपुजा झाली. संध्याकळी श्री आजगांवकर यांनी पू. श्रीदत्तमहाराजांना कुतुबमिनार पहाण्यास नेले. तेथून परतताना वाटेत रामकृष्णपुरम येथे श्री वा. द. पुराणिक यांच्याकडे आरतीचा कार्यक्रम उरकून महाराज माझ्या कीडवाईनगर येथील घरी श्रीजगन्नाथबुवांसह रात्री ८।।च्या सुमारास मुक्कामासाठी येऊन पोचले. जेमतेम अडीच दिवसच पू. श्रीदत्तमहाराजांचा मुक्काम या खेपेस माझ्या घरी होता. पण तेवढ्या काळात मला जो महाराजांचा सत्संग लाभला तो मला पुढे जन्मभर पुरला!

**साधनाविषयी मार्गदर्शन**

शुक्रवार दि. २१ मार्च १९८० रोजी पहाटेच साडेपाच वाजता मी पू. महाराजांच्यापुढे साधनेला बसलो. मला पू. श्रीगुळवणीमहाराजांकडून संकल्प दीक्षा सन १९७३ च्या ऑक्टोबरमध्ये दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी मिळाली होती. त्यानंतर लगेचच तीन साडेतीन महिन्यात म्हणजे १५ जानेवारी १९७४ ला पू. श्रीगुळवणी महाराजांनी इहलोकीची यात्रा संपविली होती. श्री गुळवणी महाराज पुण्यात - मी दिल्लीत त्यामुळे श्री गुळवणी महाराजांच्या समक्ष साधना करण्याची संधी मला कधी मिळालीच नव्हती. माझी मी साधना करीत होतो. पण साधनेमध्ये पुष्कळ वेळा मी शवासनामध्ये झोपल्यासारखा पडून रहात असे. दिल्लीला गणेशपुरीला स्वामी मुक्तानंदांचे बरेच अनुग्रहीत होते. त्यांच्याबरोबर

बऱ्याचवेळी मी साधनेला बसत असे. तेव्हा साधनेमध्ये "शवासन" ठीक नाही; सरळच बसण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे ते सुचवित. "पण माझे साधन 'शवासना'तच चांगले होते आणि साधनेमध्ये जी जी क्रिया घडेल तशी ती होऊ द्यावी आपण मुद्दाम कोणती तरी विशिष्ट क्रिया करण्याचा आग्रह धरु नये, असे जे सांगीतले जाते त्याचे काय?" असे मी म्हणत असे. त्यामुळे पू. श्रीदत्तमहाराजांसमक्ष साधना करून साधनेतील "शवासना"च्या मुद्द्याचा उलगडा करून घेण्यास मी उत्सुक होतो. माझी विनंती मान्य करून शुक्रवार दि. २१ मार्च १९८० रोजी पू. श्रीदत्तमहाराजही माझ्या घरच्या दिवाणखान्यात सोफासेटवर साधनेस बसले. मी त्यांचेसमोर खाली जमीनीवर आसन अंथरुन बसलो होतो. सुमारे सव्वातास उत्तम साधन झाले. त्यातील शेवटचा अर्धातास(३०मिनिटे) मी शवासनात पडलेला होतो. साधनेनंतर मी पाहिले तर पू. श्रीदत्तमहाराजही सोफासेटवर "शवासना"तच पहुडले होते. तेव्हा शवासनात साधन करण्यात काही गैर नाही असेच महाराजांनी दर्शविले होते. मी सुद्धा सुमारे पाऊणतास (४५ मिनिटे) साधन सरळ बसूनच केले होते. मी केलेल्या साधनात काही बदल करा असे महाराज म्हणाले नाहीत. त्यामुळे त्यानंतर मग मी माझे साधन माझ्या पद्धतीनेच करत राहिलो व त्याबद्दल कोणाचेही मत विचारण्याची आवश्यकता मला कधी वाटली नाही. अजूनही माझ्या साधनांत पुष्कळदा "शवासन" होत असते व त्यामुळेच साधन चांगले झाल्याचे समाधान मला मिळते. त्यात काही चूक असती तर ती पू. श्रीदत्तमहाराजांनी नक्कीच मला सांगीतली असती.

## पाद्यपूजा आणि कारण देहाचा दृष्टांत

यानंतर त्याचदिवशी सकाळी माझ्या घरातच पाद्यपूजा होती. श्रीजगन्नाथबुवांनी मंत्र म्हणून पूजा सांगीतली. पू. श्रीदत्तमहाराज पलंगावर बसून सर्व पूजा पहात होते. पूजेला बरेच तामिळ वगैरे दाक्षिणात्य मित्र आले होते. त्यांना पूजा फारच आवडली. "तुम्ही महाराष्ट्रीय सुद्धा रुद्राध्याय आमच्या सारखाच (म्हणजे प्रथम सर्व नमक व नंतर एक चमक) म्हणता हे पाहून आम्हाला फार आनंद वाटला" असे ते दाक्षिणात्य मित्र म्हणाले. सर्वांनी पू. श्रीदत्तमहाराजांना पायावर डोके टेकवून नमस्कार केले व त्यांचे शुभाशिर्वाद घेऊन सर्व जण आपापल्या ऑफिसला रवाना झाले. मी त्या दिवशी रजा काढलेली होती व काही निवडक मंडळींना पू. श्रीदत्तमहाराजांच्या पंगतीला दुपारच्या भोजनासाठी बोलावले होते. भोजन चालू असताना मी श्रीदत्तमहाराजांना एक प्रश्न विचारला. मी म्हटले की, 'आपण आगगाडीने प्रवासास जातो, तेव्हा आपला डबा, आपले बसावयाचे स्थान व झोपायचा बर्थ हा आपला स्थूलदेह' असतो. तसेच आपले सामान (सूटकेस वगैरे) व आपण स्वत: हा आपला "सूक्ष्मदेह" असतो. आपले मुक्कामाचे गाव आले की, 'स्थूलदेह' (म्हणजे गाडीतला आपला डबा) सोडून 'सूक्ष्मदेहा' सकट (म्हणजे सूटकेस सामान वगैरे घेऊन) आपण स्वत: बाहेर पडतो. तर हीच उपमा पुढे चालवून आपला 'कारणदेह' कसा ओळखावा?" महाराजांनी लगेच उत्तर दिले की, 'आपण याच गाडीत का बसलो व याच स्टेशनवर का उतरलो हे कळले की 'कारणदेह' समजला हे ओळखावे' हे अगदी सरळ व साधे उत्तर ऐकून मला फारच आनंद वाटला!

## पूर्वजन्माचे ज्ञान आणि अध्यात्मिक प्रगती

अगदी स्वतंत्रपणे म्हणजे वरील प्रश्नोत्तरांशी काहीही संबंध नसताना मी पू. श्रीदत्तमहाराजांना असे विचारले की, 'सर्व ज्ञानी व्यक्तींना आपापला पूर्वजन्म माहिती असतो; तेव्हा ज्ञान होण्यासाठी आपल्याला आपला पूर्वजन्म माहिती होणे आवश्यक असते का?' माझी अशी समजूत होती की, आपला पूर्वजन्म माहित होणे हे ज्ञान होण्यासाठी आवश्यक असते. त्यामुळे कोणा प्रसिद्ध मोठया माणसाशी गाठ पडली व थोडे संभाषण झाले की मी त्या व्यक्तीला 'तुम्हांला तुमचा पूर्वजन्म माहिती आहे का?' असे विचारीत असे. हेतू हा की याला जर आपला पूर्वजन्म माहित असेल तर हा ज्ञानी आहे की नाही याची अटकळ आपल्याला बांधता यावी. एकदा हरि इरला गेलो असताना तेथल्या एका प्रसिद्ध व्यक्तीला मी असेच विचारले. तेव्हा त्यांनी मला उत्तर दिले की, 'हे पहा, तुम्हाला तुमचा पूर्वजन्म जाणून घ्यायचा असेल तर तो तुम्हाला माहिती होण्याची व्यवस्था करता येईल. पण दुसऱ्याची परीक्षा घेण्यासाठी (त्याला 'ज्ञान' आहे की नाही याचा अंदाज घेण्यासाठी) तुम्ही हा प्रश्न दुसऱ्याला विचारत जाऊ नका!' ते उत्तर ऐकून मी चपापलो होतो. या प्रश्नावर विचार करताना मला पूर्वीची एक गोष्ट आठवली तेव्हा मी नागपूरला होतो. एकदा पू. श्रीजनार्दनस्वामींशी बोलताना असा विषय निघाला की, अमक्या तमक्याला पूर्वजन्म स्पष्टपणे आठवतो व तो त्यावेळचे घर, वस्तु बरोबर दाखवितो. तेव्हा पू. जनार्दनस्वामी म्हणाले होते की, या सर्व तपशीलाचा त्या व्यक्तीला स्वत:ला काहीही उपयोग नाही आणि इतरांना तर तो मुळीच नाही! तेव्हा पुर्वजन्माचे ज्ञान हा

विषय किती महत्त्वाचा याबद्दलचा काहीच निर्णय माझ्या मनामध्ये नव्हता. म्हणून मी हा प्रश्न पू. श्रीदत्तमहाराजांपुढे उपस्थित केला व त्यांना वर दिलेली सर्व पार्श्वभूमीही सांगीतली.

महाराज म्हणाले, "तुमची आध्यात्मिक प्रगति होण्यासाठी जर तुमचा पूर्वजन्म कळणे आवश्यक असेल तर तो साधनेद्वारे तुम्हाला कळेल. त्याची आवश्यकता नसेल तर कळणार नाही व त्यासाठी अट्टाहास करण्याचे कारण नाही. सर्व ज्ञानी व्यक्तींना आपला पूर्वजन्म माहिती असतो हे खरे आहे. पण म्हणून ज्या कोणाला आपला पूर्वजन्म आठवत असेल तो प्रत्येकजण ज्ञानी" होईलच असे नाही. तेव्हा पू. श्री जनार्दनस्वामींनी नागपूरात असताना व हरद्वारला त्या प्रसिद्ध पुरुषाने मला जे सांगीतले होते तेच पू. श्रीदत्तमहाराजांशी झालेल्या संभाषणातून निष्पन्न झाले!

शुक्रवार दि. २२ मार्च १९८० रोजी दुपारी ४ नंतर श्रीदत्तमहाराज श्री जगन्नाथबुवांबरोबर मी रहात असलेल्या किडवाईनगरच्या समोरच असलेल्या ऑल इंडिया मेडिकल इन्स्टिटयूटच्या आवारात असलेल्या डॉ. ना. कृ. भिडे यांचेकडे त्यांच्या प्रेमळ आग्रहाखातर मुक्कामास गेले. पू. महाराज डॉ. भिड्यांकडे रहावयास गेले तरी ते मला घरात असल्यासारखेच वाटत होते. पू. महाराज डॉ. भिड्यांकडे असेपर्यंत मी माझ्या घरी फक्त जेवणापुरताच. माझ्या घरच्या सर्वांना(म्हणजे मी स्वत:, पत्नी, मुलगा व मुलगी यांना) पू. दत्तमहाराजांकडून मंत्रदीक्षा (नाम दीक्षा) डॉ. भिडे यांच्या घरीच मिळाली!.

रामनवमीच्या दिवशी जनकपुरीला रामजन्मासाठी आम्हाला

श्री भगवान जोशी हे आपल्या गाडीने घेऊन गेले.

रामजन्माचे प्रवचन आटोपल्यावर जनकपुरीतच रामनवमीचा फराळ करून महाराजांबरोबर आम्ही सर्वजण डॉ. भिडयांच्या घरी परतलो. त्यांनतर त्या दिवशी संध्याकाळी श्री सुंदरेशपंत यांच्याकडे जाण्याचा योग आला. ते तंजावर महाराष्ट्रीयांचे दिल्लीतील एक पुढारी असून अत्यंत धार्मिक व आचारसंपन्न होते! यांचे बंधु कांचीकामकोटीच्या शंकराचार्यपीठाचे व्यवस्थापक होते. श्रीसुंदरेशपंतांनी श्रीदत्तमहाराजांना आपल्या घरी बोलावून त्यांचा सत्कार केला. श्रीदत्तमहाराजांनी तेथे "अविनयमपनय विष्णों" इत्यादी शंकराचार्यांच्या श्लोकावर छोटेसे प्रवचन केले. पू. महाराज रात्रीच्या मुक्कामासाठी श्री जाखडी यांच्या साऊथ पटेलनगर मधील घरी गेले.

**द ामहाराजांची वयं ू महानता**

त्यांनतरचा दुसरा दिवस म्हणजे मंगळवार दि. २५ मार्च १९८० याच दिवशी पू. श्रीदत्तमहाराज जगन्नाथबुवांसह दिल्लीहून पुण्याकडे रवाना होणार होते. त्यांच्या पुणे-दिल्ली व दिल्ली-पुणे या रेल्वे प्रवासाची व्यवस्था श्रीदत्तविनायकमंदीरातर्फे केली गेली होती. त्यांनी सेकंडक्लास स्लीपरमध्ये पू. महाराजांचे एक व जगन्नाथबुवांचे एक अशी दोन तिकीटे आरक्षित केलेली होती. स्टेशनवर श्रीदत्तविनायकमंदीराचे पदाधिकारी महाराजांना निरोप देण्यासाठी आले होते. डॉ. भिडे व मीही तेथे होतो. ते बदलून त्याजागी वरच्या दर्जाची तिकीटे मिळतात का याबद्दलही प्रयत्न झाले. पण ऐनवेळी ते शक्य नव्हते. आम्ही त्या डब्यात जाऊन पाहिले; तेव्हा त्या डब्यातील सर्व प्रवासी मुसलमान असल्याचे आढळले. आम्हाला वाईट वाटले पण ऐनवेळी काही

करता येण्याजोगे नव्हते. पू. महाराज अगदी निर्विकारपणे त्या डब्यात चढले ; पण त्यांना पाहिल्याबरोबर त्या डब्यातील प्रवाशांनी महाराजांना स्वयंस्फूर्तीने उठून नमस्कार केले. महाराजांना कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी आम्ही घेऊ असे आश्वासन ते प्रवासी आम्हांस देत राहिले. महाराजांचे ''महाराजपण'' असे स्वयंभू होते. हे पाहून आम्ही चकीत झालो!

**श्रीदत्तमहाराजांची २ री दिल्ली यात्रा**

पू. श्रीदत्तमहाराजांची दुसरी दिल्ली यात्रा ही दिल्ली येथे मराठी भाषेत भागवतसप्ताह करण्याच्या उद्देशाने झाली होती. भागवत सप्ताह शुक्रवार दि. २५ जून१९८२ पासून गुरुवार दि. २ जुलै १९८२ (आषाढी एकादशीचा दिवस) असा सात दिवसांचा होता. शुक्रवार दि. २ जुलै रोजी ''महाप्रसाद''झाला. व शनिवार दि. ३ जुलै १९८२ रोजी महाराज दिल्लीहून पुण्याकडे येण्यासाठी रवाना झाले. या खेपेला पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर श्री रघुनाथराव कुलकर्णी आले होते. या खेपेला मी व डॉ. भिडे यांच्याघरी असा दोनच ठिकाणी महाराजांचा मुक्काम झाला. त्यामुळे ४-५ दिवस माझ्याकडे व ४-५ दिवस डॉ. भिडे यांच्या घरी असा पू. महाराजांचा सहवास आम्हाला लाभला. महाराजांनी आपल्याकडे भोजनासाठी यावे अशी दिल्लीतील महराष्ट्रीय कुटुंबाची इच्छा असे. त्यामुळे रहाणे माझ्या किंवा डॉ. भिड्यांच्या घरी असले तरी दुपारच्या भोजनाला पू. महाराज व श्री रघुनाथराव कोठेना कोठे जात असत. भागवतसप्ताहाचा कार्यक्रम बांधलेला होता. सकाळी ७ ते ११. ३० पर्यंत संहितापाठ चालत असे. संहिता वाचन रायपूरचे वैदिक ब्राह्मण श्री मुकुंद कृष्ण जोशी करीत असत. असे

वेदशास्त्र संपन्न विद्वान संहितापाठाला व पू. श्रीदत्तमहाराजांसारखे श्रेष्ठ भागवतोत्तम निरुपणाला असा अभूतपूर्व भागवतसप्ताह त्यावेळी मराठी भाषेत दिल्ली येथे घडून आला. भागवताचा हा सर्व कार्यक्रम माझ्या किडवाईनगरमधील घरापासून अगदी जवळ साऊथ-एक्स्टेन्शनमध्ये असलेल्या 'धर्मभवन' या सभागृहात पार पडला. जे लोक सप्ताहाला बसले होते तेवढेच लोक सकाळी संहिता पाठाला असत. त्यांना नाश्ता, चहा कॉफी वगैरे देण्याची व्यवस्था श्री गुरुदास भटकळ यांनी केली होती. ती व्यवस्था फारच चांगली असायची असे सप्ताहाला बसलेली मंडळी नेहमी बोलून दाखवीत. निरूपण संध्याकाळी ६ ते ९ यावेळेत पू. महाराज करीत असत. निरूपणाला ७५ ते ८० मंडळी नियमाने येत असत. ती मंडळी खूप लांबून येत असत. आणि त्यांना परत जाताना वाहन मिळण्याची काळजी असे. हे लक्षात घेऊन पू. महाराज आपले निरूपण बरोबर ९ वाजता संपवीत असत. तसेच बरोबर ६ वाजण्याच्या ठोक्याला निरूपण सुरुही होत असे. निरूपण सुरू झाले की महाराजांची तंद्री लागत असे. सतत तीन तास कार्यक्रम असल्यामुळे दीड तासानंतर दहा मिनिटांची विश्रांती असे. पण त्या विश्रांतीची गरज लोकांना वाटत असे; महाराजांना नाही. ते आपल्या जागेवरुन उठत नसत आणि बरोबर दहा मिनिटे झाली की आपले निरूपण पुन: लगेच सुरु करीत. या दहा मिनिटांच्या सुट्टीमध्येसुद्धा त्यांची तंद्री मोडत नसे किंवा त्यांना चहा-कॉफी-पाणी वगैरे काही लागत नसे. वयाच्या ७२ व्या वर्षी महाराजांचा हा इंद्रियनिग्रह व मनोनिग्रह सर्वांना खरोखर चकित करणारा होता. भागवतातील सर्व प्रमुख विषय अगदी सुगम करून सांगण्यात आले

व कोणत्याही दिवशी वेळेचे उल्लंघन कधीच झाले नाही. असा हा मराठी भाषेत झालेला राजधानीतला अभूतपूर्व भागवतसप्ताह उत्तम रीतीने संपन्न झाला. समारोपाच्या भाषणात मी पुन: एकदा भागवतसप्ताह मराठी भाषेत दिल्लीत चांगल्या ऋतूत ऐकावयास मिळावा व त्या निमित्ताने पू. श्रीदत्तमहाराजांचे पुन: एकदा येणे व्हावे अशी आशा व्यक्त केली!

### महाराजांचे हिंदी वक्तृत्व

दिल्ली मध्ये त्यावेळी श्री जगदीश ऋषी या नावाचे सधन गृहस्थ होते. त्यांची स्वत:ची फॅक्टरी होती व सिंगापूरला मोठा व्यापार होता. श्री जगदीश ऋषी स्वत: मोठे धार्मिक होते. ते स्वत: प्रवचने करून रामकथा सांगत असत. श्री प्रभाकर नातू हे त्यांचे सल्लागार, अत्यंत विश्वासू असे जवळचे मित्र बनले होते. पू. श्रीमहाराज दिल्लीस आल्यावर श्री जगदीश ऋषी त्यांच्या दर्शनासाठी आले व महाराजांनी आपल्या फॅक्टरीत येऊन आपल्या कामगारांना उपदेश व मार्गदर्शन करावे अशी ज्यांनी विनंती केली ती महाराजांनी मान्य केली.

आमच्या मनांत एक शंका अशी आली की महाराज मार्गदर्शन करणार कसे? महाराजांना संस्कृत, मराठी व कानडी या भाषा उत्तम अवगत होत्या हे आम्हाला माहिती होते. पण दिल्लीतल्या कामगारांना या भाषा समजत नव्हत्या. महाराजांना हिंदी बोलताना आम्ही कधी ऐकले नव्हते. तेव्हा महाराज बहुतेक मराठीत बोलतील व त्याचे हिंदी रूपांतर करून ते मी कामगारांना सांगावे असा अंदाज बांधून मी तशी तयारी ठेवली होती.

आम्ही सर्व जण श्री जगदीश ऋषींच्या फॅक्टरीत गेलो. तेव्हा

मी उठून महाराजांच्या जवळ गेलो व हिंदी भाषांतरकरून महाराजांचे भाषण लोकांना ऐकवण्याची तयारी आहे असे त्यांना म्हणालो ''त्याची काही आवश्यकता नाही'' असे म्हणून महाराजांनी आपले भाषण सुरू केले. तेच मुळी अस्खलीत हिंदीमध्ये. आम्ही सर्व चकीत पण आनंदीत झालो. महाराज सुमारे तासभर बोलले व त्यांनी प्रत्येकाने आपले काम धर्म भावनेने करण्याचे महत्व सर्वांना समजावून सांगीतले.

## अन्नदोषाचे परिमार्जन

श्री ऋषींनी महाराजांना भोजनाचा आग्रह केला, तेव्हा महाराजांनी काही अटी सांगितल्या व त्या अटी पूर्ण झाल्यास आपण भोजन स्वीकारु असे महाराज म्हणाले. त्या अटी अशा होत्या - (१) ज्याने कधीहि मांसाहाराचे, मत्स्याहाराचे व अंडयाचे अन्न शिजवले नसेल अशाच व्यक्तीने स्वयंपाक करावा. (२) त्या व्यक्तीनेच शिजवलेले अन्न महाराजांना वाढावे इतरांनी कोणीहि त्या अन्नाला हात लावू नये. (३) ज्या पात्रांत आधी कोणी जेवले नसेल अशा पात्रांतच महाराजांना भोजन वाढले जावे.

श्री जगदीश ऋषींनी सर्व अटी मान्य केल्या. महाराज व त्यांच्या पंगतीला बसणाऱ्या आम्हा सर्वांसाठी त्यांनी नवीन कोरी ताटे विकत घेऊन ती मांडली. बिहारी आचाऱ्याकडून स्वयंपाक करविला. महाराजांसह आम्ही सगळे भोजनाला बसल्यावर पहिल्यांदा त्या बिहारी आचाऱ्यानेच अन्न वाढले. भोजन सुरू झाले आणि स्वत: सौभाग्यवती ऋषी हातात अन्नपात्र घेऊन वाढायला आल्या. महाराजही काही बोलले नाहीत. जेवण झाल्यावर मी महाराजांजवळ जाऊन आचाऱ्याशिवाय इतरांनी अन्नाला हात लावू नये ही अट पाळली

गेली नाही याबद्दल खेद व्यक्त केला व महाराजांची क्षमा मागितली. तेव्हा महाराज म्हणाले, 'समाजात गेल्यावर अशा गोष्टी घडतातच त्यासाठीच संध्यावंदन, त्यातील मार्जन, अघमर्षण, जप इ. सांगीतले आहेत. झाले त्याबद्दल दु:ख न करता संध्याकाळी अधिक जप करून शुद्धि करून घ्या.' या प्रसंगामुळे मला स्वत:ला अन्नदोषाबद्दल पुष्कळच शिकावयास मिळाले!

वर लिहिल्याप्रमाणे दररोज कोणीतरी महाराजांना व श्री रघुनाथरावांना भोजनासाठी बोलवत असत. त्यांच्या घरच्या सोवळया ओवळया बद्दलच्या आस्थेबद्दल माहिती करून घेऊन आम्ही महाराजांना आमंत्रण स्वीकारण्याबद्दल सांगत असू. एकदा एक मोठी अडचण निर्माण झाली. श्री पारोळकर नावाच्या वृद्ध, भाविक व्यक्तीने महाराजांनी आपल्याकडे जेवावयास यावे असा आग्रह धरला. श्री पारोळकर जरी देशस्थ ब्राह्मण होते तरी त्यांच्या पत्नी कारवारी होत्या. व त्यांना मांसाहार, मत्स्याहार, अंडी वगैरे वर्ज्य नव्हते. श्री रघुनाथरावांच्या हे लक्षात आले व त्यांनी आमंत्रण नाकारले! तेव्हा श्री पारोळकर म्हणाले, 'तुम्ही (पहिल्या यात्रेत) श्री आजगांवकरांकडे राहिलात, जेवलात आणि मला नाही कसे म्हणता?' तेव्हा प्रकरण महाराजांपर्यंत गेले. 'आम्ही आजगांवकरांकडे राहिलो पण जेवलो नव्हतो आम्ही फक्त दुध व फळे खाऊन राहिलो होतो' असे महाराज म्हणाले. त्यामुळे श्री पारोळकर निरुत्तर झाले व रडू लागले! तेव्हा डॉ. मिसेस भिडे पुढे आल्या 'मी पारोळकरांच्या घरी जाऊन स्वयंपाक करावयास तयार आहे तो तुम्हाला चालेल का?' असे त्यांनी विचारले. चालेल असे महाराज म्हणाले, आणि पारोळकरांचा जीव भांडयात

पडला! डॉ. मिसेस भिडे पारोळकरांच्या घरी गेल्या; तेथे त्यांनी सुग्रास स्वयंपाक केला आणि श्री महाराजांना व रघुनाथरावांनी जेवू घातले. एकीकडे महाराजांचा नियमही पाळला आणि दुसरीकडे श्री पारोळकरांची भावनाही जपली. केवढी ही विवेकशीलता. हे पाहून आम्ही सर्वजण चकीत झालो.

## मूर्तिचा प्रसाद

मी माझी पत्नी आम्ही दोघांनी पुण्याहवाचनाचे सर्व विधीपूर्वक त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली होती. प्राणप्रतिष्ठा झाली तेव्हा तेथे मंत्र सांगणारे गुरुजी मी व माझी पत्नी असे आम्ही तीघेच होतो. एवढ्यात पू. महाराज श्री रघुनाथरावांसह तेथे येऊन पोहले. प्राणप्रतिष्ठा झालेली आहे आणि तेथे आहेर करायला कोणी नाही हे पाहिल्यावर महाराज स्वत: पुढे आले आणि त्यांनी आम्हाला पंचवीस रुपयांचा आहेर केला. तो आहेर मी अजूनही श्रीगुरुचरित्राच्या पोथीत जपून ठेवला आहे. सप्ताह समाप्ती झाल्यावर त्या मूर्तीवर आम्ही पाच जणांनी मिळून पोथीवरुन वाचून पवमान पंचसुक्ताचा अभिषेक केला होता. ते ऐकून पू. महाराजांना कोणीतरी फार आनंद झाला होता. राजधानीतही पवमान अभिषेक होऊ शकतो हे तुम्ही दाखवून दिलेत, असे म्हणून त्यांनी आमचे कौतुक केले होते. तसेच भागवत सप्ताह समाप्त झाल्यावर त्या मूर्तीचे काय करायचे असा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हा ती मूर्ती कुर्लेकरांकडे ठेवा, तेथे तीची नित्य पूजा होईल, असे महाराज म्हणाले अशा तऱ्हेने ती मूर्ती मला मिळाली व आजही ती माझ्या घरी देव्हाऱ्यात नित्य पूजेत आहे.

## अनंतव्रताचे पुनरुज्जीवन

या खेपेला महाराजांचे वास्तव्य माझ्याकडे ४-५ दिवस झाल्यामुळे मला महाराजांशी काही गोष्टी बोलता आल्या. दररोज सकाळी उठल्याबरोबर मी महाराजांच्या खोलीत जाऊन त्यांच्या पायांना हात लावून नमस्कार करीत असे व 'उठी उठी श्रीगजानना' या पू. श्री टेंबेस्वामींनी रचलेल्या प्रात:स्मरणाच्या ओव्या व श्लोक म्हणत असे, त्या महाराजांना फार आवडत असत. प्रात:स्मरण होईपर्यंत चहा येई. महाराजही चहा घेत. त्यानंतर वर्तमानपत्रांवर दृष्टीक्षेप टाकून प्रासंगिक विषयांवर बोलणे होई. मग ताज्या दूधाचा चहा होत असे व आमच्या आग्रहाखातर महाराजही हसत हसत पुन: थोडा चहा घेत असत आणि 'ताजे दूध आल्यावर मगच चहा का करीत नाही?' असे विचारीत त्यानंतर महाराज स्नान करून त्यांचे आह्निक उरकून घेत. त्यालाबरोबर दीडतास लागत असे. मीही माझी पूजा वगैरे उरकून ऑफीसला जाण्याच्या तयारीला लागत असे. महाराज आंघोळ झाल्यावर आपले धोतर-उपरणे स्वत:च धूत असत. व धुण्याचे पिळे घेऊन न्हाणी घरातून बाहेर येत. पहिल्या दिवशी हे पाहिल्यावर माझा मुलगा संजय याने 'आपण आंघोळ करून बाहेर यावे, मी धोतर-उपरणे धूवून आणत जाईन' असे सूचविले त्याचाभाव पाहून महाराजांनी त्याची सूचना मान्य केली. त्याप्रमाणे महाराज दिल्लीत असे पर्यंत त्यांचे कपडे धूण्याची सेवा संजयने केली आणि महाराजांचा मुक्काम डॉ. भिड्यांकडे असताना तेथे जाऊनसुद्धा केली. एकदा महाराजांची बाराबंदी धूण्यात आली. तेव्हा 'महाराजांच्या शर्टला सगळया नाडयाच आहेत. बटने मुळीच नाहीत' असे तो म्हणाला. त्याची सर्वांना

गंमत वाटली. एक दिवशी मी महाराजांशी अनंताच्या पूर्जसंबंधी बोललो. माझे वडील अनंताची पूजा करीत असत; पण त्यांनी ही पूजा मला किंवा माझ्या भावांपैकी कुणाला दिलेली नव्हती. त्यामुळे आमच्या घरी ही पूजा वडिलांच्या पश्चात बंद पडली होती. श्रीगुरुचरित्राच्या बेचाळीसाव्या अध्यायात कौडिंण्य ऋषींनी अनंताचा अवमान केल्याने त्याच्यावर कशी आपत्ती आली याची कथा आली आहे. त्यासंदर्भात असाही उल्लेख श्रीगुरुचरित्रात आलेला आहे की, सायंदेवाचे गोत्र कौडिंण्य होते व म्हणून श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी त्याला व त्याचा ज्येष्ठ पुत्र नागनाथ याला 'तुमचं गोत्र कौडिंण्य आहे म्हणून तुम्ही अनंताची पूजा करा' असे सांगीतले या सगळ्याचा उल्लेख करून मी महाराजांना म्हणालो, "आमचेही गोत्र कौडिंण्य आहे. पण 'तुम्ही आनंताची पूजा करा' असे आम्हला कोणीतरी सांगीतल्याशिवाय वडिलांच्या पश्चात बंद पडलेली अनंताची पूजा कशी करावी?" तेव्हा महाराज म्हणाले की, आम्ही तुम्हाला सांगतो की तुम्ही अनंतपूजा सुरु करा आणि ती शेवटपर्यंत करीत रहा, चौदा वर्षे झाल्यावर थांबवू नका. त्याप्रमाणे त्यावर्षापासून मी अनंताची पूजा चालू केली ती आजपर्यंत चालू आहे व पुढे ही चालू रहाणार आहे. माझा मुलगा संजय ह्याचा जन्मच अनंतचतुर्दशीचा आहे. त्यामुळे तो अनंताची पूजा चालूच ठेवणार आहे.

**गुरुचरित्राचा अन्वयार्थ लिहिण्याची प्रेरणा**

आमचे कौडिंण्य गोत्र असण्याचा परिणाम म्हणूनच कदाचित श्रीगुरुचरित्र लेखक श्रीसरस्वती गंगाधराप्रमाणे मला ही श्रीगुरुचरित्र या ग्रंथाबद्दल आवड निर्माण झाली होती की काय हे मला माहिती

नाही. पण सन १९६८ पासून मी गुरुचरित्राची पारायणे करीत होतो व त्या ग्रंथाबद्दल काही लेखन करावे असे मला वाटत होते. त्यावेळेपर्यंत मी गुरुचरित्राबद्दलची काही टिपणेही करून ठेवली होती. ती अर्थातच अपूर्ण होती. तरीसुद्धा त्यातील काही भाग मी महाराजांना वाचून दाखविला आणि 'तुम्ही हे लेखन पूर्ण करा' असे महाराज मला म्हणाले होते. गुरुचरित्राबद्दलच्या महत्वाच्या टिपा पू. श्रीटेंबेस्वामींच्या 'समश्लोकी' व 'द्विसाहस्री' या ग्रंथात आहेत पण संस्कृतमधले ते ग्रंथ आम्हाला कसे समजणार असे मी महाराजांना म्हणालो. तेव्हा तुम्ही ते ग्रंथ वाचा; तुम्हाला ते समजतील असे महाराज मला म्हणाले होते. त्याप्रमाणेच झाले. माझा 'श्रीगुरुचरित्र-अन्वयार्थ' हा ग्रंथ सर्व दत्तभक्तांना मान्य झाला, पण हे सर्व होईपर्यंत महाराज इह लोक सोडून गेले होते. त्याचे फार वाईट वाटले. शेवटी 'नियती' हीच प्रमाण असते हेच खरे!

या खेपेला महाराजांच्या पुणे-दिल्ली व दिल्ली-पुणे या प्रवासाची व्यवस्था मीच केली होती. गेल्या खेपेचा अनुभव लक्षात घेऊन व या यात्रेचा ऋतु लक्षात घेऊन मी महाराजांसाठी व श्री रघुनाथरावांसाठी सेकंडक्लास एसी स्लीपरमध्ये दोन तिकिटे आरक्षित केली होती. पुण्यापर्यंतचा प्रवास चांगला झाला. पण पुण्यास पोचल्यावर महाराजांचे पत्र आले ते असे की, "आमच्या प्रवासासाठी एवढा खर्च करण्याची आवश्यकता नव्हती. आमच्या मते हा खर्च **'धर्मैकपर'न होता 'कायैकपर'झाला.**" जेव्हा जुलै महिन्यात त्यांच्या वयाच्या व्यक्तीला दिल्लीपासून पुण्यापर्यंत प्रवासासाठी वातानुकूलित व्यवस्था ही चैन नसून आवश्यकता (necessity&not

luxury)होती व त्या आवश्यकतेप्रमाणे व्यवस्था करणे हे आमचे कर्तव्यच होते, असे स्पष्ट करून कर्तव्य म्हणजेच धर्म असा अर्थ असल्यामुळे आवश्यकत कर्तव्यासाठी झालेला खर्च हा 'धर्मैकपर' च आहे असे उत्तर मी महाराजांना पाठविले, तेव्हा 'तुमचे उत्तर वाचून आम्ही स्वस्थ आहोत' असे महाराजांचे पत्र आले अशा तऱ्हेने महाराजांची दुसरी दिल्ली यात्रा पार पडली. या दोन्ही यात्रांच्या आठवणी मात्र शेवटपर्यंत आनंद देत राहतील म्हणून त्या सर्वांसाठी लिहून काढल्या!

# 'नाशिकमधील भागवतसप्ताह ज्ञानयज्ञ'

**गु. भ. अ. बा. डांगे, नाशिक**

इ. स. १९८२ मध्ये 'अधिक' मास दोनदा व 'क्षय' मास एकदा असा योग आला होता. त्यापैकी पहिला 'अधिक' मास (अधिक आश्विन) ऑक्टोबर १९८२ मध्ये होता. नाशिकच्या कापडपेठेतील श्रीव्यंकटेश बालाजी मंदीर हे कीर्तन-प्रवचन-सत्संग-सप्ताह अशा ज्ञानसत्रांसाठी सर्वमान्य व्यासपीठ होते. प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराजांच्या महायोग साधक मंडळींतर्फे प. पू. श्रीनारायणकाका महाराजांनी पुढाकार घेऊन अधिक आश्विन महिन्यात या व्यंकटेश बालाजी मंदिरात प. पू. विद्यावाचस्पती श्री दत्तमहाराजांचा भागवत सप्ताह आयोजित केला होता. या सप्ताहाची वैशिष्ट्ये अविस्मरणीय म्हणावी लागतील. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या उपस्थितीत सर्व प्रथम प. पू. श्री काकामहाराजांच्या हस्ते कलश स्थापना झाली.

या सप्ताहात सकाळच्या संहिता-श्रवणासाठी १९० एवढ्या मोठया संख्येने भाविक उपस्थित होते. दुपारी कथा-विवेचन तर उत्सवाच्या वातावरणात संपन्न होत असे. प. पू. श्रीदत्तमहाराजांची प्रासादिक, शांतरसाने ओथंबलेली वाणी श्रवणेंद्रियांद्वारे हृदयसंपुटात साठविण्यससाठी रोज किमान अडीच हजार भाविक स्त्री-पुरुष हजर असत. कथा-कथन सजीव असे आणि रुक्मिणी-स्वयंवर, कंसवध, सुदामा-भेट यासारखे प्रसंग तर श्रोत्यांच्या सक्रिय सहभागामुळे

अधिकच नाट्यपूर्ण होत. श्री महाराजांच्या या विवेचनात रोज ते एकदा तरी संतचरित्रे, विशेषत: महाराष्ट्रीय संतवाङ्मय यांचा संदर्भ देत. त्यामुळे भागवतातील मूळ कथेवरील श्रद्धा अधिकच दृढ होत असे. अर्जुनाला विश्वरूप दर्शन घडवले, त्या कथाभागाचा संदर्भ घेऊन श्रीमहाराजांनी संत सखूच्या चरित्राचे दाखले दिले.

सप्ताहाच्या सांगता दिनी प. पू. श्रीमहाराजांच्या प्रासादिक वाणीतून 'भवे भवे यथा भक्तिः' व 'नामसंकीर्तनं यस्य' या श्लोकांचे श्रवण व नंतर सामूहिक पठण झाले. त्यानंतर सांगता, ग्रंथपूजन व प. पू. श्रीमहाराजांचे पूजन झाले. प. पू. काकामहाराजांनी श्रीफळ व पीतांबर अर्पण केले, व तो परिधान करण्याबाबत प्रेमाची नम्र प्रार्थना केली. विशेष म्हणजे या वयातही प. पू. श्रीमहाराजांनी जिने चढून-उतरून पीतांबर परिधान केला व श्रोत्यांना प्रसन्न मुद्रेने दर्शन दिले! प. पू. श्रीमहाराजांची धीरगंभीर तेजस्वी मुद्रा. पीतांबरामुळे भगवान् श्रीकृष्णांच्या भावमुद्रेप्रमाणे 'योगिभिर्ध्यानगम्यं' अशी झाली आणि हा खरा चिरकालीन प्रसाद घेऊन सर्व भाविक परतले!

या सप्ताहात श्री. प. पू. श्रीदत्तमहाराजांची विनम्र, सहज-सुलभ अमानित्व-वृत्ती अनेक प्रसंगांमधून प्रगट होत होती. भक्तांनी आणलेल्या प्रसादाचा स्वीकार करणे हे असेच प्रसंग असत. हजारो भक्तांच्या प्रसादाचे ग्रहण कसे शक्य आहे? तरीही एक चिमूटभर खिरापत किंवा कणभर खडीसाखर असे स्वीकारुन प. पू. श्रीमहाराज भक्तांच्या संतोषाचे भाविक समाधानाचे संवर्धन करीत! असा हा सप्ताह, अनेक भावगर्भ, हृद्य प्रसंगांमुळे संस्मरणीय झाला आहे.!

***

# श्रीक्षेत्र नारेश्वर येथील ब्रह्मश्री, विद्यावाचस्पती सद्गुरु दत्तमहाराज कवीश्वर यांचा भागवतसप्ताह

**दिनांक १६. ५. १९८५ ते २३. ५. १९८५**

**-द. र. देशपांडे**
**आणि गु. भ. सुशीलाताई मोडक, पुणे**

आम्ही उभयतांनी प्रथमच नुकताच श्री क्षेत्र कुरवपूर येथील भागवत सप्ताहाचा आनंद घेतला होता. सद्गुरुंचा भागवत सप्ताह श्री क्षेत्र नारेश्वर येथे आयोजित केला आहे असे समजताच आम्हां पती पत्नींना खूप आनंद झाला व नारेश्वर येथील भागवतसप्ताहाचा श्रवण भक्तिचा लाभ घेण्याचा आम्ही निश्चय केला.

पुण्याहून अहिंसा एक्सप्रेसने प्रवास करण्याचे निश्चित झाले होते. रेल्वेची स्वतंत्र बोगी रिझर्व केली होती. या डब्याला बाहेरुन ''भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह'' पुणे असा मोठा फलक लावून रंगी बेरंगी पताकांनी सुशोभित केले. सप्ताहात पुण्याचे ७०-८० साधक होते. प. पू. महाराजांची स्वतंत्र व्यवस्था एअर कंडिशन डब्यात केली होती. महाराजांचे आगमन होताच सर्वांनी जयजकार करून त्यांचे दर्शन व आशिर्वाद घेतले. पुणे बडोदा असा प्रवास ''दिगंबरा दिगंबरा'' या तालासुरांत भजनांत सुरु झाला. रात्रभर प्रवास दुसऱ्या दिवशी सकाळी ११ चे सुमारांस आम्ही बडोदा येथील साधक प. पू.

महाराजांचे स्वागतासाठी व साधकांना मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते. मे महिना असल्यामुळे कडक उन्हाळा होता. पुणेकरांना इतक्या कडक उन्हाची सवय नव्हती.

पुढील प्रवास बडोदा ते गरुडेश्वर व तेथून पुढे नारेश्वर असे नियोजन होते. त्यासाठी दोन बसची व्यवस्था होती. प. पू. महाराजांचेसाठी स्वतंत्र व्यवस्था होती. तेथील साधक महाराजांना त्यांचे निवासस्थानी घेऊन गेले. सर्व साधकांसाठी धर्म शाळेची व्यवस्था होती. तेथे भोजन करून पुढे श्री गरुडेश्वर येथील प्रवास सुरु झाला श्री क्षेत्र गरुडेश्वर येथे सायंकाळी ५ चे सुमारास पोहोचलो.

नर्मदा तीरावर क्षेत्र गरुडेश्वर, श्रीदत्तमंदिर प. पू. श्री वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज यांची समाधि. प्रसन्न वातावरण. पण उन्हाची झळ मात्र खूपच!

सर्व साधकांनी नर्मदा स्नान केले. मी स्वत: व श्री बोंद्रे आम्ही दोघांनी नर्मदा स्नान संध्या करून प. पू. सद्गुरुंचे दर्शन आज्ञा घेऊन स्वामींचे समाधि जवळ द्विसाहस्त्री गुरुचरित्राचे दोन दिवसांचे पारायणास सुरुवात केली. वारकरी संप्रदायातील माझे सद्गुरु पू. अंमळनेरकर महाराज यांनी श्री गुरुचरित्राचे श्रवणभक्तीने पारायण करण्याची अनुज्ञा दिली होती तर श्री दत्तमहाराज यांनी ‘द्विसाहस्त्री ‘गुरुचरित्र पारायणाचे मार्गदर्शन केले. यावरुन गुरु या व्यक्ति दोन असल्या तरी ‘शक्ति ‘मात्र एकच आहे असा सुखद अनुभव मिळाला.

रात्री सर्वांचे भोजन झाले. नंतर विश्रांती. दुसरे दिवशी शंकराचार्य जयंती होती. आम्ही नर्मदा स्नान व संध्या करून द्विसाहस्त्री

गुरु चरित्राचे पारयण समाप्ती केली. याच दिवशी श्री शंकराचार्य जयंती निमित्त प. पू. सद्गुरु महाराजांनी श्री काळे माऊली यांना प्रवचन करण्याची संधी दिली. व त्यांनी प्रवचन केले. हा सोहळा आम्हा सर्वांना आल्हाददायक होता. दुपारचे भोजन घेऊन क्षेत्र नारेश्वरकडे प्रयाण केले.

द्विसाहस्त्री गुरुचरित्र प. प. स्वामी महाराजांचे असल्याने त्यांचेच समाधि स्थानात पारायण करण्याचे भाग्य मला प्रथमच लाभले. द्विसाहस्त्री गुरुचरित्र 'संस्कृत' मला संस्कृतचा गंध नाही, संस्कृत वाचन माझ्याकडून सद्गुरुंनी करवून घेतले. वाचन करताना समजत नव्हते पण अंगावर शहारे मात्र येत होते. आगळा वेगळा अनुभव मी घेत होतो. श्रीक्षेत्र नारेश्वर येथे आम्ही सायंकाळी पोहचलो मे महिना उन्हाळी वातावरण गरम वारे वहात होते. नारेश्वर संस्थानने सर्व साधकांची उत्तम सोय केली. दुसरे दिवशी सर्वांनी नर्मदा नदीवर स्नान केले व नंतर सर्व आन्हिक करून परिसराचे दर्शन घेतले.

प. पू. रंगावधूत महाराजांचे हे स्थान. श्री दत्तात्रयांचे भव्य मंदिर, फारच मोठा परिसर आहे. सुमारे ४ ते ५ अेकराचे क्षेत्र असावे त्यांत दाट झाडी अनेक प्रकारची फुलझाडी रम्य परिसर.

प. पू. रंगावधूत महाराज मातृभक्त असल्याने देवळासमोर त्यांनी मातोश्रींचा पुतळा उभारला आहे. आम्ही रोज दर्शन घेत असू. १ल्या मजल्यावर प्रदर्शन हॉल. त्यात श्री रंगावधूत महाराजांचे अनेक फोटो, त्यामध्ये वापरात असलेली वस्त्रे ठेवली होती. भोजन व्यवस्था उत्तम प्रकारची होती. प्रशस्त स्वयंपाकघर, भोजन प्रसादासाठी विस्तीर्ण हॉल तेथे आलेल्या भक्तगणांना रोज प्रसाद असून येथील

एक वैशिष्टय म्हणजे - भोजन गृहाशेजारी अेक वयोवृद्ध अतिशय भाविक अशा अम्मा प. पू. रंगावधूत महाराजांचेपासून सेवेसाठी रहात होत्या. त्याची रहाण्याची स्वतंत्र व्यवस्था होती. रोजच्या भोजन प्रसादासाठी त्यांचे मार्गदर्शनानुसारच शिधा घेण्याची प्रथा होती व आलेल्या भक्त व दर्शनेच्छुंना पुरेसा असे. घेतलेला शिधा कधीही कमी पडला नाही असे तेथील आचारी सांगत होते.

भोजनगृहाजवळच अेक शिवलिंगाचे मंदिर होते. तोच हा 'नारेश्वरचा महादेव'! नित्य पूजा अभिषेक होई, रंगावधूत महाराज या ठिकाणी अनुष्ठान करीत असत. असा हा परिसर पावन झाला. त्याचे वर्णन करण्यास शब्द अपुरे आहेत. प. पू. सद्गुरुस्वरूप श्रीरंगअवधूत महाराजांनी केलेल्या तपसाधनेमुळे परमपावन झालेला असा रमणीय परिसर पाहून न भूतो न भविष्यति असे आश्चर्य वाटले. आणि खरोखरच 'अनुभवियांचे राजे' असलेल्या योगीराज श्रीज्ञानेश्वर महाराजांची आठवण मनामध्ये सातत्याने होऊ लागली.

पंथराज अथवा कुंडलिनी योग ह्या सहाव्या अध्यायात योग्यांची माऊली श्री ज्ञानेश्वर माऊली असे म्हणतात 'नानायोगविभवभांडार। उघडे का।' प. पू. श्रीरंगअवधूतांचे नारेश्वर हे स्थान म्हणजे अष्टांगयोगाच्या ऐश्वर्याचे खुले केलेले हे कोठारच होय. त्या स्थानामध्ये गेले असता नास्तिक अथवा विषयी पुरुषासही उपरति उत्पन्न होईल एवढेच नव्हे तर वैराग्याला जागे करणारे असे हे स्थान आहे . हे स्थान पाहिल्याबरोबर असे वाटावे की या स्थानावरून राज्य ओवाळून टाकावे व येथेच स्वस्थपणाने राहावे. त्या नर्मदानदीच्या किनारी कोकिळेचा कुहू कुहू असा आवाज, आणि अखंड राहणारे असे

मोरही त्याठिकाणी होते. अशा ह्या एकांतस्थानी प. पू. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताह झाला.

रम्य, निवांत अशा नारेश्वरसारख्या स्थानी श्रीमहाराजांचा भागवत सप्ताह झाला त्याचे कारण तेथील प. पू. श्री विठ्ठलभाई जोशी यांच्या भाषणातून तेथे असणाऱ्या सर्वांनाच उमगले.

श्रीविठ्ठलभाईंनी असे सांगितले की प. पू. श्रीरंगअवधूत महाराजांच्या (बापजींच्या)मातोश्रींना प. पू. श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताह ऐकावयाचा होता. तशी इच्छा त्यांनी बापजींजवळ प्रगट केली होती. त्यांच्या इच्छेमुळे श्रीदत्तमहाराजांचा भागवतसप्ताह येथे होत आहे. सप्ताह जेव्हा झाला तेव्हा श्री रंगअवधूत महाराज म्हणजेच बापजी व त्यांच्या मंगलमय मातोश्री प. पू. श्री अन्नपूर्णाबाई हे दोघेही या जगात नव्हते. परंतु 'सत्य संकल्पाचा दाता नारायण' याची प्रचिती जणू काही सर्वांना आली. आणि भागवतसप्ताहाचे श्रवण करण्यासाठी मातोश्री व बापजी नक्कीच त्याठिकाणी उपस्थित असणार हे नि:संशय आहे.

## आल्हादिनी शक्तीचा वर्षाव

प. पू. भागवताचार्य श्री दत्तमहाराजांचा प्रपंचच परमार्थरूप झाला होता. त्यांच्या प्रपंचरूपी झाडाला निवृत्तिरूप, अलिप्ततेची कोट्यवधी फळे दिसत असत. स्वानंद साम्राज्याचे चक्रवर्ति सम्राट असलेले श्री दत्तमहाराज मोक्षमार्गाचे अधिकारीच! येवढेच नाही तर भागवत सांगता सांगता सहज आल्हादिनी शक्तीचा वर्षाव होत असे. आणि त्यावेळी तर काय श्री ज्ञानेश्वर महाराजांनी वर्णन केलेल्या अशा योग भूमीच्या स्थळी भागवतसप्ताह होता त्यामुळे त्या भागवतसप्ताहामध्ये

कित्येकांना शक्ति जागृती झाल्याचा अनुभव आला असेल हे सांगणे न लगे.

**विदेही दत्तमहाराज**

अत्यंत कडक उन्हाळ्यात तो भागवतसप्ताह झाला. खरोखर आम्ही ऐकणारे सर्व श्रोते पाणी, सरबत पिण्यासाठी जवळ घेऊन बसत असू. परंतु श्री दत्तमहाराजांचे आसन (बैठक) इतकी पक्की ते मांडीसुद्धा हलवत नसत की चुकूनसुद्धा आलेले घर्मबिंदू असह्य उकडण्यामुळे आलेला घाम पुसत नसत. मनामध्ये येते त्यांना उकडत नव्हते का? त्यांना उकडत असणारच! परंतु देहीच विदेही वृत्ती झालेले जनकराजाच जणू श्रीदत्तमहाराज होते असेच म्हणावेसे वाटते. भागवत होऊनच भागवत सांगणारे श्रीदत्तमहाराजांचे वर्णन खरोखरच करता येणार नाही. ते फार, फार मोठे महात्मा होतेच होते. श्रीसमर्थ-

**न कळे न कळे नेति नेति। ऐसे बोलत असे श्रुती।**
**तेथे मज मूर्खाची मति। पवाडेल कोठे।।**

सायंकाळी भागवत सप्ताहाचे नियमानुसार गोकर्ण महात्म्याचे निरूपण झाले. प. पू. रंगाअवधूत महाराजांचेसाठी खास बांधलेल्या विश्रांतीस्थानाचे कट्ट्यावर प. पू. श्री सद्गुरु महाराजांचे आसन व्यवस्था होती. समोर भव्य मंडप सुशोभित केला होता. आंबा, लिंब अशा अनेक प्रकारच्या झाडांनी आच्छादित असलेल्या सावलीत भव्य मंडप उभारला होता. कडक उन्हात असल्यामुळे सर्व साधकाचे उन्हापासून संरक्षण व्हावे याची काळजी घेतली होती.

सायंकाळी ५ चे सुमारास गोकर्ण महात्म्य कथन करण्यासाठी प. पू. ब्रह्मश्री, विद्यावाचस्पती सद्गुरु दत्तमहाराजांचे आगमन झाले. सर्वांनी

उभे राहून जयजयकार केला. महाराज आसनस्थ झाले. शांत आणि गंभीर स्वरात महाराजांनी गोकर्ण महात्म्य कथन करण्यास सुरुवात केली.

"प. पू. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज यांचे चरण स्पर्शाने पवित्र झालेल्या भूमीत नर्मदाकाठी श्री नारेश्वरच्या सान्निध्यांत प. पू. रंगाअवधूत महाराज अनुष्ठान नानाविध प्रकारच्या झाडांनी फुलांनी बहरलेली ही पवित्र भूमी आहे. असे हे तीर्थक्षेत्र भागवतसप्ताह श्रवण करण्यास अनुकूल असते." अशी सुखद सुरुवात करून सर्व भक्तांना उल्हसित केले. चैतन्य जागृत झाले. नेहमीच्या शैलीत प. पू. महाराजांनी गोकर्ण महात्म्य आख्यान कथन केले. 'दिगंबराची धून होऊन महात्म्याची समाप्ती झाली.'

गोकर्ण महात्म्यानंतर दुसरे दिवशी सकाळी ८ वाजता संहिता वाचन डॉ. रा. ल. जोशी करीत असत. संहिता वाचन चालू असताना प. पू. महाराज त्यांचे सर्व आन्हिक झाल्यानंतर येऊन बसत. सुरुवात असल्याने सर्व साधक लवकर उठून नर्मदा स्नान व संध्या आन्हिक करून संहिता वाचनासाठी उपस्थित राहिले. कांही साधकांनी तेथे असलेल्या बागेमध्ये गुरुचरित्र पारायण सप्ताह सुरू केला.

दुपारी १२ नंतर भोजन. भोजन व्यवस्था अगदी उत्तम होती. भागवतासाठी आलेल्या सर्व साधकांसाठी सोवळयात भोजन व्यवस्था होती. सर्व साधक वाढण्याची संधी सोडत नसत. रोजच पक्वान्न असे. नंतर विश्रांती नंतर भागवत निरूपण. निरूपणाची वेळ दुपारी २॥ अशी होती. सद्गुरु महाराज अगदी वेळेत निरूपण सुरु करीत असत. उन्हाळा असलेने उन व उन्हाच्या झळा शारिरीक त्रास देत होत्या. त्या परिस्थितीत सर्व साधक ओला रुमाल डोक्यावर ठेवून श्रवण भक्ति

करीत असत. प. पू. महाराजांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून पडदे लावून अडोसा करीत असत पण महाराज त्याबद्दल नाराज असत. अशा परिस्थितीतही महाराजांनी सिध्दासन हलविले नाही. कथाज्ञान यज्ञ सायंकाळी ७ पर्यंत चालू असे. त्यानंतर आरती झाली.

संहिता वाचन सुरु झाल्यानंतर प. पू. महाराज स्नानासाठी नर्मदा नदीवर जात असत. सोबत श्री रघुनाथराव असत. अेक दिवस प. पू. महाराज गंगेवर स्नानासाठी निघाले आहेत असे पाहिल्यानंतर महाराजांचे सोबत स्नानाचा लाभ घ्यावा असे विचार मनांत येऊन त्यांचा मागोवा घेत मी अेकटाच गेलो व सद्गुरुंचे सोबत स्नान केले. त्यानंतर महाराजांनी संध्या केली. महाराजांची संध्यावंदन पाहून आनंद वाटला. नर्मदा नदीचे काठावर जाताच प्रथम महाराजांनी नर्मदेला साष्टांग नमस्कार घातला. स्नान झाले नंतर वस्त्र स्वत:च धुतले व ओलेत्याने संध्यावंदन केले. श्री. रघुनाथरावांनी मला परत जाण्याची खूण केल्याने मी माघारी परतलो.

देवळांत आरती झाल्यानंतर दत्तबावनी, भजन व त्रिपदी होत असे. वाद्यांची साथ अप्रतीम असे. रात्री भोजन व विश्रांती. उन्हाच्या झळा असल्याने संहिता वाचन झाल्या नंतर बरेच साधक नर्मदेवर स्नानासाठी जात असत. त्यात आम्ही उभयता व सुलभा येत असे. महाराजांना हे समजले सायंकाळी कोणीही स्नानासाठी नदीवर जायचे नाही असा आदेशच दिला. का ते अजुनही उमगले नाही.

अशा रितीने अत्यंत आनंदात सप्ताह केव्हा संपला ते समजलेच नाही. सप्ताहाचे सांगतेचे दिवशी प. पू. महाराजांचे पूजन संस्थानतर्फे व वैयक्तिक झाले. अप्रतिम सोहळा झाला. प. पू. महाराजांनी निघायची

वेळ झाली चार चाकी गाडी सज्ज होती. प्रत्येकाचा निरोप घेवून महाराजांची पाऊले पुढे सरकत होती. श्री रघुनाथराव गाडीचे दिशेने चालू लागले त्यांचे मागे महाराज!

### 'शबरी'ची भेट

अचानक महाराजांनी आपली चालण्याची दिशा बदलविली व ते श्रीमती अम्माचे निवासाकडे वळले. श्रीमती अम्मांनी दर्शनाची इच्छा व्यक्त केली होती. पण वयानुसार त्या चालू शकत नव्हत्या महाराजांनी स्वत: त्यांचेकडे जाऊन त्यांची इच्छा पूर्ण केली. त्या दोघांची भेट म्हणजे प्रभुरामचंद्रांनी शबरीकडे जाऊन तिच्या उष्ट्याबोरांचा स्वाद घेतला. या रामायण कथेचे स्मरण देणारी होती. याठिकाणी प. पू. महाराज प्रभुरामचंद्रच व अम्मा म्हणजे शबरी असे भासले. दर्शनानंतर अम्माचा चेहरा उत्साहित झाला. अशा रितीने भागवत ज्ञानकथायज्ञ समाप्ती झाली.

***

# वसईचा भागवतसप्ताह. (१९८७)

**- श्री. उदय चं. कडीकर**

वसईला आम्ही काही साधकबंधूंनी प. पू. सद्‌गुरु गुळवणीमहाराज सत्संग मंडळ स्थापन केले आहे. त्याच्यावतीने प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचा भागवतसप्ताह आयोजित करण्याचा आमचा विचार आम्ही कांही गुरुबंधूंच्याद्वारा प. पू. महाराजांच्या कांनांवर घातला. लगेचच श्री महाराजांची परवानगी मिळालीही. तेव्हा आमचा आनंद गगनांत मावेना. वसईकर भक्तगण प. पू. महाराजांचा पूर्ण आठवड्याभरचा सत्संग लाभणार व त्यांच्याकडून श्रीमद्भागवताचे निरूपण ऐकायला मिळणार या विचाराने खूप सुखावले. हे वृत्त समजतांच माणिकपूर-विरार-पालघरचे भक्तही साह्याला धावले. आम्ही सर्वांची एक समिति स्थापन केली. आवश्यक निधीचे संकलन करून कार्यक्रमाची रूपरेषा तयार केली. पारनाका, वसईचे सुकृतीन्द्र सभागृह आरक्षित केले.

वसई येथे श्रीमहाराजांचे आगमन झाले. त्यांचा यथोचित सत्कार करून त्यांची निवासाची व्यवस्था श्री. हरिदास गुजराती यांच्या घरी केली होती. सोमवार दि. २६-१०-१९८७ रोजी श्रीमद्भागवतमाहात्म्याचे निरूपण झाले. दि. २७ रोजी यथाशास्त्र पुण्याहवाचन करून सप्ताहाचा संकल्पविधि संपन्न झाला. रोज सकाळी ८ ते १२ पर्यंत पुण्याचे वे. शा. सं. आनंदशास्त्री पारखी हे संहितावाचन करीत. दुपारी भोजनोत्तर प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज २ ते सायंकाळी

सहा वाजेपर्यंत निरूपण करीत. महाराजांचे भक्तिरसपूर्ण निरूपण श्रोते मंत्रमुग्ध होऊन देहाचे भान विसरून ऐकत. पण तेवढ्यानेच त्यांचे समाधान होत नसे. रोज आळीपाळीने साधकबंधूंनी महाराजश्रींना आपल्या घरी नेऊन त्यांची पाद्यपूजा केली. त्यांच्या सहवासांत स्वर्गसुखाचा अनुभव घेतला. आपल्या आध्यात्मिक आणि प्रापंचिक शंकांचे समाधान करून घेतले.

हा सप्ताह प. पू. महाराजांच्या देवदुर्लभ सुखमय सान्निध्यात कसा निघून गेला ते आम्हांला कळालेच नाही.

**झाली पापा ताटातुटी । दैन्य लोपले उठाउठी ।**
**धन्य आजि दिन । झाले संतांचे दर्शन ।**
**पावले मनी समाधान । पायीं विसावले मन ।**
**गुरुमाउली येई घरा । तोचि दिवाळी दसरा ।।१।।**

३-११-१९८७ रोजी भंडारा झाला. दि. ४ ला सकाळी १० वाजता प. पू. महाराज श्रीक्षेत्र निर्मळ येथे जाऊन जगद्गुरु शंकराचार्यांच्या समाधीचे दर्शन करून विरार येथे आमच्या घरी आले. त्याच दिवशी आम्ही प. पू. श्री. महाराजांच्या उपस्थितीत श्रीदत्तयागाचे आयोजन केले होते. प. पू. श्रीरंग अवधूत महाराज यांचे शिष्य कोसंब्याचे पं. दीनानाथ कुलकर्णी यांनाही निमंत्रित केले होते. या दोघांची बैठक एकत्र मांडण्याविषयी उभयतांच्या भक्तांमध्ये किंचित् मतभेद होता. पुढे पंडितजींचे आगमन होतांच प. पू. दत्तमहाराज आपल्या आसनावर उठून उभे राहिले व पंडितजींची पाद्यपूजा होईपर्यंत उभेच होते. पाद्यपूजेनंतर जेव्हां आपल्या आसनाकडे आले तेव्हां दोघांनीही एकमेकांना वांकून नमस्कार केला आणि आपल्या

अनुयायांच्या मनांतील द्वैताचे निरसन केले. 'विद्या विनयेन शोभते' या वचनाचा त्यांनी जणू वस्तुपाठच आम्हा सर्वांना दिला.

या दोन सत्पुरुषांच्या उपस्थितीत वे. मू. कोढणीकर यांच्या हस्ते श्रीदत्तयाग संपन्न झाला. दुपारी २॥ वाजतां पूर्णाहुती झाली. नंतर प्रसाद घेऊन प. पू. दत्तमहाराज थेऊरला रवाना झाले.

**प. पू. नाना महाराज व प. पू. दत्तमहाराज**
**यांचे चरणी भक्तीचे तुळशीदल**

हरी हरांची भेट जणु ही धन्य धन्य शुभदिनी ।
भागवताचे अखंड चिंतन कृष्णरुप तमनम ।।
नयनातुनी या आसू येती भाव भक्ती बहरुन ।
गुरुराया तू किती कनवाळू भक्ता दे दर्शन ।।१ ।।
अपार महिमा संतांचा हा ऐकत होतो जनी ।
आज पाहू या धन्य सोहळा चरणी नत होऊनी ।।
साजुक भक्ती पिकले पान नाना जणू भासती ।
दत्तात्रेय हे पवित्र पावन वंदन त्यांचे प्रती ।।२ ।।
सुवर्णाला सुगंध यावा, गंधा यावी रुची ।
दूध शर्करा सुयोग यावा, तैसी आजची स्थिती ।।
भागवताच्या आंकठ श्रवण, करूनी व्हा पावन ।
आत्मानुभवी या संतदर्शने, कृतार्थ हो जीवन ।।३ ।।
भावभक्तीची ओंजळ वाहू, मौन झाली वैखरी ।
द्यावे देवे दीर्घ आयु त्या, हीच प्रार्थना खरी ।।
तुलसीपत्र हे प्रिय मानुनी घ्यावे भागवत यज्ञांतरी ।
दोन हस्त नी तिसरे मस्तक नत हो चरणावरी ।।४ ।।

# दादर येथील भागवत सप्ताह

दादरला श्री. जुवेकर वकिलांच्याकडे प. पू. श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताहाचा एक आगळा वेगळा सोहळासंपन्न झाला. श्रीमद्प. प. वासुदेवानंदस्वामीमहाराजांचे एक महान शिष्य प. पू. श्री. नानामहाराज तराणेकर यांनी अशी इच्छा प्रगट केली की, प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या तोंडून आम्हाला भागवत ऐकायचे आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी ती आज्ञा शिरसावंद्य मानली व लगेच श्री. जुवेकर वकिलांच्या बंगल्यात मार्च महिन्याच्या अखेरीस हा भागवत सप्ताह घडून आला.

**जणू ही हरिहरांची भेटच**

सांगणारे संत व श्रोतेही संतच. त्यामुळे हा सप्ताह ही एक पर्वणीच वाटत होती. ही हरिहरांची भेटच वाटे. दुपारी ३ वाजता निरुपणास सुरूवात होई. प. पू. श्रीदत्तमहाराज निरुपण इतके सुंदर करीत की, भक्तीरसाला पूर येई. कारण ऐकणारे श्रोते भावनेत रंगून गेलेले नाना महाराज होते. प. पू. श्रीदत्तमहाराज इतक्या खुबीने वेळेचे नियोजन करीत की काही न वगळता चार चार तासही न संपणारा निरुपणाचा भाग दोन अडीस तासात संपवित. त्यांना कळू न देता कटाक्षतेने वेळ पाळीत कारण प. पू. श्री. नाना महाराजांना फार काळ बसवत नसे. श्रोता, वक्ता इतके भगवदभक्त की त्यामुळे या सोहळ्याचे वर्णन करताना मनात येई.

**सुवर्णाला सुगंध यावा, गंधा यावी रुची**
**दुग्धशर्करा सुयोग यावा तैसि ही शुभस्थिती**

**भागवताच्या आकंठ श्रवणे करूनी व्हा पावन**

**पवित्र ऐशा संतदर्शने कृतार्थ हो जीवन**

काही काही कथा भागाला भक्तिरसाचा पूर लोटे. श्री कपील महामुनींनी आपल्या आईला जो उपदेश केला त्याने ती माता उद्धरुन गेली हे सर्व सांगत असताना

**आसना वरी बसावे। मन स्थिर ते करावे। भगवंतचित्ती।**

**ठसवूनियाच घ्यावे ।उपचार ते मनाने। अती गौरवे**

**करावे। मुखी हास्य ते प्रभेचे। चित्ती सदा वसावे।**

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी शेवट केला

**ध्यानात लीन झाली। देही विरून गेली**

**भक्ति मुक्ती ल्याली। माता कृतार्थ झाली**

असा अर्थ पूर्ण मधून मधून संवाद चाले. श्रोत्यांना श्रवण सुखाची मेजवानी होई. दुसरे दिवशी जडभरताचे आख्यान होते. भरत इतके तपस्वी थोर तरी मृगशावकात मन अडकले मग आपले काय?

**बाळपणी खेळ गोड। तरुणपणी संसार आवड**

**थकले शरीर वृद्धपण। चिंतन केव्हा करणार**

प. पू. श्री. नानामहाराज म्हणाले हे सारे जाणून करावे नामस्मरण सर्व विषयी सावधपणा सांभाळावे सर्वदा श्रीकृष्ण भक्तित गोपी कशा तल्लीन झाल्या हे प. पू. श्रीदत्तमहाराज रंगून जाऊन सांगत होते. रानावनातून येणारा तो बासरीचा गोड नाद ऐकून गोपी देहभान विसरुन जात. प. पू. श्री. नानामहाराजांना भजनाचा विशेष नाद. ते म्हणाले

**गृही काम धाम करीता ओठात कृष्ण नाम**

**ध्यानी मनी तयांच्या तो कृष्ण पूर्ण काम**

**टिपरी वरील टिपरी तो नाद धुंद झाला**
**कृष्णासवे सख्या त्या खेळात मग्न झाल्या**
**नाही तयास भान ती लागली समाधी**
**संसार सागराची कसली तया उपाधी**

सारे गोकुळ तेथेच अवतरले होते. सात दिवस कसे संपले ते कळले नाही. दोन संत एकत्र पहाणे हाच किती अपूर्व व दुर्मिळ असा योग होता. भागवतासारखा भक्तिग्रंथ, दोन संतांचा अखंड भेटीचा सोहळा पाहून जुवेकरांचे घर व परिसर तृप्त झाला.

**समर्थ श्री नानामहाराज तराणेकर यांचा आशीर्वाद**

(गु. भ. नीलाताई जोशी यांच्या चरित्रलेखनासाठी.)

आपण प. पू. श्रीदत्तमहाराज यांचे चरित्र गुरुप्रेरणेने लिहिलेत हे कौतुकास्पद आहेच. पण चरित्रलेखनाकरिता जी व्यक्ति निवडलीत ती देखील अत्यंत थोर आहे. ‘अध्यात्मज्ञाने जी चोखडी। ते संत माझी रूपडी‘या उक्तीप्रमाणे प. पू. दत्तमहाराजांचा अधिकार मोठा आहे. ‘स जातो येन जातेन याति लोकः समुन्नतिम्‘ज्याचे जन्मास येण्याने लोकांचा भाग्योदय होतो तोच खरा जन्मला व ‘शोषणं भवसिंधोश्च ज्ञापनं सारसंपदम्‘या न्यायाने आत्मानंदांतून सर्वात्मभावाची प्रचीति घेणे व इतरांना त्याची अनुभूति आणून देणे हे त्यांचे कार्यही अविरत चालू आहे.

# कुरवपूर भागवतसप्ताह

गु. भ. सुश्री सुशीलाताई मोडक

**श्रीकृष्णामाईचे आवाहन - कुरवपूर क्षेत्र महात्म्य.**

पुण्यक्षेत्र कुरवपुरास जी प्रदक्षिणा घालत आहे. प्रदक्षिणा व परमसद्गुरु श्री श्रीपादचरण वंदन जिचे आजीव व्रत झाले आहे. अशी कृष्णामाई म्हणत आहे, 'माझे परम दैवतच इथे निवासाला आहे' "संशय न धरी मानसी । श्रीपाद आहे कुरवपुरासी ॥" आर्त, मुमुक्षु, दुःखी, कष्टी या साऱ्यांनी भक्तिमार्गाकडे वळावे म्हणून ही कृष्णा आवाहन करीत आहे. एकदा तरी कुरवपुरी या.

अंतर्मुख होण्यासाठी आपण आतुर झाला असाल, तप :साधनेसाठी कुठे जावे असे वाटत असेल, कैवल्यसुखाचा शोध घेण्याची तळमळ लागली असेल, "सुखालागी आरण्य सेवीत जावे." या वचनाची अनुभूति घ्यावयाची असेल तर कृष्णामाई सर्वांना साद घालीत आहे की, "या एकदा तरी कुरवपुरी या."

ही पुण्यभूमी आहे. पावनभूमी आहे. सिद्धभूमी आहे. साधुसंतांची भूमी आहे. इथे श्रीपादश्रीवल्लभांनी निवास केला आहे. येथे श्रीपादश्रीवल्लभांच्या निर्गुण पीठ पादुका आहेत. येथे देववृक्ष बहरले आहेत. वटवृक्षाची उन्हाळ्यात शीतल व हिवाळ्यात उबदार अशी छाया आपणास मिळेल. ज्या वटवृक्षाखाली श्रीपादांनी उग्र तपश्चर्या केली तो आजही स्थितप्रज्ञासारखा अविचल असा उभा आहे. त्याचे

शेजारी खडक आहे. त्याला सूर्यनमस्कार खडक म्हणतात. श्रीपादांच्या अष्टांग स्पर्शाने या खडकाचा कण कण उद्धरला आहे. येथे येणारा श्रद्धाळू जीव त्याला अभिवादन करतो. शिवमंदिरासमोरचा देववृक्ष औंदुबर डौलाने अजूनही उभा आहे. भावभक्तीने अनेक त्याला प्रदक्षिणा घालतात. औंदुबर छायेची मधुर माया अनुभवावयास कृष्णामाई कुरवपूरला या म्हणते.

कृष्णाजलात सारी अशुचिता विसर्जित करा व परात्पर गुरु श्रीपादश्रीवल्लभांचे दर्शन घ्या. कृष्णेचे व श्रीपादश्रीवल्लभांचे अतूट नाते आहे. कृष्णामाई म्हणते, ''श्रीपादश्रीवल्लभांनी मला आपल्यात सामावून घेतले आहे. भक्तीने देव व भक्त यात अभेदता येते या वचनाचा येथे साक्षात्कार होईल. श्रीपादश्रीवल्लभ मला वंद्य आहेत व श्रीपादश्रीवल्लभांनी मला मोठे केले आहे. आत्मश्लाघा होईल म्हणून मी सांगत नाही परंतु -

नम: श्रीकृष्णे ते जय शमित तृष्णे गुरुमते

एवढे मोठेपण मला श्री. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबे स्वामीमहाराजांनी दिले आहे. श्रेष्ठत्व संपादन करावयाचे असेल तर, या एकदा तरी कुरवपुरी या,'' असे आवाहन कृष्णामाई अखंड करीत असते.

**कुरवपूर येथील भागवतसप्ताहकुरवपूरचा भागवत सप्ताह**
**दि. १७-१२-१९८७ - ३-१-१९८८**

**(अ)** कृष्णामाईची ही साद माझ्या अंतर्मनाला बऱ्याच वेळा ऐकायला येई. पण हा योग कधी येईल असे वाटायचे. मग प. पू.

दत्तमहाराजांचा श्रीमद्भागवतसप्ताह श्रवण करतांना मनांत आले की असा सप्ताह कुरवपूरला झाला तर काय बहार येईल? का कोण जाणे पण हा विचार मनात पक्के घर करून बसला. पण हे कसे होणार? महाराजांना हे कसे विचारायचे? आणि त्यांची संमति मिळाली तरी इतक्या दूर, अपरिचित स्थळी जाऊन हे आयोजन कसे होणार? हे कुणाजवळ बोलून दाखवायचे साहसही मला झाले नाही. एकदा सज्जनगडावर गेले असता समर्थांच्या समाधीपुढेच मनोमन प्रार्थना केली की ह्या तुमच्या बालिकेचा एवढा हट्ट पुरवाच! आणि काय आश्चर्य? एऱ्हवी हातावर तीर्थ घालणाऱ्या पुजाऱ्यांनी का कोण जाणे हा संकल्प मनात झाल्या क्षणी माझ्या अंगावर तीर्थाचे प्रोक्षण केले. माझे मन आनंदाने मोहरून गेले. मनोमन खात्री पटली की ही माझी विनवणी समर्थांनी ऐकली.

ह्या घटनेनंतरही ३-४ महिने लोटले. पण माझा श्रीदत्तमहाराजांपुढे हा विषय काढायचा धीर निघाला नाही. अखेर आश्रमांत प्रौष्ठपदी सप्ताह चालू होता. त्यावेळी एका सकाळी मी मनाचा हिय्या करून आश्रमात गेले. पू. दत्तमहाराज माडीवर बसले होते. मी जिना चढून वर जात असतांना पू. सौ. आईसाहेब पायऱ्या उतरतांना दिसल्या. मी त्यांना नमस्कार करून विचारले, महाराज आहेत का वर? मला जरा बोलायचे आहे. अग, मग जा लवकर वर. एकटेच बसले आहेत. आईसाहेबांच्या आशीर्वचनाने माझा धीर वाढला आणि मी वर जाऊन पू. महाराजांना वंदन करून माझी इच्छा त्यांना सांगितली. पू. दत्तमहाराजांनी लगेच संमति दिली आणि माझ्या सुट्ट्या

केव्हा लागतात ते पाहून सप्ताहाच्या तारखाही ठरवून टाकल्या. (दि. १७-१२-१९८७ - ३-१-१९८८)

(आ) २५ एक मंडळी येतील अशी माझी अपेक्षा होती. तेवढी आर्थिक तरतूद मी केली होती. पण महाराजांचा त्याच्यापूर्वी हैद्राबादकडे दौरा होता. ते तेथून परस्पर येण्याचे ठरले. आम्ही इतर सर्व मंडळी पुण्याहून गेलो. पण श्रोत्यांची संख्या वाढत वाढत १५० झाली. साहजिकच हे माझ्या आंवाक्याबाहेरचे होते. तेव्हां पू. महाराजांच्या आज्ञेने सर्वांनी आर्थिक बोजा वाटून घेतला.

कुरवपूर येथील भागवत सप्ताहात श्री. मोघे काका व कै. सौ. मोघेबाई यांचे अनमोल सहकार्य झाले. विशेषत्वाने उल्लेखनीय असे सहकार्य श्रीदत्त सेवक प. पू. श्री. शरच्चन्द्र केळकर उर्फ श्री. भाऊ केळकर उर्फ केळकर स्वामी यांचे झाले. त्या सप्ताहासाठी ते दोनदा पुण्याला येऊन गेले आणि म्हणाले, 'काही काळजी करु नका. सर्व काही दत्तमहाराज करतात.' प. पू. श्री केळकर स्वामींनी दिलेला दिलासा, तेथील खर्चाची जुळवणी आणि इतर परिश्रम हे सर्व कार्य प. पू. श्री केळकर स्वामींमुळेच होऊ शकले. उद्याच्या सर्व कार्यक्रमाची आखणी रात्री बारा ते साडेबारापर्यंत ठरवून दुसरे दिवशी पहाटे ब्राह्ममुहूर्ती ३॥ वाजता श्री केळकर स्वामी सर्वांना उठवायला येत असत. एकदा श्रीदत्तमहाराज त्यांना म्हणाले, अहो केळकर तुम्ही झोपता कधी? प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्यांचा केलेला हृद्य सत्कार आजही डोळ्यापुढे उभा राहतो व अंत:करण गहिवरुन येते.

(ई) कुरुगड्डीला यंदा कडाक्याची थंडी आहे असे कानावर

आले. तसे आम्ही काही भक्तांनी पू. महाराजापुढे चिंता व्यक्त केली. पू. महाराजांनी सौ. सविताविहिनींना घरच्या पूजेतील दत्तूबाळाला एक लोकरीचे वस्त्र विणायला सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी एक छोटेसे पांघरूण केले व ते दत्तूबाळाला घातले. आश्चर्य म्हणजे आम्ही सर्व कुरवपूरला जाईपर्यंत थंडी खूपच कमी झाली होती. कुणालाही थंडीचा त्रास झाला नाही.

(उ) पहिल्या दिवशी पूजेची सगळी जमवाजमव करण्यात मला स्नानाला उशीर झाला. मी नदीवर पोहोंचेपर्यंत बहुतेक सर्वांची स्नाने उरकली होती. पण योग असा की पू. दत्तमहाराजांचे स्नान व्हायचे होते. आईसाहेबांनी मला पू. महाराजांबरोबर स्नान करायला सांगितले. अशा रीतीने माझे महाराजांच्या सान्निध्यात कृष्णास्नान झाले. पू. महाराजांनी दोन ओंजळी पाणी माझ्या अंगावर घातले. ही एक त्यांची मोठीच कृपा झाली. मला धन्य धन्य वाटले.

यानंतर पुण्याहवाचनपूर्वक भागवतसप्ताहाच्या संकल्पाचा विधि झाला. पू. महाराजांना ओंवाळण्याची सेवा झाली. मी पू. महाराजांसाठी एक भरजरी रेशमी पीतांबर मुद्दाम येवल्याहून आणला होता. तो मात्र त्यांनी अंगावर न घालूं देतां हातात घेतला व पुढे नरसोबाच्या वाडीत स्वारीला समर्पण केला.

सकाळचे संहितावाचन सोलापूरचे वे. शा. सं. डॉ. रा. ल. (राजाभाऊ) जोशी करीत असत. त्यांच्या शुद्ध अस्खलित वाणीतून निःसृत होणारे ऐकायला छान वाटायचे. दुपारी २॥-३ वाजतां पू. महाराजांचे निरूपण सुरूं व्हायचे. सर्वच श्रोते श्रवणाला उत्सुक होते.

त्यामुळे महाराजांना सर्वांनी विनंति केली की इथे आपले निरूपण विस्ताराने व्हावे. कुणाला कुठे जायची घाई नाही. त्यामुळे हे वाचन रात्री ८-८॥ पर्यंत चाले.

भगवान श्रीगुरु श्रीपादश्रीवल्लभ दत्तात्रेयांचे आवडते कुरवपूर. ते कुरवपूर आपली वाट पहात आहे. असे प. पू. श्रीदत्तमहाराजांना वाटले एवढेच नाही तर आपणास या महान तपोभूमीने वात्सल्याने हाक मारली आहे असेअंतर्यामी कळून आले. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराजांना, "आपण येथे भागवत सप्ताह करावा आम्हाला एंकावयाचा आहे" असेच भगवान श्रीपादश्रीवल्लभांनी सांगितले असेच म्हणावे लागेल.

श्रीमद्‌भागवत हा श्रीदत्तमहाराजांचा प्राणविषय होता. अद्वैतदृष्टी, शक्तिपातसाधना आणि भक्तियोग यांचा एकात्म आविष्कार श्रीदत्तमहाराजांमध्ये व्यक्त होत असे. ईश्वराविषयी 'अनुरक्ति, संसाराविषयी विरक्ती, आणि फलस्वरुप ब्रह्मानुभूति' हा भक्तीचा अंतरंग प्रवास आहे असे भक्तीचे अंतरंग अधिकारी असलेले ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज यांचा भागवत सप्ताह कुरवपूर येथे त्यावेळी जे भक्त, जे साधक हा भागवत सप्ताह ऐकावयास असतील त्यांचे खरोखर अहोभाग्य!

## कुरवपूर आदर्श तपोभूमी -

कुरवपूर ही श्रीगुरुंची अत्यंत गूढ एकांतातील नितांत रमणीय तपोभूमी आहे. श्रीज्ञानेश्वरांच्या सहाव्या अध्यायात श्रीज्ञानेश्वर माऊलींनी साधनास्थळी कशी असावी त्याचे सुंदर वर्णन केले आहे.

ते वर्णन कुरवपूरला तंतोतंत लागू पडते. श्रीगुरुंच्या पदस्पर्शाने कुरवपूरचा परिसर भारलेला आहे. बहिर्मुखी मनुष्यही इथे अंतर्मुख होतो. त्याच्या मनोभूमीत वैराग्याचे बीज पेरले जाते आणि तो परमार्थाचा पथिक बनतो.

अशा या तपोभूमीत भागवत सप्ताहाचे सात दिवस कसे आनंदमय वातावरणाने बहरलेले होते. याचे वर्णन करणे अशक्य आहे. 'सेवितो हा रस वाटितो आणिकां। घ्या रे होऊ नका रानभरी।' अशी भक्तीरसाची पखरण श्रीदत्तमहाराज करीत होते. भक्तीवाचून माणसाच्या चित्ताला खरी शांती प्राप्त होत नाही व भक्तीशिवाय केलेल्या इतर सर्व खटपटी व्यर्थ होत असा भागवताचा सिद्धांत आहे. भक्तिस्वरूपात ऐक्य पावलेले ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज कुरवपूर येथील भागवत सप्ताहात या 'शांतीभक्ती'चा अखंड वर्षाव करीत होते.

**करिता ऐक्यभावे निजभक्ती । उत्कृष्ट उपजे पूर्ण शांती ।**
**तेणे होये असतांची निवृत्ती। भक्तां 'पूर्ण प्राप्ति' परमानंदे।।**

एकनाथी भागवत -२:६२१

अशा परमानंदात सर्व श्रोते न्हाऊन निघत होते.

श्रीदत्तमहाराज यांच्या श्रीभागवत कथनातून केलेला कपिल महामुनींचा उपदेश - कुरवपूर येथे वेळ भरपूर असल्यामुळे कोणालाही घरी जाण्याची घाई नसल्यामुळे प. पू. श्रीदत्तमहाराजांना श्री. मोघे काका यांनी असे सांगितले की, 'महाराज आपण कपिल महामुनींचा उपदेश येथे विस्तृत सांगावा अशी आम्हा सर्व श्रोत्यांची आपल्या चरणी प्रार्थना आहे.'

उपदेश - विदूरजी मैत्रेय महर्षींना म्हणतात, 'मला कर्दम व देवहूतीच्या वंशाची कथा सांगा. कपिल महामुनींचे चरित्र ऐकण्याची माझी इच्छा आहे.'

मैत्रेय महर्षी म्हणतात, 'कपिल ब्रह्मज्ञानाचे स्वरुप आहेत. कर्दम व्हाल तर तुमचे घरी कपिल येतील. कर्दम म्हणते जितेंद्रिय.'

कपिल गीतेचा प्रारंभ तिसऱ्या स्कंधात २५ व्या अध्यायापासून होतो. भागवतात या प्रकरणाचे नऊ अध्याय आहेत. यात सांख्यशास्त्राचा उपदेश आहे. पहिल्या तीन अध्यायात वेदांताचे ज्ञान आहे आणि शेवटी भक्तीचे वर्णन आहे.

देवहूतीने भगवान कपिलाजवळ जाऊन त्यांना म्हटले की, 'आपली अनुमती असेल तर मला काही प्रश्न विचारावयाचे आहेत.' कपिल महामुनी म्हणाले, 'माते, संकोच करु नकोस.' जे तुला विचारावयाचे आहे ते खुशाल विचार. माता देवहूतीने आरंभीच शरणागती स्वीकारली होती.

देवहूतीने विचारले, 'जगात खरे सुख कुठे आहे? खरा आनंद कुठे आहे? कपिल महामुनींना आनंद झाला आणि ते म्हणाले, 'आई, कोणत्याही जड वस्तूत आनंद असू शकत नाही. आनंद तर आत्म्याचे, परमात्म्याचे स्वरुप आहे.' आनंद अविनाशी आत्म्याचे स्वरुप आहे. कपिल महामुनी पुढे म्हणतात, 'हे माते, जर आनंद शरीरात असता तर त्यातून प्राण निघून गेल्यानंतर ते शरीर लोकांनी जतन करून आपल्याजवळ ठेवले असते. बाह्य विषयात आनंद नाही. पण चित्तात, मनात आत्म्याचे प्रतिबिंब पडल्यामुळे, आनंदासारखा अनुभव येतो'

अंतर्मुख झालेल्या एकाग्र मनात ईश्वराचे प्रतिबिंब पडते तेव्हा आंनद मिळतो. मनाच्या आत आल्यावर सुख मिळते. मनच बंध व मोक्षाला कारण आहे. जेव्हा मन निर्विषय होते तेव्हाच आनंदरूप होते.

जगात सुखी होण्याचे दोनच मार्ग आहेत. एक ज्ञानमार्ग व दुसरा भक्तिमार्ग.

ज्ञानमार्ग म्हणतो - सर्व काही सोडून परमेश्वराच्या मागे लागा. ज्ञान मार्गात वैराग्य मुख्य आहे. भक्तिमार्ग म्हणतो - सर्वस्वाचा त्याग करणे फार कठीण आहे. सर्वात ईश्वर आहे असे मानून सर्वांवर विवेकपूर्ण प्रेम करा. भक्तिमार्गात भगवद्भाव ठेवून समर्पण करायचे आहे. भक्तिमार्गात समर्पण मुख्य आहे, असो.

साक्षात दत्तावतारी श्री श्रीपादवल्लभ यांच्या सेवेमध्ये आजन्म, अखंड मग्न असणाऱ्या श्री. केळकर स्वामींच्या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळे कुरवपूर येथील श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताह उत्तम पार पडला. एवढेच नव्हे तर न भूतो न भविष्यति असा झाला. श्री. केळकर स्वामींच्या ऋणातच मी राहू इच्छिते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे एकनिष्ठ शिष्य, प. पू. श्री. रा. ल. जोशी उर्फ राजाभाऊ यांचे अस्खलित भागवत संहितावाचन प्रत्येकाच्या ह्दयात रुजल्या शिवाय राहिले नाही. खरोखर त्यांचेही अपरंपार ऋण सर्व श्रोतृवर्गावर आहेत.

ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज एक महान अलौकिक अवतारी महात्मे होते. भागवत सांगत असताना त्यांचे महात्म्य माझ्यासारख्या अल्पबुद्धीला जे दिसले ते थोडक्यात सांगत आहे.

**देवासी सख्य करावे। प्रेम-प्रीतीने बांधावे।**
**आठवे भक्तीचे जाणावे। लक्षण ऐसे॥**

भक्ताचा रोम-रोम सद्‌गुरूमय व्हावा आणि सद्‌गुरूशिवाय त्याला दुसरा विषयच राहू नये किंबहुना विषय तो त्यांचा झाला नारायण अशा उंचीला श्रीदत्तमहाराज होते. अशा श्रेष्ठत्वाला पोचलेल्या श्रीदत्तमहाराजांना भगवंताचे श्रीगुरूचे सखा होण्याचे सौभाग्य लाभले होते. अशी उंची अशी तन्मयता अर्जुन आणि उद्धवजी यांनी प्राप्त केली होती. म्हणूनच ते श्रीकृष्णाचे प्रिय सखा झाले ; आणि त्यांच्यानंतर आम्हा सर्वांचे श्रीदत्तमहाराज हे भगवंताचे, श्रीगुरुंचे प्रिय सखा होते असेच म्हटले पाहिजे.

श्रीदासबोधाच्या प्रस्तावनेत प. पू. के. वि. बेलसरे महाराज भावपूर्ण भाषेत म्हणतात - 'दास्याचा विकास झाल्यावर दास आपले दासपण विसरत नाही, पण भगवान आपले स्वामीपण विसरतो व दासाला मित्रत्वाने पाहातो. भक्ताचे भगवंतावरील प्रेम दास्यप्रधान तर भगवंताचे भक्तावरील प्रेम सख्य प्रधान असते. दासाला न संकोच, न भीती उरते तर भगवंताला न परकेपण, न मोठेपण उरते. दोघेजण वेगळे होत नाहीत, वेगळे होऊ शकत नाहीत. भक्ताचा प्रेमाने पवित्र केलेला आपलेपणा आणि भगवंताचा मंगलमय मित्रपणा यांचा मधुर संगम सख्यभक्तीत असा मधुर संगम श्रोतृवर्गाला दिसून आलेला होता' प. पू. ज्ञानोबा माऊलीने कृष्णार्जुन अद्वैताचे वर्णन करताना म्हटले.

**हृदया हृदय येऊ जाहले । ये हृदयीचे ते हृदयी घातले।**
**द्वैत न मोडिता केले। आपणा ऐसे अर्जुन॥**

अशा भूमिकेतून भागवत सांगणारे श्रीदत्तमहाराज होते.

आत्मनिवेदन म्हणजे अद्वैत आत्मसाक्षात्कार. पूर्ण समर्पणता, स्वत:च ईश्वरमय होऊन विश्वात्मक भावनेने लोककल्याणार्थ ईश्वरी गुणांचे प्रकटीकरण करणारे ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज भक्त ईश्वर हे द्वैत संपून बह्मानंदमय अद्वैत आनंदात, अखंड मग्न असत. प. पू. श्रीएकनाथ म्हणतात,

**देवो देवपणे दाटला। भक्तु भक्तपणे आटला।**
**दोहोचाही अंतु झाला। अभेद जाहला अनंतु।।**

(श्रीएकनाथी भागवत, अ१. ८९)

भक्तीला ज्ञानाची जननी म्हटले आहे आणि ज्ञानामध्ये भक्तीचा जन्म होतो. ब्रह्ममूर्ती श्रीदत्तमहाराजांच्या बाबतीत श्रीदत्तमहात्म्यातील पुढील ओवी अत्यंत समर्पक आहे.

**भक्ती ज्ञानाची माऊली। करी कृपेची साऊली।**
**जिणे नामरुपा आणिली। ब्रह्ममूर्ति भली अनायासे।।**

भागवत सांगताना श्रीदत्तमहाराजांचे अंत:करण निष्काम भगवदर्पित, भावभक्तिसंपन्न होते. त्यावेळी शुद्धभक्ती, साध्यभक्ती, प्रेमभक्ती व पराभक्तीचा उदय होतो. ईश्वराची दया, सुहृदभाव यांच्या स्मरणाने ईश्वरी दिव्यलीला कथन करताना आर्तचित्त श्रीदत्तमहाराजांचे अंत:करण द्रवीत होत असे, डोळे भरुन येत असत ईश्वरी प्रेमातून अष्टसात्त्विक भाव प्रगट होत असत. श्रीदत्तमहाराजांच्या तीव्र भक्तिभावातून जागृत झालेल्या आंतरिक दिव्यशक्तीचा, स्वसंवित्, कुंडलिनी महाशक्तीचा आल्हादिनीशक्तीचा हा क्रियाविष्कार प्रगट

होत असे. एवढेच नव्हे तर सर्व श्रोतृवर्गाला शक्तिपात दीक्षेची प्राप्ति सहजगत्या होत असे.

श्रीदत्तमहाराजांचे भागवत कथनाचे हे वैभव पाहून श्री श्रीपादश्रीवल्लभ स्वामींच्या ह्दयात कौतुकाने महानंद दाटून आला असेल.

'सरस्वति वरदपात्र' असलेले श्रीदत्तमहाराज 'शाब्दे परे च निष्णात।श्रोत्रियं 'ब्रह्मनिष्ठ' या श्रुतिप्रणित सद्गुरु लक्षणांचे श्रीदत्तमहाराजांचे दर्शन कुरवपूर येथे सर्वांना घडलेच आहे.

ब्रह्मर्षि श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी निरपेक्षता, भगवद्चिंतन, समदर्शन, निरभिमान, निर्ममता, अपरिग्रह, निर्द्वन्द्वता, प्रशान्तचित्त यांचा समावेश होता. याचे प्रत्यंतर त्यांचा स्वभाव, जीवन, कार्य यामधून येत असे

श्रीएकनाथ महाराज म्हणतात -

**चैतन्य सरोवरीचे कमळ। विकासले अष्ट दल।**
**ते हे संतलक्षण केवळ। स्वानंदशील साधूसी।।**

(ए. भा. २६. ३५०)

भागवतसप्ताहांनतर आचार्य पूजन झाले. सर्व समारंभ नेटका झाल्यावर माझ्या मातु:श्रीनी पू. दत्तमहाराजांस नमस्कार केला. महाराज त्यांना कौतुकाने म्हणाले, ''सुशीलाने फार छान सप्ताह केला बरका!'' माझ्या आईला धन्यता वाटली.

मध्यंतरी थोडा वेळ मिळाला तेव्हा आम्ही कृष्णामाईच्या पैल तीरावर जाऊन तिथल्या खडकांवर उमटलेल्या मंगल आणि पावक

पदचिन्हांचे दर्शन घेतले. एका ठिकाणी तर त्यांच्या संपूर्ण शरीराचा ठसा उमटलेला आहे. आणखी एक विशेष योगायोग इथे नमुद करावा वाटतो, मी पुण्यात परत येताच त्याच दिवशी सुट्टी संपत असल्याने मला शाळेला जावयाचे होते, पण घरी येताच समजलं की सुट्टी एक दिवसाने वाढली आहे.

असा वैभवशाली, भक्तीने परिपूर्ण बहरलेला असा कुरवपूरचा भागवत सप्ताह झाला. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराजांच्या चरणी शतशः प्रणाम करून एवढेच म्हणते,

**नमितो योगी, थोर विरागी, तत्त्वज्ञानी संत।**
**ते सत्कवि वर परात्पर गुरु श्रीकृष्ण भगवंत,**
**श्रीकृष्ण भगवंत।।**

**श्रीवासुदेव निवास आणि पंथराजच्या गुरूपौर्णिमेच्या अंकात प्रसिद्ध झालेले वृत्त**

कुरवपूरचा भागवतसप्ताह - दिनांक २७ डिसेंबर १९८७ ते ३ जानेवारी १९८८ 'न भुतो न भविष्यति' असा हा सप्ताह झाला. गोपिभाव असलेल्या गुरुभगिनी कु. सुशीलाताई मोडक, पुणे यांची आग्रहाची इच्छा म्हणून हा कार्यक्रम घडून आला. या भागवतसप्ताहामुळे कृष्णा यमुना झाली आणि कुरवपूर वृंदावन झाले. श्रीमद्‌भागवताशी सामरस्याने एकरुप झालेल्या पू. श्रीदत्तमहाराजांनी दिलेल्या ज्ञानमृत भोजनाने सर्व श्रोते तृप्त झाले प्रत्यक्ष श्रीपादश्रीवल्लभांनाही ही सुवर्णसंधी मिळाल्याने त्यांनी पू. श्रीदत्तमहाराजांवर परमकृपेचा वर्षावच केला. सोलापूरचे प्रा. राजाभाऊ जोशी यांनी भाव आणि अर्थ सहज व्यक्त करणारे असे संहिता वाचन केले. या सप्ताहास गेलेल्या भाग्यवान भक्तांचा हा आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग झाला.

# श्रीक्षेत्र गाणगापूर भागवतसप्ताह

## माघ व ॥ ६ माघ व ॥ १३

**प्र. र. देशपांडे**

प. पू. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज यांचे जन्मोत्सव सोहळा संपल्यानंतर श्री क्षेत्र गाणगापूर येथे महाराजांचा भागवतसप्ताह श्री साबळे शेट यांनी आयोजित केल्याचे समजले. महाराजांचे समवेत तीर्थयात्रेचा लाभ घ्यावा असे आम्ही उभयंतांनी ठरविले होते. क्षेत्र गाणगापूर येथेही आपण जाणे असे निश्चित केले. प. पू. दत्तमहाराज वासुदेवा निवासात दुपार नंतर येत असत. आणि एक दिवस आम्ही उभयंतांनी मोठ्या धीराने श्रीक्षेत्र गाणगापूर येथील भागवत सप्ताहास येण्याची इच्छा व्यक्त केली. महाराज म्हणाले, "श्रवण भक्तीचा लाभ घेता येईल. इतर सर्व व्यवस्था होत असेल तर येण्यास हरकत नाही" अशा रीतीने महाराजांनी संमंती दिली.

श्रीक्षेत्र गाणगापूर येथे आम्ही एका उपाध्यायाकडे १/२ वेळा गेलो होतो. त्यामुळे त्यांचेकडे व्यवस्था होईलच अशी खात्री असल्याने आम्ही श्रीक्षेत्र गाणगापूर येथे रेल्वेने गेलो. भागवत सप्ताह योगिराज गुळवणी महाराज यांचे आश्रमात आयोजित केला होता. तो आश्रम श्री साबळे शेट यांनी बांधलेला आहे. श्रीक्षेत्र गाणगापूर येथे बस स्टॅंडवर उतरल्यानंतर प्रथम योगिराज गुळवणी महाराजांचे आश्रमात जाऊन चौकशी करून नंतर उपाध्याय यांचे घरी मुक्कामासाठी जावे असे ठरवले. टांग्याने आम्ही आश्रमात गेलो. गेट जवळच बॅगा ठेवून

चौकशीसाठी आश्रमात प्रवेश केला. तेथे एका बाकावर बसून विश्रांती घेत असताना धोतर, झब्बा टोपी घातलेले वयस्कर गृहस्थ आमचे जवळ येऊन त्यांनी आमची चौकशी केली. भागवत सप्ताहासाठी आम्ही पुण्याहून आलो आहोत असे त्यांना सांगताच, 'बाहेर का थांबला?' असे म्हणून एका सेवकाला बोलावून घेतले, अंगुली निर्देश करून ह्यांना वरच्या मजल्यावरील खोली उघडून दे असे सांगून आम्हाला त्याचे समवेत जाणेस सांगितले. इतकेच नव्हे तर सप्ताहात येथेच मुक्काम करा, प्रसाद घ्या, इतर ठिकाणी जाऊ नका अशी हात जोडून प्रार्थना केली. आम्हाला आश्चर्य व आनंद वाटला. पहिलाच आश्चयानंदाचा धक्का महाराजांनी दिला. चौकशी नंतर ते स्वत:च साबळे शेट आहेत असे समजले. नंतर सौ. साबळे काकूही आमच्या समाचाराला आल्या. त्यांनी आमची जेवणाची वगैरे सर्व व्यवस्था केली. 'लक्ष्मीनारायण' स्वरूपात तुम्ही आला आहात. नि:संकोच रहा. केवढा आदर व अतिथी भाव! सायंकाळी प. पू. महाराजांचे आगमन झाले. तसेच श्री पारखीशास्त्री आणि त्यांचे समवेत दोन विद्यार्थी आले.

गोकर्ण महात्म्याचेवेळी आमचे लक्षात आले की, बाहेरगावचे कोणीही नाही. शास्त्रीबुवा स्नानासाठी संगवावर जात असत. त्यामुळे संहिता वाचन सकाळी ८॥ वाजता सुरु होई. त्याचा मीही लाभ घेतला. व महाराजांचे परवानगीने श्री गाणगापूर मंदिरात नृहसिंह सरस्वतींच्या पादुकांसमोर द्विसाहस्त्रीचे पारायण सुरु केले.

संहिता वाचनासाठी श्री साबळे पती पत्नी व आम्ही उभयतां होतो. त्यामुळे भागवत सप्ताहाचे महात्म्य - भाग्य जवळून अनुभव घेता आला. प. पू. महाराज सकाळचे आन्हिक करून संहिता

श्रवणासाठी येत असत. महाराजांची आसन व्यवस्था करण्याचे भाग्य मला सतत ७ दिवस मिळाले. महाराजांचे अगदी सानिध्यात बसण्याचा लाभ आम्हा उभयंतांना सतत ७ दिवस मिळाला. या सप्ताहासाठी रीक्षेत्र काशी येथील निर्मलानंद स्वामी उपस्थित होते. ते रोज सकाळी 'पापनाश' तीर्थावर स्नानासाठी जात असत. एक दिवस त्या तीर्थावर स्नान करताना 'श्रींच्या पादुकांचा'प्रसाद मिळाला. आम्हा उभयतांना त्यांनी त्या दाखविल्या. आम्ही पादुकांचे दर्शन घेतले. त्या पादुका अजुनही त्यांचे जवळ आहेत.

संहिता वाचनानंतर भोजन प्रसाद महाराजांचे सानिध्यात आम्हा उभयतांना हा लाभ मिळाला व महाराजांची कृपादृष्टी रोज आमचेवर होत असे.

दुपारी ३ वाजता 'निरूपण' गाणगापूर गावातील पुजारी व संगमावरील काही सेवक श्रवण भक्तीला येत असत. श्रवण भक्तीसाठी ३०/४० श्रोत्यांची उपस्थिती असे. त्यामुळे श्रीक्षेत्र गाणगापूर येथील भागवत ज्ञान कथा अगदी जवळून ऐकण्याचा लाभ आम्हाला मिळाला. महाराजांचे इतक्या जवळ येण्याचा योग पुन्हा आला नाही. महाशिवरात्रीचे एक दिवस आधी भागवत सप्ताह समाप्ति झाली. श्री पारखी शास्त्रींची यथासांग पुजा श्री साबळे पती पत्नीनी केली व योग्य सन्मान केला. शास्त्रीजी सकाळीच परतले.

सायंकाळी प. पू. महाराजांची पुजा व सत्कार केला. सायंकाळी महाराज तेथून निघाले. एक अनुभव येथे नमुद करण्यासारखा आहे. भागवत सप्ताहानंतर संगमावर श्रीगुरुचरित्र पारायण सप्ताह करावा ही माझी इच्छा माझ्या पत्नीला सांगितली तीने ही संमती दर्शविली.

संगवावर मुक्काम करण्याचे असल्याने किराणा दुकानात जाऊन सात दिवसांचा शिधा घेऊन दुकानात ठेवला. संगमावर जाताना घेऊन जाऊ असे दुकानदाराला सांगितले व महाराजांना निरोप देण्यासाठी व सप्ताहाची परवानगी घेण्यासाठी आश्रमात गेलो. महाराजांची निघण्याची तयारी झाली होती. प्रत्येक जण महाराजांना नमस्कार करत होता. आम्ही उभयतां पुढे गेलो पत्नीने नमस्कार केला, मी केला व सप्ताहाची परवानगी विचारण्यापूर्वीच महाराज म्हणाले, 'आता सप्ताह वगैरे करणेचा नाही, येथून सायंकाळी ७ वाजता लगेचच पुणे एसटी आहे त्या बसने तुम्ही निघा.'

आम्ही उभयतां एकदम अवाक् झालो. काय विचारावे ते सुचलेच नाही. पटकन सौ. म्हणाली महाराज उद्या महाशिवरात्र आहे. आम्ही संगमाचे स्नान केले नाही., लगेचच महाराज म्हणाले, 'उद्या ते करून सायकाळी ७ चे बसने निघा' आंर्तज्ञानाने महाराजांनी ओळखले आणि आम्ही शिवरात्रीला सायंकाळी ७ चे बसने निघालो.

***

# खर्डा येथील भागवत सप्ताह (१९९०)

**श्रीमती नीलाताई जोशी**

मराठवाडयातील खर्डागाव प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या आजोबांपासूनचे अनुग्रहीत गाव आहे. येथील प्रत्येक घरातील सुना, मुले, मुली प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अनुग्रहीत आहेत. गोकुळामध्ये गोपींची जशी भगवंतावर भक्ती होती तशी खर्ड्यात प. पू. श्रीदत्तमहाराजांवर सर्व गावाची भक्ती आहे. हे निरतिशय प्रेम प. पू. श्रीदत्तमहाराज अंतरंगात जाणून असतात. भक्त ज्यावेळी अनन्यपणे भक्ती करीत असतो. त्यावेळी देव किंवा गुरु यांनाही भक्ताची ओढ लागत असते. तसे खर्डागावावर प. पू. श्रीदत्तमहाराजांचे प्रेम आहे. त्या गावची त्यांना ओढ आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी सद्गुरु प. प. श्रीनृसिंहसरस्वती (दीक्षित)स्वामीमहाराजांच्या आज्ञेने पहिला प्रौष्ठपदी श्रीमद्भागवत सप्ताह इ. स. १९२६ साली श्रीक्षेत्र औरवाड येथे केला; पुढे त्यांच्याच आज्ञेनुसार दरवर्षी तेथेच प्रौष्ठपदी सप्ताह निष्ठेने ४० वर्षे केला. पहिली २५ वर्षे त्यांनी औरवाडच्या बाहेर सप्ताह केले नाहीत. १९५० साली त्यांनी औरवाडच्या बाहेर पहिला सप्ताह केला तो खर्डा येथेच. ह्या सप्ताहाची प्रत्यक्षदर्शी माहिती उपलब्ध नसली तरी इ. स. १९९० सालच्या सप्ताहाची हकीकत आम्ही येथे देत आहोत.

खर्ड्याला १९९० साली भागवत सप्ताह झाला. त्यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराज तेथे पंधरा वीस दिवस होते. सप्ताहाचा बाह्यरंगाने फार मोठा थाट नसे. साधे कॉटवर घातलेले गादीचे आसन असले तरी भाव मात्र चंदनाच्या आसनावर फुलांचा सडा पडावा तसा खर्डेकर मंडळीचा होता. दुपारी २॥ वाजता निरूपणाला सुरुवात होई. उन्हाळा कोण असे! पण खर्डेकरांचे भक्तिभावाने प. पू. श्रीदत्तमहाराजांना शीतलता येई. 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे' ही वाक्ये ऐकली की खर्डेकरमंडळी उष्मा काय पण वेळ काळ सर्व विसरुन जीवाचे कान करून ऐकत.

**भक्तिचा नंदादीप लावियला अंतरात ।**
**गुरुदेवाचे ते शब्द मनी राहती तेवत ॥**
**भगवंत आले गावी भागवत सांगतात।**
**बोध खोल खोल जाई देहभान विसरत ॥**
**किती दिसांनी आलात आता करु नका दूर।**
**कसे राहू तुम्हावीण मना लागते हुरहुर॥**

सर्व भक्त मंडळीचे भाव हे असे तन्मयतेचे होते. एकरुप झाल्याचे होते. निरुपण होऊन दोन तास झाले तरी महाराज निरुपण सांगण्यात रंगुन जात. या लोकांना वाटे गुरुदेव आमचे दमले. असे किती बोलणार आमच्या कल्याणासाठी? ते सारे. प्रेमार्द होत. लगेच 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे' हा गजर सुरु करीत. भागवत सांगण्यात रंगून गेलेले महाराज भानावर येत. त्यांच्या मनातील भाव ओळखून हसून थांबत असत.

येथे भागवत रंगत होते. खर्डेकरांच्या भक्ति गुलाबपाण्याचा

शिडकावा सारखा होत होता. श्रोता व वक्ता दोन्ही एकरुप होत होते. हा भागवत सप्ताह काही वेगळेच रुप घेत होता. चार तासाहून जास्त निरुपण होई. सर्वांना वाटे आपले श्रीमहाराज इतके सांगताहेत डोळयांना किती त्रास होत असेल असे वाटून रात्री त्यांच्यापैकी एक भक्त प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या पायाला गाईचे तूप लावण्यासाठी येई. प. पू. श्रीदत्तमहाराज कुठेही कोणाकडूनही सेवा करून घेण्यास अजिबात तयार होत नाहीत. पण येथील भक्ति ही काही वेगळीच. त्यांचा भाव इतका कोमल मृदु होता की, प. पू. श्रीमहाराजांना नाही म्हणणे शक्यच होत नसे. त्यावेळी त्यांच्या बोलण्यातून एक गोष्ट सहजपणे कळून जायची. त्यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणायचे आम्ही वाचतो कुठे? नुसते निरुपण करतो. भागवत सप्ताह इतके झाले की ते मुखोद्‌गत झाले होते. प्रत्येकाला वाटे प. पू. श्रीमहाराजांनी आपल्याकडे जेवावे. या उतार वयात ते रोज वेगळया ठिकाणी जेवायला जात होते. हे कशाच्या बळावर? **भाव भक्ति भीमा उदक ते वाहे** तशी भक्तीची सरिता वहात होती. एवढे खरे.

सप्ताहाच्या समाप्तीचा सोहळा तर आगळा वेगळाच. ग्रंथराज भागवत व भागवत्तोत्तम व्यास श्रीमहाराजांची मोठी मिरवणूक खड्यातून काढली. प्रत्येक घरातील स्त्रीने प. पू. श्रीमहाराजांना ओवाळले. तो प्रसंग विलक्षण पवित्र होता. एकनाथांचे भागवतातील गोपींचे भक्तिवर्णन या वेळी आठवले. अनन्य भावाने गोपी एकरुप झाल्या. त्यांच्या भक्तिपुढे सर्व साधने पराभूत झाली. त्यांना वेद माहित नव्हता. सच्चिदानन्द म्हणजे काय हे माहित नव्हते. पण सगुण रुपाची आराधना करता करता त्यांना आत्मसुखाचा लाभ झाला.

या वर्णनाप्रमाणे खर्डा गाव अनन्य भक्तीने प. पू. श्रीदत्तमहाराजांशी एकरुप झालेले आहे. २॥ ते ३ तास मिरवणूक चालली होती. प. पू. श्रीमहाराज जरी कुठेही आसक्त होत नसले तरी खर्डा गावाची भक्ति पाहून त्यांच्या मनात या गावाविषयी ओढ वाटे. त्यांच्या या भोळया भावामुळे प. पू. श्रीदत्तमहाराज स्वत:चे कष्ट विसरत. पालखी मिरवणूक इतका वेळ झाली. प. पू. श्रीदत्तमहाराज आता थकलेले असतील असे वाटण्याच्या आत ते आल्या आल्या पाय धुवून संध्येसाठी बसले. सगळेच विलक्षण वाटते.

प. पू. श्रीदत्तमहाराज हे सर्वांचे भक्तीभाव ओळखून आपल्या थकलेल्या शरीराचीही फारशी तमा बाळगत नाहीत. सर्व वेळ अनुसंधान ठेवून ते न दाखविता राहतात. खर्ड्याला गोकुळाचीच उपमा द्यावीशी वाटते. कारण भाव बळाने श्रीदत्तमहाराज येथे रमले. खर्डागाव श्रीमहाराजांना फार प्रिय आहे. याचा उल्लेख अनेकवार आला आहे. एप्रिल १९९५ मध्ये श्रीमहाराज पुन्हा एकदा खर्ड्याला जाऊन आले. कोणताही कार्यक्रम न ठरविता अगदी मोकळया मनाने घरोघरी आपलेपणानी भेटी देऊन आले. सर्वांची प्रेमभराने चौकशी केली. सर्व गावाला शुभाशीर्वाद देऊन तृप्त केले. तेवढेच स्वत:ही अंतर्यामी समाधान पावलेले चेहऱ्यावरुन उमटले गेले! धन्य ते गाव धन्य ते भाव. तुमचे आमचे त्याला कोटी कोटी प्रणाम!

***

# मलकापूरचा भागवतसप्ताह

**-रमेश श्रीधर घिर्णीकर**
(उपाख्य कृष्णाजी श्रीधर घिर्णीकर)
**-प्र. ब. कुलकर्णी**

## प. पू. महाराजांचे प्रथम दर्शन

मला प. पू. महाराजांचे प्रथम दर्शन फाल्गुन व॥ १ शके १९०९ दिनांक ४. ३. १९८८ शुक्रवार रोजी झाले. महाराज महाराष्ट्र एक्सप्रेसने पुण्याहून मलकापूरला आले होते. माझे काका कै. बंडुनाना घिर्णीकर यांनी महाराजांचा अनुग्रह घेतला होता व त्यांच्या आमंत्रणावरून प. पू. महाराज मलकापूरला आले होते. महाराजांबद्दल बरेच ऐकण्यात आले होते. दर्शन घ्यावे व जमल्यास अनुग्रहाची प्रार्थना करावी असा एक सहज विचार मनात होता. आणि महाराजांचे दर्शन झाल्यावर व त्यांचे वागणे बोलणे पाहिल्यावर मात्र त्यांच्या विषयीच्या श्रद्धेने मन भरुन गेले व हेच आपले गुरुमहाराज व्हावेत अशी तीव्र इच्छा मनात घेऊन मी व माझ्या पत्नीने त्यांच्या जवळ अनुग्रहाची प्रार्थना केली व प. पू. महाराजांनी लगेच संमती दिली. त्याच दिवशी श्री. मल्लीकार्जुन संस्थानच्या सभामंडपात मलकापुरातील इतर भक्तांसमवेत आम्हा उभयतांना प. पू. महाराजांनी अनुग्रह देऊन आपल्या छत्राखाली घेतले. भोजनानंतर प. पू. महाराज दुपारच्या विश्रांतीसाठी आमच्या घरी आले व आमचे घर पावित्र्याने भरून गेले. प्रथम दर्शनाच्या दिवशीच अनुग्रह झाला एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष गुरुमहाराज आमच्या

घरी रहावयास आले. या आमच्या भाग्यावर आमचाच विश्वास बसत नव्हता. सायंकाळी संध्या झाल्यावर स्थानिक दत्तमंदिरात, 'ब्राम्हण सभा, मलकापुर'च्या वतीने श्री महाराजांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी श्री. महाराजांचे प्रवचन झाले व नंतर प. पू. महाराज पुढील कार्यक्रमासाठी चिखलीला गेले.

**प. पू. महाराजांचा लाभलेला सहवास**

१९९० साली प. पू. महाराजांचा भागवत सप्ताह मलकापुरला माघ वद्य ।।५ पासुन करण्याचे ठरविले होते; परंतु चार दिवस आधीच पू. अशोकराव महाराज निरोप घेऊन आले की काही अडचणीमुळे प. पू. महाराज येऊ शकत नाहीत त्यामुळे भागवत सप्ताह पुढे ढकलावा लागेल. भागवत सप्ताह व्हावा अशी तीव्र इच्छा असल्यामुळे मी माझ्या बंधुसह(श्री अरुण घिर्णीकर) लगेच पुण्याला महाराजांना विनंती करण्यासाठी गेलो. तेथे असे कळले की महाराज एका ग्रंथाच्या प्रकाशन समारंभासाठी नाशिक येथे गेलेले आहेत. आम्ही लगेच नाशिक गाठले. तेथे गेल्यावर व तेथील घटनाक्रम कळल्यावर प. पू. महाराजांच्या सर्वज्ञतेची प्रचिती आली. मलकापुरचा कार्यक्रम रद्द झाल्यामुळे प्रथम वर्गाचे आरक्षण महाराजांनी रद्द करावयास सांगितले होते. (२-३ दिवस आधी) व त्याप्रमाणे ते झालेही होते. पण आम्ही नाशिकला पोहचण्याच्या आधीच प. पू. महाराजांनी "**आपल्याला संध्याकाळी मलकापुरला जायचे आहे. त्याचे आरक्षण करा**", असे रघुनाथकाकांना सांगितले होते. त्याप्रमाणे थ्री टायरचे आरक्षण करून सकाळी प. पू. महाराज मलकापुरला पोहोचले, आम्ही सोबतच



भागवत सप्ताह - मलकापूर




सहस्रचंद्रदर्शनानिमित्त तुला



श्रीमद्भागवत सप्ताह - कुरवपूर



गुलबर्गा येथील भागवत सप्ताह - पू. अशोक महाराज आणि डॉ. कमलापूरकर श्रवण करताना



गुलबर्ग्याच्या भागवतसप्ताह समाप्तीनंतर कांचीकामकोटीच्या परमाचार्यांचा प्रसादरूप
मोत्यांचा हार घालताना

होतो व माघ व॥ पंचमीपासून ठरल्याप्रमाणे भागवत सप्ताह सुरु झाला. **दुसऱ्या दिवशी माघ व ॥ षष्ठीला प. पू. महाराजांचा वाढदिवस होता.** त्या दिवशी महाराजांनी ८० वर्ष पूर्ण करून ८१ व्या वर्षात पदार्पण केले. हा सुवर्णयोग आमच्या घरी आला. त्यादिवशी सुवासिनींकडून औक्षण करवून त्यांना मंगलस्नान घातले. सायंकाळी भागवत वाचन झाल्यावर एक छोटासा समारंभ आयोजित केला होता. त्यात प. पू. महाराजांची शर्करा तुला करण्यात आली. महाराजांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा पुढे मे महिन्यात पुण्यात संपन्न झाला परंतु प. पू. महाराजांनी ज्या दिवशी ८१ व्या वर्षात पदार्पण केले तो मुख्य दिवस साजरा करण्याचे भाग्य आम्हास लाभले. ही महाराजांची आमच्यावर परमकृपा म्हटली पाहिजे.

त्या भागवत सप्ताहात महाराजांचा दिनक्रम असा असे - सकाळी स्नान - संध्या झाल्यावर महाराज फराळ करत व नंतर प्रेमाने आमंत्रण दिलेल्या २-३ भक्तांच्या घरी जाऊन येत. त्यावेळी मलकापुरचे रस्ते चांगले नव्हते. जुनी वस्ती असल्याने वाहनाचीही सोय नव्हती. महाराजांना जास्त त्रास होऊ नये म्हणून श्री. रघुनाथकाका हे टाळण्यासाठी सुचवून पहात पण, ''लोक प्रेमाने बोलावतात, आपण गेलं पाहिजे'', असे महाराज म्हणत असत. त्यानंतर मल्लीकार्जुन संस्थान येथे गेल्यावर दुपारचे भोजन होई व त्यानंतर अखंड ५ तास पू. महाराज भागवत सांगत असत. संध्याकाळी परत आमच्या घरी येत. माझे तीर्थरुप महाराजांपेक्षा एक वर्षाने मोठे होते. सायंसंध्या झाल्यावर महाराज रोज त्यांना

नमस्कार करीत. नंतर त्यांची जुन्या गोष्टींवर, धर्मशास्त्रावर चर्चा होत असे. संध्याकाळी अगदी मित आहार घेत बहुधा मुगाची डाळ, पोळी किंवा खिचडी असाच बेत असे वयाच्या ८० व्या वर्षी चाललेला हा दिनक्रम प. पू. महाराजांच्या दिव्यत्वाची प्रचिती देणाराच आहे.

**श्रीमद्‌भागवतसप्ताहाची थोरवी व सद्‌विचार-**

साधारणा १९८८-८९साल असावे. मलकापूर येथील श्रीमान बंडूनाना घिर्णीकर ह्यांची बरेच दिवसाची इच्छा होती, की आपल्याकडे प. पू. महाराजांचा श्रीमद्‌भागवतसप्ताह संपन्न व्हावा. त्यानुसार पुणे येथे प्रत्यक्ष भेटीत त्यांनी प. पू. महाराजांना तशी विनंती केली व विशेष कृपादृष्टी म्हणजे प. पू. महाराजांनी ते मान्य केले.

वेळ, कालावधी, जागा (मल्लीकार्जुन सभामंडप, मलकापुर) ठरल्यावर प. पू. महाराज व श्री रघुनाथशास्त्री पुण्याहून महाराष्ट्र एक्स्प्रेसने यांचे मलकापूर मुक्कामी आगमन झाले. कार्यक्रम स्थळाजवळ नानांचे घर असल्याने तेथेच एका खोलीत प. पू. महाराजांची निवासाची व्यवस्था करण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीमदभागवतसप्ताहास आरंभ झाला.

त्यावेळी मी नोकरीला नळगंगापूरला होतो. तेथून मी रोज दुपारी श्रीमद्‌भागवत ऐकावयास जात असे. शेवटी आरती म्हणायची जबाबदारी माझ्यावर सोपविली होती. खूप आनंद व समाधान मिळत होते. मी खूपच समाधानी होतो.

श्रीमद्‌भागवतसप्ताहाच्या शेवटच्या दिवशी सर्व उपस्थित

ज्येष्ठ-श्रेष्ठ मंडळींनी श्रीमद्भागवताची भव्य मिरवणूक व मोठ्या प्रमाणावर भोजनप्रसाद वितरणाची व्यवस्था केली होती. खूप आनंद व उत्साह सर्वांच्या ठिकाणी संचारला होता आणि ते साहजिकच आहे कारण भागवतकार प्रत्यक्ष आमचे प. पू. दत्तमहाराज हे होते.

परंतु ईश्वरेच्छा काय असेल हे आपण जाणू शकत नाही. समाप्तीच्या दिवशी मी सकाळी बुलढाण्यावरुन मलकापूरला जायला निघालो त्या बसमध्ये मला श्री प्रभूदंडे चिखलीहून निघून मोताळ्याला त्यांच्या नोकरीवर जात असताना त्यांची भेट झाली. त्यांनी प. पू. महाराजांचे धाकटे बंधू वासुदेवशास्त्री यांना देऊळगांवराजा मुक्कामी देवाज्ञा झाल्याचे सांगीतले व ही घटना प. पू. महाराजांना तुम्ही सांगा असे म्हटले.

मी मलकापूरला पोहोचलो तो कार्यक्रमाची सकाळी उत्साहात मोठी तयारी सुरु होती. असे आनंदाचे वातावरणात दु:खाची बातमी कशी सांगावी म्हणून मी विचार करीत असतानाच धाड येथील श्री गंगाधरमामा मला भेटले व म्हणाले, ‘अरे! बाळासाहेब आलात का?’ आता तयारीला लागा. मिरवणूक काढायची आहे. मी त्यांना म्हटले, ‘हो, मामा पण मी काय सांगतो ते अगोदर ऐका’ मग मी त्यांना ती दु:खद बातमी सांगीतली, त्यावर तेही विचारातच पडले व लगेच म्हणाले, सदर बातमी सांगायची आमची हिंमत नाही. नंतर त्यांनी श्री रघुनाथशास्त्री यांना एकीकडे बोलाविले, ते दोघेही शेजारी फोनची व्यवस्था असलेल्या श्री पाटलांकडे गेले व देऊळगांवराजाला फोन करून बातमीची खात्री करून घेतली. नंतर रघुनाथशास्त्री, श्री बंडूनाना, श्री गंगाधरमामा

व मी स्वत: असे आम्ही महाराजांच्या खोलीत गेलो व समोर बसलो पण बोलायची कोणाचीच हिंमत झाली नाही. जे महाराज डोळे लावून ध्यान करीत बसले होते, ते डोळे उघडून म्हणाले, 'नाना जे घडते ते ईश्वरी इच्छेने. आपल्याहाती काय आहे?' वाईट झाले पण त्याला इलाज नाही. तुम्ही श्रीमद्‌भागवताची मिरवणूक काढणे रद्द करा. आम्ही भागवताची सांगता करु व सर्वांना प्रसाद करा. ही श्रीव्यासांची गादी आहे त्याला काहीच दोष नाही. नंतर दुपारी आम्ही देऊळगांवराजा येथे जाऊ.

त्यानुसार श्रीमद्‌भागवताची सांगता झाली. नैवेद्य - आरती झाली व सर्वांना प्रसाद वितरण झाले. श्रीमहाराजांनी मात्र काहीच घेतले नाही. सर्वांचा फारच आग्रह झाल्यावर दुध प्राशन केले व दुपारी रघुनाथशास्त्री, वसंतराव जोशी व मी महाराजांना घेऊन बुलढाणा येथे आलो. प्रवास फार लांबचा असल्याने थोडी विश्रांती आवश्यक होती म्हणून आम्ही सर्व श्री वसंतराव जोशी यांच्या निवासी थांबलो. तेथे श्री महाराज हात-पाय धुणे वगैरे करून थोडे पाणी प्यायले व नंतर पुढचा प्रवास सुरु झाला.

अशारितीने श्रीमद्‌भागवताची थोरवी व त्याबद्दल महाराजांचे सद्‌विचार कळून आले.

"धन्य ते सद्‌गुरु महाराज"

# अंतिम भागवत सप्ताह गुलबर्गा

**-सौ. शांताबाई कमलापूरकर**

(डा. प्रभाकर कमलापूरकर व सौ. शांताबाई कमलापूरकर हे उभयता प. पू. योगीराज श्रीगुळवणी महाराज यांचे अनुग्रहीत असून डॉक्टांनी प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वरांकडून व सौ. शांताबाईंनी प. पू. समर्थ नानामहाराजांकडून मंत्रानुग्रह घेतलेला आहे. सौ. शांताबाईंचे माहेर मराठवाड्यातील निलंगा तालुक्यात खडक उमरगा हे होय. त्यांचे वडील श्री गोविंदराव कुलकर्णी व आई सौ. लक्ष्मीबाई कुलकर्णी. खडक -उंबरगेकर यांचे चार पिढ्यांच्या श्री विठ्ठलरखुमाई मंदिराचा इतिहास मोठा रोमांचक आहे. गोविंदरावांचे आजोबा बाळकृष्णपंत निझामाच्या १४०० अरब गार्डस् चे प्रमुख होते. त्यांना पंढरपूरला स्वप्नदृष्टांत होऊन विठ्ठलरखुमाईच्या मूर्ति मिळाल्या. त्यांची प्रतिष्ठापना त्यांनी लतिफशहा नावाच्या एका अवलियाच्या सल्लयावरुन खडक-उमरगा येथे केली. यात प्रत्यक्ष निझामाचे सहकार्य होते.)

प. पूज्य श्री दत्तमहाराजांच्या सहस्रचंद्र दर्शनाच्या सोहळ्यास मी, माझे यजमान डॉ. प्रभाकर कमलापूरकर आणि माझे सासू सासरे पुण्यास आलो होतो. प. पूज्य महाराज काही कार्यक्रमासाठी बाहेर निघाले होते, येवढयात त्यांचे आवडते शिष्य श्री. रघुनाथरावजी यांनी महाराजांना सांगितले की, गुलबर्ग्याहून डॉ. कमलापूरकर आपल्या आईवडिलांना घेऊन आलेले आहेत. तेव्हा महाराजांनी निरोप दिला त्यांना आंत घेऊन या. कार्यक्रमाला

निघालेले महाराज १०-१५ मिनीटे आमच्यासाठी थांबले. आंत गेले त्यावेळी त्यांनी माझ्या सासू- सासऱ्यांना नमस्कार केला आणि मग कार्यक्रमासाठी ते बाहेर पडले. केवढी ही लीनता, केवढी नम्रता! ते सर्व पाहून आम्ही थक्क झालो. या प्रसंगाने माझे सासरे फारच भारावून गेले. त्यांचे डोळे पाणावले; माझ्या सासऱ्यांच्या स्वभावात पूजा-अर्चा, जप-जाप्य अशा औपचारिक गोष्टींना फारसे स्थान नव्हते. पण एखाद्यावर संकट कोसळले किंवा कुणी अडीअडचणीत असेल तर, त्याला शक्य त्या सर्वप्रकारे मदत करीत. कधी पैशानी, कधी धान्य, कधी कपडा-लत्ता असे देऊन त्याची अडचण दूर करीत यालाच ते देवपूजा मानीत. हे त्यांचे कार्य अखंड चाललेले असे. पण कधी पोथी, पुराण ऐकणे असे त्यांनी केले नाही. पण प. पूज्य श्री. महाराजांच्या या भेटीनंतर त्यांना वाटले, की श्री. महाराजांचा भागवत सप्ताह आपल्या घरी करावा आणि ती इच्छा त्यांनी आपल्या मुलाला म्हणजेच माझ्या यजमानांना बोलून दाखवली. सप्ताहाचा खर्च खूप येतो असे आम्ही ऐकले होते. तो खर्च आपल्याला झेपेल का असा विचार मनांत घोळत होता.

त्यानंतर आम्ही उभयता इंदोरला प. पू. नानामहाराजांच्या दर्शनाला गेलो होतो. त्यावेळी त्यांना आम्ही आमच्या घरी प. पू. दत्तमहाराजांचा भागवतसप्ताह करण्याचा संकल्प सांगून त्यांच्या आशीर्वादासाठी प्रार्थना केली. प. पू. नाना म्हणाले, 'फार चांगली गोष्ट आहे. तो (दत्तमहाराज)साक्षात दत्त आहे! सप्ताह उत्तम होणार यात शंकाच नाही. आम्हीपण रोज तिथे श्रवणाला येणार बरं का!' हा त्यांचा आशीर्वाद घेऊन आम्ही पुण्याला आलो.

त्याच वेळी प. पूज्य महाराजांनी घरच्या लोकांच्या आग्रहावरून आपल्या घरी-रेणुकानिवासमध्ये, सप्ताह सुरू केला

होता. सप्ताह वाचन संपवून महाराज नुकतेच बसले होते. कुणी तरी त्यांना सांगितले की, गुलबर्ग्याहून डॉ. कमलापूरकर आले आहेत. त्यांनी लगेच आम्हाला आत बोलावले. आंम्ही उभयंता आत गेलो, नमस्कार केला. तिथे श्री. रघुनाथरावजी उभे होते. त्यांना आमचा मानस सांगितला. ते लगेच म्हणाले, "विचाराना महाराजांना!" आम्ही लगेच महाराजांना विचारले, "महाराज, माझ्या सासऱ्यांची फार इच्छा आहे की, आमच्या घरी आपण भागवत सप्ताह करावा." आणि एका क्षणाचाही विलंब न लावता महाराज रघुनाथरावांना म्हणाले, "बघा कोणती तारीख योग्य आहे? कोणत्या तारखेला जमतय ते?" रघुनाथरावांनी सांगितले, "३ तारीख योग्य आहे." वास्तविक ३ तारखेला त्यांच्या मुलीच्या घरी लग्न होते. महाराज म्हणाले सकाळी अक्षत पडेल त्या नंतर आम्ही येथून निघू. या सर्व घटनेचे आम्हाला अतोनात - आश्चर्य वाटले कारण बाहेर बरेच लोक बोलत होते की महाराज आता सप्ताह करत नाहीत वगैरे वगैरे. त्या मुळे त्यांनी एकदम आमच्या घरी येण्याचे कबुल केल्यामुळे आमची मने भारावून गेली. खूप खूप आनंद झाला. खर्चाचा विचार मनातून आपोआप आम्हाला न सांगता पसार झाला.

आम्ही कांची जगद्गुरु शंकराचार्यांना सप्ताहाचे आमंत्रण दिले. त्यावेळी जगद्गुरु जयेंद्रसरस्वती म्हणाले, 'प. पू. श्रीदत्तमहाराजांचा भागवतसप्ताह आपल्या घरी होणार. आपण भाग्यवान आहात!'

तो आमच्या घरचा भागवत सप्ताह अगदी अवर्णनीय झाला. प. पू. दत्तमहाराज बरोबर ३ फेब्रुवारी १९९१ रोजी पू. सौ. आईसाहेब, पू. सौ. ताईमहाराज, पू. अशोकमहाराज, सौ.

सुलभाताई तसेच मा. गु. भ. आप्पासाहेब साबळे यांच्यासह आमच्या घरी आले. तिथी होती माघ वद्य ६-प. पू. दत्तमहाराजांचा वाढदिवस. आम्हाला आमच्या भाग्याचे कौतुक वाटले. सात दिवस प. पू. दत्तमहाराज, सौ. आईसाहेब, सौ. ताईमहाराज अशा थोर विभूतींचा सहवास आम्हाला लाभला. त्यांची सेवा आमच्या हातून घडली. आमची वेडीवाकडी सेवा त्यांनी गोड करून घेतली ; आम्हाला अगदी धन्य वाटले.

आम्ही प. पू. दत्तमहाराजांना अभ्यंगस्नान घातले. पाच सुवासिनींनी त्यांना ओवाळून तेल लावले. डॉक्टरांनी ही सेवा अत्यंत प्रेमाने बराच वेळ केली. तेव्हा महाराज म्हणाले, 'पुरे आता! दिवसभर काम करायचे आहे.' तेव्हा डॉक्टरांनी आपण आता सात दिवस काम बंद ठेवणार असल्याचे सांगीतले.

संहितावाचनासाठी कासारशिरसीचे वे. शा. सं. जोशी गुरुजी यांना प. पू. महाराजांनीच बोलावले होते. सकाळी ते संहिता वाचन करीत. प. पू. महाराजांच्या निरुपणाला दुपारी ३ वाजता आरंभ होई. ५-५॥ वाजता १० मिनिटांची विश्रांती होई. नंतर ७॥वाजेपर्यंत निरुपण चालत असे. प. पू. महाराजांचे निरुपण रसपूर्ण व मर्मग्राही असे. साधकांचे प्रबोधन करून त्यांच्यातील भक्तिभाव पुष्ट करण्याचे त्यांचे कौशल्य वर्णनातीत आहे. भक्तिरसाच्या अमृतवर्षावात आम्ही सात दिवस न्हाऊन निघालो.

सप्ताहाची सांगता झाली. प. पू. महाराजांनी आमच्या सर्व लहानथोर कुटुंबियांना लग्नात करावेत तसे भरगच्च आहेर केले. ते निघण्याच्या तयारीत असतानाच कांचीचे परमाचार्य जगद्गुरु चंद्रशेखरेंद्र सरस्वती यांच्याकडून एक पत्र व पार्सल आले. त्यातील पत्र प. पू. दत्तमहाराजांना उद्देशून असल्याने ते त्यांनी उघडून वाचले.

पत्र वाचताना त्यांच्या नेत्रातून घळघळ अश्रु वाहू लागले. ते पत्र त्यांनी कुणालाही न दाखवता खिशात ठेवले. (आपला सन्मान प्रकट न करण्याच्या प. पू. दत्तमहाराजांच्या स्वभावाचे हे आणखी एक उदाहरण होय.) त्या पार्सलमध्ये कांची परमाचार्यांनी महाराजांसाठी एक मोत्याचा हार आणि शाल पाठविली होती. डॉक्टर प्रभाकररावांनी तो हार महाराजांच्या गळ्यात घातला आणि शाल पांघरली. लगेच महाराजांनी ती शाल डॉक्टरांनाच प्रसाद म्हणून दिली. त्या पार्सलमध्येच एक चंदनाचा हार गोपालकृष्णाच्या मूर्तीसाठी होता. 'तुमचे जगद्गुरुंशी चांगले संबंध दिसतात,' असे म्हणून महाराजांनी आमचे कौतुक केले.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट इथे घडली, केवळ महाराजांच्या कृपेने, इथे एक भजन संच तयार झाला. भागवत सप्ताह चालू असताना सकाळी 'प्रभाती' करावी असे माझे यजमान डॉ. प्रभाकर यांच्या मनात आले आणि त्यांनी ही इच्छा काही लोकांना बोलून दाखवली. त्या प्रमाणे काही मंडळी 'प्रभाती' करण्यास जमली. सकाळी ६ वाजता 'प्रभाती' करावयाचे असे ठरले. पण एवढया सकाळी महाराजांना त्रास होईल या विचाराने प्रभाती आम्ही वरच्या मजल्यावरती सुरू केली. पहिली भूपाळी म्हणायला सुरूवात झाली असेल नसेल एवढयात महाराज एवढया पायऱ्या चढून आले आणि प्रभाती ऐकायला बसले. आंम्हाला खरोखर फारच आश्चर्य वाटले. ते म्हणाले आम्ही रोज प्रभाती ऐकणार, आणि सात दिवस रोज त्यांनी प्रभाती ऐकली. त्यांना ती फार आवडली. त्यांनी आम्हाला त्यांच्या घरी नवरात्रात भजन करण्यास बोलावले. तसेच श्री. गुळवणी महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवात पण त्यांनी आम्हाला बोलावले होते. त्यांच्याच कृपेने

गेली १०-१२ वर्षे सतत या उत्सवात सेवा करायला आम्ही येत आहोत. ही केवळ त्यांचीच कृपा.

आणखी एक गोष्ट येथे सांगाविशी वाटते की, आमच्या या 'स्वरांजली 'भजन मंडळीचा कार्यक्रम पुण्यासारख्या ठिकाणी व्हावा अशी यांची अत्यंत तीव्र इच्छा होती. त्यांची ही इच्छा पण महाराजांनी पूर्ण केली. त्यांचे आमच्यावर अनंत अनंत आशीर्वाद आहेत. पूज्य श्री गुळवणी महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवात आम्ही कार्यक्रमाला आलो की सकाळी किंवा संध्याकाळी प. पूज्य श्री दत्तमहाराजांच्या घरी आमचे भजन व्हायचे. एकदा सकाळी भजन चालू होते, महाराज पूजा करत करत आमचे भजन ऐकत होते. शेवटी भैरवी 'बाजे किसन की पैजनीया'हे संत मीराबाईचे भजन स्वत: लावलेल्या चालीत मीराताई गाऊ लागल्या आणि ते भजन ऐकता ऐकता महाराज एकदम म्हणाले 'त्या युगांत मीरेचे भजन ऐकतानां कृष्णाला काय होत असेल याची अनूभुती आज आंम्हाला येत आहे.' हे ऐकून मीराताईचे डोळे पाणावले त्यांना अगदी धन्य वाटले. आपली सेवा परमेश्वरानी स्विकारली याचा अपरंपार आनंद त्यांना झाला. हे मीरेचे भजन महाराजांना फार आवडायचे. या भजनाला चाल स्वत: मीराताईनीच लावलेली आहे. हे भजन पूढे खूप प्रसिध्द झाले आहे. बरेच जण हे भजन आपल्या कार्यक्रमात म्हणतात ही त्यांचीच कृपा.

प. पूज्य सौ. आईसाहेब खूपच आजारी होत्या त्यावेळी आम्ही उभयता पुण्याला आलो होतो. महाराजांच्या घरी गेलो, तिथे आम्हाला कळले की सौ. आईसाहेबांना नळीच्या सहाय्यानेच काही भरवणे चालले आहे. आम्ही तिथे असताना ती नळी निघाली होती आणि बऱ्याच लोकांनी प्रयत्न केला, पण ती नळी नाकातून

घशात सरकेचना. ENT तज्ज्ञ डॉक्टरांना बोलावून आणले. त्यांनी सांगितले यांना दवाखान्यात घेऊन जावे लागेल. भूल देऊन ही नळी पुन्हा घालावी लागेल. अशी ही गडबड चालू होती, तेव्हा माझ्या मनात विचार आला, अर्थात तो विचार होऊन महाराजच माझ्या मनात आले आणि मला असे वाटले, नळी सरकवण्याचा प्रयत्न आपण का करू नये; आणि तसे म्हणालो, मी प्रयत्न करू का? मी प्रयत्न करायला लागलो, एकदा तो प्रयत्न फसला पण पुन्हा मी प्रयत्न करू लागलो तोच कुणीतरी महाराजांना बाहेर जाऊन सांगत होते की, नळी आत सरकत नाही. त्याच क्षणी महाराज त्याला म्हणाले आता आत जाऊन तुम्ही पहा. नेमके त्याचवेळी माझ्या प्रयत्नांनी ती नळी आत सरकवली गेली होती. म्हणजेच महाराजांनीच हे माझ्या हातून घडवून आणले ही त्यांचीच कृपा. त्यांच्याच कृपेने हे सर्व घडले यांवर माझा संपूर्ण विश्वास आहे. या प्रसंगाची आठवण झाली की, मन अगदी भारावून जाते ते मला शब्दात सांगता येणारच नाही. हे सर्व शब्दांपलीकडचे आहे ते अनुभवलेच पाहिजे.

**कांची कामकोटी पीठाचे परमाचार्य**

**प. प. चन्द्रशेखरेन्द्र सरस्वती यांचा अभिप्राय.**

‘येथे आलेली विद्वान् दिग्गज मंडळी, ही त्यांच्या क्षेत्रांत वावरणारी व कर्माचरणी आहेत. पण आमचे कवीश्वरशास्त्री हे खरे मुरलेले आहे. जसा मुरलेला आंवळा हा परिपूर्ण, तृप्त व संपृक्त द्रावण होऊन अधिकाधिक गुणकारी असतो त्याप्रमाणे! ‘

# श्रीदत्तमहाराज कवीश्वर नामावली

डॉ. वासुदेव व्यं.देशमुख

मार्गदर्शक-डॉ. रा. ल. जोशी

१ उपमन्युगोत्रप्रकाशक श्रीदत्त कवीश्वर।।

२ कलिप्रभावितजनदयार्द्र श्रीदत्त कवीश्वर।।

३ श्रीगणेशलोकस्थित श्रीदत्त कवीश्वर।।

४ स्वीकृतमानवविग्रह श्रीदत्त कवीश्वर।।

५ सप्तर्षिकुलदीपक श्रीदत्त कवीश्वर।।

६ कवीश्वरोपाख्यान्वर्थक श्रीदत्त कवीश्वर।।

७ धुंडिराजतपफल श्रीदत्त कवीश्वर।।

८ सरस्वतिगर्भरत्न श्रीदत्त कवीश्वर।।

९ वासुदेवयति-अंकस्थित श्रीदत्त कवीश्वर।।

१० वक्रतुंडनामधारक श्रीदत्त कवीश्वर।।

११ पुराणकथनेच्छुक श्रीदत्त कवीश्वर।।

१२ गीताप्रेमी बालक श्रीदत्त कवीश्वर।।

१३ नृसिंहवाटिकावासी श्रीदत्त कवीश्वर।।

१४ मातृतपस्यासहायक श्रीदत्त कवीश्वर।।

१५ वेदशास्त्रसंपादक श्रीदत्त कवीश्वर।।

१६ नृसिंहसरस्वतिचरणाश्रित श्रीदत्त कवीश्वर।।

१७ श्रीगुरुचरणांबुजनिर्भर श्रीदत्त कवीश्वर।।

१८ गुरुदर्शनार्थलंघितमहापूर श्रीदत्त कवीश्वर।।

१९ श्रीमद्भागवतपाठपरायण श्रीदत्त कवीश्वर।।

२० श्रीमद्भागवततत्त्वोपदेशक श्रीदत्त कवीश्वर।।

२१ श्रीभागवतरहस्योद्घाटक श्रीदत्त कवीश्वर।।

२२ साक्षात् श्रीमद्भागवत श्रीदत्त कवीश्वर।।

२३ भागवतोत्तम श्रीदत्त कवीश्वर।।

२४ भागवतसुधारसचंद्र श्रीदत्त कवीश्वर।।

२५ सर्वदर्शनपारग श्रीदत्त कवीश्वर।।

२६ सुंदरलक्ष्मीवरमालित श्रीदत्त कवीश्वर।।

२७ अनेकविद्वत्सभाजिष्णु श्रीदत्त कवीश्वर।।

२८ परमाचार्यार्पित-सुवर्णकंकण श्रीदत्त कवीश्वर।।

२९ तनयावसानदु:खसहिष्णु श्रीदत्त कवीश्वर।।

३० आचार्यचतुष्टयसंमानित श्रीदत्त कवीश्वर।।

३१ पुण्यपत्तनवासी श्रीदत्त कवीश्वर।।

३२ छात्रप्रिय अध्यापक श्रीदत्त कवीश्वर।।

३३ नवनीतमृदुमानस श्रीदत्त कवीश्वर।।

३४ हित-मित-सत्यवाचक श्रीदत्त कवीश्वर।।

३५ श्रीगुरुवामनकृपाश्रित श्रीदत्त कवीश्वर।।

३६ वासुदेवयतिग्रंथप्रकाशक श्रीदत्त कवीश्वर।।

३७ श्रीगुरुदेवचरित्रलेखक श्रीदत्त कवीश्वर।।

३८ त्रिवारराष्ट्रपतिसंमानित श्रीदत्त कवीश्वर।।

३९ जितसर्वेंद्रिय श्रीदत्त कवीश्वर।।

४० दोषादर्शन श्रीदत्त कवीश्वर।।

४१ अमानी-मानद श्रीदत्त कवीश्वर।।
४२ सर्वत्र समदर्शी श्रीदत्त कवीश्वर।।
४३ अजातशत्रु श्रीदत्त कवीश्वर।।
४४ पितृपरायण श्रीदत्त कवीश्वर।।
४५ मातृभक्तिपर श्रीदत्त कवीश्वर।।
४६ कुलाचरणदक्ष श्रीदत्त कवीश्वर।।
४७ कुलपरंपरासंवर्धन श्रीदत्त कवीश्वर।।
४८ संतचरणरत श्रीदत्त कवीश्वर।।
४९ संतचित्ततोषण श्रीदत्त कवीश्वर।।
५० संतवचनकृत श्रीदत्त कवीश्वर।।
५१ श्रीधरयतिप्रिय श्रीदत्त कवीश्वर।।
५२ सज्जनगडसमारोहक श्रीदत्त कवीश्वर।।
५३ योगिराजआज्ञापित श्रीदत्त कवीश्वर।।
५४ समर्थसंनिधि ध्यानावस्थित श्रीदत्त कवीश्वर।।
५५ शांभवीदीक्षाप्राप्त श्रीदत्त कवीश्वर।।
५६ चिच्छक्तिविलासदर्शी श्रीदत्त कवीश्वर।।
५७ योगिराजप्रिय श्रीदत्त कवीश्वर।।
५८ करुणासागर श्रीदत्त कवीश्वर।।
५९ आर्तबंधु श्रीदत्त कवीश्वर।।
६० दीनोद्धारक श्रीदत्त कवीश्वर।।
६१ श्रीवासुदेवनिवाससंकल्पक श्रीदत्त कवीश्वर।।
६२ श्रीवासुदेवनिवाससंवर्धक श्रीदत्त कवीश्वर।।
६३ योगिराजप्रकटितमहिमा श्रीदत्त कवीश्वर।।

६४ श्रीगुरुवामननिर्दिष्टमोक्षमार्गदर्शक श्रीदत्त कवीश्वर।।
६५ शक्तिपाताचार्य श्रीदत्त कवीश्वर।।
६६ श्रीगुरुवामनशिबिकावाहक श्रीदत्त कवीश्वर।।
६७ श्रीगुर्वर्पितजीवित श्रीदत्त कवीश्वर।।
६८ श्रीवामननिवासनिर्माता श्रीदत्त कवीश्वर।।
६९ श्रीअमरेश्वरमंदिरजीर्णोद्धारक श्रीदत्त कवीश्वर।।
७० श्रीनृसिंहगुरुसंकल्पपूरक श्रीदत्त कवीश्वर।।
७१ तुल्यनिन्दास्तुति श्रीदत्त कवीश्वर।।
७२ शांतिसागर श्रीदत्त कवीश्वर।।
७३ अहैतुकीकृपाकर श्रीदत्त कवीश्वर।।
७४ परगुणपरमाणुपर्वतीकृत् श्रीदत्त कवीश्वर।।
७५ परदोषकंठधर श्रीदत्त कवीश्वर।।
७६ परापराधसाहन श्रीदत्त कवीश्वर।।
७७ परेच्छाप्रारब्धभोगी श्रीदत्त कवीश्वर।।
७८ अनाक्रोशप्रारब्धाद्दत श्रीदत्त कवीश्वर।।
७९ सहजसमाधिस्थित श्रीदत्त कवीश्वर।।
८० आत्माराम श्रीदत्त कवीश्वर।।
८१ भक्तिसुधापरिक्लिन्नहृदय श्रीदत्त कवीश्वर।।
८२ नागेशाचार्यशिक्षित श्रीदत्त कवीश्वर।।
८३ द्वैततिमिरसूर्य श्रीदत्त कवीश्वर।।
८४ अज्ञानध्वांतभास्कर श्रीदत्त कवीश्वर।।
८५ शरणागतवत्सल श्रीदत्त कवीश्वर।।
८६ रेणुकानिवाससंस्थित श्रीदत्त कवीश्वर।।

८७ कुटुंबवत्सल श्रीदत्त कवीश्वर।।
८८ सम्यक्पूरितगृहस्थाश्रम श्रीदत्त कवीश्वर।।
८९ वेदांतपारिजातसौरभानुवादक श्रीदत्त कवीश्वर।।
९० शुक्लांबरधर श्रीदत्त कवीश्वर।।
९१ प्रसन्नमुखचंद्र श्रीदत्त कवीश्वर।।
९२ मधुरहास्य श्रीदत्त कवीश्वर।।
९३ दर्शनपावन श्रीदत्त कवीश्वर।।
९४ कूर्मकृपादृष्टि श्रीदत्त कवीश्वर।।
९५ सहजवार्तोपदेश श्रीदत्त कवीश्वर।।
९६ अमोघसंकल्प श्रीदत्त कवीश्वर।।
९७ वराभयकर श्रीदत्त कवीश्वर।।
९८ भगवद्गुणगानप्रिय श्रीदत्त कवीश्वर।।
९९ यजनयाजनचोदक श्रीदत्त कवीश्वर।।
१०० भुक्तिमुक्तिप्रदाता श्रीदत्त कवीश्वर।।
१०१ निगृहीतसर्वेंद्रिय श्रीदत्त कवीश्वर।।
१०२ योगेनान्ते तनुत्यागी श्रीदत्त कवीश्वर।।
१०३ मृत्यंजय श्रीदत्त कवीश्वर।।
१०४ स्वानंदलीन श्रीदत्त कवीश्वर।।
१०५ निजधामारोहक श्रीदत्त कवीश्वर।।
१०६ नित्यसनातन श्रीदत्त कवीश्वर।।
१०७ स्मर्तृगामी श्रीदत्त कवीश्वर।।
१०८ वासुदेवकृतसारथ्य श्रीदत्त कवीश्वर।।